**बातमीपत्रे**--सरंजामानिशी निपाणीकर अंकलीस कृष्णा स्नानास गेल्यावावत आवाजी पोवार व नारो गंगाधर यांचे छत्रपतीस (६७२); हुकेरी, कितूर व बेळगाव भागातील इंग्रज लष्कराच्या हालचालीसंबंधी हणमंत पवार यांचे (६४३); आपाजी नलगे व सखोजी धावडे यांसह भुदरगड येथील लोक पळून गेल्यावावत (६४४); इंग्रजांचा मुक्काम निपाणीस आल्यावद्दल सिदोजी साळोखे व कृष्णाजी संभाजी यांचे (६४८); व रघुनाथ चव्हाण यांचे (६४९); ग्रॅप्टन साहेव वेसर्डेहून भुदरगडास येणार असल्यावावत कृष्णाजी गोविंद यांचे (६६८).

रुमाल क्र. ५

पुडके क्र. १—(चालू)

याद्या—छत्रपतींच्या वाड्यातील कामगारांनी कामे करण्यासंबंधी (अपूर्ण) (६५०); कोट करवीर-कडील छत्रपतींना निवेदन करावयाच्या कामासंबंधी (६५४, ६५६); मुरारराव घोरपडे यांनी रामपूर येथे ठाणे घालून केलेल्या वसुलासंबंधी (६५७, ६५८, ६५९); चिकोडी मनोळीसंबंधी निपाणीकर व करवीरकर यांच्या देण्याघेण्यासंबंधी (६६५); वेबरसाहेब कलेक्टर व पोलिटिकल एजंट धारवाड यांची मुलाखत करवीर मुक्कामी होऊन बोलणी झालेसंबंधी (६६१); तोरगलकर किल्ला सोडून गेल्यानंतर तेथील गडकरी, किल्ल्यातील नेक व्यापारी वगैरे यांना छत्रपतींच्याकडून जावयाच्या आज्ञापत्रांच्या मसुद्याची (६६६); तोरगलकरांकडून ठाणे बुवासाहेब छत्रपतीने घेतल्यासंबंधी (६७६, ६७७).

---

ज. क्र. ५, रु. क्र. ५, पु. क्र. २, का. सं. ६७८–७३५ (५८).

सु. १२२७ ते १२२८, इ. स. १८२६-२७ ते १८२७-२८.

आज्ञापत्र—नरसिंगराव सूर्यवंशी यांस खोदशी (खोची) येथील नायकीचे वतन दिल्याबद्दल (७००).

पत्रे : (छत्रपतींस)—कटकोळ ठाण्याबाबतची कलमबंदी पोचल्याबाबत (६७८); माही यात्रेचा प्रसाद पाठविला असून सरकारवाडा बांधण्याचे काम चालू आहे म्हणून कृष्णाजी गोविंदचे (६७९); कटकोळचे ठाणे घेण्यास हुजूर पथकाचे लोक पाठविणेबाबत बाबाजी सुर्वे व गणपतराव जाधव यांचे (६८०); पन्हाळा येथील वाघ दरवाजा उघडण्याविषयी कर्नल यांची जिकीर आहे म्हणून राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (६८१); बागेवाडीस हवे ते जिन्नस पोचते करीत असून गावात त्राण राहिला नाही म्हणून बाबाजी खोड यांची (६८२-६८५); शिमग्याचा प्रसाद पन्हाळगडी सर्वांना वाटल्यासंबंधी राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (६८६); वेबर साहेबाचा मुक्काम बेळगावास होणार म्हणून बाबाजी खोड यांचे (६८७, ६८८), वेबरसाहेब धारवाडास जात असून त्यांचे लष्कर पाच्छापूराहून जाणार आहे म्हणून बाळाजी जासूद यांचे (६८९); पाच्छापूरचे लष्कर सोलापुरी व बाकीचे बधाळ येथे असल्याबद्दल बाबूराव खोड यांचे (६९०); भुदरगड येथील वर्तमान यथास्थित असल्याबद्दल (अपूर्ण) (६९१); पन्हाळा येथे चोरांच्या सुळसुळाटामुळे लोक हवालदील झाले आहेत म्हणून राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (६९२); बंडातील लोक फिरल्यास उपद्रव करीत असून त्यांना काही आरब व राऊत लोक येऊन मिळाले म्हणून भगवंतराव प्रतिनिधी यांचे (६९३); जीवनराव हवालदार, बच्याचार्य पंडितराव, कृष्णराव गर्दे व प्रतिनिधी यांच्यात खातरजमा झाल्याबाबत जीवनराव, इत्यादींचे (६९४); नानावील व कुंभवड या गावांच्या सीमा तंट्याबाबत मुजाजी हवालदार व आबाजी सबनीस यांचे (६९५); गोखल्यांच्या फौजेने बंडवाल्यांपुढे माघार घेतली म्हणून प्रतिनिधी यांचे (६९६); निपाणीकराकडील स्वार व पायदळ पट्टणकुडी व खडकलाट येथे जमल्यासंबंधी व सामानगडावरील गडकऱ्यांची हलाखी आहे म्हणून मोरो गोविंद यांचे (६९७); मनोहरगडी श्रीस विवाह समारंभाचे दुस्त समर्पण केल्यासंबंधी रामचंद्र विसाजीचे (६९८); भंडारहालीस ठाणे घालणेसाठी कटकोळहून लोक पाठवल्यासंबंधी व्यंकटराव नलवडे यांचे (६९९); यशवंत शामजीकडून प्रचीतगडी असलेल्या बंडवाल्याचे पारिपत्य झाले नाही म्हणून भगवंतराव प्रतिनिधी यांचे (७०१); तलणग्यास शिवाजीपंत खाडेकर यांना पाठवून द्यावे म्हणून रताजीराव चव्हाण यांचे (७०२); प्रचीतगड येथील बंडवाले व गोखले यांच्यातील तह, यशवंत शामजी व गोपाळ जिवाजी यांचा गावोगावी उपद्रव व सुवर्णदुर्ग इंग्रजांनी घेतला इत्यादिबाबत भगवंतराव प्रतिनिधींचे (७०३); इचलकरंजीत पेंढारी व स्वार जमल्याबाबत रताजीराव चव्हाण यांचे (७०४); शिपूरचे ठाणे घेतल्याबाबत रताजीराव चव्हाण यांचे (७०५); लग्न समारंभाचे दुस्त, विडे व नारळ श्रीस (भुदरगड येथील) समर्पण केल्यासंबंधी रेखोजी माधव व कृष्णाजी गोविंद यांचे (७०६); यंकणमूर्डी येथे असल्याबाबत आप्पाजी देसाई, यांचे (७०७); बागेवाडी, गोकाक व पाच्छापूर येथे इंग्रजांकडील जमाव आल्यासंबंधी लहूजी पवार

**रुमाल क्र. ५**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे : छत्रपतींस—(चालू)**

यांचे (७०८); तोरगलकराच्या कटकोळवरील उपद्रवाबाबत व खर्चाची सोय होण्यासंबंधी बाबाजी सुर्वेचे (७०९); यंकनमर्डीस आलेल्या इंग्रज लष्कराची बर्दास्त ठेवीत आहे म्हणून बाबाजी सुर्वे यांचे (७१०); आजरेकराच्या सामानगड भागातील उपद्रवासंबंधी लहूजी पवार यांचे (७११); नेमल्या जागी डेरे देऊन तोफा उडवल्यासंबंधी हणमंतराव निंबाळकर व रताजीराव चव्हाण यांचे (७१२); तोरगलकर व करवीरकर यांच्यात चाललेल्या लढयाबाबत बाबाजी सुर्वे यांचे (७१३); करवीरचे सैन्य व तोरगलकर यांच्यातील लढाईबद्दल व सैन्याच्या पोटापाण्याची व्यवस्था होण्याबाबत बाबाजी सुर्वे यांचे (७१४, ७१५); पन्हाळा किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन करीत आहे म्हणून राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (७१६, ७२४, ७२७); पाडळीकर यांची गुरे जप्त केल्याबाबत आप्पोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे आईसाहेबांना (७१७); कटकोळ ठाण्यावर तोरगलकर, बनूरकर, मुधोळकर, हे चालून आल्यावर झालेल्या लढाईसंबंधी बाबाजी सुर्वे यांचे (७१८); कटकोळवरील स्वारीत तोरगलकरांचा मोड झाल्याविषयी व्यंकटराव नलवडेचे (७१९, ७३१); तोरगलकरांच्या कटकोळ व मनोळी येथील शिलशिल्याबाबत व्यंकटराव नलवडे यांचा (७२१); इंग्रजांचे स्वाधीन सामानगड करीत आहे म्हणून सामानगडकऱ्यांचे (७२५); पावनगड इंग्रजांच्या स्वाधीन केल्याबाबत केदारजी निकम व विठ्ठल आबाजी सबनीस यांचे (७२६); किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केल्यास दुसरीकडे न जाता किल्ल्यातच राहणार असल्यासंबंधी सामानगडकऱ्यांचे (७२८.७२९); इंग्रज जनरल व त्याबरोबर आलेल्या लोकांची व्यवस्था ठेवल्याबाबत राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (७३०); तोरगलकरांशी लढा चालू ठेवण्याविषयी खर्चाची व्यवस्था व्हावी म्हणून बाबाजी सुर्वे यांचे (७३२); भुदरगडी हुशारीने आहे म्हणून कृष्णाजी गोविंद यांचे (७३३); पन्हाळा, पावनगड वगैरे पांच किल्ल्यांच्या सोडचिठ्या पाठविण्याबद्दल निसबत यांचे (७३४); तोरगलकरांचे शिलशिल्यामुळे वसूल बंद असून शिबंदीच्या खर्चाची सोय करण्याबाबत बाबाजी सुर्वे व गणपतराव जाधव यांचे (७३५).

**रवासुदगी**—पन्हाळा, पावनगड, आकिवाट, सामानगड इत्यादि इंग्रजांचे स्वाधीन करण्याबद्दल झालेल्या नोंदी (७२०, ७२२, ७२३).

---

**ज. क्र. ६, रु. क्र. ६, पुडके क्र. १, का. सं. ७३६—८०३ (६८),**

**सु. १२२७ ते १२३४, इ. स. १८२६–२७ ते १८३३-३४.**

**आज्ञापत्रें**—रुपये आणण्यास पाठविलेल्या इसमास मसाला द्यावा म्हणून गावकामगार खंगदाळ यांस राजमंडळाकडून (७४४, ७४५, ७४६); चैत्र वद्य ८ चे रुपये पाठवून देणेबद्दल अंताजी विरुपाक्ष यांस राजमंडळाकडून (७५१); गोपाळभट जोशी यास जमीन दिल्याबद्दल गावकामगार आंबर्डे यास (७५४); जोत्याजी निंबाळकर यास प्रायश्चित्तासाठी आलेल्या खर्चाच्या फेडीबाबत छत्रपतींची (७५५); जप्त असलेली सरंजामी गावे लक्ष्मीबाई घोरपडे यांच्या स्वाधीन करण्यासंबंधीं छत्रपती यांचे (७६२); आबाजीपंत वाकनीस याची इनाम जमीन चालवावी म्हणून गावकामगार बसर्गे यास यांस रताजीराव चव्हाण यांचे (७८३); श्रीपाद श्रीधर याची जमीन जप्त करण्यासंबंधीं श्रीनिवास यांस राजमंडळाकडून (७८५); जोत्याजीराव निंबाळकराचे कर्ज फेडीसाठी सामानगडचा ऐवज लावून दिल्यासंबंधी छत्रपतीचे (७९६).

**इनामपत्रें**—खंडोजी निंबाळकर देसाई यांनी सिदोजीराव निंबाळकर यांस बाळेकूंद्र इनाम दिल्याबद्दल (७६८, ७६९).

**निवाडपत्र**—यारोजी भगवंत काशिद यांच्या वतनासंबंधीं गांवकामगार व गांवकरी वडगांव यांजकडून (७५५).

रुमाल क्र. ६

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—छत्रपतींस :** तोरगलकराशी चालू असलेल्या युद्धासंबंधीं गणपतराव जाधव सरनाईक यांचे (७३६); तोरगलकराशी झालेल्या लढाईबाबत व खर्चाची व्यवस्था होणेबाबत बाबाजी सुर्वे व गणपतराव जाधव सरनाईक यांचे (७३७); सदोबा पिराचा प्रसाद पाठविल्याबाबत राणोजी दळवी व आबाजी हणमंत यांचे (७३८); छत्रपतीकडील सवालाजवाबा संबंधी सेना खासखेल यांना पत्र पाठवू म्हणून थॉमस मन्रो यांचे (७४०); इंग्रज कर्नल याने सज्जा कोठींवर बावटा लावल्यासंबंधी राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (७४१); शिमग्याचा प्रसाद सर्वांना वाटल्याबाबत राणोजी दळवी व हणमंत आबाजी यांचे (७४२); वतनाची मोकळीक होण्याबाबत आप्पाजी दसाई यांचे (७४३); गोखले व बंडवाले यांच्यातील चकमकीसंबंधी भगवंतराव प्रतिनिधी यांचे (७४८); भूदरगड येथील जत्रेचा प्रसाद व नारळ पाठविला आहे म्हणून कृष्णाजी गोविंद यांचे (७४९), कारकुनासह येत आहे म्हणून शिवाजी बल्लाळ प्रसिद्धगड याचे (७५०); खानापूरजवळील इंग्रज लष्करातील बुणगे लोक चोऱ्या करतात म्हणून लहूजी पवार याचे (७५५); दत्तविधान झाले म्हणून भगवंतराव प्रतिनिधी यांची (७५८, ७५९, ७६०); एकतर्फी अंमलाच्या चौकशीसाठी प्रतिनिधींचा कारकून रॉबर्ट कीटकडे परत गेला त्यासंबंधी जिवाजी बल्लाळ याचे (७६१); वसर्गेच्या रानात कोणा स्त्रीस ठार मारलबद्दल आबाजी गणेश याचे (७६३); असणे गांवाच्या शीव तंटचाचा निकाल करण्याबद्दल सब-कलक्टर याचे (७६४); नसरी येथे छत्रपतीचा अमल असल्याने लोक बाहेर पडल्यासंबंधी महादजी शिंदे व भास्कर हरी यांचे (७६५); आज्ञेप्रमाणे निघून येतो म्हणून आप्पाजीराव देसाई यांचे (७६७); माधवराव फडणीस मेणवलीकर यांच्या लग्नास यावे म्हणून रामचंद्र गंगाधर भाऊ यांचे (७७२); भरतगडचे चोरी वखेडा करणाऱ्या लोकांस चौकशीसाठी पाठविण्याचा हुकूम कलेबाबत पो. ए., धारवाड, यांचे (७७७); गव्हर्नर यांच्या मुक्कामासंबंधी व सातान्याचे छत्रपती करवीरास दवीच्या दर्शनास येणार म्हणून करवीरकर वकीलाचे (७७९); नापीक झाल्यामुळे कटकोळ येथील वसूलात अडचण आहे म्हणून रायाजी भीमराव याचे (७८०); कागलकराच हत्ती परत करण्याबद्दल पो. ए., धारवाड, यांचे, (७८४); सातारकरांची भावजय कैलासवासी झाल्यासंबंधीं अँडरसन यांचे (७८७); छत्रपतीस कन्यारत्न झाल्याबद्दल शर्करा पोंचली म्हणून सयाजीराव जाधव यांचे (७९२); कृष्णाजी पाटील सातडकर यास लोकांसह पाठविला आहे म्हणून राणोजी दळवी व सदाशिव आप्पाजी यांचे (७९४); सामानगडचा ऐवज रदकर्ज फेडीस लावून दिल्याबाबत जोत्याजीराव निंबाळकर यांचे (७९७); मनोहरगडी बंदोबस्त ठेविला आहे म्हणून आप्पाजी दळवीचे (७९८, ८०१); नरसोजी नलवडे यांच्या गांवाकडील येणे असलेल्या कर्जाच्या वसुलीस तहकुबी मिळावी म्हणून राणोजी दळवी व आबाजी हणमंत यांचे (८००); मनोहरगडच लोकांस अभयपत्र देवून किल्ल्यास आणीत असल्याबद्दल आप्पाजी जाधव यांचे (८०२); मनोहरगडास बंदुक, बारदार व दारूगोळा पाठविण्याबद्दल (८०३).

**पत्रे—इतर :** दत्तक घेण्याबाबत जिऊबाई महाराज (पंडित) यांना पो. ए., धारवाड, यांचे (७५२); असण गांवच्या शीव तंटचाचा निकाल करण्यासाठीं रामचंद्र कृष्ण यांस पाठविले म्हणून सब कलक्टर कोंकण यांस छत्रपतींचे (७६६); मसूर वगैर गांवी इंग्रजी अंमल असल्यानें तेथील रयतेस उपद्रव न देण्याबाबत मामलतदार, भूदरगड, यांस सब कलक्टर कोंकण यांचे (७७६), भरतगडचे चोरी वखेडा करणाऱ्या लोकांस चौकशीसाठीं पाठविण्याचा हुकूम केल्याबाबत पो. ए., धारवाड, यांस छत्रपतींचे (७७८); समन्सप्रमाणे कोर्टांत लोक पाठवून देण्याबाबत असिस्टंट जज्ज रत्नागिरी, यांचे मामलेदार, भरतगड, यांस (७८१); वसर्गे यथील इनाम जमिनीच्या सनदापत्रासंबंधीं रताजीराव चव्हाण यांचे अंबाजी वाकनीस यांस (७८२); रावरंभा यास वर नेमस्त करण्यासाठीं छत्रपतींनी लोक पाठविल आहेत म्हणून मीरखा हकीम यांचे रावरंभा यांस (७८६); नाहावी येथील पाटिलकीचा ऐवज रघुनाथराव घोरपड यांस देण्याबाबत संभाजीराव घोरपड यांचे बाबाजी व्यंकटश यांस (७७८, ७८९); करवीरकरास रूजू रहाण्याबाबत सदाशिव माणकेश्वर यांचे चिचणीकर देसाई यांना (७९९).

रुमाल क्र. ६

पुडके क्र. १—(चालू)

**याद्या**—पन्हाळगडावरील वाघ दरवाजा उघडणे व जमिनीची लागवड करणे याबाबत इंग्रज व छत्रपती यांच्यांत झालेल्या वाटाघाटीची (७३९); चिकोडी, मनोळी तालुके सोडवून घेण्याबाबत भाऊ महाराज यांना बक्षिसीबद्दल दिलेल्या ऐवजीची (७५३); शिंदे, पटवर्धन वगैरेंशी करवीरकरांच्या झालेल्या युद्धांच्या तारखांची (७५७); युवराव व नरसिंगराव शिंदे नेसरीकर यांच्यांत वांटणीबाबत झालेल्या ठरावांची (७७०); बाळाजी शिवदेव यासोबत धारवाडास वेहेडे वगैरे पाठवलेल्या कागदांची (७७१); उमाजी रामोशीस आश्रय न देण्याबद्दल व नरसिंहवाडीस अनुष्ठानासाठी मंडप घालण्याबाबत चिटणिसाकडून झालेल्या हुकूमांची (७७३); औदुंबर येथील दत्तात्रेयाचे देवस्थानास निरनिराळ्या गांवी जमीन दिल्याबाबत चिटणिसीकडून झालेल्या हुकूमांची (७७४); करवीर येथील कोर्टाच्या आंतील रस्ते झाडून घेण्याबाबत झालेल्या ठरावाची (७७५); लोकांस गांववतने देण्याबाबत चिटणिसीकडून झालेल्या हुकूमांची (७९१); विशाळगड प्रतिनिधीस मिळाल्यापासून त्यांच्या वाटाघाटीच्या माहितीची (७९३).

**रवासुदगी**—छत्रपतींना कन्या झाल्याबद्दल शर्करा पाठवल्याबाबतच्या आज्ञापत्रांची (७९०).

---

**ज. क्र. ६, रु. क्र. ६, पु. क्र. २, का. सं. ८०४–८३७ (३४).**

**सु. स. १२३४ ते १२३७, इ. स. १८३३–३४–१८३६–३७.**

**आज्ञापत्रे**—सोनगडी कैदेंत असलेले महादजी म्हेंसकर व लोक यांस पाठवून देण्याबद्दल अंताजी यशवंत यांस (८०४); सौंदती मठाच्या खटल्याच्या चौकशीसाठी करवीरी येण्याबाबत भगिरथीगिरी यांस (८०५); माणसांची खरेदी विक्री होऊ न देण्याबद्दल बालकृष्ण सखाराम सरदेशकुलकर्णी यास (८१९).

**पत्रे**—भगीरथीगिरीस उपद्रव होऊ न देण्याबाबत पो. ए., धारवाड, यांचे छत्रपतीस (८११); करवीरकरांनी सौंदती जबरीने घेतल्याबाबत भगिरथीगिरी याचे पो. ए., धारवाड, यांस (८१२); करवीरकरांनी दंगे न करण्यासंबंधी पो. ए., धारवाड, यांचे छत्रपतीस (८१३); भरतगडाकडील गावांच्या अम्मलाबाबत पो. ए., धारवाड, यांचे छत्रपतीस (८१५); रामराव, अखबारनविस यास बडतर्फ केल्यासंबंधी पो. ए., धारवाड, यांचे छत्रपतीस (८१६); चिंचलीचे ठाणे व्यंकटराव जाधव यास परत करण्याबद्दल पो. ए., धारवाड, यांचे छत्रपतीस (८१७); नारायणराव राजाज्ञाकडे करवीरकरांनी कारभार द्यावा म्हणून पो. ए., धारवाड, याचे छत्रपतीस (८१८); इंग्रजांच्या लष्करी खर्चाचा हप्ता दण्याबाबत मामलेदार चिकोडी यांचे गावकामगार, पाटीलकुलकर्णी शिरौल यांना (८२०); अर्जुनवाडी ताब्यात घेतल्यासंबंधी गणेश मुरार मुजुमदार यांची नरसिंगराव शिंदे नेसरीकर व जीवराव नाना जाधव यांस (८२३, ८२४); मनोहरगडावरील बंदोबस्त झाल्याने आनंद वाटला म्हणून डनलॉप यांचे छत्रपतीस (८३०).

**बारनिशी**—धारवाडहून (वकीलाकडून) करवीरास रवाना झालेल्या पत्रांची (८०८); वेबर साहेबास रवाना झालेल्या पत्रांची (८२१).

**विनंतीपत्रे.** छत्रपतींस—(छत्रपतींच्या) भेटीस येत आहे म्हणून आपाजीराव जप्तनमुलुख यांचे (८०६); दारूगोळा व लोक पाठविण्याबद्दल भरमाप्पा जाधवराव व भरमदेव नाडगौडा याचे (८०७); मनोहरगड गडकऱ्यांचा बंदोबस्त व्हावा म्हणून रामाजी भीमराव यांची (८२५, ८२६, ८२७); तेथील बंदोबस्त केल्याचे डनलॉप यास कळवल्याबद्दल रामाजी भीमराव यांची (८२८, ८२९); पारवोली घाटातील जकात वसुलीसंबंधी भवानराव घाटगे व विठोजी शिंदे यांचे (८३१); विरोजी मूर्तीच्या मालमत्तेचा व मुलामाणसांचा बंदोबस्त ठेवल्याबाबत संतराम भहीस व दाजी सखाराम यांचे (८३२); तसेच त्याजकडील गुराढोरांच्या चौकशीबाबत व त्याजकडील माणसांना जामिनावर सोडण्याबाबत धनू चोपदार, शेठी मोरे व महादजी परशराम यांची (८३३, ८३४); गर्डहिंग्लज वगैरे गावांकडील वसुलाची रक्कम पाठविल्याबाबत संतराम भहीस व सखाराम दाजी यांचे (८३५); मनोहरगडाचे आसपास वाटसरूस होणाऱ्या उपद्रवाबाबत भगवानराव घाटगे व विठोजी शिंदे यांचे (८३७).

रुमाल क्र. ६

पुडके क्र. २—(चालू)

**याद्या**—शिरोळचा वसूल जोत्याजीराव निंबाळकराकडे देण्याबाबतच्या कलमाची (८११); इंग्रजास लष्करी खर्चासाठी करवीरकरांनी द्यावयाच्या रकमेची (८१४); अमात्य पदावर आलेल्या पुरुषांची (८२२); अंताजी विरूपाक्ष नेसरीकराकडील इनाम गावांची (८३६).

**खासुदगी**—हुजूराच्या कर्जाचा ऐवज दहा हजार तसेच लष्कर खर्चाबद्दल एक लक्ष तेहतीस हजार आठशे रुपये देणेबद्दल जोत्याजीराव नाईक निंबाळकर यांस झालेल्या आज्ञापत्रांची (८०९).

---

**ज. क्र. ७, रु. क्र. ७, पुडके क्र. १, का. सं. ८३८–८७८ (४१).**

**सु. स. १२३८ ते १२३९, इ. स. १८३७–३८ ते १८३८–३९.**

**आज्ञापत्रे**—सरंजामसुद्धा वाडीस येण्याबद्दल लक्ष्मीबाई घोरपडे यांना (८४४); दत्तजयंतीसाठी साहित्य व रक्कम कृष्णभट पुजारी यास देण्याबद्दल गावकामगार शिरोळ यास (८५५); करवीरनिवासिनीच्या नवरात्र उत्सवाची रक्कम देण्याबद्दल गावकामगार शिरोळ यांस (८५९); १०० रुपये अटरा कारखान्यांकडे देण्यासंबंधी गावकामगार शिरोळ यांस (८७०); शिलेखान्याकडे सिकलगार पाठवून द्यावा म्हणून गावकामगार यांना (८७१); कोठीकडे २०० रुपये द्यावे म्हणून गावकामगार शिरोळ यांस (८७२); दत्त उत्सवाबद्दल १०० रुपये द्यावे म्हणून गावकामगार शिरोळ यांना (८७३); सरकारी पालख्या, गाड्या इत्यादी दुरुस्तीस पाठवून देण्याबाबत गावकामगार शिरोळ यांना (८७४); शिरोळ येथील सरकारी गाड्या, पालख्या, कणे, इत्यादी पाठवून देण्यासंबंधी संभाजी जगदाळे यांना (८७५).

**पत्रे**—**छत्रपतींस.** गैरवर्तणुकीबद्दल मोहनगड गडकऱ्यांकडून जामीन घेण्याबद्दल पो. ए., कर्नाटक, यांचे (८३८); हणमनघाट व आजरे भागांतील बंदोबस्ताबद्दल भगवानराव घाटगे यांचे (८४२); पारगडच्या परागंदा झालेल्या गडकऱ्यांना घेऊन येत असल्याबद्दल भगवानराव घाटगे यांचे (८४३); हलकर्णगले गावाचा बंदोबस्त केल्याबाबत (८४५); लिंगगौडा देसाई यांच्या भडगाव व हिडदगी येथील जमिनी त्यास दिल्याबाबत संतराम भहीस व दाजी सखाराम यांचे (८४६); रामचंद्र जाधव यास निर्वाहासाठी शेरी जमीन देण्याबाबत संतराम भहीस व दाजी सखाराम यांचे (८४७); इंग्रजाकडील पत्रास उत्तर देण्याबद्दल लहूजी पवार सामानगडकर यांचे (८४८); सामानगड इंग्रजांच्या स्वाधीन करण्याबाबत लहूजी पवार यांचे (८४९); सामानगड इंग्रजांच्या स्वाधीन करण्यास गडकरी कबूल नाहीत म्हणून लहूजी पवार यांचे (८५०); जदीद लोक व चोर, मांग वगैरेंना करवीरास पाठवीत आहे म्हणून लहूजी पवार यांचे (८५१); भीमाच्या शिवरात्री यात्रेचा प्रसाद पाठवल्याबाबत गवरोजी पारखे यांचे (८५४); पंडित महाराज मृत्यु पावल्याबाबत बुवासाहेब महाराज यांस (८५६); निलजीचे ठाणे घेतल्याबाबत नारायणराव भोसले यांचे (८५७); ठाणे रायबाग येथे हुषारीने असल्याबद्दल बापूजी निकम यांचे (८५८); श्रावणमास अनुष्ठान, भोजन व वरातदार खर्चासंबंधी गवरोजी पारखे व सामानगडकरी यांची (८६०, ८६१); भेटीस येत आहे म्हणून लहूजी पवार (सामानगड) यांचे (८६२); नृसिंहवाडी सावकारांनी सावकारी काम करण्याचे कबूल केल्यासंबंधी छत्रपतींस सोनजी जाधव व एकनाथ बाळाजी यांचे (८६३); सावकाराकडील ऐवज शिरोळास ठेवीत आहे म्हणून सोनजी जाधव व एकनाथ बाळाजी यांचे (८६४); मिरजेच्या सावकाराकडून आणलेल्या ऐवजाची यादी पाठविल्याबाबत सोनजी जाधव व एकनाथ बाळाजी यांचे (८६५-८६७); आकिवाट व टाकळीपैकी करवीरकरांस द्यावयाच्या रकमेसंबंधी पो. ए. कर्नाटक यांचे (८६९); मुत्नाळ यथे राजापूरच्या व्यापाऱ्याचा माल चोरीस गेला त्याच्या चौकशीसंबंधी संतराम भहीस व दाजी सखाराम यांचे (८७६); बंदोबस्त ठेवला आहे म्हणून पावनगडगडकरी यांचे (८७७); तुळजापुरी पोचल्यासंबंधी भगवानराव घाटगे, हरि जाधव व नारो बाबाजी यांची (८७८).

**बारनिशी**—अखबारनवीस यांनी छत्रपतींस लिहिलेल्या बातमीपत्रांची (८७३).

**याद्या**—गुरुनाथ कोंडो यांनी कापशीहून आणलेल्या कागदपत्रांची (८३९); नारो गंगाधर चिटणीस यांनी छत्रपतींच्याकडे हजर केलेल्या सनदांची (८४०, ८४१); इचलकरंजी प्रकरणी करवीरकरांकडील सनदा इत्यादी कागदपत्रांची (८५२).

---

ज. क्र. ८, द. क्र. ८, पुडके क्र. १, का. सं. ८७९-९६४ (८६).

सु. स. १२३९-१२४२ इ. स. १८३८-३९ ते १८४१-४२.

**अर्ज**—मिरज प्रांताच्या मुतालकीचे वतन चालवण्यासंबंधी आप्पाजी सखाराम मुतालीक याचा (९११).

**अर्ज व जबाब**—रांजणा येथील चौकीदार विरुद्ध जकात वसूलीबाबत तातो व सदाशिव प्रभू बोके यांचे मालवण ता. अधिकारी यांचेकडे (९०५, ९०६, ९०७).

**आज्ञापत्रे : छत्रपतींची**—नवीन शिबंदी न देण्याबद्दल जहागिरदार इत्यादिंना (८९०, ८९१); फोंडा घाटातील चोरट्यांच्या बंदोबस्ताबाबत हणमंतराव निंबाळकर यांस (८९२, ८९३); काजीपणाचे वतन चालवण्याबाबत सय्यद मखूम काजी, मल्हारजी भोसले व कारकून कोट करवीर यांस (८९५, ८९६); कन्यागत पटीची रक्कम देण्याबाबत जोत्याजी नाईक निंबाळकर यांस (८९७); रघुनाथभट्ट ठकार यास दरसाल सहा रुपये देण्याबाबत खंडोजी गायकवाड यांस (९०१); शिंदे यांना जहागिरीचा कारभार चांगला करण्याबाबत राजमंडळाची (९०२, ९०३); किल्ल्याचे हिशेब व कामकाज चांगले ठेवण्याबाबत भुदरगडकरी यांस राजमंडळाचे (९३४); गोपाळराव गायकवाड यांस वारगीरीची आसामी दिल्याबाबत गावकामगार नेटली यांस (९५१); भुदरगड तनख्यातील दुतर्फा अम्मलाची गावे इंग्रजाचे स्वाधीन करण्याबाबत दिनकरराव गायकवाड यांस (९५७).

**चिकटबंदी**—मिरज प्रांताच्या मुतालकीच्या वतनासंबंधी (९१४).

**जाहीरनामा**—सतीची चाल बंद करण्यात आल्यासंबंधी करवीर राजमंडळाचा (९६०–९६३).

**पत्रे**—बुवासाहेब छत्रपतींच्या निधनाबद्दल दुःखवट्याचे लक्ष्मीबाई यांचे (८८३); भरतगड मिठागराच्या हासिलाबाबत करवीरकर वकील यास पो. ए. प्रांत कर्नाटक यांचे तसेच अकिवाट येथील करवीरकरांच्या वाड्यासंबंधी (८८८, ८८९); अमात्याकडील कामदार पाठविणे बाबत अप्पाजी बल्लाळ याचे आप्पासाहेब गायकवाड यास (८९९); तातो रघुनाथ व घनःशाम बोके याजकडील जकात वसुलीसंबंधी चौकशी करण्याबद्दल करवीरकर वकील सदाशिवपंत यांस पो. ए. यांचे (९०८, ९१३); श्रीपत निलजीकर यांचे भाऊबंदी हिस्सेबाबत चौकशी करण्याबद्दल करवीरकर वकीलांस कंपनी सरकारचे (९०९); प्रसिद्धगडकऱ्यांनी तिखड्यातील मुलास धरून नेले त्याची चौकशी होण्यासंबंधी करवीरकर वकीलास कंपनी सरकारचे (९१०, ९१२); अकिवाट व टाकळीबाबत करवीरकरास द्यावयाच्या ऐवजा संबंधी पो. ए. यांचे (९१५); दत्तवाडच्या वाटणीसंबंधी करवीरकर वकीलास पो. ए. याचे (९१६); अकिवाटच्या नायकीच्या हिशेबासंबंधी करवीर वकीलास पो. एजंट यांचे (९१९); बंडाच्या बंदोबस्ताबाबत पो. एजंट यांस राजमंडळाचे (९२४); मनोहरगड व मनसंतोषगडाच्या मामलेदार नेमणुकीबाबत पो. ए., यांस छत्रपतीचे (९२९); कापशीकर घोरपड्यांना मिळालेल्या सनदांच्या नकलासाठी कारकून पाठविणेबद्दल लक्ष्मीबाई घोरपडे यांना दिनकरराव गायकवाड व आनंदराव मंत्री यांचे (९३१), मनोहरगडकरी यांच्या उपद्रवाच्या बंदोबस्ताबाबत पो. ए. यांचे करवीरकर वकीलास (९३३); दाजीराव, सुलतानराव व अमृतराव शिंदे नेसरीकर यांनी केलेल्या धांदलीच्या चौकशीबाबत पो. ए., यांचे (९५३); सुभानजी निकम याने केलेल्या फंदफितुरीबाबत गडकरी सिंधुदुर्ग यांचे (९५४); अकिवाटच्या ऐवजासंबंधी पो. एजंट यांचे करवीरकर वकीलास (९५८); फिर्यादी भोसले व प्रतिवादी पुजारी यास करवीरी पाठविण्याबाबत वामनजी पांडुरंग यांचे दिनकरराव गायकवाड यांस (९५९).

**छत्रपतींस :** मनोहरगड गडकऱ्याचे वेतन व नोकरी याबाबत भगवानराव घाटगे याचे (८८५); रहिमानखान पठाण व त्याचे लोक यांच्या हालचाली व मालवण तिजोरी लुटण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न या संबंधी अमृतराव प्रतिनिधी यांची (८८६, ८८७); पूर्वापार प्रमाणे आपल्याकडून सेवा घेण्याबाबत नीलकंठराव शिंदे यांचे (९०४); कडिलगे व माशेवाडी जकात वसुलीबाबत आप्पाजीराव देसाई यांचे (९१७); नरसिंगराव शिंदे यानी केलेल्या उपद्रवा-

रुमाल क्र. ८

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे : छत्रपतींस** (चालू) :—

संबंधी दाजीराव व सुलतानराव शिंदे यांची (९१८, ९२०, ९२६); अधिकाऱ्याकडून होणारा अन्याय दूर करण्याबाबत मनोहरगड गडकरी यांचे (९२१); मनोहरगडकरी यांच्या खर्चाची सोय होण्याबाबत व कारकून पाठविणेबाबत पो. ए., यांचे (९२५, ९२७); मनोहरगड व मनसंतोषगड येथे काका मामलेदार यांची नेमणूक करू नये म्हणून पो. एजंट यांचे (९३०); तिळगुळ पाठवल्याबद्दल यादवराव कदम यांचे छत्रपतिस (९५२).

**बारनिशी**—छत्रपतींचे तुळजापुरास जाणे व इतर सर्व बाबीसंबंधी पत्रांची (८७९); रामराव अखबारनवीस यांनी पो. ए. यांची भेट वगैरेबाबत लिहिलेल्या (इंग्रजी अधिकाऱ्यास) पत्रांची (८८१, ८८२).

**याद्या**—तुळजापुरास जातेवेळी छत्रपतींच्या मुक्कामाची (८८४); करवीराकडून इचलकरंजीकरास मिळालेल्या इनाम वतनांची (८९४); कणंगले वगैरे गावासंबंधीचे जावसालाबाबत करवीरकर वकीलास पो. एजंट यांची (८९८); सरलष्कर यांच्या सरंजामी नोकरीच्या तपशिलाची (९००); शाहू व संभाजी यांचा तह, शाहूचा मृत्यू, इचलकरंजीकरास मिळालेल्या सनदा इत्यादिसंबंधी कलमवार (९२२); इचलकरंजी प्रकरणातील सनदा इत्यादि कागदपत्रांची (९२३); डवळे घराण्यातील लोकांनी केलेल्या नोकरीसंबंधीच्या माहितीची कलमवार (९२८); इचलकरंजीकर करवीरकरांचे सरंजामदार असल्यासंबंधी पो. एजंट यांस दिलेल्या माहितीच्या (९३५–९५०, ९६४).

**रवामुदगी**—आनंदराव मंत्री यांची भुदरगड भेट, पागेकडील लोकांची चोऱ्यांच्या बंदोवस्तासाठी नेमणूक; इत्यादि संबंधी; गावाकडील जकात वसुलीबाबतची. (८८०, ९५५, ९५६).

---

ज. क्र. ८, रु. क्र. ८, पु. क्र. २, का. सं. ९६५–१०६६ (१०२)

सु. स. १२४० ते १२४२; इ. स. १८३९–४० ते १८४१–४२

**आज्ञापत्र**—अरब इत्यादी विदेशी हत्यारी लोकांस अटक करण्याबद्दल जहागिरदार इत्यादींना (१०६६).

**खातरपत्र**—इमाने इतबारे सेवा करण्याबाबत मनोहरगडकऱ्यांचे करवीरकराना (९७१).

**जाब**—भगवानराव घाटगे याने बंडाई करण्यास प्रोत्साहन दिल्यासंबंधी बाळोजी सटगे सरनोबत, सावाजी बावाजी, तुकाजी चव्हाण, मनोहरगडकरी यांचे करवीर सरकारात (९७२, ९७४).

**ताकीदपत्र**—मनोहरगडकरी व भगवानराव घाटगे यांच्या सरकारविरुद्ध बंडखोरीबाबत राजमंडळचा (९६८).

**पत्रे**—पोलिटिकल एजंट यांस राजमंडळाची : रघुनाथ नलवडे हणमीनहाल याचा बंदोवस्त केल्याबाबत (९७५); बाल छत्रपती व राजमाता यांना विषप्रयोग झाल्यासंबंधी (९८५); गोव्याकडील यात्रेकरू करवीरी मृत्यु पावल्यासंबंधी (९८६); राणी जिजाबाईने मालवणच्या गांवकर यास दिलेल्या सनदासंबंधी (९८७); अरब इत्यादी विदेशी लोकांस अटक करण्यासंबंधी (९९३); पाटगांवी झालेल्या सतीच्या गुन्ह्याबाबत (९९७); भरतगडच्या वसुलासंबंधी उलगडा होण्यासंबंधी (१०१२); मनोहरगडकरी यांच्या बंदोवस्ताच्या माहितीबाबत (०४२).

**छत्रपतींस** : नवरात्रानिमित्त देवास पाठविलेली वस्त्रे पोचल्यासंबंधी रखोजी जाधव व चिंतामण जोशीराव यांचे (९८०); प्रसिद्धगडाच्या लक्ष्मीच्या यात्रेचा प्रसाद पाठवल्यासंबंधी गोदजी नाईक निवाळकर व केशव आबाजी यांचे (९८४); मनोहरगड गडकऱ्यांच्या बंडाईसंबंधी माहिती पाठवण्याबद्दल तसेच त्यांचा पक्का बंदोवस्त केल्यासंबंधी पो. एजंट यांचे

**रुमाल क्र. ८**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे : छत्रपतींस—(चालू)**

(९८९, १००१); जहागिरदारांच्या जकातीबाबत झालेल्या नुकसानीसंबंधी पो. एजंट यांची (९९१, ९९८, ९९९); घाटातील चोरट्यांच्या बंदोबस्ताबद्दल पो. एजंट यांचे (९९२); राजी दासी हीस विषप्रयोगाचे गुन्ह्याबाबत कैदेत ठेविले असल्याबद्दल रखोजीराव जाधव व चिंतामण जोशीराव यांचे (९९४); भरतगड, बावडा व विशाळगड येथील जकात माफीसंबंधी पो. एजंट यांचे (९९६); सामानगड किल्यावरील खर्च इत्यादी बाबत महादजी पारखे व रामचंद्र व्यंकटेश याचे (१०००); पन्हाळगडावरील बंदीवानांच्या व्यवस्थेसंबंधी राणोजी दळवी व हणमंत आवाजी यांचे (००२); पावनगडावरील बंदीवानाच्या व्यवस्थेबाबत खंडोजी निकम व नारो गंगाधर यांचे. तसेच पन्हाळगड, प्रसिद्धगड, भुदरगड व सामानगडावरील बंदीवानासंबंधी (००४, ००५, ००७, ००९,); प्रसिद्धगडाहून छड्या इत्यादि वस्तू पाठवल्यासंबंधी गोदजी निंबाळकर व केशव आवाजी यांचे (००६); श्रीचे उत्सवासाठी सालाबादप्रमाणे सामान पाठवल्यासंबंधी गोदजी निंबाळकर व केशव आवाजी यांचे (०१०); सती संबंधी पाटगांवच्या गुन्हेगाराबाबत गोदजी निंबाळकर व केशव आवाजी यांचे (०११); पन्हाळा येथील तट व नागेशाची इमारत पडल्यासंबंधी राणोजी दळवी व हणमंत आवाजी यांचे. (०१८); प्रसिद्धगड येथील धंद्याची वहिवाट रामजी नाईक चव्हाण यास दिलेबाबत नाईक निंबाळकर यांची (०१९, ०२१); श्री चतुर्थी उत्सवाचे सामान पाठविल्यासंबंधी गोदजी निंबाळकर यांचे (०२२); नवरात्र उत्सवाचा प्रसाद पाठविल्यासंबंधीं गोदजी निंबाळकर यांचे (०२४); मनुष्य विक्रीच्या बंदीबाबत राणोजी दळवी व हणमंत आवाजी यांचे (०४३); बंदीवानांच्या पायातील बेड्यांच्या वजनासंबंधी राणोजी दळवी व हणमंत आवाजी यांचे (०४४); सामानगडाच्या खर्चासंबंधी महादजी पारखे व नारायण जोती यांची (०६२, ०६३); शिरोळ ठाण्याच्या वहिवाटीच्या मोर्तबासंबंधी सखाराम नृसिंह व सुभानजी मिसाळ ह्यांचे (०६४).

**दिनकरराव गायकवाड यांसी :** पन्हाळगडावर पूर्वापार प्रमाणे वहिवाट ठेविली असल्यासंबंधीं हणमंत आवाजी यांचे (९९५); शिरोळ मामलेकडील मोर्तबाची वहिवाट, व्यंकट गुंडो कुळकर्णी यास करवीरी पाठवणेसंबंधी, वगैरे बाबत (१०१३); ठाणे शिरोळच्या वसुलासंबंधी (०१४); बेळगांव मुक्कामी साहेबास भेटत असल्यासंबंधी सखाराम माणकेश्वर देशपांडे यांचे (०१७); कुरुंदवाड व घरणगुती या गांवामधील सीमातंट्याबाबत सुभानजी मिसाळ याचे (०२३); ठाणे शिरोळ येथील पान, तपकीर इत्यादी व खोत्या चढ आकाराने लावण्यासंबंधी सखाराम डवीर यांची (०२५, ०२६); सालाबादप्रमाणे गल्ला व नक्त नेमणूक मिळण्यासंबंधी प्रसिद्धगडकरी यांचे (०२७); नृसिंहवाडी येथील गुरुद्वादशीची व्यवस्था, शिरोळ ठाण्यापैकी गांवांच्या वसूल इत्यादीबाबत सखाराम डवीर व सुभानजी मिसाळ यांची (०२९, ०३०, ०३३); हिरलगे येथील यलदेवाचा चौक चोरीस गेल्याबाबत महादजी पारखे व नारायण जोती सामानगड यांचे (०३१, ०३२); मुर्डशिंगी येथील मनुष्य विक्रीच्या गुन्ह्याबाबत रखोजी जाधव व चिंतामण जोशीराव यांचे (०३४); घरणगुती व कुरुंदवाड यामधील सीमातंटा, शिरोळ ठाण्यापैकी गांवातील फरारी रयत याबाबत सखाराम डवीर व सुभानजी मिसाळ यांचे (०३५); कटकोळ ठाण्यातील दारूगोळा कोठीच्या किल्ल्यासंबंधी खंडेराव नवलडे हवालदार यांचे (०३६); मिरजकर देशपांडे यांच्या शिरोळ मामलेतील वतनी ऐवजासंबंधी सखाराम डवीर व सुभानजी मिसाळ यांचे (०३७); गणेश धाणेकर यास संगमेश्वरास पाठवल्यासंबंधी हणमंत आवाजी याचे (०४१); गजाबाई खानवीलकर यांच्या कन्येच्या विवाहाबाब कमळाबाई पाटणकर यांचे (०४९).

मनोहरगड गडकऱ्यांच्या बंदोबस्ताबाबत अनंतराव मंत्री यांचे मातोश्री आईसाहेब (दिवाणसाहे यांना (९६७, ९७०); ताराबाईसाहेब, बाबासाहेब व चिमासाहेब यांच्याकडील चौ पहाऱ्याबाबत पोलिटीकल एजंट यांस दिवाणसाहेबाचे (९७८); मनोहरगडकरी व छत्र यामधील तक्रारीच्या चौकशीसंबंधी पोलिटीकल एजंट यांचे करवीर वकीलास (९७२ जोत्याजीराव निंबाळकर यानी रास्ते यांस देणे असलेल्या कर्जासंबंधी पोलिटीकल एजंट

रुमाल क्र. ८

पुडके क्र. २—(चालू)

**दिनकरराव गायकवाड यांसी—(चालू)**
राजमंडळचे (९८१); आनंदराव महाडीक यास करवीरी ठेऊन घेतल्यासंबंधी परशुरामराजे महाडीक यांचे दिवाणसाहेबास (०२८); मालवण येथील करवीरकरांच्या चौथाई हक्काबाबत कलेक्टर रत्नागिरी यांस लक्ष्मण गोविंद यांचे (०६८).

**निवाडापत्र**—मांगूर व यळगूड या गांवांच्या सीमातंटयाबाबत पंच विद्यमाने झालेला (९८८).

**याद्या**—कटकोळ प्रकरणी करवीरकरांनी सदाशिव अनंत वकील यांचेकडे पाठविलेल्या कागदपत्रांची (९६६); नरसिंगराव शिंदे यांच्या सरंजामासंबंधी छत्रपतीनी दिलेल्या आज्ञापत्रांची (९८२); कोणास कोणतो गावे इमान आहेत त्याबाबतची (९८३); प्रसिद्धगडाहून छत्रपतींसाठी पाठविलेल्या खडाव, जोडा इत्यादि वस्तूंची (१००३); देवस्थाने, अष्टप्रधान, इनामदार इत्यादींना छत्रपतीकडून जावयाच्या पत्रांच्या मायन्यांची (०४६–०६०); जमाबंदीसंबंधी राजमंडळाने केलेल्या नियमांची (०६१).

**खापुरर्गी**—सदाशिव अनंत वकील यानी दिवाणसाहेबांच्या भेटीस येण्यासंबंधी (९६५); मनोहरगडकरी यांच्या तंटया बखेडयाबाबत (९६९); दत्तवाडकरांच्या भाऊबंदी वाटण्या,पोलिटिकल एजंट यांची करवीर भेट, रास्ते यांचे कर्ज इत्यादीसंबंधी (९७७,१०३८-०४०).

---

ज. क्र. ९, रु. क्र. ९, पु. क्र. १, का. सं. १०६७–१११३ (४७),

सु. स. १२५२ ते १२६०, इ. स. १८५१–५२ ते १८५९–६०.

**टिपणे**—गोपाळ कोन्हेर यास अर्जुनवाड इनाम मिळाल्याबाबत (१०८२); कटकोळ प्रकरणी करवीरकरानी इंग्रजांस पाठवलेल्या कागदांचे (०८३); मनोहरगड व प्रसिद्धगडासंबंधी झालेल्या ठरावाबाबत (०८६).

**दंडपत्र**—बंड प्रकरणी ज्यांच्याकडून ऐवज वसूल केला त्या बाबतचा (११००).

**पत्रे**—छत्रपतींस: ठाणे शिरोळकडील दरमहाचा जमाखर्च व नोकर लोक यासंबंधी माहिती पाठवण्याबाबत सखारामराव नृसिह व सुभानजी मिसाळ यांचे (१०६७); वसुलाच्या अडचणीसंबंधी सखाराम नृसिह व सुभानजी निकम यांचे (०६९); बाबू घारगे,महादेव सलगर व पतंग देसाई यांना पकडण्याबाबत महादजी पारखे व नारायण जोती यांचे (०७०); इंग्रज लष्कर चिमगगावी उतरले आहे म्हणून भुदरगड गडकरी यांचे (०७३); मुख्य कारभारी आपल्या हितसंबंधास बाध आणीत आहेत म्हणून पन्हाळगड गडकरी यांचे (०७४); करवीरकरांच्या पथकातील लोकांना भुदरगडावर राहू देण्याबाबत रेखोजीराव जाधव यांचे (०७५); गांवोगांवी इंग्रज लष्कराच्या उपद्रवाच्या बंदोबस्तासंबंधी (०७७); व इंग्रजांची गडावरील मोहीम बंद करण्याबाबत रेखोजी जाधव भुदरगड गडकरी यांचे (०७८); करवीरकराकडून येणे असलेल्या कर्जासंबंधी मुख्य कारभारी यांची (०९७, ०९९).

**पत्रे**—हलकर्णी हिम्मत बहाद्दर यास परत मिळण्याबद्दल गोविंद बापूजी सुपेकर व जनार्दन महादेव गोडे यांचे पोलिटिकल एजंट यांस (१०८४-८५); इंग्रजांकडील फरारी कैद्यास पकडण्याबद्दल पो. एजंट, प्रांत कर्नाटक, यांस राजमंडळाकडून (०८०); बाबासाहेब व चिमासाहेब यांचे विवाहास उपस्थित रहाण्याबाबत रॉबर्ट रीड यांचे आनंदीबाई यांना (०८७, ०८९); नरसिंग व दाजीराव नेसरीकर यांचे वडिलकीबाबत चिटणीस व पारसनीस यांचे मुख्य कारभारी यांना (०९४); ग्वाल्हेरकर शिंदे यांच्या पोषाखाचे सरंजामाबाबत रावसाहेब खर्डेकर यांस विनायक रामचंद्र यांचे (१०१); अमीरूल उमराव घोरपडे

पत्र—(चालू) घराण्यातून सोंडूर संस्थानाकडे झालेल्या दत्तकासंबंधी मुख्य कारभारी (करवीर) यांना (११०७); शिवरामराव घोरपडे यास सोंडूर घराण्यात दत्तक दिल्यासंबंधी दत्तवाडकर घोरपडे यांचे करवीरकरास (१०८); आजरे तालुक्याचे वहिवाटीसंबंधी शिवाजीराव घोरपडे यास बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव यांचे (१११, ११२).

बारनिशी—गडकरी लोक, संस्थानचा कारभार इत्यादी बाबत इंग्रज व मुख्य कारभारी यांच्या पत्राचे (१११३).

यादी—अंताजी विरूपाक्ष मुतालीक देसाई प्रांत हुकेरी यांच्या घराण्याच्या माहितीची (१०७१); करवीर राज्यात चोऱ्या दरोडे इत्यादींच्या बंदोबस्तासाठी केलेल्या नियमांची (०७२); मनोहरगडी नेमलेल्या सवनीस व फडनीस यांची (०७६,); सेनापती घोरपडे यांना दिलेल्या सनदा व आज्ञापत्रे यांच्या नकलांची (०७९, ०८०); करवीर हद्दीतील घाटातील चौक्यांचा बंदोबस्त, ग्वाल्हेरकराशी युद्धप्रसंग इत्यादीबाबत (०८१); निपाणकर व नारायणराव घोरपडे यांनी करवीरकरांच्या हद्दीत ठाणी घातल्यासंबंधी इंग्रजांकडे पाठवलल्या कलमाची (०८८); सयाजीराव गायकवाड यांचे पुत्र व कन्या यांची (०९१); पंत अमात्य घराण्यात झालेल्या भाऊबंदी वाटण्यासंबंधी (०९२); कापशीकर घोरपडे (सेनापती) यांना मिळालेल्या इनाम व सनदापत्रांची (०९४, १०२); सेनापतींच्या भाऊबंदांकडे असलेल्या इनाम गावांची (०९५); नेसरीकर शिंदे यांच्या घरच्या माहितीची कलमवार (०९६); पंडित महाराज घराण्याच्या माहितीची कलमवार (१०३); रांगणा, नृसिंहगड व भरतगड यांच्या तनख्यांच्या ठरावाबद्दल (१०४); करवीरकराकडील सरंजामदार इत्यादि लोकांची (१०५); पंडित महाराज, जोशीराव वगैरेना मिळालेल्या इनाम गावांची (१०६); हिम्मत बहाद्दर पदावर कोण किती वर्षे होते त्याबद्दलची कलमवार (१०९); सेनापती पदावर कोण किती वर्षे होता त्याबद्दलची (११०).

---

**ज. क्र. ९, रु. क्र. ९, पु. क्र. २, का. सं. १११४ ते ११८२ (६९).**

**सु. स. १२४३ ते १२६१, इ. स. १८४२–४३ ते १८६०–६१.**

**टिपण**—शंभू छत्रपती यांना सयाजी मोहिते याने ठार मारल्यासंबंधी (१११४–११८); बाळाजी बाजीराव, नारायण व्यंकटेश, राणोजी घोरपडे इत्यादींच्या शिक्क्यातील अक्षराचे (१२९); प्रतिनिधी पदावर असलेले पुरुष व त्यांचे शिक्के यासंबंधी (१३९).

**दानपत्र**.—बाळकृष्ण भट्ट यास हुकेरी परगण्यांत दान दिलेल्या जमिनी संबंधी (११२७).

**मुचलका**—सेनापती कापशीकर घोरपडे यांच्या सरंजामाच्या माहितीसंबंधी गडहिंग्लज मामलेदा यांचेकडे आलेला (११३३–१३७).

**पत्रे**.—**पो. एजंट यास :** नारायणराव घाटगे यांच्या सरंजामाच्या माहितीसंबंधी (११२०, १२१) इचलकरंजी संस्थानास दत्तक घेण्यास परवानगी मिळण्याबाबत गंगाबाई व यशोदाबाई घोरप यांचे (१३०); विशाळगड पेटयातील गाव रत्नागिरी जिल्ह्यांत घातल्यासंबंधी (१३१ विठ्ठल शिवराम जमेनिस यांच्या जप्त झालल्या जमिनीच्या वसुलासंबंधी (१७८); का संभाजी करवडे यांच्या इनाम गांवाच्या जप्तीसंबंधी (१७९).

**दिनकरराव गायकवाड यांस :** ठाणे शिरोळच्या जमाखर्चाच्या याद्या पाठविण्यासंबंधी (१४६ छत्रपतीस सामानगडाच्या खर्चासंबंधी याद्या पाठविल्याबाबत (१४७); शिरोळ ये पिराच्या उरुसाच्या खर्चाबाबत (१४८); सतीच्या गुन्ह्याबाबत भुदरगडावर कैदेत अस गुन्हेगारांची मुदत संपल्याबाबत (१४९); कार्तिक पौर्णिमेस घालवाडे येथील समाराधनच्या

रुमाल क्र. ९

पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे : दिनकरराव गायकवाड यांस**—(चालू)

संबंधी (११५०); श्रीपादभट जमदग्नि यास पैसे दिल्यासंबंधी व खगदाळ वगैरे गावांच्या वसुला-संबंधी (१५१); शिरोळची जकात व इतर चार गावांच्या वसुलासंबंधी (१५२); शिरोळ येथील अनैतिक गुन्ह्याबाबत सखारामराव नरसिह डबीर याचे (१५३–१५५); शिरोळहून जिन्नस पाठविल्यासंबंधी सुभानजी मिसाळ याचे (१५६); मळी जमिनीची लागण व नृसिंहवाडी येथील दत्तजयंतीची समाराधना याबाबत सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१५७); पन्हाळा व पावनगडाहून त्रयोदशीच्या श्राद्धाचे साहित्य पाठविल्यासंबंधी (१५८–१५९); छत्रपतीसाठी शिरोळहून मक्याची कणसे पाठविल्यासंबंधी सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६०); शिरोळ भागातील कुलकर्ण्याकडून येणे असलली इनामपट्टी व त्या भागात होणाऱ्या चोऱ्या, दरवडे इत्यादीसंबंधी सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६२); सामानगडाहून आवळे पाठविल्यासंबंधी (१६३); कुंभोजच्या पाटलाचे रयतांचे नेलेले बैल, हणवर याची जमीन व चित्तेवानाचा सादिलवार ऐवज याबाबत सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६४); शिरोळ भागातील पटकीचा उपद्रव, कापसाची लागवड, वतनदारी, तंटे-बखेडे यांच्याबाबत सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६५); शैल्या शेट व मुरंगशेट व विरूपाक्ष केकापुरे यामधील नृसिंहवाडी येथील दुकानाच्या जागेच्या वादासंबंधी सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६७); शिरोळच्या मामल्या बाबत कलमबंदी यादी पाठविल्यासंबंधी सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६८); नृसिंहवाडीस छत्रपतींच्या मुक्कामासाठी जागेची व्यवस्था केल्यासंबंधी सखाराम डबीर व सुभानजी मिसाळ याचे (१६९); शिरोळहून छत्रपतीसाठी चितरजोडी, भाजीपाला वगैरे जिन्नस पाठविल्यासंबंधी (१७०, १७३, १८२)

**पत्रे—छत्रपतीस** : पन्हाळगडावरील कैदी हरी खेमाजी जैन यांच्या पायातील बेडी आजारीपणास्तव काढण्याबाबत (११७१), अंताजीपंत मुळणे यांचा बेळगावाहून आलेला लखोटा छत्रपतीकडे पाठविल्यासंबंधी (१७६); भुदरगड गडकऱ्यांचे हक्क वगैरे पूर्ववत चालविण्याबाबत (१७७); संक्रांतीचे तिळगूळ पाठविल्याबाबत नारायणराव घोरपडे याचे (१८१).

**पत्रे—इतर** : आऊबाई पाटणकर यांच्या मृत्यु संबंधी बायजाबाई शिंदे ग्वाल्हेरकर यांना राजसबाईचे (१२४); भरतगडच्या वाटाघाटीसंबंधी पेटा भुदरगड अधिकारी यांना (१२८); छत्रपतींना पुत्र झाल्याबाबत राजसबाई यांना (१३२); तळगांवकर राणे यानी म्हसरंग घोलातील धनगरास मारहाण करून पैसे घेतल्याबाबत रावजी पोतनीस व मामलेदार यांना (१६१); आप्पाजी विष्णु यास मुक्त करण्याबाबत नारायणराव राजाज्ञा यांस (१६६); प्रसिद्धगडचे वहिवाटीचे कागद ताब्यात घेण्यासंबंधी अंताजी नारायण यास नारायणराव राजाज्ञा यांचे (१७४, १७५); कपडे मिळाल्याने गुलाम गौरा यांस आनंद झाल्याबाबत (१८०).

**याद्या**—तोरगल जहागिरीचा आमल कोणी किती वर्षे केला त्याबद्दलची (१११९); भाऊ महाराज यानी वकील म्हणून करवीरकराविरुद्ध केलेल्या कृत्यांची (१२२); माधवराव पेशवे व जिजाबाई यांमध्ये झालेले तह, भिरडीची लढाई, निपाणकरांचे इनाम गांव इत्यादी माहितीची (१२३); करवीरकर छत्रपतींची बडोदा भेटीच्यावेळी ठेवावयाच्या व्यवस्थेसंबंधी (१२५, १२६); मनोळी तालुक्यांत पेशव्यानी शिन्दे यांना दिलेल्या सरंजामाची (१३८); विशाळगड बंडात सामील झालेले सरंजामी लोक, कर्जदाराचे देणे इत्यादी बाबतच्या माहिती प्रकरणी पोलिटिकल एजंट व कारभारी करवीर यामध्ये चाललेल्या पत्रव्यवहासंबंधी (१४०); नांगतूर व पांगेरे ही गांवे मिळण्यासंबंधी पो. ए., करवीर, व यशोदाबाई घोरपडे कापशीकर यामध्ये चाललेल्या पत्रांची (१४१–१४५).

---

**ज. क्र. १०, रु. क्र. १०, पु. क्र. १, का. सं. ११८३ ते १२५४ (७२).**

**सु. स. ९६२ ते ११३१, इ. स. १५६१-६२ ते १७३०-३१.**

**आज्ञापत्रे**—दानवाड व कल्लोळ या गावांमधील सीमा तंट्यासंबंधी गावकामगार कल्लोळ यांना सुभेदार हुकेरी याचे (११८४); दानवाड व एकसंबे या गावामधील जंगल जमिनीच्या लागणीसंबंधी गावकामगार दानवाड यांना सुभेदार अजमनगर यांचे (१८५); दानवाडच्या सीमा आहेत त्याप्रमाणे वहिवाट करण्यासंबंधी गांवकामगार दानवाड यांना सुभेदार

रुमाल क्र. १०

पुडके क्र. ३--(चालू)

आज्ञापत्रे--(चालू)

रायवाग याचे (११८६); एकसंबे, कल्लोळ व यडूर या गावांच्या सीमा तंटयाच्या बंदोवस्तावद्दल सुभेदार हुकेरी यांस (१९०); एकसंबे व दानवाड यामधील सीमा तंटयातील दानवाडकरांची जमीन त्याच्या ताब्यांत दिल्यावद्दल गाव-कामगार एकसंबे यांना (१९१); कल्लोळच्या रयतांस दानवाड येथील जमीन लागणी करून देण्यावावत गांवकामगार दानवाड यांस (१९२); दानवाडच्या हद्दीतील जमिनीत लावणी न करण्यावावत गांवकामगार कल्लोळ यांना (१९३); रघुनाथ पंडित अमात्य यास वार्षिक नेमणूक करून दिल्यासंबंधीचे (१९६); त्रिंबकजी राजे काका यांना तंजावर प्रांत जहागिर देण्यावावत रघुनाथ पंत अमात्य यांना (१९७); शामजी ठाकरे देशकुलकर्णी यांस इंगळी गांव इनाम दिल्यासंबंधी (२०२); दत्ताच्यारी पंडितराव यांना जमीन इनाम दिल्यावावत पारपत्यगार व लेखक तर्फ संगमेश्वर यांना (२०५); कृष्णाजी परशुराम यांचे आज्ञेप्रमाणे स्वामी कार्य करण्यावावत गणू सावंत यांस (२०६); मोरेश्वर रामचंद्र यास निविडी गांव मोकासा दिल्यासंबंधी गावकामगार निविडी यांस (२१०); सोंधे संस्थानाकडून तहानुसार करवीरकरांस मिळालेल्या रकमेवावत भागजी वल्लाळ हेजीव यांस (२१४); धोंडो भास्कर देशकुलकर्णी यांस नवीन हक्क इत्यादी दिल्यावावत कमाविसदार यांस (२१६); कुरुंदवाड गांव पिराजी घोरपडे यास मोकासा दिल्यासंबंधी गांवकामगार कुरुंदवाड यांना (२१८); कुरुंदवाड, आलास इत्यादी चार गांवे राणोजी घोरपडे यांस दिल्यासंबंधी देशाधिकारी व लेखक प्रांत पन्हाळा यांना (२१९); प्रांत पन्हाळा व दहा कर्यातीची सरदेशमुखी राणोजी घोरपडे यास दिल्यासंबंधी देशाधि-कारी लेखक प्रांत पन्हाळा यांना (२२०); मिरज मामलेपैकी चौदा कर्यातीची सरदेश-मुखी राणोजी घोरपडे यास दिल्यासंबंधी देशाधिकारी व लेखक मिरज यास (२२१); तासगांव, बेडग इत्यादि मिरज प्रांतातील गांवे राणोजी घोरपडे यास मोकासा दिल्यासंबंधी देशमुख, देशपांडे प्रांत मिरज यांना (२२२-२३३); गोकाक परगणा जमावाच्या खर्चाबद्दल राणोजी घोरपडे यांस दिल्यावद्दल शिवलिंग देसाई गोकाक यांस (२३४), मतिवडे हा गांव व्यंकटराव नारायण यास इनाम दिल्यावद्दल गांवकामगार मतिवडे यांस (२३५); सोंधे संस्थानाकडून यावयाच्या खंडणीत सूट दिल्यावद्दल भानजी बल्लाळ हेजीब यांस (२३६), अबू महमद काजी यास कालिगे हा गांव इनाम दिल्यावद्दल उदाजी चव्हाण यांस (२३७); उमापतिभट्ट यास साठ रुपये देण्यावावत सुभानजी बल्लाळ हेजीव यास (२३९); नरहर देशकुलकर्णी यास त्याचे पूर्वापार हक्क ठरवून दिल्यावद्दल (२४०); नारो खंडेराव यांस रांगोळी हा गांव इनाम दिल्यावद्दल गांवकामगार रांगोळी यास (२४२); कृष्णभट्ट रंगभट्ट लळीत ज्योतिषी यास जमीन इनाम दिल्यावद्दल देशा-धिकारी व कारकून यास (२४३); तारळयाचे देशमुखीवावत नागोजीराव पाटणकर यास (२४५); आळते इत्यादि पांच गांवे राणोजी घोरपडे यांना इनाम दिल्यावावत देशाधि-कारी व कारकून यांना (२४७); शाहू व संभाजी यामधील तहानुसार वारणेपासून तुंगभद्रेपर्यंतचा मुलुख संभाजीकडे देण्यात आल्यासंबंधी हिंदुराव घोरपडे, वळवंतराव शिवदेव, गोविंदराव व सुभानराव मोरे यांना (२४८-२५०; २५३, २५४); मिरज प्रांती राणोजी घोरपडे यांस देशमुखी वतन दिल्यासंबंधी देशाधिकारी व कारकून मिरज यांना (२५१); राणोजी घोरपडे यांस नांगनूरची देशमुखी दिल्यावद्दल (२५२).

कौलनामा--दानवाड व एकसंबे यामधील जंगल जमीन नरसो पंडित यांस दुमाला करून दिल्यासंबंधी (११८८); देसाई यांचे दहशतीपासून गांवकऱ्यांना संरक्षण देण्यावावत गांवकामगार नांदणी यांस (२१७).

टिप्पणे--घोरपडे घराण्यात सेनापतिपद कोणकोणास मिळाले त्यावावत (११९५).

पत्रे--एकसंबे व कल्लोळ या गांवामधील सीमा तंटयासंबंधी गांवकामगार, कल्लोळ यांस सुभे आजमनगर यांचे (११८९); तिळ शर्करायुक्त पत्र पाठविले आहे तरी खुशालीचे पत्र म्हणून शिवाजी राजे यांचे अमरसिंह दादा यांना (१९९); भिकंभट धर्मातकारणी तीर्थपुरोहितपण दिलेवद्दल चंद्रसेन जाधव यांचे (२०४); आपलकडील खेडयापाडय उपसर्ग न दण्यावावत कृष्णराव प्रतिनिधि यास राणोजी घोरपडे यांच (२०७); प्रभावळ

रुमाल क्र. १०

पुडके क्र. १--(चालू)

**पत्रे**--(चालू)

कुलकर्णीपणाच्या खटल्याबाबत कृष्णराव प्रतिनिधि यांचे ताराबाईस (१२०८-२०९); साधोजी व शिवाजी घाटगे यास जमीन इनाम दिल्याबाबत गांवकामगार चिखली यास (२३८); मिरज प्रांताच्या सरदेशमुखीच्या मुतालिकीबाबत मल्हारराव नारायणराव मुतालीक यांस (२४१).

**फर्मान**--नरसगोंडा पाटील यास उदयगांवची पाटिलकी दिल्याबद्दल महमद आदिलशहा याचे (११८३).

**महजर**--भीमदेवभट्ट रघुनाथभट्ट यामधील बोरगांव तर्फेच्या वृत्तीच्या तंट्याबाबत (१२०१).

**याद्या**--सीमेशेजारच्या गांववाल्यांनी घेतलेल्या कल्लोळ गांवच्या इनाम व धर्मादाय जमिनीची (११८७); जयराज व जयकृष्ण चोबे (मथुरादासी) यास वर्षासनाप्रमाणे पावत्या झालेल्या रकमांची (२००).

**वतनपत्रे**--सिदोजीराव घोरपडे यास चिकोडीचे नाडगौडी वतन दिल्याबाबत (१२११, २१३); राणोजी घोरपडे यास मिरज मामलेची देशमुखी दिल्याबाबत (२४६).

**वर्षासन** पत्र--जयकृष्ण चोबे (मथुरादासी) यास वर्षासन करून दिल्यासंबंधी शिवाजी राजे यांचे (११९४).

**वृत्तीपत्र**--का तारळेची देशमुखी वृत्ती रामराव पाटणकर यास दिल्याबाबत (१२०३).

**सनद**--रामदास यांच्या चाफळ येथील मठास गांवे जमिनी इत्यादी इनाम दिल्यासंबंधी (११९८).

---

**ज. नं. १०, रु. क्र. १०, पु. क्र. २, का. सं. १२५५ ते १३३३, (७९).**

**बिनसाली**

**आज्ञापत्रे**--रुई गांवी सखो देवाजी कुलकर्णी यास जमीन इनाम दिल्याबद्दल सदर कुलकर्णी व गावकामगार यांना (१२५५-२५७); बाबूराव व दिनकरराव चिटणीस यास १०१ रुपये देण्याबाबत भानजी बल्लाळ हेजीब यास (२५८); सौंधे संस्थानिकास १०० होन देण्याबाबत भानजी बल्लाळ हेजीब यास (२५९); मनेराजुरी गांव राणोजी घोरपडे यास मोकासा दिल्याबद्दल (२६२); नारो अनंत सबनिस यास व्रतबंधानिमित्त १०० होन देण्याबाबत भानजी बल्लाळ हेजीब यास (२६५); हरिहराचार्य पंडित यास ५० होन देण्याबाबत यास (२६६); बाळाजी महादेव मुतालिक यास ५० होन देण्याबाबत भानजी बल्लाळ हेजीब यास (२६७); पिराजी व शहाजी बागल यांना यळगूड हा गांव इनाम दिल्याबाबत (२६८, २६९); मालोजी नलवडे यास हनिमनाळ हा गांव इनाम दिल्याबद्दल त्रिंबकराव कृष्ण यांस (२७३, २७७); राणोजी घोरपडे यास तेरा गांवे मुकासा दिलेबद्दल देशमुख देशपांडे तालुका सोलापूर यास (२७८, २७९); महादजी काशी यास जमीन इनाम दिल्याबद्दल गांवकामगार आसंडोली व रेखोजी जाधव हावलदार यास (२८१, २८२); करीमखान जमलखान यास जुगुळ इनाम दिल्याबद्दल गांवकामगार खिद्रापूर यांस (२८४); बाळाजी देसाई यांच्या जमिनीतील देशमुखीबाबत नागोजीराव पाटणकर यास (२८६); रामजी धोंडदेव व आपाजी संभाजी यांना तालुका सालसी व तालुका खारेपाटण येथील देशकुलकर्णीचे वतन दिल्याबद्दल देशाधिकारी व कारकून प्रांत राजापूर यांना (२८८, २८९); व्यंकटराव अग्निहोत्री यास वर्षासन दिलेबद्दल भगवंतराव तमाजी वकील यांस (२९०); करवीरकर संभाजीशी राजनिष्ठ रहाण्याबाबत देशमुख देशपांडे पाा यादवाड, नवलगुंद इत्यादींना सातारकर शाहू छत्रपतीची (२९१-२९९); बाळाजी देसाई यास सहा गांवचे देशमुखी व कुलकर्णाचे वतन दिल्याबद्दल गांवकामगार तालुका असंडोली यास (३००); मुरारराव घोरपडे यास सांगवडे गांव दिल्याबाबत गांवकामगार सांगवडे यांना (३०२); अर्जुनी गांव व्यंकूबाईस इनाम दिल्याबाबत गांवकामगार अर्जुनी यांना राणोजी घोरपडे यांचे (३०५); कवठे गांवचे कुलकर्णीपणाचे वतन हरी राम पोंभुर्लेकर यास दिल्याबाबत गांवकामगार कवठे यास (३०८); पन्हाळप्रांती हणमंतराव नारायण व बापूजी नारायण यास जमिनी दिल्याबद्दल कृष्णराव आमात्य यास (३१३); म्हाकवे गांव विठ्ठल शपाद्री यांस इनाम दिल्याबद्दल गांवकामगार म्हाकवे यास (३१४), शेपो

रुमाल क्र. १०

पुडके क्र. २--(चालू)

**आज्ञापत्रे**--(चालू)

नारायण यास वालिंगे गांव इनाम दिल्यावद्दल गांवकामगार वालिंगे व देशमुख देशपांडे तालुका कागल यांना (१३२०, ३२३); शेपो कानडे यास निलजी गांव इनाम दिलेवद्दल गांवकामगार निलजी यांस (३२४); राणोजी घोरपडे यास सेनापति पद दिल्यावावत (३२६).

**इनामपत्रे**--सगुणावाई निंबाळकर यांना म्हाळुंगे गांव इनाम दिल्यावद्दल (१२५४); मखदुम सय्यद काजी यास नंदवाल हा गांव इनाम दिल्यावद्दल (२७२); मालोजी नलवडे यास हनिमनाळ येथे सरनोवतीचे वतन दिल्यावद्दल (२७४, २७६); मुधोळ येथे नरहरभट यास जमीन दिलेवद्दल (२९०); शेपो नारायण यास म्हाकवे गांव इनाम दिल्यावद्दल, भिर्डी गांव शेपो नारायण यास इनाम दिल्यावद्दल (३२१, ३२२).

**चकनामा**--जुगळ व राजापूर येथे मुसलमानास मशिदीसाठी जमीन दिल्यावद्दल (१२८३).

**टिप्पण**--कापशीकर घोरपडे यांचे सरंजामाच्या माहितीचे (१२६३).

**पत्रे**--कोल्हापूरचे संभाजी यांचे कर्जाचा हवाला खंडोजी गोगवले यांनी घेतल्यावद्दल वनसीपुरी महंत यांना (१२८५), आजरे तालुका शिवाजी घोरपडे यास इनाम असल्यासंबंधी वाळाजी वाजीराव व माधवराव वल्लाळ यांची घोरपडे यांस (३०४, ३०६); रामराजासंबंधी वाळाजी वाजीराव यांचे रामचंद्र नारायण यांस (३१०, ३११); व करवीरकरांचे पेशवे यांना (३१५-३१९); वारभाईस शह देण्यावावत रघुनाथ वाजीराव यांचे करवीरकरास (३२५); लक्ष्मीवाई सावंतवाडीकर यांचे पुण्यास व करवीरास जाण्यासंबंधी छत्रपतींना (३२७), वेगरेनहाळ हा गांव जानराव केदारजी धारराव यास इनाम दिल्यावावत सगुणावाई यांना छत्रपतींचे (३२८), कंपनी सरकारातून हुकेरी व चिकोडी हे तालुके करवीरकरास दिल्यासंबंधी राणोजी घोरपडे यास (३२९); सिद्दी सय्यद सुभेदार दंडाराजापुरी यास अमात्यांनी पाठवलेले पत्र पोचल्यासंबंधी सुभेदार याचे भगवंतराव अमात्य यास (३३०); आवाजीराव कृष्ण यांचे आप्पाजीरावास दत्तक दिल्यासंबंधी जिजावाई साहेब यांना (३३१); खेवडे हा गांव संकेश्वर मठास इनाम असल्यावावत विठोजी घाटगे सर्जेराव यास (३३२, ३३३).

**याद्या**--कापशीकर घोरपडे यांचेकडे असलेल्या सरंजामी गावाची (१२६०); महादजी शिंदे यांना छत्रपती व पेशवे यांनी पाठवलेल्या पत्रांची (२६१); राणोजी घोरपडे यास मिळालेल्या सनदाची (२७०); व त्यांच्या सरंजामाच्या माहितीची (२७१); सावनूर संस्थानाकडून येणे असलेल्या ऐवजासंबंधी (अपुरी) (३०७); वापूजी नाईक यास आणावयासाठी झालेल्या खर्चाची (३०९).

**वतनपत्र**--तालुका असंडोलीपैकी सहा गांवचे देशमुखी वतन वाळाजी लिंगोजी देसाई यास दिल्याचे (१३०१).

---

**ज. क्र. ११, रु. क्र. ११, पु. क्र. १, का. सं. १३३४ ते १३९३ (६०).**

**सु. स. ११९१ ते १२१५, इ. स. १७९०-९१ ते १८१४-१५.**

**आज्ञापत्रे**--प्रीतीराव चव्हाण व नारायणराव पाटणकर यास सामानगडावरील बंदोवस्त पाहू देण्यावावत हंबीरराव जाधव व कृष्णाजी मलेगीर यांस (१३४३); भाऊ महाराज यांच्या कर्जाचा हवाला घेण्यावावत प्रभाकर वल्लाळ यास (३७२); तसेच पांडुरंग नाईक यांना (३७४); व्यंकटराव लक्ष्मण यास गडावर येण्यास व परत जाण्यास परवानगी देण्यावावत दिनकरराव भोसले व आवाजी राम यांस (३७९).

रूमाल क्र. ११

पुडके क्र. १—(चालू)

**करीना**—इंग्रजांकडील सभापती मुदलियार याचेशी झालेली दोस्ती व पंडित महाराजांचा इंग्रजांशी स्नेह याबाबत अमृतराव शिंदे यांचा (१३६६).

**कलमबंद्या**—मनोळी व हुकेरी तालुके करवीरकराकडे देण्याबाबत दुर्गाबाई व पेशवे यामध्ये झालेला (१३३५); शेषो नारायण व भगवंत आप्पाजी यांजकडील गावासंबंधी दुर्गाबाई व पेशवे यामध्ये झालेला (३३६).

**टिपणे**—रखमाजी भोसले यास सामानगडचे मुक्कामी ठार मारल्यासंबंधी (१३४१); सावंतवाडीकर यानी परस्पराचा मुलुख ज्याचा त्यास देण्याबाबत एलिफिन्स्टन साहेबांशी वकिलामार्फत झालेल्या बोलण्याचे (३५३); निपाणकर यानी करवीरकरांच्या घेतलल्या खेड्यासंबंधी एलिफिन्स्टन साहेबाकडे पाठविलेल्या माहितीचे (३५५); अमृतराव शिंदे, भाऊ महाराज, नारो गिरमाजी इत्यादींना पाठविलेल्या पत्रांची (३७०); करवीरहून पुण्यास हैबतराव गायकवाड, उदाजीराव घाटगे इत्यादींना पाठवलेल्या पत्रांचे (३८४); मनोहरगडचे सरनोबत, गडकरी, नायकवाडी इत्यादी बाबत छत्रपतीस केलेल्या निवेदनाबाबत (३९०).

**पत्रे—छत्रपतीस**—करवीरकर व हैदरअल्ली यांच्याशी सख्य करण्याबाबत रघुनाथ बाजीराव याचे (१३३४); पक्ष तिथीसाठी नारळ, सुपारी इत्यादी साहित्य पाठविल्याबाबत बनगाजी नाईक निंबाळकर यांचे (३४५); निपाणीकर यांचेकडील ठाणी सोडवून घेण्याबाबत (३४८); निपाणकरांनी करवीरकरांच्या मुलुखात ठाणी घातल्याबाबत (३४९) व निपाणीकर व सादुल्लाखान यांच्या उपद्रवासंबंधी भाऊ महाराज यांचे (३५०).

**करवीर वकीलांची छत्रपतीस :** बाठारकर यांचे देणे देण्यासंबंधी (३५६); घोसरवाड, दानवाड चिचली इत्यादी गावांच्या सोडचिठ्या इंग्रजांकडून घेण्याबाबत (३६१); पुण्यात मारवाड्याच्या घरावर पडलेला दरोडा, गंगाधरशास्त्री, पेशवे व इंग्रज यांच्यातील बोलणी, इत्यादीसंबंधी (३६५); एलिफिन्स्टन बोरघाटास शिकारीस गेले इत्यादी मजकुराचे (३७५); आनंदराव जाधव देऊळगांवकर यांची भाऊबंदी वाटणी, निजामचे वकील व पेशवे यांची भेट, बाळासाहेब रास्ते इत्यादीसंबंधी (३७७); मालवणच्या व्यापाऱ्यांना चोरानी लुटल्यासंबंधी (३७८); हिंदुस्थानात जाणाऱ्या इंग्रज सैन्याबरोबर पेशव्यांचीही फौज जाणार असल्यासंबंधी (३८०); बावडेकरांनी घातलेले दरोडे व कऱ्हाड भागातील विठ्ठल बापुराव यांचे बंड यासंबंधी (३८१–३८३); इंग्रजांच्या फलटणी धोडनदीव उतरल्या असून शिंद्यांचे लष्कर ग्वाल्हेरच्या दक्षिणेस असल्याबाबत (३८५); पेशव्यांचेवर जास्त फौज ठेवण्यास निर्बन्ध, करवीरकरांचे देणे, घेणे इत्यादीबाबत (३९१), सदाशिव पंतांकडून इंग्रजांमार्फत करवीरकरांच्या ऐवजाची वसुली, पेशवे व इंग्रज यांच्या भेटी इत्यादीबाब (३९२-३९३); करवीरहून हुजरे वगैरे न पाठविण्याबाबत (३८९).

रगडकरी, राणोजी घोरपडे व विरुपाक्ष आण्णाजी यांच्या बंदोबस्ताबाबत बाळाजी जनार्दन यांचे त्रपतीस (३३७); विश्वनाथ दीक्षित यांची इनाम जमीन चालविण्याबाबत नरसिंगराव उडपी स परशुराम रामचंद्र यांचे (३४२); सखाराम घाटगे बाहेरगावी गेले असल्यासंबंधी रत्न पंत राजाज्ञा व भाऊ जोशीराव यांस सिदोजीराव निंबाळकर सरलष्कर यांची (३४६-३४७); चिपळूणकर यांचे कर्ज फेडीबाबत चिपळूणकर यांना वासुदेव पंडित व दिनकरराव गायकवा (३५४); मानचंद फत्तेचंद व बळवंतराव मोहोळकर यांना त्यांची कर्जे भागविण्य दिनकरराव गायकवाड यांची (३५९–३६०); निपाणीकरानी घेतलेली गावे, तालुका इत्यादीबाबत करवीरकर वकीलाचे सुन्दराबाईस (३६३); सभापत र यांचे भेटीबाबत नारो शिरताजी यांचे अमृतराव यांना (३६७); करवीरच मंडळीसंबंधी अमृतराव शिंदे यांचे कृष्ण रावजी यास तसेच त्यास गोव्यास सांगितल्याबाबत त्याचे (कृष्णरावाचे), अमृतराव शिंदे यांना (३६८, ३६९) राज यास करवीरी पाठविण्याबाबत एलिफिन्स्टन साहेबास करवीरकरा करवीरास येण्याबाबत भाऊ महाराज यांस सुन्दराबाईचे (३७३); गायकवाड, गोविंदराव व त्रिंबकजी डेंगळे हे " इंग्रजांचे स्वार्थ (३८६–३८८).

## रुमाल क्र. ११

### पुडके क्र. १—(चालू)

**याद्या**—सामानगडावरील मामलेदार, कारकून, गडकरी, सरनोबत इत्यादी लोकांची (१३३८–३४०); सामानगडावरील जकिऱ्याचे सामानाबद्दलची (३४४); पांडुरंग नाईक यांजकडील कर्जफेडी-संबंधी (३५१); सरंजामदार लोक आजरे तालुका इत्यादीबाबत इंग्रजांकडून घ्यावयाच्या कामांची (३५२); हिंदुराव घाटगे कर्नाटकातील सरंजामदार, निपाणीकर इत्यादीबाबत करवीरकर वकिलानी इंग्रजांशी बोलणी करण्यासंबंधीची (३५७–३५८); बापूराव मोहोळ-कर यांच्या कर्जाऊ रकमेसंबंधीची (३६२); हिम्मतबहाद्दर निपाणीकर वगैरेबाबत कर-वीरास पाठवलेल्या पत्रांची (३६४); पुणे मुक्कामी करवीरकर वकिलाचे विद्यमाने झालेल्या जमाखर्चाची (३७६).

---

**ज. क्र. ११, रु. क्र. ११, पु. क्र. २, का. सं. १३९४ ते १४५९ (६६).**

**सु. स. १११६ ते १२२१, इ. स. १७१५-१६ ते १८२०-२१.**

**आज्ञापत्र**—चिकोडी व मनोळी तालुक्यांतील जमेदार व जहागिरदार यांचे सोडचिठ्ठ्याबाबत बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस यांस (१४२०).

**करारनामे**—सातारा व करवीर यांचे एक राज्य करून पूर्ववतप्रमाणे चालवण्याबाबत शंभू छत्रपती यांना बाळाजी बाजीराव व चिमाजी आप्पा यांनी लिहून दिलेला (१४५१); राम-राजास साताऱ्यासह करवीरकरांचे ताब्यात देऊन करवीरकरांचा अधिकार सर्वत्र चालण्या-बाबत शंभु छत्रपती यांसी पेशवे यानी केलेला (४५२, ४५३).

**तहनामा**—करवीरकर व हैदरअल्ली यांमध्ये परस्परास सहाय्य व रघुनाथराव यांची पेशवाईवर स्थापना करण्याबाबत झालेला (१४५४).

**पत्रे—करवीरकर वकीलांची छत्रपतीस :** बापू रामोशी इत्यादी बंडवाल्यांचा बंदोबस्त, घोडनदीनजीक इंग्रज सैन्याचा तळ इत्यादीबाबत (१४०४); खानदेशात बंडवाले व इंग्रज यांच्या लढाईत इंग्रजांची खराबी झाल्यासंबंधी (४०६–४०८); कागल तालुका करवीरकरांकडे येण्याबाबत (४०९–४११); रायबाग व पानवाड येथील रयतेस होणारा उपद्रव व पेशव्यांचे कन्येचा मृत्यू याबाबत (४१२); इंग्रजांच्या सैन्यात घेत असलेल्या लोकांत मराठे नाहीत इत्यादी मजकूराचे (४१३); इंग्रज व पेशवे यांच्या वितुष्टाबाबत (४१४); कोणी मातबर मनुष्य इंग्रजाकडे पाठवण्याबाबत (४१५–४१६); मालकमसाहेब पुण्यास हैदराबादहून आल्यासंबंधी (४१७); इंग्रज व पेशवे यांचे वितुष्ट व उभयतांचे लष्करी हालचाली याबाबत (४१८–४१९); इंग्रजांचे लोक येताच शिरोळ व बाळवे येथील करवीरकरांचे लोक काढून घेण्याबाबत (४२१); थॉमस मन्रो यांचा चोरीस गेलेला घोडा व इतर साहित्य यांचा तपास लावण्यासाठी मनोळीहून करवीरास येत आहे (४२६); रॉबर्टसन साहेबास द्यावयाची मेजवानी, जवाहीर, सनगे इत्यादीबाबत (४२८–४२९); मेजर क्लार्क इस्लामपूर मार्गे बेळगावास जाताना त्यांचा बंदोबस्त ठेवण्याबाबत (४४१); सिंहगड, पुरंदर, रायगड यांच्या सोडचिठ्ठ्या इंग्रजानी पेशव्याना दिल्याबाबत (४५५).

**पत्रे**—करवीरास गोखल्यांकडून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त, पेशव्यांच्याकडून करवीरकरांची होणारी कामे इत्यादीबाबत (३९५); आजरे महालावर दिलेले विनायकराव लागू यांचे कर्ज भागविण्याबाबत बाळकृष्ण महादेव यांचे (३९६); दौलतराव शिंदे यांच्या मृत्युसंबंधी (३९७–३९८); सौंदती करवीरकरांस दण्याबाबत (३९९); निपाणीकरांनी करवीरकरांच्या केलेल्या लुटीची भरपाई करण्याबाबत पेशवे फुलगांव आवटीस असून पेंढाऱ्यांचा बंदोबस्त इंग्रजांकडून होत असल्याबाबत (४०१); सौंदती, बोरगांव इत्यादी गांवासंबंधीची कामे इंग्रजांकडून करून घेत असल्याबद्दलचे (४०२); जोतजी नाईक यांस निपाणीकर यांचे अटकतून सोडणे, विशाळगड, भेडसगांव या भागांतील बंड इत्यादीबाबत (४०३);

**रुमाल क्र. ११**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे**--(चालू)

**पत्रे**—सुबराव जाधव देसाई प्रांत रायबाग यांस, त्याने आपल्या वतनी कामाबाबत छत्रपतींकडे दाद मागावी या अर्थी थॉमस मन्रो यांचे (७८०८); जीवराव जाधव हवालदार यास धारवाड येथील पो. एजंट यांच्याकडील छत्रपतींची कामे होतील या आशयाचे (कामे कोणती ती लिहिली नाहीत) भरमाप्पा देसाई यांचे (८१०); भरमाजीराव जाधव देसाई यांस, धारवाडास चितोपंत देशपांडे वकील यांजकडे त्यांच्या वतनी कामाच्या जावसालाबाबत कारकून पाठवून देण्यासंबंधी यशवंतराव देसाई यांचे (८१२); पो. एजंट यास, सौदत्तीकर गोसावी याच्या सौदत्ती गावाबाबतच्या हक्कासंबंधी (पत्र अपुरे व फाटलले) करवीरकरांचे (८१३); पो. एजंट टाकरीन यास, सुबराव जाधव याच्याकडून चिंचली गांवाचा कबजा मिळण्यास होणारा अडथळा दूर करून धनाबाई देसाई हिच्या त्यासंबंधीच्या हक्काबाबत चौकशी होण्याबद्दल भरमाप्पा जाधव देसाई याचे (८१४); जखाप्पा आकाप्पा देसाई व रायप्पा नाडगोंडा यांस, राचापा सुबराव व भरमाप्पा सिदराम यांच्या भाऊबंदी तंट्याचा निवाडा सत्वर करण्यासंबंधी नरसो रामचंद्र याचे (८१६); मथुरागिरी गोसावी यास, सौदत्तीचे ठाणे त्यास मिळाल्यासंबंधी पावती देण्याबाबत रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (८१८); आईसाहेब यांना, राचाप्पा जाधव यांच्या वतनासंबंधीच्या खटल्याचा निकाल सत्वर करण्यासंबंधी यादवराव कदम गिरवीकर यांचे (८२२); सरलष्कर यास चिंचली गावाचा वसूल आपणास देण्याबद्दल ताकीद होण्यासंबंधी भरमाप्पा सिदराम देसाई याचे (८२४); काकासाहब गायकवाड यास, क्षेमसमाचारासंबंधी लक्ष्मीबाई पाटणकर हिचे (८२६); नानासाहेब राजाज्ञा यास, एकदोन दिवसात भेटीस येत असल्यासंबंधी भरमाप्पा सिदराम देसाई याचे (८२९); हैबतराव गायकवाड यास, सरकारातून दोन हजार रुपये मिळण्याबाबत आनंदराव आबाजी यांचे (८३०); सुबराव बापूसाहेब हिंदुराव यांस, भरमाप्पा सिदराम देसाई यांचा बंदोबस्त करण्यासंबंधी दौलतराव घोरपडे यांचे (८३१); बाळाबाईआक्का निवाळकर यांस, आपले इंगळी गावासंबंधीचे काम करण्यासंबंधी तसेच हजार पाचशे रुपये पाठविण्याबाबत भाऊ महाराज यांचे (८३३); कृष्णराव गोपाळ यांजवरील गुन्ह्याबाबत व हिंदुराव यांच्यावरील पहारा उठविण्याबाबत भाऊ महाराज व इंग्रज अधिकारी ह्यांची बोलणी झाल्यासंबंधी आप्पा देसाई चिंचलीकर यांचे (कोणास लिहिले ते नमूद नाही) (८३५).

**छत्रपतीस** : तुळजापुरास भेटीस येत असल्याबद्दल श्रीनिवास नारायण भिर्डीकर यांचे (७८११); भरमाप्पा देसाई याने केलेल्या भाऊबंदी खटल्यामुळे आपल्या वतनास झालेला अडथळा दूर करण्यासंबंधी धनाबाई देसाई हिचे (८१७); आपल्या पोटापाण्याचा वगैरे बंदोबस्त करण्याबाबत हैबतराव व विश्वासराव गायकवाड यांचे (८१९–८२०); बुवासाहेब छत्रपती यांस,

रुमाल क्र. ५०

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—(चालू)

कृष्णाजी महाजन कापसीकर यास शिवोर येथे लावणीस पाठविल्यासंबंधी व खानविलकर यास परत बोलावण्याबाबत बहिणाबाई यांचे (७८२१); रावाप्पा देसाई याच्या वतनासंबंधीच्या खटल्याचा निकाल सत्वर करण्यासंबंधी यादवराव कदम यांचे (८२३); घोंडो बापूजी यास मुरारजी पाटील याने धरून नेल्यासंबंधी गुरु महाराज यांचे (८२५); आज्ञेप्रमाणे स्वार व लोक पाठविल्यासंबंधी भरमाप्पा सिदराम जाधवराव देसाई यांचे (८२७); चिचलीचे ठाणे धनाबाई देसाई हिच्या स्वाधीन करण्याबाबत भरमाप्पा देसाई यांचे (८२८); सरकारात घेतलेला वतनाचा ऐवज परत मिळण्यासंबंधी व चिंचलीची सोडचिठी मिळण्याबाबत भरमाप्पा देसाई यांचे (८३२); बुवासाहेब छत्रपती यांस पुण्यास येण्याबाबत गव्हर्नर यांची थैली आलेवरून जात असल्यासंबंधी व खर्चास पांच हजार रुपये पाठविण्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (८३४).

---

**ज. क्र. ५०, रु. क्र. ५०, पु. क्र. २, का सं. ७८३६–७९४७ (११२).**

**सु. स. १२२३–१२३८, इ. स. १८२२–२३ ते १८३७–३८**

**आज्ञापत्रे**—गावकामगार चिंचली यास, भरमाजी सिदराम जाधव देसाई यांच्या आज्ञेत वागण्यासंबंधी (७८४०); का लाटमधील गावोगांवचे गावकामगारांना माणको सखो व जिवाजी नरहर देशपांडे याजकडे देशपांडेपणाचे वतन, जमीन, हक्क वगैरे चालविण्यासंबंधी (८४१); अर्जुनवाड येथील बाळाजी गोपाळ देसाई याची जमीन त्याजकडे चालविण्याबाबत (८५३); गावकामगार कवठेसार यास, देशपांडे यानी भाऊ महाराजांस दिलेली जमीन त्याजकडे चालवण्याबाबत (९१०); नारोपंत यांस, करगांव, प्रांत हुकेरी हा गाव भाऊ महाराज याना दुमाला दिल्याबाबत (९११); सावगांव, हातकणंगले व सामानगड येथील गांवकामगार यांना, भाऊ महाराज यांच्या जमिनीचा घेतलेला वसूल त्यास परत करण्यासंबंधी (९१३–९१५); गावकामगार शिवारे यास, भाऊ महाराजांकडे आज्ञेप्रमाणे जमीन चालविण्यासंबंधी (९२०); श्रीपाद श्रीधर याचा इनामी हिस्सा त्याजकडे चालविण्याबाबत, राजमंडळाचे गांवकामगार भिर्डी यास (९२५).

**कलमबंद्या**—भाऊ महाराज यांचे हुकेरी येथील वतनाचा बंदोबस्त होऊन मिळण्याबाबत (७८४८–८५२); भाऊ महाराज यांच्या इनाम गावास करवीरकराकडून होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्ताबाबत (८५४).

**पत्रे**—आंबेकरी भोज यास, बाळाजीपंत यास नदीपार पोचविण्यासंबंधी मानसिंगराव पाटणकर याचे (७८३६); श्रीविद्याशंकर भारती स्वामी यास, वरचेवर पत्रे पाठवून समाचार कळविण्याबाबत वासुदेव पंडित याचे (८३७); हैबतराव गायकवाड यास, नांदणी येथील बंदोबस्तात ढवळाढवळ न करण्याबाबत कल्याणराव कृष्ण याचे (८३८); केरूर या भाऊ महाराजांच्या इनाम गावास उपसर्ग न होण्याबाबत पो. ए. यांचे (९०९); जीवराव जाधव यास, धारवाड येथे नरसिंगराव शिंदे पोहोचल्याबाबत भरमाप्पा सिदराम जाधव देसाई याची (९१८–९१९); काकासाहेब गायकवाड यास, क्षेमसमाचारासंबंधी लक्ष्मीबाई पाटणकर हिचे (९२१); करवीरकर वकिलास, निलजीकर इनामदाराच्या वाटणीसंबंधीच्या कामाचे उत्तर पाठविण्याबाबत पो. ए. यांचे (९२३–९२४); दिनकरराव गायकवाड यास, सौंदतीच्या रयत लोकांस उपसर्ग न देण्याबाबत सदाशिव अनंत याचे (९२६); पो. ए.यांस रावजी महाराज याचे घरी चोरी करणाऱ्या नारो कृष्ण पाटणकरवरील गुन्ह्याची चौकशी कंपनी सरकारकडून होण्याबाबत राजमंडळ करवीर यांचे (९२७); श्रीनिवास पंडित रावजी महाराज यास, गुरूमहाराज यांच्या चोरीबाबत काय म्हणणे असेल ते कळविण्याबाबत (९२८); पो.ए.यास, गुरूमहाराज यांचे चोरीस गेलेले दागिने त्यांचे मुखत्यार चिमणाजी गंगाधर हर्षे याजकडे देण्याबाबत कारभारी गुरूमहाराज यांचे (९२९); करवीरकर वकिलास, भिरडी येथील सीमा तंट्याबाबत पो.ए. यांचे (९३०); पो. ए. यास, देवचंद गुजर याच्या चोरीच्या दाव्यातील आरोपी चेनगोंडा व बाबा कागलकर यांना मामलेदार गोकाक यांजकडे पाठवण्यात येत असल्यासंबंधी करवीरकरांचे (९३१); सईबाई (दिवाणसाहेब) यांना, पट्टी नजीकच्या जागेत सोपा बांधल्यासंबंधी गुरूमहाराज यांचे (९३२); रखमाबाई यांना भाऊ

**रुमाल क्र. ५०**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे**—(चालू)

महाराज यांनी त्यांच्या सरंजामासंबंधी दिलेली ठराव यादी मान्य नसल्यासंबंधी रावजी महाराज याचे (कोणास लिहिले ते नमूद नाही) (७९३३); बाबासाहेब महाराज यास, वरचेवर पत्रे पाठवून क्षेमसमाचार कळविण्याबाबत, तसेच बसण्यास दुसरा घोडा पाठविण्यासंबंधी बाळमहाराज याचे (९४१); पंत राजाज्ञा यास, खर्चास रक्कम मिळण्यासंबंधी दिनकर आप्पाजी याचे (९४२); सदाशिवपंत अनंत यास, चिकोडीहून खजिना आणण्याबाबत व चिकोडी ठाणे ताब्यात मिळण्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (९४३); भरमाप्पा जाधवराव देसाई यास, बाजीपंत याच्या खर्चास रक्कम पाठविण्याबाबत गोपाळराव गोविंद याचे (९४४); नागोजीराव घाटगे यास, मालवण येथील समाचार करवीरकरांस कळवल्याबाबत हैबतराव गायकवाड याचे (९४५); ज्योतिबाच्या दर्शनास गेलेले अमृतराव पंडित नाहीसे झाल्यामुळे त्यांचा शोध करण्याबाबत करवीरकरानी इंग्रजास लिहिण्याच्या पत्राचा मसुदा (९४६); आईसाहेब यांना, क्षेमसमाचारासंबंधी कृष्णाजी अमृतराव प्रतिनिधी यांचे (९४७).

**छत्रपतींना**—चिंतामण श्रीनिवास भिर्डीकर व आप्पा राणोजी भिसे यांच्या सनदा देण्याबाबत सदाशिव सखाराम याचे (७९४०); तळीखोर निलजीकर खंडेराव निंबाळकर याचा बंदोबस्त करण्याबाबत पो. ए. यांचे (९२२); करवीरकरांच लखोट लष्करात पोचल्यासंबंधी व मल्हारपंताचे लखोटे सदाशिव भाऊ त्यांच्याकडे पाठविल्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (९१७); नांदणीचे ठाणे घण्यासंबंधी केदारजी यादव व बापू नारायण भोसले याचे (८३९); मथुरागिरी, मठ सौदत्ती, हे कैलासवासी झाल्यासंबंधी रघुनाथगिरी याचे (९१६).

**बाबासाहेब व चिमासाहेब छत्रपती यांस**—सदाशिव अनंत शेणोलीकर यांचा शोध लागत नसल्यासंबंधी गुरुमहाराज यांचे (७९३४); नरसोजी नाईक, कोरोची, याच्या खटल्यासंबंधीचे कागदपत्र पाठवीत असल्यासंबंधी गुरुमहाराज यांचे (९३५–९३६); पो. एजंट धारवाडकडून आलेली थैली पोचल्याबाबत गुरुमहाराज यांचे (९३७); वळीवडे येथील जैन व लिंगायत यांच्या धार्मिक कार्यात ब्राह्मण उपाध्याय न जाण्याबाबत गावकरांस ताकीद दल्यासंबंधी विष्णु पंडित याचे (९३८); आबा महाराज यांच्या पत्राचे उत्तर देता येण्यासारखे नसल्याबाबत गुरुमहाराज यांचे (९३९).

**याद्या**—चिकोडी, मनोळी तालुके सोडवून घेण्याबाबत केलेल्या कामगिरीबद्दल भाऊ महाराज यांना बक्षीस म्हणून एक लक्ष रुपये देण्याच्या व्यवस्थेसंबंधी (७८४२); बाबा महाराज, नाना महाराज व भाऊ महाराज यांना करवीर सरकारांतून मिळालेली इनाम गावे व जमिनी यासंबंधी (८४३–८४७); निलजीकर इनामदार यांच्या वंशावळीसंबंधी (९१२).

**लेखापत्रे**—हेरवाड, शिरढोण, टोप इ. गावचे गावकामगार यांना आपल्या वतनी हक्काबाबतचा ऐवज जोत्याजीराव निंबाळकर यास रदकर्जाबाबत देण्यासंबंधी राचाप्पा व्यंकटराव देसाई, नाडगौडा, प्रांत रायबाग, यांची (७८५५–९०८).

---

**ज. क्र. ५०, रु. क्र. ५०, पुडके क्र. ३, का. सं. ७९४८ ते ८००१ (५४).**

**इ. स. १८०० ते १८५८.**

**आज्ञापत्रे**—गावकामगार चिचली प्रांत रायबाग यास, भरमाजी देसाई यास देशागतीचे वतन दिल्याबाबत (७९५१); व्यंकटराव जाधव देसाई यास, कृष्णाजी नरसिंह यास इंगळी व दुर्गावाडी येथे पाटिलकीच्या मुतालिकीबद्दल इनाम दिलेली जमीन त्याजकडे चालवण्याबाबत (९६७).

**कलमबंदी**—छत्रपतींकडून व्यंकटराव श्रीनिवास निलजीकर यांच्या उलगडून मिळावयाच्या जावसालासंबंधी (७९६६).

**पत्रे**—गावकामगार भिर्डी यास, भिर्डी हा गाव देखरेखीसाठी छत्रपतींनी आपणाकडे दिला असल्यासंबंधी रामचंद्र दीक्षित याचे (७९४८); राघो वच्चाचार्य, सांगली, यास, आपल्यामध्ये व श्रीनिवासराव यामध्ये भिर्डी गावासंबंधीची वाटणी पूर्व वहिवाटीप्रमाणे करीत असल्यासंबंधी श्रीपादराव श्रीधर याचे (९५२); श्रीनिवास नारायण भिर्डीकर यास, त्याने छत्रपतींविरुद्ध

**रुमाल क्र. ५०**

**पुडके क्र. ३—(चालू)**

**पत्रे—(चालू)**

केलेल्या अर्जाची चौकशी सुरू असल्यासंबंधी विल्यम सिप्सन याचे (७९६०); कृष्णाजी नरसिंह याजकडून यावयाच्या ऐवजाबाबत त्यास भरमाप्पा देसाई याच्याकडून होत असलेल्या उपद्रवासंबंधी (अपूर्ण) (९६२); शिवराम दादा यास, घरखर्चासाठी घेतलेल्या कर्जाच्या ऐवजाची फेड करीत असल्याबाबत विश्वासराव नारायण व राचाप्पा व्यंकटराव जाधवराव यांचे (९६५); सौदती हा गाव रघुनाथगिरीकडून काढून भगिरथगिरी यास देण्यात आल्याबाबत माहिती पाठविल्यासंबंधी पो. एजंट यांचे (९८६–९८८); पोलिटिकल एजंट यास, नरसलापूर व अथनी यामधील सीमा तंट्यासंबंधी करवीरकरांचे (९८९); तर्फ खारेपाटण-पैकी कंपनी सरकारकडे असलेल्या भागातील मोरेश्वरपंत अमात्य यांचा सरंजाम, इनाम गाव इ. त्यांच्याकडे चालवण्याबाबत, (९९२–९९५); अर्जुनगिरी गोसावी व व्यंकाजी नाईक वाघमारे यास, त्यांच्याकडून येणे असलेल्या ऐवजाची रक्कम देण्यासंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यांचे (९९६); दिनकरराव गायकवाड यास, मार्नसिंग माने यास रांडरोटीबद्दल दहा बिघे जमीन छत्रपतींनी दिली असल्याबाबत हैबतराव गायकवाड याचे (९९७); त्र्यंबक रावजी यास भेटीस येत असल्यासंबंधी भरमाम्प्पा जाधव याचे (९९८); रत्नाकरपंत राजाज्ञा यांस आरळे, हेरले, खोचो इ. गावांवर अरब लोकांकडून होणारे रोखे व बराता यांना मनाई करण्यासंबंधी हैबतराव गायकवाड याचे (९९९); दिनकरराव गायकवाड यास, सौदत्तो मठाधिपती याच्याविरुद्ध चाललेल्या खटल्याची माहिती पाठविण्यासंबंधी हरिहरराव नारायण याचे (८००१).

**करवीरकर वकिलास पोलिटिकल एजंट यांची:** चिचलीकर देसाई याचे ठाणे जबरीने घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या, सुबाराव देसाई याचा बंदोबस्त करण्याबाबत (७९४९); राचप्पा जाधवराव देसाई व भरमप्पा देसाई यामध्ये भाऊबंदकीबाबत वाटणीसंबंधी दंगाधोपा होऊ न देण्याबाबत (९५०); राचप्पा व्यंकटराव जाधव देसाई यांचे इनाम गाव चिचली त्यांच्या स्वाधीन करणे, करवीरकरांच्या अटकेत असलेल्या त्यांच्या कारकुनास सोडून देणे इत्यादि-बाबत (९५३–९५५); निलजी गावी होणाऱ्या लूटालुटीचा बंदोबस्त करण्याबाबत (९५६); यशवंतराव निंबाळकर व व्यंकटराव श्रीनिवास यांच्यामधील निलजी येथील नाईकीच्या वतनाबाबतच्या खटल्याची चौकशी करण्याबाबत (९६३–९६४); देसाई प्रांत रायबाग व करवीरकर याच्यामधील गावोगावच्या इनाम जमिनी, हक्क इ. बाबतच्या खटल्यासंबंधी (९६८–९७०); शेबो नरसिंह भिर्डीकर हे त्यांच्या भाऊबंदो खटल्याबाबत करवीरो हजर राहत नसल्यासंबंधी (९७१).

**छत्रपतींना:**—पुरुषोत्तम नारायण याच्या भाऊबंदी वाटणीसंबंधीची माहिती, पो. ए., यांजकडे पाठविण्याबाबत आनंदराव वकील याचे (७९५७); छत्रपतींसाठी प्रसाद व फळे पाठविल्या-संबंधी सौदत्ती मठाधिपती भगीरथगिरी यांचे (९९०); छत्रपतींसाठी फराळाचे जिन्नस पाठविल्यासंबंधी तसेच पाघेर यांजकडील जिजापूर येथील जकातीच्या हिशोबासंबंधी (८०००).

**प्रकरणी कामे**—सौदती मठाधिपतो भगीरथगिरी गोसावी यांनी रयतेवर जुलूम करून त्यांची चीजवस्तू लूटल्यासंबंधी (७९७२ ते ९७७).

**जबाब**—सौदती येथे झालेल्या ज्वारीच्या कणसांच्या चोरीबाबत करवीर दरबारकडे झालेल्या शेत सनदी इ. लोकांचे (७९७८–९८५).

**टिप्पण**—यडाव येथील वसुलाचे काम, करबे येथील चोरीची चौकशी इ. संबंधी (७९९१).

**याद्या**—द्वारकोजीराव, लक्ष्मणराव, पिराजीराव इ. सात पाटणकर बंधूंमध्ये झालेल्या वाटणीसंबंधी (७९५८); रदकर्जास लावून दिलेल्या चिचणी येथील ऐवजाच्या हिशोबासंबंधी (९५९); भिर्डीकर इनामदार यांनी दरबार खर्च इ. बाबत करवीर सरकारात भरलेल्या ऐवजासंबंधी (९६१).

---

**ज. क्र. ५१, रु. क्र. ५१, पु. क्र. १, का. सं. ८००२ ते ८०३५ (३४).**

**इ. स. १८२४ ते १८५०.**

**अर्ज**—कंपनी सरकारास, निळजी गावाच्या आपल्या भोगवटयासंबंधी व्यंकटराव श्रीनिवास यांचा (८००५).

**आज्ञापत्रे**—श्रीनिवास नारायण यास, भिर्डी हा गाव जप्तीतून खुला करून त्यास दुमाला करून दिल्यासंबंधी राजमंडळाची (८००२–००४); कृष्णाजी व शेषो नरसिंह व श्रीपाद श्रीधर यांस, श्रीनिवास नारायण यांची जबरदस्तीने नेलेली पारडी, गुरे वगैरे त्यास परत देण्याबाबत (००७), बापूजी भोसले यास, भिर्डी हा गाव श्रीनिवास नारायण यांच्या स्वाधीन करणेबद्दल राजमंडळाचे (००८); गावकामगार रायबाग यांना, भिर्डी व चंदूर या गावांमधील सीमातंटयाचा निकाल करण्यासंबंधी राजमंडळाचे (०११); गावकामगार भिर्डी यांस, श्रीनिवास यांजकडे भिर्डी हा गाव चालवण्याबाबत (०१६).

**कलमबंद्या**—करवीर राजमंडळाकडून भिर्डी गावावर रोखे करून होणाऱ्या उपद्रवासंबंधी (८००६); रायाप्पा जाधवराव देसाई यांच्या वतनाच्या वहिवाटीसंबंधी (०१७–०१८).

**पत्रे**—गुजाजी गायकवाड यास, रक्कम भरून परशुराम भाऊ याच्याकडे असलेले करवीरकरांचे ओली सोडवून घेण्यासंबंधी बंकगिरी गोसावी मठ का तासगाव यांचे (८०२१); भाऊ महाराज यांना, क्षेमसमाचारासंबंधी जयसिंगराव घाटगे सर्जेराव यांचे (०२३); श्रीनिवासराव मुनशी यांस, त्याच्याकडे निरोप देऊन बाजीपंत यांस पाठवले असल्यासंबंधी भरमाप्पा जाधवराव देसाई यांचे (०२४); रंगराव मुनशी यास, त्याच्याकड बाजीपंत यास निरोप देऊन पाठविले असल्यासंबंधी भरमाप्पा जाधवराव देसाई याच (०२५ व ०३३); आनंदराव मुनशी यास त्याच्याकडे कामकाजासाठी बाजीपंत यास पाठविला असल्यासंबंधी भरमाप्पा देसाई याचे (०३२).

**छत्रपतींना** : सुब्राव देशपांडे याचे दानवाड येथील आपलें वतन गुरु महाराज याना दिल्यासंबंधी गांवकामगार दानवाड यांचे (८००९); आज्ञप्रमाणे भेटीस येत असलेसंबंधी श्रीनिवास नारायण भिर्डीकर याचे (०१२); तुळजापुरास येत असल्यासंबंधी व्यंकटराव श्रीनिवासराव याचे (०१३); आबासाहेब छत्रपतींना चंपाशष्ठीच्या उत्सवाचे साहित्य कोठीकडून पाठविल्यासंबंधी (कोणाचे ते नमूद नाही) (०२२); प्रकृती ठीक नसल्यासंबंधी हैवतराव गायकवाड याची (०२६–०२७); हैवतराव गायकवाड ह्यांची प्रकृती वरी नसल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (०२८); आज्ञा झाल्यास छत्रपतींबरोबर कोकणांत यावयास तयार असल्यासंबंधी हैवतराव गायकवाड याचे (०२९); आंदो नीळकंठ यास पाठवून देण्यासंबंधी हैवतराव गायकवाड याचे (०३०).

**याद्या**—भादोले येथील कुलकर्णीपणाचे वतन मल्हार यशवंत कुलकर्णी याजकडे चालविण्यासंबंधी (८०१०); चिचलीकर देसाई यांची कवठे येथील जमीन भास्करपंत जोशी यास दिल्यासंबंधी (०१४ व ०१५); भिर्डीकर इनामदार यांच्या भाऊबंदी वाटणीसंबंधी (०१९–०२०); भाऊ महाराज यांच्या मुलांच्या विवाहासाठी व मुंजीसाठी छत्रपतींनी दिलेल्या ऐवजासंबंधी (०३१); सौदत्ती येथील असामी लोकांची (०३४–०३५).

---

**ज. क्र. ५१, रु. क्र. ५१, पु. क्र. २, का. सं. ८०३६ ते ८१०४ (६९).**

**इ. स. १८१२ ते १८३८**

**पत्रे**—गोपाळराव यास, लाटटून चिकोडीस मुक्कामास आल्यासंबंधी छत्रपतींचे (८०४४); नानासाहेब हवालदार यास, धारवाड मुक्कामी सुखरूप पोहचल्यासंबंधी गुरुनाथ कोंडो याचे (०७७); भाऊ जोशीराव यास, म्हैसुरास भेटीसाठी सरंजामासह येण्याबाबत, व्यंकटराव लक्ष्मण याचे (०९१); सुंदराबाई याना, सावगाव येथील वसूल, इंग्रजांशी अनंत फडणवीस याने केलेली बोलणी इ. संबंधी दिनकरराव भावे याचे (०९३ व ०९४); दिनकरराव गायकवाड यास, कृष्णराव गोपाळ यानी छत्रपतींची मर्जी संभाळून राहण्याबाबत भाऊ महाराज यांचे (०९५–०९६); जोशीराव यास, त्यांचे पत्र व छत्रपतींचे आज्ञापत्र पोहचल्यासंबंधी भीमराव बळवंत यांचे (०९८); दिनकरराव गायकवाड यास आपण चिंचवडहून पुण्यास आल्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (०९९); भाऊ महाराज यास, त्यांचे पत्र व छत्रपतींचे आज्ञापत्र पोचल्यासंबंधी, माधवराव देशमुख यांचे (१०२).

रुमाल क्र. ५१

पुडके क्र. २—(चालू)

पत्रे—(चालू)

**दिनकरराव गायकवाड यांची :—**प्रभाकरपंत जोशी यास पुणे मुक्कामी घेतलेल्या कर्जाची फेड करीत असल्यासंबंधी (८०३७); मानचंद फत्तेचंद यास, त्याच्याकडून घेतलेले कर्ज परत करीत असल्यासंबंधी (०३८); महादजी जकाते यास, पुणे मुक्कामी घेतलेल्या कर्जाची फेड करीत असल्यासबंधी (०३९); उमाशंकर खेमचंद यास, त्याच्याकडून पुणे मुक्कामी घेतलेले कर्ज फेड करीत असल्यासंबंधी (०४२); संकाजी नलवडे यास, साळवणहून करवीरास येण्यासंबंधी (०९२); आप्पाजी नाईक निबाळकर यास, वाटखर्चासाठी घेतलेल्या कर्जाऊ रकमेची फेड करीत असल्यासंबंधी (८१०१).

**छत्रपतींना गोपाळ वासुदेव यांची :—**गव्हर्नर पुण्यास येत असल्यासंबंधी (८०४५); गव्हर्नर तूर्त पुण्यास येणार नसल्यासंबंधी, तसेच हणमंतराव दिवाण कैलासवासी झाल्याबाबत (०४७); कमिशनर व गव्हर्नर यांच्या आग्रहामुळे करवीरास येणेस दिनावधी लागेल अशासंबंधी (०४८); कमिशनरकडे पाठविलेल्या थैल्यांच्या नकला धारवाड व मुंबईकडे पाठविल्यासंबंधी (०४९–५०); खर्चाचे रुपये व आज्ञापत्रे पोहोचल्यासंबंधी (०५३); भाऊ महाराज यांच्याकडे असलेले अस्सल कागदपत्र पाठविण्याबाबत (०५४–०५५); कमिशनर, कोरेगावकर शिकारीस येत नसल्यासंबंधी व भाऊ महाराजांकडील कागदपत्रे मिळाली नसल्यासंबंधी (०५६–०५७); भाऊ महाराजाकडील मजकूर नंतर पाठविला जाईल याअर्थी (०५८); बेळगाव मुक्कामी कमिशनर यांची व्यवस्था ठेवण्यासंबंधी (०५९); कमिशनर व गव्हर्नर यांच्या कितूर, मिरज, मुंबई वगैरे ठिकाणच्या मुक्कामाबाबत (०६०); बेळगांव मुक्कामी कमिशनरची भेट होऊन बोलणी झाल्यासंबंधी (०६१); बेळगाव मुक्कामी इंग्रज अधिकाऱ्यांची व्यवस्था ठेवण्याबाबत (०६२); पुणे मुक्कामी खर्चास पाठविण्याबाबत (०६३); गव्हर्नर विलायतेस जात असल्याने त्यांच्या भेटीस येण्याबाबत (०६४); खर्चाचा बंदोबस्त करण्याबाबत (०९७); चॅपलीन यांची भेट घेऊन नंतर हकीगत कळवित असल्यासंबंधी (८१०३); विनंतीपत्रांची उत्तरे येण्यासंबंधी (१०४).

**छत्रपतींना गुरुनाथ कोंडो यांची :—**पुणे मुक्कामी करवीरकरांच्या कामकाजांचा उलगडा इंग्रजांकडून अद्याप न झाल्याबद्दल (८०५१–०५२); पो. एजंट यांच्याकडून आलेली थैली छत्रपतींकडे पाठविल्यासंबंधी (०६६); छत्रपतींच्या प्रकृतीस आराम असल्याचे कळल्याबाबत (०८६); छत्रपतींच्या थैल्या (पत्रे) व त्यानी पाठविलली मिठाई पो. एजंट याजकडे पोचती केल्यासंबंधी राघो बल्लाळ व गुरुनाथ कोंडो यांचे (०६९); कमिशनर यांजकडे मेव्याचे पेटारे पोचते केल्यासंबंधी (०७०); नारायणराव हंचीनाळ यास साक्षीकरिता, नरसिंहवाडीहून धारवाडास नेला असल्यासंबंधी (०७१); पो. एजंटकडून लिहून आल्याप्रमाणे साक्षीदार पाठविण्यासंबंधी (०७२); बसापूर व हगदेहाळ या गावासंबंधीच्या रुनदा पो. एजंट, धारवाडकडे पोचत्या केल्यासंबंधी (०७३); कल्लोळ व दानवाड यामधील जमीनतंटयाचा निवाडा होण्याबाबत (०७४); करवीर इलाख्यातील दरोडेखोर लमाण लोकांस धरून ठेवण्याबाबत (०७५); इचलकरंजी, कागल व तोरगल प्रकरणी जाबसाल उलगडण्याबाबत इंग्रजाकडे मुखत्यार पाठविण्यासंबंधी (०७६); बाबा नाईक पारगांवकराकडील वह्या हिशेबासाठी पाठविण्याबाबत (०७७); रायबाग मुक्कामी पो. एजंट यांची व्यवस्था उत्तम ठेवण्याबाबत (०७८); इचलकरंजी, तोरगल व कागल इलाखे प्रकरणी इंग्रजाकडे कागदपत्र गुदरल्याबाबत (०७९); तासगाव येथील बाबाजी गायकवाड याचा चोरीस गेलेला बैल परत देण्याबाबत (०८०); खाजमा बागबानीण हिच्या दाव्याच्या कामी खादीर म्हेतर यास चिकोडी कोर्टात पाठवण्याबाबत (०८१); करवीरच्या लोकांनी माणिकवाडी येथील कुश्या विठचा रामोशी यास धरून नेल्याबाबत (०८२); का सरूड येथे वारणा पलीकडील लोकांनी घातलेल्या दरोडयाच्या बंदोबस्ताबाबत सातारा रेसिडेंटकडे कळवल्याबाबत (०८३); करवीर ते धारवाडपर्यंत जासुदांची डाक बसविण्यासंबंधी (०८४); बाबू नारायण सिंधी याचे बापास कमाविसदार याने पैशाबाबत त्रास दिला, त्याचा बंदोबस्त होण्याबाबत (०८५); मल्लाप्पा आकोळकर यास पकडून चिकोडी मामलेदाराकडे पाठवण्याबाबत (०८६); आडगळ येथील हणम्या देसाई याच्या फिर्यादीची चौकशी होण्याबाबत (०८७); सोळांकूर येथे चोरी करणाऱ्या चिकोडीच्या तीन इसमांस

रुमाल क्र. ५१

पुडके क्र. २—(चालू)

पत्रे—(चालू) व फिर्यादीस चिकोडी मामलेदाराकडे पाठविण्याबाबत (८०८८); बेळगाव येथील लिंगप्पा यास हलकर्णीच्या लोकांनी लबाडल्याबाबत चौकशी होण्यासंबंधी (१०८९); पो. एजंट यास पाठवलेले मासे पोचल्यासंबंधी (०९०).

छत्रपतींना—एल्फिन्स्टन यांची भेट घेऊन बोलणे झाल्यावर हकीगत कळवित असल्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (८०३६); उमाशंकर खेमचंद यास त्याच्या कर्जाची फेड करीत असल्याबाबत दिनकरराव गायकवाड यांचे (०४०); राघोबा निंबाळकर व बहिराजी भोसले वगैरे बार्शी मुक्कामी असल्यासंबंधी दिनकरराव यांचे (०४१); शिखर शिंगणापूर येथील महादेवाचे दर्शन घेऊन पुण्यास जात असल्यासंबंधी दिनकरराव आप्पा यांचे (०४३); रामपूर व वाडीकर यांच्या दुतर्फा अम्मलाच्या छत्रपतींनी दिलेल्या सोडचिठ्ठ्या पोचल्यासंबंधी (०४६); अर्जुनवाड प्रकरणी आज्ञापत्राचे मसुदे तयार करून पाठवल्याबाबत जीवराव जाधव यांचे (०६५).

यादी—दिनकरराव गायकवाड वकिलीच्या कामावर गेल्यावेळी झालेल्या कर्जाबाबतची (८१००).

---

ज. क्र. ५१, रु. क्र. ५१, पु. क्र. ३, का. सं. ८१०५ ते ८१८६ (८२).

इ. स. १८१६ ते १८४०

आज्ञापत्रे—यशवंतराव यास, सुलतानराव निंबाळकर यांच्या विवाहास येण्यासंबंधी (८१२३); आनंदराव त्र्यंबक यास, गव्हर्नर, मुम्बई, यांची आज्ञेप्रमाणे भेट घेण्याबाबत (१२४).

कैफियत—कंपनी सरकारकडे दानोळी येथील पाटिलकीच्या खटल्याच्या कामी जखगौडा कलगोंडा पाटील यांची (८११९–१२२).

पत्रे—सुन्दराबाई यांना त्यांनी गहाण ठेवलेले दागिने सोडवून घेण्यासंबंधी अर्जुनगिरी गोसावी, पुणे, यांची (८१०५–११०); मालजीराव भोसले यास आळतेकर याजबरोबर पाठविलेले कापड पोचल्यासंबंधी शिवरुद्राप्पा पारशेट्टी यांचे (११३); एल्फिन्स्टन यास, त्यांच्याकडे खंडोजी भोसले व नारायणराव राजाज्ञा यांना पाठविल्यासंबंधी छत्रपतींचे (११४); सुन्दराबाई यांना, बाळासाहेब छत्रपतींच्या निधनामुळे दुःख झाल्यासंबंधी, भाऊ महाराज यांचे (११५); सखाराम दळवी यास भाऊ महाराजाकडील मजकूर कळविण्यासंबंधी, साळूबाई मंत्री हिचे (१३०); जोत्याजीराव घाटगे यास, दर्याबाई हिच्या लग्नास येण्यासंबंधी उदाजीराव चव्हाण यांचे (१३१); दिनकरराव गायकवाड यास, भडगाव येथील येणे रकमेबाबत पाटील यास हप्ते ठरवून दिल्यासंबंधी हरिराव लागू यांचे (१३२); घराचे साहित्य, धनगर महालाचा मक्ता यासंबंधी (१३३); बाळाजीपंत यास, यशवंत जयराम व नागो कुलकर्णी यांच्या बाळवे येथील तैनातीस चिटको विठ्ठल व बापू कोन्हेर यांच्याकडून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्यासंबंधी व्यंकटराव थोरात यांचे (१३४); चिटकोपंत चिटणीस यांना, सखारामपंत यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याबाबत गणेश हणमंत खांडेकर यांचे (१३५); मनेराम जमादार यास, कोपार्डे येथील खाटीक यास गावकर सांगतील तेथे राहण्यास सांगण्याबद्दल घोंडो रघुनाथ कुलकर्णी यांचे (१३६); दिनकरराव गायकवाड यास, श्रीमंतांची स्वारी निडसोसीस देवदर्शनास जाणार असल्यासंबंधी माणकेश्वर देशपांडे यांचे (१३७); सुन्दराबाई यांना क्षेमसमाचारासंबंधी भाऊ महाराज यांचे (१३८); गव्हर्नर मुम्बई यास इंग्रज व करवीरकर यांच्यामध्ये मैत्री रहाण्याबाबत छत्रपतींचे (१३९); हैबतराव गायकवाड यास, क्षेमसमाचारासंबंधी नारो गिरमाजी यांचे (१४०); सुन्दराबाई यांना, मालवणकडील मजकूर कळविण्याबाबतचे आज्ञापत्र पोचल्यासंबंधी मोरो बाजीराव यांचे (अपूर्ण) (१४१); सईबाई यांना, उदाजीराव हिम्मतबहाद्दर यांच्या मुलांच्या विवाहासंबंधी गुणवंतीबाई घाटगे यांचे (१४२), भाऊ महाराज यांना, छत्रपतींच्यासाठी पाठविलेल्या पालखीच्या सामानाचे पैसे देण्यासंबंधी, दिनकरराव यांचे (१४३); आक्कासाहेब यांना क्षेमसमाचारासंबंधी व्यंकटराव यांचे (१४४–१४५); मानसिंगराव पाटणकर यास, त्यांनी पाठविलेले छत्रपतींचे आज्ञापत्र पेशवे सरकारात पोचल्यासंबंधी सदाशिव माणकेश्वर यांचे (१४६); रामचंद्रपंत यांना, क्षेमसमाचारासंबंधी बाळाजी लाड यांचे (१४७); सुन्दराबाई यांना

रुमाल क्र. ५१

पुडके क्र. ३—(चालू)

पत्रे—(चालू)

भाऊ महाराज यांच्यासह चॅपलीन यास भेटून करवीरकरांच्या कामकाजासंबंधी बोलणी केल्याबाबत मोरो बाजीराव चिटणीस याचे (८१४८); विश्वासराव गायकवाड यास, क्षेमसमाचारासंबंधी नारो गिरमाजी याचे (१४९); सुन्दराबाई यांना, मोरोपंतांच्या प्रकृतीस बरे नसल्यासंबंधी बाळाजी बाजीराव याचे (१५१); रामचंद्र रघुनाथ यास भेटीस येत असल्यासंबंधी पांडुरंग बाळाजी याचे (१५४); सुन्दराबाई यांना बजाबाई घाटगे यांच्या प्रकृतीसंबंधी बाळाबाई आक्का निंबाळकर याचे (१५५); बळवंतरावजी हंबीरराव याना करवीरकराकडून इंग्रजांस हवी असलेली माहिती कलमवार पाठवून देण्याबाबत सदाशिव अनंत याचे (१५६); सदाशिव अनंत यास, क्षेमसमाचारासंबंधी (पत्र कोणाचे ते नमूद नाही) (१५८); आईसाहेब याना, प्रसिद्धगडाहून आलेला प्रसाद व लखोटा त्यांच्याकडे पाठविल्यासंबंधी मोरो चिटको व बाळोजी निकम याचे (१५९); बळवंतरावजी चिटणीस यास मुलीच्या विवाहास येण्यासंबंधी गणो नाईक सरदेसाई याचे (१६०); नीळकंठराव चिटणीस यास, त्यानी सखाराम पांडे यास पाठविलेले पत्र पोचल्यासंबंधी सदाशिवराव भिकाजी याचे (१६१); सुन्दराबाई यांना, देवपूजेची चांदीची भांडी तयार होताच पाठवित असल्यासंबंधी मोरो बाजीराव याचे (१६४).

**आबासाहेब व बुवासाहेब छत्रपती यांना :** त्यांच्यासाठी खास विडे व भोजनसाहित्य पाठविल्यासंबंधी सुन्दराबाई यांचे (८१२५); त्यांच्यासाठी अंजीर पाठवल्यासंबंधी सुन्दराबाई यांचे (१२६); पुढे जाण्यास वडिलांची आज्ञा घेऊन येण्यासंबंधी आबासाहेब यांचे बुवासाहेबांना (१२७); बुवासाहेब याना, थट्टीकडील गाई व गवळी याना आपल्या मुक्कामाठिकाणी पाठवून देण्यासंबंधी आबासाहेब छत्रपती यांचे (१२८); पुण्याहून (इंग्रजाकडून) आलेली पत्रे त्यांच्याकडे पाठविल्यासंबंधी, भाऊ महाराज यांचे (१२९); त्यांच्याबरोबर स्वारीत गेलेल्या लोकांच्या घरी वुणगे पाठवून दुकानातील सामान इत्यादी देण्याची व्यवस्था होत असल्यासंबंधी सुन्दराबाई यांचे (१५०); आबासाहेब (दुसरे संभाजी) छत्रपती यांना, करवीरास तोफखाना व पागेतील स्वार पाठविले असल्यासंबंधी सुन्दराबाई यांचे (१५२); त्यांच्याकडे तटाकडील व कारखान्याकडील शिड्या पाठविल्यासंबंधी सुन्दराबाई यांचे (१५३); त्यांच्यासाठी खास विडे पाठविल्यासंबंधी, बाळाबाई आक्का निंबाळकर यांचे (१५७, १६२–१६३).

**छत्रपती यांना :** छत्रपतींसाठी गोमंतकी आंबे पाठविल्यासंबंधी मोरो बाजीराव चिटणीस यांचे (८१११); त्रिवकहून छत्रपतींसाठी आंबे पाठविल्यासंबंधी कृष्णराव जाधव याचे (११२); सप्तसागर येथें पुन्डाई करणाऱ्या सुब्राव बाबर वगैरे लोकाना धारवाडास पाठवून देण्याबाबत, आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बाबूराव यांचे (११६–११७); चंदगडहून मध व आंबे पाठविले असल्यासंबंधी आप्पाजीराव देसाई याचे (११८); विठोजी पंडित यांच्या घरास भगवानराव गायकवाड हे कुलप घालून तंटा करीत असल्याबाबत मोरो चिटको याचे (१६५) क्षेमसमाचारासंबंधी बळवंतराव शिर्के याचे (१६६); महागांव व यमकनमर्डी येथील नकाशांच्या यादीसंबंधी आबाजीराव जाधव याचे (१६७); खर्चास पैसे पाठविण्याबाबत चिमणाजी भगवंत याचे (१६८); शिरढोण येथील लोकांनी आप्पाजीराव शिर्के यास द्यावयाच्या वसुलासंबंधी सयाजीराव जाधव याचे (१६९); चिमाबाई पाटणकर इत्यादी मंडळी सुखरूप पोचल्याबद्दल बळवंतराव शिर्के याचे (१७०); चिंचवड येथे धान्य मागण्यास इंग्रजाकडून आलेल्या चपराशास छत्रपतींच्या हुकुमाशिवाय धान्य देता येणार नाही म्हणून सांगितल्यासंबंधी सयाजीराव जाधव याचे (१७१); मसाल्याची रक्कम वसूल केल्याबाबत, तसेच कोंबडी व द्राक्षे पाठवून देत असल्यासंबंधी, रावजी बापूजी याचे (१७२); राजवाड्यातील व्यवस्था यथास्थित असल्यासंबंधी (कोणाचे ते नमूद नाही), (१७३); चिकोडी येथे केलेल्या डुकराच्या शिकारीसंबंधी व्यंकटराव निंबाळकर व नरसिंगराव सूर्यवंशी यांचे (१७४); इंग्रजाकडील मजकुराची यादी व सोनेरी, रुपेरी इत्यादी प्रकारचे कागद पाठविल्यासंबंधी मोरो बाजीराव चिटणीस याचे (१७५); जोशीराव यांच्याबरोबर पाठविलेली मिठाई व आज्ञापत्रे पोचल्यासंबंधी (कोणाचे ते नमूद नाही) (१७६); शिरोळहून हिशोबाच्या याद्या घेऊन येत असल्यासंबंधी सयाजीराव

**रुमाल क्र. ५१**

**पुडके क्र. ३—(चालू)**

**पत्रे**—(चालू)

सरनोवत याचे (८१७७); महागांव येथील चौकशीचे काम करून पुढे जात असल्यासंबंधी आवाजीराव जाधव याचे (१७८); बाबू सकपाळ याच्या हमीवर सावकाराकडून घेतलेल्या कर्जाऊ रक्कमेबाबत रूपाजी जाधव व गोपाळ बाबाजी याचे (१७९); राजवाड्यातील व तटबंदीकडील लोकांच्या हजरीच्या याद्या पाठविल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (१८०); छत्रपतींनी सांगितलेल्या वस्तु खरेदी करण्यास एवजाची जरुरी असल्यासंबंधी मोरो बाजीराव चिटणीस याचे (१८१); इंग्रज अधिकाऱ्यासाठी उंट व घोडी पाठविल्यासंबंधी, नारायण रत्नाकर याचे (१८२); नागोजीराव पाटणकर यांच्या नाकास औषधोपचार चालू असल्यासंबंधी आप्पाजीराव शिर्के याचे (१८३); छत्रपतीसाठी गोमंतकी आंबे व फणस पाठविल्यासंबंधी (१८४); जासूद व परदेशी लोकांसह मेणा पाठविला असल्यासंबंधी जीवराव जाधव व कृष्णराव जाधव यांचे (१८५); प्रसिद्धगडाहून नवरात्र उत्सवाचा प्रसाद पाठविल्याबाबत, राणोजी निंबाळकर याचे (१८६).

---

**ज. क्र. ५२, रु. क्र. ५२, पु. क्र. १, का. सं. ८१८७ ते ८२३९ (५३)**

**इ. स. १८२० ते १८३७.**

**आज्ञापत्रे**—जोत्याजीराव निंबाळकर यास, अंताजी रघुनाथ सांगतील त्याप्रमाणे कागदपत्र पाठवून देण्यासंबंधी छत्रपतीचे (८१९०).

**पत्रे**—गावोगावचे गावकामगार यांना, करवीर हद्दीतील तालुक्यांच्या मोजणीस येणाऱ्या कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांची योग्य ती व्यवस्था ठेवण्याबाबत, आनंदराव त्र्यंबक याचे (८१९१); दिनकरपंत यास, क्षेमसमाचारासंबंधी बच्चाजी बल्लाळ याचे (२२२); अप्पाजीपंत नि॥ प्रतिनिधी यास, महादजीपंत याच्या बायकोस पाठवून देण्यासंबंधी सोम सावंत सरदेसाई याचे (२२५); नानासाहेब राजाज्ञा यास, माधवराव घाटगे यास नागपुरास जाण्यासाठी द्याव-याच्या खर्चासंबंधी, जीवराव जाधव याचे (२२८); गोव्यातील कामकाजामुळे तूर्त छत्रपतींच्या भेटीस येण्यास सवड नसल्यासंबंधी तसेच कंपनी सरकारचे लष्कर जाण्याच्या तयारीत असल्यासंबंधी देवी नाईक दुभाषी याचे (२३४); दिनकरराव गायकवाड यास कागल मुक्कामी घोड्यांची चंदी व मोतद्दार याना पाठवून देण्याबाबत बाळोजी निकम याचे (२३५); देवी नाईक दुभाषी यास, कोकण प्रांताच्या बंदोबस्तासाठी फौज पाठविल्या-संबंधी, प्रीतीराव चव्हाण याचे (२३६).

**छत्रपतीना**: जरळी, खणदान, सोलापूर इत्यादी ठिकाणी, चोरी, दरोडे होऊ न देण्याबाबत केलेल्या बंदोबस्ताबाबत माधव गर्दे याचे (८१८७–१८८); अवधूत मिसाळ यास नांगनूरकर देसाई यानी मारहाण करून लुटल्याबाबत चौकशी होण्यासंबंधी, आनंदराव त्र्यंबक याचे (१८९); छत्रपतींच्या मनोदयाप्रमाणे घडून येईल याअर्थी (कोणाचे ते नमूद नाही) (१९२); वकिलीबाबतच्या खर्चाच्या याद्या पाठविल्या असल्याबाबत, आनंदराव त्र्यंबक याचे (१९४); पुण्यास कमिशनर आले नसल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (१९५); मनोळी येथील रोख्याचे काम झाल्यासंबंधी कृष्णराव गर्दे याचे (१९६); छत्रपतींच्या भेटीस इंग्रज अधिकारी येत असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बापूराव यांचे (१९७); पो. एजंट बेवर यांची प्रकृती बरी असल्यासंबंधी, अंताजी यशवंत व गणेश माधवराव गर्दे याचे (८२००); प्रसिद्धगड, रांगणा, रांगोळी इत्यादीसंबंधी करवीरकरांच्या हक्काबाबत टाकरीन यांच्याकडून ठराव झाल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (२०१–२०२); सखोजी महाडीक याजकडे दिलेली बकरी मेल्यासंबंधी तसेच केशवराव कुरुंदवाड-कर मृत्यु पावल्यामुळे त्यांची पत्नी सती गेल्यासंबंधी जीवराव जाधव व कृष्णराव गर्दे यांचे (२०५); छत्रपतींनी पाठविलेले आज्ञापत्र पोचल्यासंबंधी, कृष्णराव गर्दे व जीवराव जाधव यांचे (२०६); इंग्रजांनी चिकोडी निपाणी मार्गाची माहिती करून घेतल्यासंबंधी, अंताजी यशवंत याचे (२०७); धारवाड मुक्कामी करवीरामार्फत पो. ए. यांच्याशी बोलणी चालू असल्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (२०८); इंग्रजी लष्कराचा मुक्काम दिवाळीपर्यन्त कोटबागनजीक रहाणार असल्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (२०९);

### रुमाल क्र. ५२

### पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—(चालू)

पो. एजंट यास आणण्यासाठी रामराव दिवाण रवाना झाल्यासंबंधी, अंताजी यशवंत याचे (८२१०–२११); इस्लामपूर येथे झालेल्या लग्नसमारंभाविषयी वच्चाचार्य व कृष्णराव गर्दे यांची (लग्न कुणाचे ते नमूद नाही) (२१२–२१३); आपली प्रकृती ठीक नसल्यासंबंधी कृष्णराव गर्दे यांचे (२१४); बळवंतराव चिटणीस यांच्या घरातील कागदपत्रांत भाऊ महाराजांच्या विद्यमाने ठरलेली यादी सापडली नसल्यासंबंधी, कृष्णराव गर्दे याचे (२१५); महिपतराव पारनीस यांची इंग्रजांशी करवीरकरातर्फे चाललेल्या वाटाघाटीवावत जरुरी असल्यासंबंधी अंताजी रघुनाथ याचे (२१६); महालक्ष्मीच्या दर्शनास आलेल्या गुरुनाथपंतांस छत्रपतींना भेटण्यास सांगितले असल्यासंबंधी कृष्णराव गर्दे याचे (२१७); गुरुनाथपंत यास छत्रपतींच्या भेटीस पाठविल्यासंबंधी कृष्णराव गर्दे याचे (२१८); मुरगूड व कटकोळ भागातील लावणीचे काम करून करवीरी येत असल्यासंबंधी अंताजी रघुनाथ याचे (२१९); हरी विठ्ठल हा करवीरी नको असल्यास त्यास घालवून देण्यासंबंधी गुरुनाथ कोंडो याचे (२२०); खर्चाची व्यवस्था करण्यावद्दल आनंदराव त्र्यंवक वकील मुक्काम धारवाड याचे (२२१); आप्पाजी भास्कर धारवाडास पोचल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२२३); चिकोडी ठाण्याकडील मजकुराची यादी छत्रपतीकडे पाठविली असल्यासंबंधी जीवराव जाधव व कृष्णराव गर्दे यांचे (२२४); इंग्रजांकडील छत्रपतींची कामे त्यांच्या मनोदयाप्रमाणे होतील याअर्थी आप्पाजीराव भगवंत याचे (२२६); सुबराव घोरपडे व चिकोडी येथील मामलतदार याच्या सांगण्याप्रमाणे वर्तणूक करीत असल्यासंबंधी कृष्णराव गर्दे याचे (२२७); सुबराव घोरपडे हिंदुराव यांना तडसरनंदी येथे पाठवून देण्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक वकील याचे (२२९); गव्हर्नर जनरलसाठी पाठविलेले मिठाईचे पेटारे पोचल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२३०); इंग्रजी लष्कर पाडळीहून साताऱ्यास व तेथून वासोटयास जाणार असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२३१); लिंगनूरसंबंधी चौकशीस इंग्रज अधिकारी येणार असून त्यावावत करवीरकरामार्फत जावसाल करण्यास कोणीतरी पाठवून देण्यासंबंधी गोपाळराव आवाजी व अंताजी रंगनाथ याचे (२३२); सुबराव घोरपडे हिंदुराव, मामलतदार, यांची व पो. एजंट यांची कापूर नजीक लष्कर मुक्कामी भेट झाल्यासंबंधी कृष्णराव गर्दे याचे (२३३); पुण्याहून करवीरास येत असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२३७); भाऊ रघुनाथ भट व विक्रम दीक्षित यांच्याकडे यरनाळ हा गाव इनाम म्हणून चालविण्यावावत, आनंदराव त्र्यंवक याचे (२३८); पुणे व बेळगांवहून निपाणी नजीक इंग्रजी लष्कर आल्यासंबंधी व निपाणीकर लष्करावरील कर्नल यास भेटल्यासंबंधी जीवराव जाधव व कृष्णराव गर्दे याचे (२३९).

**याद्या**—मिरजेस दरोडे घालणाऱ्या करवीर हद्दीतील चोरांच्या बंदोवस्तावावत (८१९३); राचाप्पा जाधवराव देसाई, सुबराव देशपांडे, लाखमगौडा देसाई, प्रांत हुकेरी इत्यादी संबंधीच्या चिटणिसीकडे पाठवलेल्या कागदपत्रासंबंधी (१९८–१९९).

---

**ज. क्र. ५२, रु. क्र. ५२, पु. क्र. २, का. सं. ८२४० ते ८२८३(४४).**

**इ. स. १८१६ ते १८४३.**

**आज्ञापत्रे**—देवी नाईक दुभापी यास, छत्रपतींच्या भेटीस येण्यासंबंधी (८२८०); जोत्याजीराव नाईक यास, वहिरजी भोसले यांच्या हिशेबाचा उलगडा करण्यासाठी येण्यावावत, राजमंडळाचे (२८१).

**पत्रे**—सुन्दरावाई याना सावकारांचा ऐवज मागवण्यावद्दल तसदी लागल्यासंबंधी, अर्जुनगिरी गोसावी पुणे, यांचे (८२४०–२४२); खर्चास ऐवज पाठविण्यासंबंधी, (कोणाचे कोणास ते नमूद नाही) (२६४–२६५); आप्पाजी भगवंत यास, रेंदाळ व वोरगांव टाण्यास करवीरकरांकडून उपद्रव पोहोचत असल्याने फौजेसुद्धा येऊन बंदोवस्त करण्यासंबंधी, सरस्वतीबाई यांचे (२६८); आईसाहेब याना, व्यंकोजीपंत यास घेऊन चाकरी करीत असल्यासंबंधी, आप्पाजी भगवंत याचे (२६९); इंग्रजांकडे डौल व पत्रे घेऊन जात असल्यासंबंधी,

**रुमाल क्र. ५२**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे**—(चालू)

डोंगरोजी जाधव याचे वयावाई याना (८२७०); महिपतराव पारसनीस यास, क्षेमसमाचारासंबंधी रामचंद्र रघुनाथ याचे (२७१); मि. मॅलेट यास, महादजी त्र्यंवक यास आपल्याकडील मजकूर सांगण्यासाठी पाठविल्यासंबंधी, छत्रपतीचे (२७२); रावजी पारसनवीस यास, मुंवईहून त्यांच्यासाठी कोणती पुस्तकें आणावयाची ते कळविण्यासंबंधी (पत्र कोणाचे ते नमूद नाही) (२७९); उदाजी माने यास, चंदी, रोजमुरा व खर्चास पाठवण्यासंबंधी वाळोजी हवालदार याचे (२८२).

**छत्रपतींना**:—पुण्याकडील मजकुराची थैली परभारे पाठविली असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (८२४३); करवीरकरांच्या राज्यातील निलजी, यरनाळ, वगैरे गावातील तंटयावावत पो. एजंटकडे येणाऱ्या तक्रारींचा वंदोवस्त करण्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याची (२४४–२४९); तुळजापुरास जाण्यास छत्रपतीसाठी रहदारीचा परवाना मिळण्यावावत पो. एजंट यांच्याशी वोलणी केल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२५१–२५२); दिवाण, मुनशी वगैरे इंग्रजाकडील मंडळींचा शिरोळ मुक्कामी राहाण्याचा वंदोवस्त ठेवण्यासंवंधी, आनंदराव त्र्यंवक याचे (२५३); पो. एजंट करवीरी आल्यावर त्यांच्याशी चांगले प्रकारे बोलणी करण्यासंबंधी अंताजी रघुनाथ गोखले याचे (२५४); छत्रपतींच्या प्रकृतीविषयी वरचेवर कळविण्यासंबंधी, तसेच जॉन मन्रोवरोवर धारवाडास गेल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२५५); कित्तूर मुक्कामी सुखरूप असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (अपूर्ण) (२५६); करवीरकरांच्या कामकाजासंबंधी कमिशनर याना कळवीत असल्यासंबंधी, तसेच कित्तूरचे ठाणे इंग्रजानी घेतल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक व वाळकृष्ण वाबूराव यांचे (२५७–२५८); कमिशनरची स्वारी वेळगांवच्या किल्ल्यावाहेर डेरे देऊन राहिल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक व वाळकृष्ण वाबूराव याचे (२५९); छत्रपतींच्या भेटीस येत असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक व वाळकृष्ण वाबूराव याचे (२६०); वाळवे प्रकरणीची पत्रे जासुदावरोवर पाठविल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक व वाळकृष्ण वाबूराव यांचे (२६१); निपाणीकर कृष्णा स्नानास जात असल्यासंबंधी जीवराव जाधव याचे (२६२); मुरगुडास पो. एजंट वेवर याची भेट घेतल्यासंबंधी माधवराव गर्दे याचे (२६३); सांगली मुक्कामी इंग्रजाकडे पत्रें व थैल्या पोहचत्या केल्यासंबंधी, आवाजी देशपांडे पन्हाळा याचे (२६६–२६७); करवीरकरांचे इंग्रजाकडील जावसाल उलगडण्यासंबंधीचे काम होत असल्यासंबंधी आप्पाजी भगवंत याचे (२७३); शितोळे प्रकरणावावत अखवारनवीसाकडे थैली पाठविल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२७४); पुण्याहून आलेल्या इंग्रजांकडील थैलीचे उत्तर पाठविण्याविषयी आनंदराव त्र्यंवक याचे (२७५); पुण्याकडील वर्तमान निवेदनार्थ हिंदुराव याना पाठविल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२७६); करवीर येथील मल्लप्पा जैन यास जातीवाहेर काढल्यासंबंधी चौकशी करण्यावावत आनंदराव त्र्यंवक याचे (२७७); करवीरकरांच्या चिकोडी व मनोळी तालुक्यांच्या कामासंबंधी गव्हर्नर यांची भेट घेतल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२७८); प्रकृती वरी नसल्यासंबंधी व खर्चास पाठवण्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (२८३).

**यादी**—जोत्याजीराव नाईक निंवाळकर याजकडून छत्रपतीनी घेतलेल्या ऐवजासंबंधीची (८२५०).

---

**ज. क्र. ५३, रु. क्र. ५३ पु. क्र. १, का. सं. ८२८४ ते ८३९१ (१०८).**

**इ. स. १८१३ ते १८३७.**

**आज्ञापत्रे**—अंताजी यशवंत व मोरेश्वर गर्दे याना, भाऊ महाराज यानी आपल्या उत्पन्नाबावत कागदोपत्री लवाडी केली असल्यावावत इंग्रजास बोलण्यासंबंधी छत्रपतीचे (८३२४–३२५); गावकामगार निर्वाडा यास सदर गावचा मोकासा मोरेश्वर रामचंद्र याजकडे दिल्यावद्दल गावकामगार कोल्हापूर व देशाधिकारी कारकून वर्तमान, भावी यास छत्रपतीचे (३६२); कोल्हापूर येथे अंदोजी नरसोजी माने यास जमीन इनाम दिल्यासंबंधी छत्रपतीचे (३६३).

रुमाल क्र. ५३

पुडके क्र. १—(चालू)

**कलमबंद्या**—करवीरकरांच्या प्रांतातील वसूल निपाणकर यानी घेतला त्याची रुजवात तसेच चिकोडी, मनोळी वावतची सरहद्द वगैरे इंग्रजाकडून करून घ्यावयाच्या कामासंबंधी (८२९२-२९४); करवीरकरांचे इंग्रजाकडील जावसाल तसेच चिचलीकर देसाई यांच्या ठाण्या-संबंधी व प्रसिद्धगड संबंधीचे जाबसाल उलगडण्यावावत (३५०-३५३).

**पत्रे**—नानासाहेव हवालदार यास क्षेमसमाचार कळविण्यासंबंधी मोरो विठ्ठल परांजपे याचे (८३३८); वाळावाई आक्का निंवाळकर याना, सावकाराकडून कर्ज घेऊन दागिने घेऊन येत असल्या-संबंधी दिनकरराव याचे (३४८); वाळावाई आक्का निंवाळकर याना कागल तालुक्याच्या सोडचिठ्ठीविषयी इंग्रजाशी बोलणी केल्यावावत दिनकरराव याचे (३४९); देवी नाईक दुभाषी गोवा यास चिकोडी तालुक्यात करवीरकरांची ठाणी घालून देण्यावावत रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (३५४); सदाशिवपंत आवा यास क्षेमसमाचारासंबंधी व हेरवाड येथील ऐवज वाकीवद्दल दिनकरराव गायकवाड याचे (३६१, ३६४); वापूसाहेव घोरपडे यास कऱ्हाड मुक्कामी इंग्रजांच्या भेटीस येण्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (३६५); जोशीराव याना छत्रपतीनी कौलपत्र दिल्यास फौजसुद्धा येत असल्यासंबंधी नबाव सफदरगंज याचे (३७१); क्षेमसमाचारासंबंधी मल्हार मुकुंद याचे (३७२); उमराव वहाद्दर सुलतान निंवाळकर, यास निजामशाहीत सरंजाम करून देण्यासंबंधी छत्रपतींचे (३७६).

**छत्रपतींना :** प्रकृतीत विघाड झाल्यामुळे येता येत नसल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (८२८८); सौंदत्ती व शितोळेकडील ठाण्यासंबंधी इंग्रजाशी बोलत असल्यावद्दल आनंदराव त्र्यंबक याचे (२८९-२९१); माणकेश्वर देशपांडेकडून पाठविलेली आज्ञापत्रे पोहोचल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (२९८); कऱ्हाड मुक्कामी गव्हर्नर यानी कित्तूरकर प्रतिनिधी वगैरेंच्या भेटी घेतल्या-संबंधी तसच त्यांचा मुक्काम नंतर करवीरी होणार असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (२९९-३००); प्रसिद्धगड प्रकरणी कमिशनर व गव्हर्नर यांच्याशी बोलणी झाल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (३०१-३०२); कमिशनर यांची प्रकृती ठीक नसल्याने कामकाजे होण्यास अवघी असल्यासंबंधी गोपाळ वासुदव याचे (३०३-३०४); धारवाड मुक्कामी पोहचल्या-संबंधी ज्योती निकम हुजरे याचे (३०५); सदलगे व वेडकीहाळ गांवच्या सीमातंटयावावत वाळोजी निकम हुजरे याचे (३०६); इंग्रजाकडील आलेल्या पत्रांच्या नकला व आनंदराव वकील याजकडून आलेला लखोटा छत्रपतींच्याकडे पाठविल्यासंबंधी व्यंकटराव नलवडे व राघो वल्लाळ यांचे (३०७); धारवाडहून पाठविलेल्या कलमबंदीचे उत्तर सत्वर येण्यावावत ज्योती निकम हुजरे याचे (३०८); करवीरकरांच्या कामकाजावावत कंपनी सरकारचे मनात भेदभाव उत्पन्न झाल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (३१२-३१३); तुळजा-पुरास जाण्यावावतचा रहदारीचा परवाना पाठवीत असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (३१४); सुळकूड मुक्कामी छत्रपती दाखल झाल्याचे वर्तमान असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व वाळकृष्ण वावूराव यांचे (३१५); वच्चाचार्य पंडितराव व कृष्णराव गर्दे यांची भेट बेळगाव मुक्कामी झाल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व वाळकृष्ण गर्दे याचे (३१६); आज्ञापत्र पोहचल्यावद्दल आनंदराव त्र्यंबक याचे (३१७); इंग्रजाकडील तहाचे कलमाचा उलगडा करण्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक याचे (३१८-३२०); सयाजीराव वागल हा यळगूडची सोडचिठी देण्यास तयार नसल्यासंबंधी करवीरकर वकीलांचे (३२३); गव्हर्नर कोल्हापूर मुक्कामी येत नसल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व वाळकृष्ण वावूराव यांचे (३२६); करवीरकरांच्या कामकाजासंबंधी इंग्रजाकडून जावसाल ठरवून घेत असल्यावावत अंताजी यशवंत व गणेश महादेव गर्दे यांचे (३२७-३२८); हुकेरी मुक्कामी छत्रपती व पो. एजंट यांची भेट व्हावी याअर्थी अंताजी यशवंत व गणेश महादेव गर्दे यांचे (३२९-३३०); पो. एजंट यांच्या वागेवाडी येथे होणाऱ्या मुक्कामावावत गणेश माधव गर्दे याचे (३३१); छत्रपतीनी आपली फौज कमी केली नाही म्हणून इंग्रजांचा रोष असल्यासंबंधी गणेश माधव गर्दे याचे (३३२); नंदगांव खानापूर येथे गणपतराव गर्दे यास पाठविण्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (३३३); श्रीनिवास दिवाण यास आपल्याकडे पाठवण्यावद्दल अंताजी यशवंत याचे (३३४); अतिवृष्टीमुळे खानापूरहून कलेक्टरचे तंबू हलविण्याचा बेत असल्या-संबंधी अंताजी यशवंत यांचे (३३५); पो. एजंट मेण्यातून धारवाडास जात असल्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (३३६); श्रीनिवासराव दिवाण यांची प्रकृती ठीक नसल्यासंबंधी व पो.

रुमाल क्र. ५३

पुडके क्र. १--(चालू)

पत्रे--(चालू)

एजंट निसवट मुक्कामी आले नसल्यावावत अंताजी यशवंत याचे (८३३७); श्रावणनाथ वावा यांस हैदरावादेस पोचते करण्यावावत रहदारीचा परवाना पाठविल्यावद्दल गुरुनाथ कोंडो याचे (३३९); ववईसाहेव यांच्या प्रकृतीसंबंधी वाळोजी निकम व मोरो चिटको याचे (३४०); हिंदुराव घोरपडे यास पाठविण्यावावत व ताकरीन यास भेटण्यासंबंधी थैली पाठवण्यावावत आनंदराव त्र्यंवक याचे (३४१); पागेकडून सामान आणविल्यावद्दल खंडोजीराव भोसले याचे (३५५); चिप्री, जैनापूर इत्यादी गावच्या लोकांस लक्ष्मणराव गोविन्द यान दिलेल्या कर्जाऊ ऐवजाच्या उलगड्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (३५६); सिंधुदुर्ग येथे अटकेत असलेल्या चिटको नारायण गोगटे याच्या सुटकेवावत दिनकर अप्पाजी याचे (३५७); इंग्रजांची भेट सावर्धगिरीने नृसिंहवाडी मुक्कामी घेण्यावावत व थैल्यांची उत्तर पाठवण्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (३५८); मिरजकर वकिलाकडे यादी पाठविल्यासंबंधी व धारवाडकडून वकिलाची पत्र पोहचल्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक व वाळकृष्ण वावूराव याचे (३७३); दानवाड व रांगोळी येथील खंड पैदास प्रकरणावावत आनंदराव त्र्यंवक याचे (३७४–३७५); करवीर तालुक्यातील चोरांचा वंदोवस्त करण्यासंबंधी आनंदराव त्र्यंवक याचे (३७७–३७८); क्षेमसमाचारासंबंधी देवी नाईक दुमापी याचे (३९१).

**सुंदराबाई यांना :** पालखीचे सामान खरेदी करुन पाठविले त्याच्या ऐवजासंबंधी दिनकर राय याचे (८२८४); गंगापूर व वाघापूरचे जावसाल उलगडून घेत असल्यासंबंधी तसेच एकसंबे व भोज वगैरे गावांवावत वोलणी करीत असल्यावद्दल आनंदराव त्र्यंवक याचे (२८५–२८७); गंगापूर व वाघापूरची ठाणी वसविल्यावद्दल व निपाणीकराकडील ठाणी वसवित असल्यावावत दिनकर राय याचे (३०९–३११); नरहर देशपांडे याच्या सुटकेवावत दिनकर राय याचे (३४२–३४३); चिकोडी, एकसंबे वगैरे गावे छत्रपतींस मिळण्यासंबंधी इंग्रजांशी वोलणे करीत असल्यावावत दिनकर राय याचे (३४४–३४७); हिम्मत वहादूर यांच्या सरंजामाच्या वसुलाच्या याद्या, हलकर्णी व करंवळी वगैरे गांवच्या सोडचिठ्या इत्यादीवावतची कामे इंग्रज वहादूरांचेकडून करुन घेत असल्यासंबंधी दिनकर राय याचे (३५९–३६०); सामानगड, हलकर्णी वगैरेसंबंधी तक्रार पत्रांचा जावसाल इंग्रजाकडून उलगडून घेत असल्यावावत दिनकर राय याचे (३६६–३६७); एकसंबे, दिडगांव वगैरेसंबंधी इंग्रजांशी वोलणे करीत असल्यासंबंधी दिनकरराय याचे (३६८–३७०); करवीरकरांच्या वसुलासंबंधी व भोज, एकसंबे इत्यादी गावांवद्दल इंग्रजांकडे निकड लावल्यासंबंधी दिनकर राय याचे (३७९–३८४); मिरजेच्या वाघ्यास चिंचवड येथे लुटल्यासंबंधी यशवंतराव घाटगे इत्यादींना जेजुरी मुक्कामी भेटत असल्यावावत दिनकरराव राय याचे (३८५–३८६); आप्पाजीराव नाईक निवाळकर यांचेकडील येणे असलेल्या ऐवजावद्दल तसेच रेंदाळ, मुळकूड गांवच्या सोडचिठ्यांवावत दिनकर राय याचे (३८७–३८८); करवीरकरांची ठाणी सोडण्यास निपाणीकर अडथळा करीत असल्यासंबंधीचा मजकूर इंग्रजांचे कानांवर घातल्यावद्दल दिनकर राय याचे (३८९–३९०).

याद्या—मानको सखो व जिवाजी नरहर देशपांडे यांच्या वतनाचा वंदोवस्त करवीरकराकडून होण्यावावत (८२९५–२९७); वंटमुरीकर, नणंदीकर वगैरे इसमांच्या वतनावावत (३२१–३२२).

रवासुदगी—करवीरहून प्यारी कलावंतणीस घेऊन जाऊन पुण्यास राहिलेल्या रायोजी पाटणकराचा शोध लावून घेण्यासंबंधी चिटणिसीकडील हुकुमासंबंधी (८३१८).

---

ज. क्र. ५३, रु. क्र. ५३, पुडके क्र. २,का. सं. ८३९२–८४७१ (८०)

इ. स. १८१८ ते १८३८

आज्ञापत्रे—जीवराव जाधव हवालदार व कृष्णराव माधव गर्दे यांस, करवीरकरांचे भेटीस आसामी घेऊन येण्यावावत। (कोणाचे ते नमूद नाही) (८४१२), मिरासी गांवकर नारिंगे, तालुका साळसी यांस, पांडुरंग दादाजी प्रभु यास नारिंगे येथे मिराशीचे इनाम करुन दिल्यावावत छत्रपतींचे (४६७); पारपत्यगार व लेखक नारिंगे यास तेथील वाग इनाम करुन पांडुरंग दादा यास दिल्यावावत छत्रपतींचे (४६८).

**रुमाल क्र. ५३**

**पुडके क्र. २—(चालू)**

**कलमबंदी**—रायबाग महालातील सहा गांवे, वल्लभगड व मनोळी येथील मोकासा बाब इ. संबंधी इंग्रजांकडे व्हावयाच्या जावसालासंबंधी (८४६०); गोर्गावडी, रायबाग वगैरे ठाणी घातलेसंबंधी व छत्रपतींनी कंपनी सरकारशी चांगले वागण्याबाबत (४६२).

**पत्रे**—सुंदराबाई याना : इंग्रजांच्या चोरीस गेलेल्या घोड्याचा शोध लावण्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (८३९२-३९३); नारायण सदाशिव दीक्षित नाशिककर यांचे सनदाच्या प्रकरणाबाबत कळवित असल्यासंबंधी छत्रपतींचे (४००); आनंदराव त्र्यंबक वकील यास, डुकरांचे शिकारीचे वेळी झाडलेल्या गोळ्यांपैकी मुरारराव घोरपडे यास गोळी लागून ठार झाल्यासंबंधी नारायणराव पाटणकर याचे (४०६); चिकोडी व मनोळी तालुक्यांसंबंधी श्रीची कामे लवकर करून देण्याबाबत करवीरकरांनी इंग्रजांस लिहावयाच्या पत्रासंबंधी (४५१); सुंदराबाई याना, करवीरकरांविरुद्ध कागलकरांस सामील झाल्याचा आपल्यावर निष्कारण आरोप केला असल्यासंबंधी दिनकरराव याचे (४५२); दिनकरराव गायकवाड यास छत्रपतींच्या भेटीसाठी उदाजी घाटगे सर्जेराव यास पाठविण्यासंबंधी (लिहिणाऱ्याचे नांव नाही) (४५५); उदाजीराव घाटगे सर्जेराव यास छत्रपतींच्या मुक्कामी सत्वर येण्यासंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (४५६); आईसाहेब याना कागलच्या कामाबाबत पुण्यास राहण्याची जरूरी नसल्याने करवीरी येण्याची आज्ञा होऊन खर्चासाठी ऐवज पाठविण्यासंबंधी दिनकर आप्पाजी याचे (४५७); करवीरकरांमार्फत जावसालाचा उलगडा करण्यासाठी त्र्यंबक बाळकृष्ण यास पाठविले आहे याअर्थी छत्रपतींनी पो. एजंट यास लिहावयाच्या पत्राबाबत (४५८); छत्रपतींच्या प्रकृतीबाबत नानासाहेब राजाज्ञा यास, जीवराव जाधव हवालदार याचे (४५९); सदाशिव अनंत यास सखाराम नाईक याच्या गुमास्त्याबरोबर पाठविलेल्या पत्रांची उत्तरे देण्याबाबत (पत्र कोणाचे ते नमूद नाही) (४६१); नानासाहेब यास, तोरगलकर यांच्याकडे दुखवट्याबाबत शेला पाठवून देणे व माधवराव घाटगे यास नागपुरास जाण्यास खर्चास देणे यासंबंधी जीवराव जाधव याचे (४७१).

**छत्रपतींना अंताजी यशवंत व कृष्णाजी माधवराव गर्दे यांची :** न्यायाधिशाचे फडास बसून न्याय निःपक्षपातीपणे करीत असल्याबद्दल (८३९४); शिताळे यांच्या नांवाची यादी पाठविण्याबाबत (४१३); पो. एजंट बेबर याची प्रकृती बरी असून ते आपली कामे पाहू लागले असल्यासंबंधी अंताजी यशवंत व गणेश माधव गर्दे याचे (४१४); जीवराव जाधव हवालदार यास छत्रपतींच्याकडे पाठविले असल्याबाबत (४१५); पो. एजंट याच्या कचेरीस पंधरा मानकऱ्यांसह येण्यासंबंधी (४१६-४१७); नवलगुंद येथील दोन मुली हिरा जोगतिणीने करवीरी विकल्याबाबतच्या गुन्ह्याच्या चौकशीबाबत (४१८); छत्रपतींची हकिकत इंग्रजांस निवेदन केल्यासंबंधी (४३०).

**छत्रपतींना आनंदराव त्र्यंबक याची :** वासुदेव नारायण याच्या कर्जाचा बंदोबस्त करून त्याचे देणे त्यास परत देण्यासंबंधी (८३९५); बंडू भट याचे फिर्यादीत बोलणे करणेसाठी भाऊ भट याने जावे असा संबंधीची आज्ञा होण्याबाबत (३९६); इंग्रजांचा मुक्काम लाटेहून चिकोडीस झाल्याबाबत (३९७); कृष्णाचार्य पुराणिक याचे आदरातिथ्य करण्यासंबंधी (३९८); लक्ष्मणराव तात्या याचे घर जिदगी बापूराव याने लुटली ती परत करण्यासंबंधी (३९९); सिद विरापा मुगरवाडी हलकर्णीकर याचा जावसाल उलगडण्यासंबंधी (४०१-४०२); फिर्याद करणाऱ्या लोकांस संमती दिली ती विचारात न धरण्याबाबत (४०३); नायकू गंगाधर औरवाडकर याच्या भाऊबंदकी खटल्याच्या निकालासंबंधी (४०४); करवीरकरांच्या भेटीस येण्यासंबंधी परवानगी मिळविण्याबाबत (४०५); करवीरकरांची कामकाजे इंग्रजांकडून व्हावीत अशी इच्छा असल्यासंबंधी (४०९); आज्ञापत्राप्रमाणे इंग्रजांशी बोलत असल्यासंबंधी (४२०); लष्कर मुक्कामी सुखरूप असलेबाबत (४२१-४२२); इचलकरंजीकरांच्या देशमुखी व सरदेशमुखी हक्काबाबत व करवीरकरांची सहा गांवे सुटून मिळण्यासंबंधीची बोलणी इंग्रजांशी केल्याबाबत (४४९); नणंदी गावच्या बंदोबस्ताविषयी इंग्रजांशी भेट घेतल्याबाबत (४६३); कमिशनर मुंबईहून जलमार्गाने न येता खुष्कीमार्गे बेळगावास येत असल्यासंबंधी (४६४); जेजुरी मुक्कामी गव्हर्नरची भेट घेण्याबाबत (४६५); इंग्रजांचा मुक्काम कोंडवेवर होणार असल्यासंबंधीची हकीकत वायिनसाहेब याना सांगण्याविषयी (४६६).

रुमाल क्र. ५३

पुडके क्र. २—(चालू)

**छत्रपतींना कृष्णराव गर्दे यांची :** आपण इस्लामपुरास आलो असून सोमवारी लग्नास जात असल्याबाबत (८४३२); इस्लामपूर येथे होणाऱ्या मोठ्या लग्न समारंभासंबंधी (लग्न कोणाचे ते नमूद नाही) (४३३-४३५); निपाणीकर यांच्याकडे झालेल्या लग्न समारंभासंबंधी (४३६-४३८); रावसाहेब निंबाळकर सरलष्कर हे सरंजामसुद्धा छत्रपतींच्या भेटीस रवाना झाल्यासंबंधी व इस्लामपूर येथील लग्नसमारंभ व्यवस्थित पार पडल्यासंबंधी (४३९-४४०).

**छत्रपतींना गणेश माधवराव गर्दे यांची :** वागेवाडी येथे इंग्रजांचा मुक्काम असल्यासंबंधी व फलटणच्या लोकास मिठाई व फळफळावळ देत असल्याबाबत (८४३१); फते महंमद भालदार व हालवारदार वगैरे लोकांबरोबर लोखंड, वागरोली वगैरे पाठवलेले सामान पोहचल्याबाबत (४५०).

**छत्रपतींना गुरुनाथ कोंडो यांची :** छत्रपतींकडून आलेल्या थैल्या (पत्रे) पो. एजंट याजकडे पाठविल्यासंबंधी (८४४२); रामराव असवारनवीस यास छत्रपतींनी दिलेल्या दोन इनाम गावांच्या सनदा पो. एजंट धारवाड यांच्याकड पाठवून देण्यासंबंधी (४४३-४४४); करवीर येथील आनंदा सोनार यास साक्षीसाठी धारवाडास पो. एजंट यांच्याकडे पाठवून देण्यासंबंधी (४४५); इचलकरंजी येथील बापू चितो जोशी याच्या जावसालाची जरुरी नसल्यासंबंधी (४४६); बेंगलोरहून साताऱ्यास जाणाऱ्या लॉर्ड कार्डिंग्टन व त्याच्या बरोबरच्या लोकांसाठी म्हैसाळ येथे भोई लोक पाठविण्याबाबत (४४७); जज्ज मि. लिजीट हे धारवाडहून यडूरास येऊन म्हैसाळास जाऊन परत यडूरास येणार असल्याने त्यांच्या प्रवासाचा बंदोबस्त ठेवण्यासंबंधी (४४८).

**छत्रपतींना जीवराव जाधव हवालदार व कृष्णराव गर्दे यांची :** मोरोपंतास आलेल्या आज्ञापत्रावरून छत्रपतींनी केलेल्या शिकारीबाबतचा मजकूर समजल्यासंबंधी (८४१०-४११); चिकोडीकडील कामासंबंधी कलमबंदी यादी पाठविली असल्यासंबंधी (४२३); चिकोडी येथे शिरगावकर यांच्या घरी देवघरात जमीन उकरली असल्यासंबंधी तसेच चिकोडी येथे पो. एजंट मुक्कामास येणार असल्यासंबंधी (४२६-४२७); चिकोडी नजीक लष्कर मुक्कामातील मजकुराची यादी पाठविली असल्यासंबंधी (४२८-४२९); इंग्रजांची मर्जी संभाळून करवीरकरांची कामे करून घेत असल्यासंबंधी (४६९).

**छत्रपतींना इतरांची :** नीळकंठराव शिंदे व नानीबाई घाटगे वगैरेबद्दलची कामे इंग्रजांकडून करून घेत असल्याबद्दल गोपाळ वासुदेव याचे (८४०७-४०८); कात्रजला डाकेची सोय झाल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बाबूराव यांच (फाटले आहे), अंजन प्रकरणाबाबत आज्ञेप्रमाण माती उकरावयाचे काम चालले असल्यासंबधी (४२४-४२६); पुण्याहून काळ्या व गोऱ्या लोकाची फलटण मिरज मुक्कामानजीक येत असल्यासंबंधी गोपाळ वासुदेव याचे (४४१); सयाजीपंत यास छत्रपतींच्याकडे पाठवल्यासंबंधी रामचंद्र जोशीराव याचे (४५३-४५४); रामराव भीमाजी यास छत्रपतींनी लिहिलेल्या पत्रांचे लखोटे त्याच्याकडे धारवाडास रवाना केल्यासंबंधी जीवराव जाधव याचे (४७०).

---

ज. क्र. ५३, रु. क्र. ५३, पु. क्र. ३ व.ा. सं. ८४७२-८५१५ (४४)

इ. स. १८११-१८२५

**आज्ञापत्रे—**त्र्यंबक आवजी यास जॉन फदीसन याना थैल्या व ऐवज पोहवता करून त्याच्या फलटणीसह घेऊन येण्यासंबंधी छत्रपतींचे (८४७२); त्र्यंबक आवजी यास मिस्तरजीचे (ल्युई फर्मादज) पदरी ऐवजाचा भरणा करून पलटणीसह पाठवून देण्याबाबत छत्रपतींचे (४७३); देवी नाईक दुभाषी यास पद्मगडावरील गुराबा, गलबते, आरमार काढण्याविषयी एलफिन्स्टन याच्याकडून हुकूम झाल्यावर कळवीत असल्यासंबंधी छत्रपतींचे (४७४).

**रुमाल क्र. ५३**

**पुडके क्र. ३—(चालू)**

**पत्रे**—अँडरसन यांच्या अर्जुनगडास होणाऱ्या मुक्कामासंबंधी जरूर ती व्यवस्था होण्याबाबत जीवराव जाधव यांचे (८५०२); बाळाबाई आक्का निंबाळकर याना कागल तालुक्याच्या सोडचिठ्या-विषयी खंडोजी नाईक सांगतील या अर्थी दिनकरराव याचे (५०६); बाळाबाई आक्का निंबाळकर याना, ठुशा जोड पाठविला व माणकाच्या बाळ्या तयार करून पाठवित असल्या-संबंधी व क्षेमसमाचारासंबंधी दिनकरराव याचे (५०६–५०८); बळवंत रावजी व आप्पा व दादा यास रत्नाकरपंत राजाज्ञा यांच्या जावसालासंबंधीचे कामी मुंबईस जावे लागेल या अर्थी आनंदराव भगवंत याचे (५०९); नानासाहेब राजाज्ञा यास, व्यंकटराव निंबाळकर व नरसिंगराव सूर्यवंशी यांच्या जवळच्या लोकांखेरीज इतराना आपापले गावी जाण्यास सांगितलेसंबंधी जीवराव जाधव याचे (५१३); बाळाबाई आक्का निंबाळकर याना, ठुशा, अंगरखे वगैरे वस्तू पाठवीत असल्यासंबंधी दिनकरराव याचे (५१४); सदाशिवपंत आबाजी यास क्षेमसमाचारासंबंधी दिनकर गायकवाड याचे (५१५).


याद्या—मोकासा गांवासंबंधी (१२७२६–३१); वंटमुरीकर देसाई नणंदीकर, इत्यादींनी गुरु महाराज यांना दिलेल्या इनाम जमिनीसंबंधी (७३२–७३३); मामला तोरगलपैकी सरंजामी गांवासंबंधी (७३४); बिरनिराळे लोकास इनाम, सरंजाम, दुमाला वगैरे असलेल्या गांवासंबंधी (७३५–७३९); पटा करवीरपैकी इनाम, सरंजाम, धर्मादाय इत्यादी प्रकारच्या गांवासंबंधी (७६३–७६६) हुजूर खासगीकडील गांवासंबंधी (७६७–७६८); संताजीराव घोरपडे, हैवतराव गायकवाड इत्यादींस दुमाला करून दिलल्या गांवासंबंधी (८५७–८५८); स्वामी संस्थान मठ, रताजीराव चव्हाण वगैरेंना दिलेल्या इनामं गांवासंबंधी (८५९–८६३); पंत अमात्य यांच्याकडील गांवासंबंधी (८६४–८६९).

---

ज. क्र. ८३, रु. क्र. ८३, पु. क्र. १, का. सं. १२८७०–१३०३२ (१६३).

सु. स. १२२७ ते १२४३, इ. स. १८२६-२७ ते १८४२-८३.

देहझाडे—देवस्थान, धर्मादाय, सरंजाम, इनाम वगैरे बाबतच्या गांवासंबंधी (१२९७१–१३००१); आजरे तालुक्यातील गांववार जमाबंदीसंबंधी (००२–००९); भुदरगड पेटचांतील गांवासंबंधी (०२१–०३०).

याद्या—करवीर राजमंडळाकडील तर्फवार जमाबंदीसंबंधी (१२८७०–९५८); राजमंडळ नि चिटणिसीकडील गांवासंबंधी (९५९–९६०); पंतप्रतिनिधी यांच्या घाटावरील मुलुखांतील दुमाला गांवासंबंधी (९६१–९६३); जगद्गुरू कृष्णेंद्र स्वामी, श्रीशंकराचार्य इत्यादींस दुमाला करून दिलेल्या गांवासंबंधी (९६४–९६६); जगद्गुरू दुमाला असलेल्या गांवासंबंधी (९६७); गुरूमहाराज राजोपाध्ये दुमाला, धर्मादाय असलेल्या गांवाबाबत (९६८–९७०); देवस्थान व धर्मादाय गांवासंबंधी (१३०१०–०११); सेनापती, नेसरीकर इत्यादीकडील सरंजामी गांवासंबंधी (०१२–०१५), हुकेरी प्रांतातील इनाम गांवासंबंधी (०१६–०१७); प्रांत चिकोडीकडील दुमाला गांवासंबंधी (०१८–०१९); नीळकंठराव शिंदे यांच्याकडील इनाम गांवासंबंधी (०२०); मुदपाकखान्याकडील लोकांस दिलेल्या जमिनीसंबंधी (०३१–०३२).

ज. क्र. ८४, रु. क्र. ८४, पु. क्र. १, का. सं. १३०३३–१३१८० (१४८).

सु. स. १२१४ ते १२४०, इ. स. १८१३-१४ ते १८३९-४०.

देहझाडे—राजमंडळ करवीरकडील माहालानिहाय गांवासंबंधी (१३०३३-०३७); राजमंडळ चिटणिसीकडील खालसा व दुमाला गांवासंबंधी (०४८-११५).

याद्या—हुकेरी प्रांतातील गांवासंबंधी (१३०३८-०४७); देवस्थाने, इनामदार, सरंजामदार इ. कडील दुमाला गांवासंबंधी (११६-१२४); खासगी, धर्मसंस्थान, कोट करवीर इ. मामल्याकडील गावासंबंधी (१२५-१३३); किल्ले व पागा याकडील गांवासंबंधी (१३४-१३७); सरंजाम लोकांकडे असलेल्या दुमाला गांवासंबंधी (१३८-१५५); राजमंडळ चिटणिसीकडील गांवासंबंधी (१५६-१६४); तोरगल संस्थानापैकी गांवासंबंधी (१६५); का कापसी पेटा गडहिंग्लजपैकी गांवासंबंधी (१६६); आळते पेट्यातील गांवासंबंधी (१६७-१७०); पंतप्रतिनिधी यांच्या वरघाट भागातील गांवासंबंधी (१७१-१७३); पेटा भुदरगडकडील खालसा दुमाला वगैरे गांवासंबंधी (१७४-१७७); विरूपाक्ष अण्णाजी, शेषो नारायण व रामचंद्र नाईक यांच्याकडील इनाम गांवासंबंधी (१७८-१८०).

---

ज. क्र. ८५, रु. क्र. ८५, पु. क्र. १, का. सं. १३१८१–१३४३६ (२५६).

सु. स. १२१२ ते १२४५, इ. स. १८११-१२ ते १८४४-४५.

देहझाडे—हुकेरी परगण्यांतील गांवासंबंधी (१३१८१-१८३; ४२२-४३६); सुभा मनोळीकडील गांवासंबंधी (१८५-१८८; १९८-२०१); आवाजीराव जाधव यांजकडील गांवासंबंधी (१८९-१९१); प्रांत रायबागमधील गांवासंबंधी (१९२-१९५); करवीर राजमंडळाकडील दुमाला व खालसा गांवासंबंधी (२२७-४१२); मुरगूड, सतेगिरी इ. भागांतील दुमाला व सरंजामी गांवासंबंधी (४१३-४१६).

देहझाडा बोटखत—करवीर राजमंडळाकडील खालसा व दुमाला गांवासंबंधी (१३२११-२२६).

याद्या—वामनाळ येथील रयत, इनामदार वगैरे लोकांच्या जमिनीसंबंधी (१३१८४); तालुका आजरेपैकी दुतर्फा गांवासंबंधी (१९६-१९७); १८३९ व १८४० या सालातील देहझाड्याच्या हिशोबातील फरकासंबंधी (२०२-२०८); इनाम दिलेल्या गांवासंबंधी (२०९-२१०); करवीर, पन्हाळा, इ. ठिकाणची संस्थाने (देवस्थाने) व मामले यासंबंधी (४१७-४१९); विरुपाक्ष आण्णाजी, रामचंद्र नाईक, वसव प्रभुदसाई इ. कडे असलेल्या गांवासंबंधी (४२०); सरंजाम व इनाम असलेल्या गांवासंबंधी (४२१).

---

ज. क्र. ८६, रु. क्र. ८६, पु. क्र. १, का. सं. १३४३७–१३५३३ (९७).

सु. स. ११७२ ते १२४७, इ. स. १७७१-७२ ते १८४६-४७.

देहझाडे—प्रतिनिधी यांच्या कोकण प्रांतातील गांवासंबंधी (१३४५४-४५७); का नेसरी प्रांत हुकेरीकडील गांवासंबंधी (४५८); किल्ले सामानगडपैकी गांवासंबंधी (४५९); यशवंतराव विचारे यांच्या अम्मलदारीखाली असलेल्या पेट्यांतील गांवासंबंधी (४६१-४६४); रायबाग प्रांतातील कर्यातवार गांवासंबंधी (४६५-४६८); प्रांत हुकेरीपैकी गांवासंबंधी (४६९-४८३); तर्फ आजरेपैकी इचलकरंजीकर व वतनदार यांच्याकडे असलेल्या गांवासंबंधी (४८७-४८८); देवस्थान, धर्मादाय, सरंजाम वगैरे बाबतच्या गांवासंबंधी (४८९-४९४); विशाळगड संस्थानच्या वरघाट भागातील गांवासंबंधी (४९५-४९८); पेटा करवीरपैकी गांवासंबंधी (५०५-५१०; ५२८-५३३).

याद्या—भगवंत आप्पाजी, शेषो नारायण, श्रीनिवास शेषाद्रि इ. कडील गांवासंबंधी (१३४३७-४३८); बाळ ज़ोशीराव यांच्यामार्फत इंग्रजाकडून होऊन यावयाच्या कामासंबंधी (४३९-४४०); परगणे मुरगूडपैकी गांवासंबंधी (४४१); वटनाळ तर्फेतील गांवासंबंधी (४४२-४४३); सामानगड तालुक्यांतील गांवासंबंधी (४४४); मोकासा गांवासंबंधी (४४५-४५३); मनोळी तालुक्यांतील गांवासंबंधी (४६०); मनोळी सुभ्यातील खालसा

**रुमाल क्र. ८६**

**पुडके क्र. १—(चालू)**

गांवासंबंधी (१३४८४-४८६); खालसापैकी दुमाला केलेल्या गांवासंबंधी (४९९-५००); राजमंडळाकडील महाली इनामदार लोकासंबंधी (५०१-५०२); देवस्थानाकडील दुमाला गांवासंबंधी (५०३-५०४); पटा शिरोळपैकी गांवासंबंधी (५११-५१६); मनोळी तालुक्यातील शिंदे यांना सरंजाम करून दिलेल्या गांवासंबंधी (५१७-५२१); निपाणी तालुक्यातील गांवासंबंधी (५२२).

**याद्या**—मनोळी तालुक्यांतील करवीरकराकडे यावयाच्या गांवासंबंधी (१३५२३-५२७).

---

**ज. क्र. ८७, रु. क्र. ८७, पु. क्र. १, का. सं. १३५३४–१३७३२ (१९९).**

**सु.।स. ११७२ ते १२५३, इ. स. १७७१-७२ ते १८५२-५३.**

**कलमबंदी**—छत्रपतींच्या कारभाऱ्यांनी खर्चाची वगैरे दखलगिरी देऊन कामे करण्यासंबंधी (१३६३४-६४१); भवानीशंकर पागेकडील कामाच्या व्यवस्थेसंबंधी (६६८); जमेनिसी फडाकडील नोकर लोकांच्या वर्तणुकीसंबंधी (६६९-६७२).

**टिप्पण**—इ. स. ८०० ते १२०० पर्यंत होऊन गेलेल्या राजे लोकांसंबंधी (१३६९९).

**तक्ता**—बुवासाहेब छत्रपतींनी इनाम दिलेल्या गांवासंबंधी (१३७००-७०१).

**तेरीज पत्रक**—करवीर राजमंडळाकडील सेवक लोकांस करून दिलेल्या नेमणुकांसंबंधी (१३६७९-६९८).

**देहझाडे**—हुकेरी प्रांतातील गांवांसंबंधी (१३५३४-५४० ; ५८७-६११); धर्मादाय, इनाम वगैरे गांवासंबंधी (५४१-५५५ ; ६१७-६२३); कर्यातीपैकी गांवांसंबंधी (५५६-५५८); छत्रपतींकडे असलेल्या गांवासंबंधी (५६३-५६८); चिकोडी, प्रांत हुकेरीकडील गांवांसंबंधी (५७०-५८६); चिकोडी तालुक्यांतील कारकुनीबद्दल दिलेल्या गांवासंबंधी (६१२-६१६); मनोळी तालुक्यांतील गांवासंबंधी (६२४-६२९); प्रांत कागल येथील दुमाला व सरंजामी गांवासंबंधी (६४२-६४३ ; ७१५-७१६); प्रांत मिरजकडील गांवासंबंधी (७०५-७१४); रायबाग प्रांतातून वजा केलेल्या कृष्णेपलीकडील गांवासंबंधी (७१७-७२९).

**पत्रे**—भोज व एकसंबे या गांवांच्या लुटीसंबंधी छत्रपतींना पो. एजंट याचे (१३६३१-६३३).

**याद्या**—प्रांत कागलमधील गांवासंबंधी (१३५५९-५६२); मामला तोरगल येथील गांवासंबंधी (५६९); पन्हाळा तनख्यांतील गांवासंबंधी (६३०); कोल्हापूरकर शंभू छत्रपतींच्या अष्टप्रधानासंबंधी (६४४-६४६); विशाळगड, प्रसिद्धगड इ. बाबत इंग्रजाकडून होऊन यावयाच्या कामासंबंधी (६४७-६४९); उदेपूर राजांच्या वंशावळीसंबंधी (६५०-६५३); पारसनवीस याजकडील कागदपत्रांच्या बेळगांवास सदाशिव अनंत वकील याजकडे पाठवलेल्या नकलासंबंधी (६५४-६६७); बुवासाहेब व चिमासाहेब यांच्या उपनयनाच्या आमंत्रणासंबंधी (६७३-६७७); चॅपलीन व टाकरीन इ. च्या पत्रांच्या करवीरास पाठवलेल्या नकलासंबंधी (६७८); चिकोडी तालुकेत दाखल नसलेल्या गांवासंबंधी (७०२-७०४); चिकोडी तालुक्यांतील गांवासंबंधी (७३०-७३२).

---

**ज. क्र. ८८, रु. क्र. ८८, पु. क्र. १, १३७३३–१३८५९ (१२७).**

**सु.।स. १२०८ ते १२६७, इ. स. १८०७-०८ ते १८६६-६७.**

**अर्ज**—गोपाळ आंबाजी पाटील याजबरोबर असलेला खटला पंचायती मार्फत सोडविण्याबाबत काणो कोन्हेर पाटील याचा करवीर सरकारास (१३७३३).

**आज्ञापत्रे**—कोगे येथे गोपाळजी शिंदे यास जमीन दिल्याबद्दल, गांवकामगार कोगे यास राजमंडळाचे (१३७५८); सातार्डे येथे संताजी पोवार यास जमीन दिल्याबाबत गांवकामगार सातार्डे

**रुमाल क्र. ८८**

**पुडके क्र. २—(चालू)**

आज्ञापत्रे—चालू
यास राजमंडळाचे (१३७५९); गोपाळजी शिंदे यास कोगे येथे जमीन दिल्याबावत मोरो सदाशिव मामला कोट करवीर यास राजमंडळाचे (७६०); तारलेकर देशपांडे यांच्या इनाम हक्काबावत गांवकामगार सोळांकूर यास राजमंडळाचे (७६४).

फलमबंदी—बोरपाडळे ता। सातवे येथे रविवारचा नवीन बाजार भरविण्यासंबंधी (१३७३६-७३७).

टिप्पण—कोणकोणत्या प्रसंगी तोफांचे बार उडवावयाचे यासंबंधी (१३८०९-८१४).

तेरीज—दुमालदार लोकास दिलेले गांव व नाइकी वतनें यासंबंधी (१३७८८-७९०).

पत्रे—छत्रपतींस—नेसरीहून पक्षी पाठविल्यासंबंधी महादजी शिंदे व भास्कर हरि यांचे (१३७४२); भेटीस येत असल्यासंबंधी सयाजीराव जाधव याचे (७४३); क्षेमसमाचारासंबंधी रामजी भीमराव याचे (७४४, ७४८); व्यंकुईच्या गर्भदानाचा आहेर पोचल्यासंबंधी रामजी भीमराव याचे (७४५); पो. एजंट यांच्या भेटीस बेळगांव मुक्कामी सत्वर येण्याबावत रामजी भीमराव याचे (७४६-७४७); बाबाजी कुरुंदवाडकर याने भडगांव येथे दांडगावा केल्यासंबंधी पिराजी ताटे हुजरे व त्रिंबक जगन्नाथ यांचे (७४९); आज्ञप्रमाणे जिन्नस व थैल्या अंडरसन यांच्याकडे पोचत्या केल्यासंबंधी व त्यांच्याकडील थैल्या रवाना केल्यासंबंधी (७५०-७५२); भेटीस येत असल्यासंबंधी बापू आयरे मुा धारवाड याचे (७५५); हैवतराव गायकवाड यांच्या घरगुती प्रकरणाचा फैसला करण्याबावत रामजी भीमराव याचे (७५६); भेटीस येत असल्यासंबंधी नरसिंगराव रामजी याचे (७५७); नाशिककर वैद्य यास पाठवीत असल्यासंबंधी जिवराव जाधव याचे (७८०); नानासाहेब हे आपल्याकडील मजकूर सांगतील या अर्थी आपाजीराव जाधव जप्तनमुलूख याचे (७८१).

पावती—आपला जप्त झालेला ऐवज परत मिळाल्यासंबंधी गोपाळ आवाजी पाटील याजकडून गांव कामगार जेंन्याळ यास (१३७३४-७३५).

फेरिस्त—सातारा, तंजावर, खानवट व पुणे येथून आलेल्या पत्रांबावत (१३७६६-७७९).

बारनिशी—मातोश्री कमलजाबाईसाहेव यांचेकडून लग्न समारंभाबावत साहेव लोकांस पाठवलेल्या पत्रासंबंधी (१३८१५-८१९); आऊबाई यांच्या विवाहप्रसंगी पाठवलेल्या थैल्या व पत्रासंबंधी (८२०-८२७).

याद्या—शिरोळ येथे छत्रपती व गव्हर्नर यांच्या भेटीच्या वेळी हजर असलेल्या मानकऱ्याबावत (१३७३८-७३९); करवीरकर शंभु छत्रपतींच्या अष्टप्रधानासंबंधी (७४०-७४१); शिरोळ मुक्कामी करवीराहून आणावयाच्या सामानावद्दल (७५३-७५४); राजमंडळ चिटणिसाकडून निरनिराळ्या लोकांस आदा झालेल्या रकमासंबंधी (७६१-७६३); चिटणिसीकडील हिशेबासंबंधी (७६५); नाथाजी पवार याच्या गड्याच्या अंगात जगदंबा आली, रामचंद्र नेरलीकर यांची पत्नी सती गेली इ. चिकोडीकडील मजकुरासंबंधी (७८२-७८७); दुमालदार लोकांकडील इनाम गांवांसंबंधी (७९१-७९५); आळते पेट्यांतील गांवांसंबंधी (७९६-८०२); पन्हाळा पेट्यांतील खालसा गांवांच्या लागवडीसंबंधी (८०३-८०८); विवाहाबावत यशवंतराव शितोळे याच्या मुलीच्या माहितीसंबंधी (८२८-८२९); राजमंडळ चिटणिसीकडून ज्याना पत्रे पाठवावयाची ती देवस्थाने व सरदार इ. लोक यासंबंधी (८३०-८५९).

---

**ज. क्र. ८९, रु. क्र. ८९, पु. क्र. १, का. सं. १३८६०–१३९३८ (७९).**

**सु. स. ११५१ ते १२५८, इ. स. १७५०-५१ ते १८५७-५८.**

आज्ञापत्रे—तलदगे येथील ऐवज राजसबाईसाहेब यास देण्यासंबंधी गांवकामगार तलदगे यास आईसाहेब (जिजाबाई) यांचे (१३८६३); गांवचा ऐवज राजसबाई यांच्याकडे देण्याबावत गांवकामगार अंबप यास आईसाहेब (जिजाबाई) यांचे (८६४); पेंठ जिजापूर कोट करवीर येथील ऐवज राजसबाई यांना देण्याबावत सेठी व महाजन पेठ जिजापूर यास जिजाबाई यांचे

रुमाल क्र. ८९

पुडके क्र. १—(चालू)

आज्ञापत्रे—(चालू)

(१३८६५); तुळजापुरास देवदर्शनास जात असल्याने त्याबावत बंदोबस्त ठेवणसंबंधी त्र्यंबकराव बल्लाळ यास छत्रपतींचे (८७३); गोपाळजी शिंदे हुजरे यास हुजूर सेवेबद्दल जमीन दिल्याबावत गांवकामगार कोगे यास राजमंडळाचे (८८३); चित्ते व वाघ यांच्या खर्चासाठी प्रत्येकी दोन रुपये सरदारखान चित्तेवान यास देवविण्याबावत राजमंडळाकडून गांवोगांवचे गांवकामगारांना (८८४); अंताजी दादाजी यांच्या तांदूळ वगैरे जिन्नस घेऊन येणाऱ्या गाड्यांना जकात माफ केल्याबावत ठाणेदार, कमाविसदार वगैरेना राजमंडळाकडून (८९६); प्यादे पट्टीचे रुपये आणणाऱ्यांस रोजमुरा देण्यासंबंधी आरे, घाटवडे इ. गांवच्या गांवकामगार याना राजमंडळाकडून (८९७-९०१); कलमबंदीप्रमाणे अठरा कारखान्याकडील व्यवस्था ठेवण्यासंबंधी मोरो चिटको यास राजमंडळाकडून (९०४); रामचंद्र कृष्ण व कृष्णाजी घन:शाम यांचे घरी असलेल्या सागवानी लाकडासंबंधी चौकशी करण्याबावत हरी जाधव व दाजी चव्हाण यांस राजमंडळाचे (९०५); चिटणिसीकडील दप्तर बांधणेस रुमाल पाठवण्यासंबंधी मोरो चिटको यास राजमंडळाकडून (९०६); लष्कर मुक्कामी कलमबंदीची यादी रवाना करण्याबावत मोरो चिटको यास राजमंडळाचे (९०७); संभापूर देवस्थानकडील प्रसाद पोचल्यासंबंधी वामन पांडुरंग यास राजमंडळाकडून (९०८); नोकर लोकांच्या पोटगीसाठी पीठ, मीठ, इ. पाठवून देण्यासंबंधी मोरो चिटको यास राजमंडळाकडून (९०९); छत्रपतींसाठी पाठविलेले गोमांतकी आंबे पोचल्याबावत मोरो चिटको यास राजमंडळकडून (९१०); चिंतामणराव पांडुरंग यांच्या विनंतीपत्राचे उत्तर रवाना करण्याबावत मोरो चिटको यास राजमंडळकडून (९११); इंग्रजी डाकेस अडथळा न होता करवीर मुक्कामची नाव रुकडीस पाठवून देण्याविषयी मोरो चिटको यास राजमंडळाचे (९१२); बाबाजी पाटील याच्याबरोबर पाठवलेल्या लोकांस कैदेत ठेवण्याबावत, गणपतराव विचारे व आप्पाजी विष्णु किल्ले मनोहरगड यास राजमंडळकडून (९१३).

**इनामपत्र**—राजसबाई याना गावें, जमिनी इ. इनाम करून दिल्यासंबंधी जिजाबाई यांचे (१३८६१-८६२).

**जबाब**—ताकिदीप्रमाणे आपण आपल्या नवऱ्याजवळ नांदण्यास तयार असल्याबावत साळी केदारजी शिंपी हिचा करवीर सरकारकडे (१३९०२); रामा हैवती माने याने पळवून नेलेली आपली मुलगी आपणास पोचल्याबावत आमण्णा जोती शिंपी, शिरोळे, याचा करवीर सरकारकडे (९०३).

**टिप्पण**—इ. स. ८०० ते इ. स. १२०० पर्यंत होऊन गेलेल्या राजे लोकांसंबंधी (१३९३४).

**पत्रे**—त्र्यंबकेश्वर वगैरे देवाकडील चाकरीबद्दल शामा नायकिणीस जमीन इनाम दिल्यासंबंधी गांव कामगार वडणगे यास हैवतराव भोसले याचे (१३८६०); सातारकर छत्रपती यांची वंशावळ पाठवण्यासंबंधी सुबराव घाटगे यास (कोणाचे ते नमूद नाही) (८७५); येसबा पाटील याचा महारोग चिदंबर स्वामींनी बरा केल्यासंबंधी सभापति मुदलियार याचे छत्रपतीस (८७६); जोत्याजीराव निंबाळकर यांजकडून घेतलेले कर्ज फेडले या अर्थी बळवंतराव तात्या यास बाळकृष्ण अनंत याचे (८९४-८९५); घेतलेल्या कर्जाच्या फेडीबावत भवानराव तात्या व दाजीबा भोसले याना सिनपा व बाळाप्पा सराफ यांचे (८७९); दिवाणखान्याच्या इमारतीच्या बांधकामाविषयी विठोजी मोहिते याचे (९१५); भडगांव प्रकरणी बोलणी करण्यासाठी भगवंत अप्पाजी यास पाठविल्याबावत दिनकरराव गायकवाड यास हरिहरराव नारायण याचे (९१६); लष्कराहून आलेली पत्रे पाठविल्याबावत आप्पाजी पाटील यास श्रीनंद रामजी मुा पुणे याचे (९१७); मयत व्यंकटराव भोसले यांच्या जिंदगीच्या वारसाप्रकरणी शहाजी भोसले याने करवीर सरकार विरुद्ध इंग्रजांकडे केलेल्या फिर्यादीबावत व खटल्याच्या चौकशीचे कागदपत्र पो. एजंट प्रांत कर्नाटक याजकडे पाठविल्याबावत पो. एजंट यांस राजमंडळकडून (९२१-९२३);

**पत्रे—छत्रपतींस : कामकाजाची पूर्तता होताच परत येत असल्याबावत अंताजी रघुनाथ याचे (१३८८६); लग्नाचा आहेर पोहोचल्याबावत, अंताजी विरूपाक्ष देसाई याचे (८८७); हिशेबाच्या याद्या**

रुमाल क्र. ८९

पुडके क्र. १ (चालू)

**पत्रे**--(चालू)
तयार करीत असल्यासंबंधी अंताजी यशवंत याचे (१३८८८); कुंभोज येथील जमिनीची पहाणी, आकारणी वगैरे कामे संपल्याबाबत अंताजी यशवंत याचे (८८९); नरसिंग रावजी गास पाठविलेला आहेर त्यास पोचता केल्यासंबंधी बापूजी आयरे याचे (८९०); महाल कोठीकडील खर्चाचा बंदोबस्त करण्याविषयी, अंताजी यशवंत याचे (८९१); शिरगांव बागेतील आंबे पाठविल्याबाबत अंताजी विरुपाक्ष याचे (८९२); आंबे पाठविल्याबाबत लखमगोंडा प्रभूदेसाई याचे (८९३); पटकीच्या आजारावरील औषधाची माहिती पाठविल्यासंबंधी गुरूनाथ कोंडो याचे (९१४); वाडी रत्नागिरी येथे विठोबा गोसावी याच्या घरावर पडलेल्या दरोड्याबाबत बाबाजी नाईक व चिमणाजी रघुनाथ यांचे (९२०).

**पत्रक**--हिम्मत बहाद्दर हा किताब चव्हाण घराण्यातील कोणकोणत्या लोकांस मिळाला त्यासंबंधी (१३८६७); नरू सरपोतदार यास निरनिराळ्या गांवांकडून मिळणाऱ्या ऐवजाबाबत (९२४-९२५).

**प्रकरणी कामे**--वारणेच्या तहानंतर कोणकोण पंतप्रतिनिधी झाले याबाबत (१३९२७-९२८).

**मसुदा**--राघोजी भोसले व दौलतराव शिंदे व इंग्रज यांच्यामध्ये झालेल्या दोस्तीच्या कराराबाबत गव्हर्नर जनरल यास छत्रपतींनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (१३८७२).

**याद्या**--का कबनूर प्रांत हुकेरी येथील जमाबंदीबाबत (१३८६६); देशमुखी व सरदेशमुखी (दुमालदार लोकांकडे असलेल्या) जमिनीसंबंधी (८६८); सरदार, मानकरी व अष्टप्रधानवगैरेना दिलेल्या किताबासंबंधी (८६९-८७१); पारसनीस याजकडे नकला करावयास दिलेल्या सनदा इ. कागदपत्रासंबंधी (८७३); पेशवे व इंग्रज यांच्यामध्ये झालेल्या लढायासंबंधी (८७७); छत्रपतीस कागलकरानी शिरपेच, घोडी व हत्यारे द्यावयाच्या ठरावासंबंधीची (८७८); शिवराम दीक्षित यांचे कटकोळ येथील इनाम जमिनीसंबंधीच्या आज्ञापत्रांबाबत (८८०); किल्ले पन्हाळा येथे रवाना केलेली पत्रे, चिठ्या, इ. संबंधी (८८१); भोरकर सचीव यांनी दत्तक घेतल्याप्रसंगी छत्रपतीस दिलेल्या नजराण्याबाबत(८८२); पेशवाईचे अधिकार कोणाकोणाकडे चालत आले त्याबाबत (८८५); अथणी ते चिकोडी मार्गावरील टपालाच्या व्यवस्थेसंबंधी, करवीरकर वकीलांचे पो. एजंट याना (९१८); व या व्यवस्थेसंबंधी करवीरकर वकीलास पो. एजंट याचे (९१९); नरू पोतदार याच्या गावोगांवच्या हक्कदारीसंबंधी (९२६); पंत अमात्यपदावर कोणकोण लोक किती वर्षे होते या बाबतच्या माहितीसंबंधी (९२९-९३२); सदर अमीन कोर्टाकडून छत्रपतींकडे पाठविलेल्या कागदपत्रासंबंधी (९३३); शिवछत्रपतींच्या वंशावळीसंबंधी (९३५-९३८);

---

**ज. क्र. ९०, रु. क्र. ९०, पु. क्र. १, का. सं. १३९३९–१४००९ (७१).**

**सु. स. १११९ ते १२३२, इ.स. १७१८-१९ ते १८३१-३२.**

**आज्ञापत्रे**--फौज व तोफखान्यासह यशवंतराव शिंदे यास जाऊन मिळण्यासंबंधी मुधोजी भोसले यास छत्रपतींचे (१३९५२); धुणकी, भादोले, तासगांव इ. गांवच्या देशमुखी वतनाच्या जमिनीच्या लावणीबाबत सदर गांवच्या गांव कामगारांना राजमंडळचे (९७५).

**जाबता**--स्वामी संस्थान करवीरकडील तनखा व नेमणुका यासंबंधी (१३९४७).

**जाहोरनामा**--खुनाचा गुन्हा करणाऱ्यास फाशी दिले जाईल या अर्थी करवीर सरकारचा (१३९८८-९८९).

**टिप्पणे**--वसईचा किल्ला चिमाजी आप्पा यानी घेतल्यासंबंधी (१३९४५); तंजावरकरास पत्रे लिहावयाच्या पद्धतीसंबंधी (९६१-९६२); **रखमाजी भोसले याचा वध, केसो महादेव यास भवानगडच्या मसलतीत झालेली जखम, इ. संबंधी (९६८-९६९); भुदरगड केव्हा घेतला, तसेच राजाज्ञा, पाटणकर इ. स. पोतनिसी, सरलष्करी वगैर हुद्दे दिल्यासंबंधी (९७२).**

रुमाल क्र. ९०

पुडके क्र. १ (चालू)

पत्रे—सटवोजी भोसले व मानाजी शिंदे यास वारभाईंच्या मुलुखांत स्वाऱ्या न करण्याविषयी ताकीद होण्याबाबत यशवंतराव शिंदे यास कंपनी सरकारचे (१३९३२); करवीरकरांनी कंपनी सरकारचे कर्ज भागवण्याबाबत. व्यंकटराव सुबनीस व यशवंतराव शिंदे यास रॉबर्ट इनग्लिस यांचे (९६३-९६४); प्रभू लोकांत वेदोक्त कर्म करण्यास मनाई करण्यासंबंधी आनंदराव त्रिंबकजी यास माधवराव नारायण यांचे (९७०-९७१); मोरोपंत यांजबरोबर पत्र देऊन विल्सनसाहेब यांजकडे भेटीस पाठवल्याबाबत व माल्कम भेटीबाबत नागोजीराव घाटगे यास निंबाळकर यांचे (९७३); छत्रपतींसाठी पाठवलेली पिस्तुलांची जोडी पोहचल्याबाबत देवी नाईक यास प्रतापराव चव्हाण यांचे (९७६); म्हैसाळ येथील त्रिंबकराव कुलकर्णी करवीरमधील नोकरी सोडून पांची राहिला त्यास धरून आणण्याबाबत (९८५); उंटांचीं दाणे उरकण्याविषयी मुनाजराव निकम यास शंकराचार्य यांचे (९९५); आंब्याचा पेटारा मिळाल्यासंबंधी नारायणराव पाध्ये यांचे आईसाहेब यांना (९९६); आसामी लोक पाठवून देण्याविषयी. बाजीराव यादव यास नारायणराव व रत्नाकर यांचे (९९८); हुक्केहून पेरणीस नुकसान होणार असल्यासंबंधी बुवासाहेब यांचे आईसाहेब यांस (१४००८-००९).

पत्रे—छत्रपतींस: मिरजप्रांताच्या लढाईत करवीरकरांनी मदतीच्या केलेल्या पराक्रमासंबंधी रॉबर्ट इनग्लिस यांचे (१३९५३); सटवोजी भोसले यास पाठवून देण्याबाबत कंपनी सरकारचे (९६०); सैन्यखर्चासंबंधी (९६३); निपाणीकरांच्या उपद्रवाच्या बंदोबस्तासाठी कंपनी सरकारास एक लक्ष रुपये व दोन लाखे देण्यासंबंधी बाबाजी यादव वकील मि॥ कंपनी सरकारचे (९७४); हणमंतराव पाटील यांजकडून छत्रपतींकडील करारनामा पोचल्यासंबंधी कंपनी सरकारचे (करारनाम्यात कलमे ते लिहिले नाही) (९७८); पावनगडाहून होळीचा प्रसाद पाठविल्यासंबंधी केदारजी निकम व विठ्ठल आबाजी यांचे (९८७); त्रिंबक पाठविल्याबाबत केदारजी निकम यांचे (९९४); आंबे पाठविल्यासंबंधी संताजी विश्वास यांचे (९९९); बारवाडहून चंदनी तेल व चंदनाचे खोड पाठविल्यासंबंधी राणोजी मोनराव यांचे (१४०००); न्यामणकेरे व ककरी या गांवांमध्ये चालू असलेल्या सीमातंट्या प्रकरणी बाळाजी शिवदेव यांचे (००१-००२); उमे आकिवाट येथील गल्ला व भाजी वगैरे सामान कोल्हापुरास आणण्यासंबंधी राणोजी मोनराव यांचे (००३); चंदनी तेल, सुपारी वगैरे पाठविल्यासंबंधी बाळाजी शिवदेव यांचे (००४); सैन्यखर्चासंबंधी बाळाजी शिवदेव पारगांवकर यांचे (००५); देवस्थानांत जाण्यास परवानगी मिळण्याबाबत पो. एजंट यास निवेदन केले असल्यासंबंधी राणोजी मोनराव यांचे (००६-००७).

बाबा—पेशवेपद कोणाकोणाकडे चालले त्यासंबंधी (१३९३९-९४३). हिम्मत बहादर चव्हाण व घोरपडे यांच्या पूर्वजांनी केलेल्या कामगिरीविषयी (९४४); आबासाहेब छत्रपतींनी तंजावरकरांस दिलेल्या नोकरीच्या ऐवजासंबंधी (९४६); भोसले घराण्याच्या वंशावळीसंबंधी (९५४-९५८); जावी ते तुंगभद्रेपर्यंत असलेले किल्ले व गड यासंबंधी (९६५-९६६); चिकोडी प्रांत व हुकेरी येथील गांवासंबंधी (९७७); पुण्यास रवाना केलेली पत्रे व तालेवार यासंबंधी (९७९); छत्रपतींच्या प्रांतांतील गांवाचा वसूल व नक्त गोखले यांच्या फौजेने नेल्यासंबंधी (९८०-९८१); मुंबई येथील इंग्रजांच्या न्यायाविषयी कोर्टाविषयी (९८२-९८३); उदेपूरच्या राजांच्या वंशावळीसंबंधी (९८४); पो. एजंट वेबर यांच्या पन्हाळा व करवीर भेटीसंबंधी (९८६); हणमंतराव निंबाळकर यास सरलष्करचा हुद्दा देण्यात आला त्या वेळी देण्यात आलेली वस्त्रे, हत्यारे इ. संबंधी (९९०-९९३); रघुनाथ वल्लाळ यांजबरोबर बारवाडास पाठवलेल्या अस्सल कागदपत्रांसंबंधी (९९७).

सूडबंद—महाल वाटणी व सरदेशकुळकर्णी प्रांत पन्हाळा यासंबंधी (१३९४८-९५१).

---

रु. क्र. ९०, रु. नं. ९०, पु. नं. २, का. सं. १४०१०–१४०८३ (७४).

सु. स. १२३२ ते १२४२, इ. स. १८३१-३२ ते १८४१-४२.

आज्ञापत्रे—जयराम विक्रम हुजरे यास सेवेबद्दल जमीन दिल्यासंबंधी गांवकामगार आडूर यास राजमंडळाचे (१४०१७-०१८); संताजी पोवार हुजरे यास सातार्डे येथे जमीन

रुमाल क्र. १०

पुडके क्र. २—(चालू)

**आज्ञापत्रे**—(चालू)

दिल्याबाबत अंताजी शिवाजी किल्ले पन्हाळा यास राजमंडळाकडून (१४०१९); सटवाजी पोवार यास इनाम जमीन दिल्याबद्दल मोकदमानी साताई यास राजमंडळाकडून (०२०-०२२); आप्पाजी कुलकर्णी यास हुजूर सेवेबद्दल इनाम जमीन दिल्याबद्दल गावकामगार नागांव यास राजमंडळाचे (०२१); रामगोंडा बाळगोंडा पाटील यास जमीन दिल्याबाबत गांवकामगार नागाव यास राजमंडळाचे (०२३); आप्पाजी मोहिते यास हुजूर सेवेबद्दल पट्टण कोडोली येथे इनाम जमीन दिल्याबद्दल राजमंडळाचे (०२४); यशवंती कदम हुजरे यास हुजूर सेवेबद्दल हिरवडे येथे जमीन इनाम दिल्याबाबत रामोजी दळवी व सदाशिव आप्पाजी किल्ले पन्हाळा व गांवकामगार हिरवडे याना राजमंडळाचे (०२५-०२७); तारळेकर देशपांडे याचे घरास उपसर्ग न करण्याबाबत वरातदार मौजे तारळे यास राजमंडळाचे (०२८); तारळेकर देशपांडे यांचेकडील एवज आणावयास पाठवलेल्या लोकांना नेमाला रुजू करून देणेबाबत मोकदमानी मौजे हिरवडे यास राजमंडळाचे (०२९); चैत्र वद्य ८ च्या उत्सवाबद्दलचे पंचवीस रुपये भगवंतराव गायकवाड यांजकडे देण्याबाबत गांवकामगार किणी व निगवे यास (०३०-०३१); लक्ष्मण झुजार व त्याचा मुलगा यांच्या भांडणामुळे महे येथील त्यांची जमीन जप्त करण्यासंबंधी गांवकामगार महे यास राजमंडळाचे (०३२); मिणचे व आकनूर येथून पंधरा रुपये घेऊन हुजूर भेटीस येण्याबाबत विदेसी लोकांना राजमंडळाचे (०३३-०३४).

**कलमबंदी**—दिवाणसाहेब (सईबाई) यांच्या कारकीर्दीतील दौलतीच्या व्यवस्थेसंबंधी (१४०६५-०६६).

**जाहीरनामे**—दौलतीची व्यवस्था, न्याय वगैरेबाबत ठेवावयाच्या वर्तणुकीबाबत दिवाणसाहेब (साईबाई) यांचे (१४०६७-०६९); दगेबाज भवानराव घाटगे व त्याचे दोन भाऊ याना पकडण्याविषयी करवीर सरकारचा (०७३).

**टिप्पणे**—सरकारांतून इनाम गावे दिल्याबद्दल (१४०५७-०६२).

**पत्रे**—पाडळी येथील आपले कुलकर्णी वतन आबाजीपंत यास दिल्यासंबंधी गावकामगार पाडळी यास अंताजी रामचंद्र पन्हाळकर यांचे (१४०१६); वेंगरोळचे ठाण घेतल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यास रावजी शिवाजी यांचे (०७४); निशाण मोतबाचे काम चालू केल्यासंबंधी (०७५); मयत खानवटकर भोसले यांच्या जिंदगीची माहिती पाठवण्याबाबत पो. एजंट यांचे राजमंडळास (०७६); आंबे पाठविल्याबाबत दिनकरराव गायकवाड यास अन्नपूर्णाबाई पटवधन यांचे (०७७); क्षेमसमाचारासंबंधी दिनकरराव गायकवाड याना गणतराव खानविलकर यांचे (०८०).

**पत्रे—छत्रपतीस:** तेरणीच्या मुक्कामाहून पुढे कूच होण्याबाबत सिवदेव पारगावकर यांचे (१४०१०); अंडरसन यांच्याबरोबर धारवाड मुक्कामी पोचल्याबाबत रामाजी भीमराव यांचे (०११); स्वार लोक वगैरे सरंजाम रवाना केला असल्यासंबंधी नरसिंगराव रामजी यांचे (०१२); आज्ञेप्रमाणे मनोहरगडचा बंदोबस्त करीत असल्यासंबंधी रामाजी भीमराव यांचे (०१३); कलेक्टर अंडरसन व पो. एजंट यांना मेण्याचे पेटारे पाठविल्यासंबंधी रामाजी भीमराव यांचे (०१४); कलेक्टर अंडरसन यानी दिलेली थली पाठविल्यासंबंधी रामाजी भीमराव यांचे (०१५); हरभरे खरेदी करून ठेविले असल्यासंबंधी बाळकृष्ण शेट पोवार यांचे (०७९).

**पत्रक (तक्ता)**—चिटणीसीकडील लोकांच्या नेमणुकीबाबत (१४०८१-०८२).

**याद्या**—न्यायाधीशीकडील कामकाजासंबंधी (१४०३५-०४४); रघुनाथ बल्लाळ याजबरोबर धारवाडास पाठवलेल्या सनदासंबंधी (०४५-०४६); धारवाडास पो. एजंटकडे पाठवलेल्या कागदपत्रासंबंधी (०४७-०५०); इंग्रजाकडून हुजूर अखबारनवीसाचे जागेवर आलेल्या लोकांसंबंधी (०५१-०५२); छत्रपतींच्या न्यायाधीशीकडे व जमेनिसीकडे असलेल्या कामदाराच्या नांवानिशी (०५३-०५४);

रुमाल क्र. ९०

पुडके क्र. २—(चालू)

**याद्या**—(चालू)

दिवाणसाहेब (सईबाई) यांच्या कारकीर्दीतील राज्यकारभाराच्या व्यवस्थेसंबंधी (१४०५५-०५६); राजमंडळाच्या दुमालदाराकडे असलेल्या सरंजामासंबंधी (०६३-०६४); हुजूरची स्वारी त्र्यंबोलीस गेली असता त्या ठिकाणी दंगा झाला त्याबाबत शिक्षा देण्यात आलेल्या लोकांसंबंधी (०७०-०७१); अठरा कारखान व हुजूर बाजार याकडील खर्चाच्या व्यवस्थसंबंधी (०७२); चिटणिसीकडील नोकर लोकांच्या नेमणुकीसंबंधी (०७८); राजमंडळ चिटणिसीकडील लोकांना दिलल्या नेमणुकीबाबत (०८३).

---

**ज. क्र. ९१, रु. क्र. ९१, पु. क्र. १ का. सं. १४०८४-१४१३५ (५२).**

**सु. स. १२४३-१२८०, इ. स. १८४२-१८३४ ते १८७९-८०.**

**जबाब**—मालवण येथील रामेश्वर देवास अभिषेक वगैरे वामन जोशी याच्या वडिलांकडून होत असल्यासंबंधी चिटको हरि मालविद याचा महालकरी सालसी यांच्यासमोर (१४०९०).

**टिप्पणे**—अंताजीपंत यास सचिवपद दिल्याबाबत (१४११७); सरंजामदार, इनामदार इत्यादींच्या वारसा चौकशीसंबंधी (१३०-१३१); ज्या लोकांच्या सनदा परत द्यावयाच्या शिल्लक राहिल्या त्यासंबंधी (१३३); राघो गंगाधर वैद्य वगैरे लोकांच्या वारसा चौकशीच्या कामासंबंधी (१३५).

**पत्रे**—हरगापूर येथील महार स्त्रीच्या खुनाच्या चौकशीसंबंधी रामचंद्रपंत राजाज्ञा यास पोलीस अम्मलदार चिकोडी यांचे (१४०८४); यासंबंधी पोलीस अम्मलदार चिकोडी यास राजाज्ञा व हिंदुराव गायकवाड यांचे (०८५); इंग्रजांच्या मुक्कामासंबंधी आबाजी शामजी देशपांडे प्रांत पन्हाळा याचे छत्रपतीस (०८९); मुरगूड संबंधीच्या सनदा इ. कागदपत्र सापडत नसल्यासंबंधी पो. एजंट यास चिटणीस, सरकार करवीर यांचे (१०५); गावांच्या जमाबंदीचा तक्ता पाठवून देण्याबाबत गोपाळ बाबाजी खाजगी कारभारी यास इंग्रज सरकारचे (१३२); लग्नाकरिता बडोद्यास जाणार असल्याबाबत पो. एजंट यांना अहिल्याबाई यांचे (१३४).

**प्रकरणी काम**—मयत मोरो चिटको याच्या वारसा चौकशीसंबंधी (१४१०९—१११).

**याद्या**—करवीर इलाख्यातील पाटील, कुलकर्णी, जहागिरदार वगैरेंनी रयतेस व लोकास उपद्रव न करता वहिवाट करण्यासंबंधी (१४०८६-०८८); देहझाडचापैकी पठचांचे पत्रकात नसलेल्या गावांसंबंधी (०९१); सखारामपंत याजबरोबर करवीरास पाठविलेल्या कागदपत्रासंबंधी (०९२); नरू बापू सरपोतदार याचा गावगन्नाकडून येणे असलेल्या हक्काच्या एवजाबाबत (०९३-१०४); पिंगळे घराण्यातील पशव्यांच्या वंशावळीबाबत (१०६-१०८); पंतअमात्य यांच्या पूर्वजांच्या माहितीसंबंधी (११२); पंडितराव घराण्याच्या वंशावळीसंबंधी (११३-११४); मानकरी वगैरेस विडे द्यावयाच्या पद्धती विषयी (११५-१६); स्वामी जगदगुरु, अष्टप्रधान इ.च्या किताबासंबंधी (११८-१२१); करवीरकर संभाजीने नमलेल्या अष्टप्रधानासंबंधी (१२२); विजापूर बादशहाच्या वेळच्या जमिनी मोजण्यासंबंधीच्या पद्धतीबाबत (१२३); करवीरकर छत्रपती बडोद्यास लग्नास गल्यावर तेथ त्यांच्या होणाऱ्या भेटी वगैरेबाबत (१२४); गव्हर्नर एलफिन्स्टन हे करवीरी आल्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी निरनिराळ्या ठिकाणी तोफा उडविण्यात आल्या त्यासंबंधी (१२५-१२९).

---

**ज. क्र. ९१, रु. क्र. ९१, पु. क्र. २, का. सं. १४१३६-१४२४० (१०५).**

**सु. स. १२४३ ते १२८८, इ. स. १८४२-१८४३ ते १८८७-८८.**

**आज्ञापत्र**—तिळगूळ पाठविल्यासंबंधी हणमंतराव श्रीनिवास यास छत्रपतींकडून (१४२०४).

**इनामपत्र**—माणकोजी भोसले यास खानवट गांव इनाम दिल्यासंबंधी, पेशवा माधवराव बल्लाळ यांचे (१४२३०).

**रुमाल क्र. ९१**

**पुडके क्र. २—(चालू)**

**जबाब**—साळू शिंपी हिला पळवून नेले प्रकरणी रामा माने याचा करवीर सरकारकडे (१४२१८).

**देहझाडा**—पेटा पन्हाळयाकडील गावासंबंधी (१४१६४-१६७).

**पत्रे**—क्षेमसमाचारासंबंधी छत्रपतीस नागोजी नाईक याचे (१४१५०); छत्रपतीच्या भेटीस आज्ञापत्र येताच येत आहे या अर्थी जिवराम नाना याना नरसिंगराव घोरपडे याचे (१५१); सांगवडेकराकडून धोंडजी नाईक याच्या येणे असलेल्या ऐवजाचा फडशा करण्याबाबत (१५२); चिकोडी, हुकेरी तालुके छत्रपतीस दिल्याबाबत राणोजी घोरपडे यांस थॉमस मन्रो याचे (१५३); आपल्या कामकाजांचा बंदोबस्त सरकारातून करवून देण्याबाबत नानासाहेब पाटणकर यास राधाबाई घोरपडे यांचे (१५४); यशवंतराव घोरपडे सांगतील त्याप्रमाणे कामाचा बंदोबस्त करण्याबाबत मालोजीराव भोसले यास चंदोजीराव घोरपडे याचे (१५५); धारवाडहून आपण करवीरी केव्हा आला ते कळवावे याअर्थी आनंदराव आण्णा याना संभाजीराव घोरपडे याचे (१५६); चाकरीसाठी लोक पाठविले असल्याबाबत बुवासाहेब छत्रपतीस आनकाबाई जाधव यांचे (१५७); शिराळे गावास होणारा उपद्रव बंद झाला असल्यासंबंधी छत्रपतीस भगवंतराव आबाजी याचे (१५८); येणे ऐवजाबाबत पन्हाळा तालुक्यातील धरून ठेवलेल्या पाटील, कुलकर्णी यांच्या सुटकेसंबंधी छत्रपतीस आनंदराव भगवंत यांचे (१५९); सावंतवाडीकरानी लुटलेल्या इंग्रजी फत्तेमारीविषयी नागोजीराव घाटगे यास अप्पूराव याचे (१६८); तिळगूळ मिळाल्यासंबंधी बाळाजी नारायण याचे (२०३); आज्ञेप्रमाणे सरकारी काम करीत असल्यासंबंधी छत्रपतीस बच्चाचार्य याचे (२०५); तिळगूळ पाठविल्यासंबंधी, बुवासाहेब छत्रपतीस भाऊ महाराज त्र्यंबक यांचे (२१७); पुणे मुक्कामी केलेल्या कापड खरेदीसंबंधी छत्रपतीस यमाजी हुजरे व गोपाळ त्र्यंबक यांचे (२१९-२२०); इमारत कारखान्याकडील ४०० रुपये विठोजी मोहिते यास दिल्यासंबंधी, जीवराव जाधव याचे छत्रपतीस (२२१); रत्नागिरीस थैली पाठविल्यासंबंधी जीवराव जाधव याचे (२२२); तारळे येथे मृत्यु पावलेल्या फकिरास मूठमाती दिल्यासंबंधी जीवराव जाधव हवालदार याचे छत्रपतीस (२२३); खर्चास रुपये पाठविल्याविषयी दिनकरराव गायकवाड यास शिवभट लेले मुक्काम मिरज याचे (२२४); सरकारी पागेतील घोड्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यास भास्कर गोविंद जोशी याचे (२२९); इंग्रजाकडे वकिलीचे काम करण्याबाबत, कारकुनीबाबत रुपये घेणार नाही या अर्थी, कृष्णराव गद्रे याचे छत्रपतीस (२४०).

**याद्या**—करवीरकर संभाजी व सातारकर शाहू छत्रपति यानी दिलेल्या सनदा इत्यादी संबंधी (१४१३६); थॉमस याच्या करवीर भेटीबाबत (१३७); देवस्थाने, पागा, धर्मादाय इत्यादीकडील खर्चाबाबत (१३८); न्यायाधिशांकडे पंचायतीस बसणाऱ्या लोकांनी करावयाच्या वर्तणुकीबाबत (१३९-१४६); विशाळगड प्रतिनिधी यांच्याकडील अस्सल पत्रासंबंधी (१४७-१४९); पन्हाळा येथील खालसा वगैरे गावांसंबंधी (१६०-१६३); राजमंडळ चिटणिसीकडील लिहिण्यात यावयाच्या विनंती व आज्ञापत्रासंबंधी (पहिले पान नाही) (१६९-१९२); युवराज व अष्टप्रधानपद देण्याच्यावेळी वापरावयाच्या वस्त्रासंबंधी (१९३-२०२); कंपनी सरकारकडे फिर्यादी घेऊन गेलेल्या लोकांच्या सवालाबाबतच्या जबाबासंबंधी (२०६-२१२); सेवक लोकांनी बेकायदा घेतलेल्या जमिनी परत सरकारांत घेतल्यासंबंधी (२१३-२१६); सुमंत घराण्याच्या माहितीसंबंधी (२२५-२२८); मुंबई येथे इंग्रज सरकारच्या झालेल्या दरबारासंबंधी (२३१-२३८); कमांडर-इन-चीफ पियरसाहेब यांच्या करवीर, निपाणी, धारवाड इत्यादि ठिकाणच्या भेटीसंबंधी (२३९).

---

**ज. क्र. ९२, रु. क्र. ९२, पु. क्र. १, का. सं. १४२४१-१४३२२ (८२).**

**सु. स. १२१२ ते १२७३, इ. स. १८११ १२ ते १८७२-७३.**

**अर्ज**—बकऱ्यावरील जकात माफ करण्यासंबंधी खाटीक याचा करवीर सरकारकडे (१४२९९).

**उतारा**—दरवेशी याच्या स्वाधीन केलेल्या अस्वलासाठी प्रत्येक घराकडून एक पैसा देण्यासंबंधी चिटणिशी वारनिशीतील आज्ञापत्राचा (१४३००).

**रुमाल क्र. ९२**

**पुडके क्र. १—(चालू)**

**टिप्पण**—महादाजी शिंदे, माधवराव, पेशवे इत्यादीशी करवीरकरांच्या झालेल्या तहासंबंधी (१४२४१).

**दस्तक**—एक दफेदार व दहा असामी याना करवीर हद्दीतील सातार्‍यास जाऊ देण्याबाबत (१४२७१).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची** : वकिलीच्या कामकाजासंबंधी कारकुनी म्हणून दोन रुपये घेणार नसल्यासंबंधी वच्याचार्य व कृष्णराव माधव गद्रे यांची (१४२६५-२६७) आपल्या सरजामाचे संरक्षण करण्यासंबंधी आनंदीबाई देसाई नूलकर यांचे (२६९); विरोजी मूर्तीच्या घरास चौकी पहारा बसवल्यासंबंधी धनु चोपदार व महादजी परशराम माइणीकर यांचे (पत्र अपुरे आहे) (२७०); तेरणी येथील ठाणी विरोजी मूर्ती याच्या स्वाधीन झाल्यासंबंधी सखाराम दाभाडे व श्रीनिवास गुरुनाथ यांचे (२७२-२७५); विरोजी मूर्ती यास पाठविला असल्यासंबंधी श्रीनिवास गुरुनाथ याचे (२७६).

**पत्रके—(कोष्टक वजा)** : चिटणिसीकडील लोकांस असलेल्या नक्त नेमणुकीसंबंधी (१४२८१); हुजूर पथकाकडील नोकर लोकांच्या हजेरीबद्दल (२८२-२८५); महाल पागा, हुजूर खासगीकडील मामलेदार वगैरे लोकांस दिलेल्या नक्त नेमणुका जमिनी वगैरेसंबंधी (२८६-२८७); सरंजामी लोकांकडे असलेल्या स्वार व पायदळ यांच्या माहितीसंबंधी (२८८-२९३); पांचवे शिवाजी यांच्या माहितीसंबंधी (३०१-३०५).

**प्रकरणी कामे**—मयत मोरो चिटको याच्या जमिनीच्या वगैरे केलेल्या व्यवस्थेसंबंधी (१४२९४-२९८).

**पावती**—अचिर्णे येथील रामेश्वर देवालयाच्या खर्चास रुपये पावल्यासंबंधी दामोदर नारायण जोशी याजकडून कलेक्टर, मालवण यास (१४२६८).

**याद्या**—सरंजाम, दुमालदार, वगैरे मंडळीच्या नावासंबंधी (१४२४२-२६४); खालसा गावापैकी दुमाला दिलेल्या गावासंबंधी (२७७-२७९); चिटणिसीकडील मंडळीना दिलल्या जमिनीसंबंधी (२८०); धर्मादाय व सरंजामी गावासंबंधी (३०६-३२१).

---

**ज. क्र. ९२, रु. क्र. ९२, पु. क्र. २, का. सं. १४३२३-१४४१६(९४).**

**सु. स. १२०१ ते १२६८, इ. स. १८००-०१ ते १८६७६८.**

**आज्ञापत्रे**—चौथाई पट्टीचे रुपये आंबाजी येसाजी वाकनीस याजकडे वंशपरंपरा देण्याबाबत गावकामगार पंडेवाडी यास राजमंडळाचे (१४३३७); आबाजी यशवंत यास पंडेवाडीकडील चौथाई बाब वंशपरंपरा इनाम दिल्यासंबंधी राजमंडळाचे (३३९); पंडवाडी येथील बावतीचा ऐवज आबाजी यशवंत वाकनीस यास इनाम करून दिल्याबाबत, गोविंदराव पंडित अमात्य याचे, गांवकामगार पंडेवाडी यास (३४१); पंडेवाडी येथील पंचोत्रा हक्क आबाजी यशवंत वाकनीस यास दिल्यासंबंधी गावकामगार पंडेवाडी व आबाजी यशवंत वाकनीस यास (३४२-३४३); पंडेवाडीकडील कोट पट्टी बाबतचे रुपये आबाजी यशवंत वाकनीस यास देण्याबाबत, गावकामगार पंडेवाडी यास राजमंडळाचे (३४४); पंडेवाडीकडून यावयाचे कोटपट्टीचे रुपये माफ केल्यासंबंधी आबाजी यशवंत वाकनीस यास राजमंडळाचे (३४५); पंडेवाडी येथील नाडगौडा हक्काचा ऐवज आबाजी यशवंत यास देण्यासंबंधी, गावकामगार पंडेवाडी याना माधवराव लक्ष्मण यांचे (३४६); जयराम निकम हुजरे यास सेवेबद्दल आडूर येथे जमीन दिल्याबाबत, महाल खासगी पोता यास राजमंडळाचे (३४७); छत्रपतीसाठी पाठविलेला जोतीबाचा प्रसाद पावल्याबाबत, बाळोजी भोसले यास राजमंडळाचे (३४८); बापू आनंद कुलकर्णी मौजे पेणारे ता. नारळे यास करवीरी हुजूरकडे पाठवण्याबाबत राणोजी गायकवाड व अंताजी यशवंत यास राजमंडळाचे (३४९); रुद्र गया येथील तीर्थस्थानास असलेले धर्मादाय इनाम महिंद्राचार्य याजकडे चालविण्याबाबत गावकामगार इ. अधिकार्‍यास राजमंडळाचे (३५४).

**कलमबंदी**—खेबुडे येथील देशमुखीच्या एवजासंबंधी (१४४१५).

**जबाब**—आत्माराम वडणगेकर यांच्याशी चाललेल्या घराच्या भिंतीबाबतच्या खटल्यासंबंधी ववन भट जोशी यांचा करवीर सरकारकडे (१४३५५).

**रुमाल क्र. ९२**

**पुडके क्र. २—(चालू)**

**टिप्पण**—संवदलगे, तोरगल, चिकोडी वगैरे ठिकाणास छत्रपतींनी दिलेल्या भेटीसंबंधी (१४३३२); आऊबाई आक्का, बाबासाहेब छत्रपती इ. चे विवाह वगैरेसंबंधी (३९७).

**पत्रे**—चार गावाच्या सीमा तक्रारीसंबंधी दगड घालण्यास लोक रवाना झाले असल्यासंबंधी (१४३२७); सातारा येथील तुरमतजी सेठ मोदी याच्या चोरीस गेलेल्या घोड्याच्या तपासासंबंधी सातारकर छत्रपतीस इंग्रज अधिकाऱ्याचे (त्याचे नाव नाही) (३३४); पंडेवाडी येथील बावतीचा ऐवज आबाजी यशवंत बाकनीस यास इनाम करून दिल्याबाबत धोंडो भास्कर नानिवडेकर यास गोविंदराव अमात्य यांचे (३४०); हैबतराव गायकवाड याना यात्रेस जाण्यासाठी इंग्रजाकडील रहदारीचे दस्तक पाठविल्याबाबत नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (३५०); वतनाच्या वारसा हक्कासंबंधी पो. एजंट यास पंडित बाळाचार्य यांचे (३५२); प्रकृती ठीक होताच भेटीस येत आहे म्हणून दिनकरराव गायकवाड यास रुद्रो बाळकृष्ण याचे (३७२); पारगावकर सुतार याने साळवण येथील जांभळीची झाडे तोडल्याबद्दल त्यास शिक्षा होण्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यास शिवराम प्रभु देसाई याचे (३७३); गोविंदराव गायकवाड यास द्यावयाच्या औषधासंबंधी दिनकरराव गायकवाड यास गुलाम घोपखां याचे (३७४); हुंबरवाडी येथील लगमाण्णा याच्या मळ्यातील वेळू मोडल्याबद्दल दिनकर आप्पा यास सदाशिव अनंत याचे (३७५); कागल येथील समाचार कळविण्याविषयी आप्पासाहेब गायकवाड यास बापू गोपाळ याचे (३७६); इंगळीकर यांचा कारकून गणेश बाजी करवीरी रवाना केल्याबाबत दिनकरराव गायकवाड यास रामचंद्र गुंडो व अंताजी बाबूराव याचे (३७८); अखबारनवीस याजकडील लखोटा पोचल्याबाबत दिनकरराव गायकवाड यास माधवराव लक्ष्मण याचे (३८०); भाऊ याजबरोबर पाठविलेले पत्र पोचल्याबाबत दिनकरराव गायकवाड यास आप्पाजीराव पाटणकर याचे (३८२); दानवाड येथील वसुलासंबंधी दिनकरराव गायकवाड यास केसो गणेश याचे (३८३); क्षेमसमाचारासंबंधी दिनकरराव गायकवाड यास आप्पाजीराव पाटणकर याचे (३८४); अखबारनवीस कागल येथे आले असल्यासंबंधी बाळोजी निकम व महादाजी बापोजी यांचे दिनकरराव गायकवाड यास (३८५); कुडाळ येथील इनाम जमिनीच्या ऐवजाच्या मोकहिकीबाबत दिनकरराव गायकवाड यास विनायक केशव याचे (३८६); परळी येथील पाटील याच्या चौकशीबाबत बापूसाहेब राजाज्ञा व हिंदूराव गायकवाड यांना अंताजी बाबूराव याचे (३८९); दादाप्पा चौधरी याच्या घरच्या चोरीबद्दल माहिती पाठवण्यासंबंधी मुख्य कारभारी करवीर यास पो० सुपरिण्टेण्डेण्ट याचे (३९३-३९६); आप्पा शास्त्री कागलकर यास सोनाळी व सिदनेंली येथून मिळावयाचे भात व बैल यासंबंधी (४०२) ; कोल्हापूरची प्राचीन माहिती लिहून पाठविण्याबाबत दाजी कृष्ण पंडीत यास मेजर ग्रॅहॅम याचे (४०४); दौलतीच्या व्यवस्थेबाबत पो. ए. यास छत्रपतीचे (४०७-४०८).

**पत्रे**—**छत्रपतीस** : सांगली येथे सुखरूप पोचल्याबाबत नारायणराव मोहिते याचे (१४३२८); मुलगलीहालचे ठाण्यांतील लोकांनी छत्रपतींच्या लोकावर केलेल्या गोळीबारासंबंधी कमिशनर, पुणे यांचे (३२९-३३१); पो. एजंट निसबट यांच्या भेटीस येण्याबाबत अंताजी रघुनाथ याचे (३३८); लष्कर मुक्कामी पागेकडे चंदी वगैरे पाठविल्याबाबत जीवराव जाधव हवालदार याचे (३५३); हिरगले येथे कामगिरीस नेमलेल्या विदेशी लोकांच्या रोजमुऱ्याबाबत रामचंद्र जाधव व रंगो नारायण यांचे (३५९); नगारखान्याच्या बाजू बसविण्यास शिसे देण्यासंबंधी विठोजी मोहिते याचे (३६०); तेरणी गाव ठाणेसुद्धा कासगौंडा देसाई याचे स्वाधीन केल्याबाबत सखाराम दाभाडे व श्रीनिवास गुरुनाथ यांचे (३६१-३६२); तेरणी येथील रयतेस व गावकामगार यास दिलेली अभयपत्रे पोचल्यासंबंधी सखाराम दाभाडे व मुरारजी घोरपडे यांचे (३६३); नंदवाडचे ठाणे स्वाधीन झाल्यासंबंधी संतराम भयस याचे (३६४); तेरणी येथील वसुलासंबंधी सखाराम दाभाडे व श्रीनिवास गुरुनाथ यांची (३६५-३६९); जनोबा कारकून यास जबाबास पाठवून देण्यासंबंधी पो. एजंट याचे (३७०); बेळगाव ते करवीर या मार्गावर होणाऱ्या डाकेच्या व्यवस्थेबाबत आप्पाजीराव व देसाई यांचे (३७१); छत्रपतीकडून आलेली यादी पाठवण्यासंबंधी चिमाजीराव भोसले याचे (३७७); कुटुंबाची प्रकृती बरी होताच हुजूर सेवेस येत असल्यासंबंधी वासुदेव बापूजी

### रुमाल क्र. ९२

### पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे**—(चालू)

याचे (१४३८८); पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणे इंग्रजाशी दोस्ती चालू ठेवण्याबाबत राजाराम छत्रपती याना गव्हर्नर मुंबई याचे (४०६); आमात्यपदाची पाठवलेली वस्त्रे पोचल्यासंबंधी माधवराव मोरेश्वर याचे (४०९); राणी सईबाई (दिवाण साहेब) या वडील असलेने त्या कारभार पहातील या अर्थी पो. एजंट याचे (४१०); वलभगडाच्या मोकळीकीबद्दल व गलदगे गाव मिळण्यासंबंधी इंग्रजांशी बोलणी केल्याबद्दल भाऊ महाराज याचे (४११); संवदती गावच्या सावकारीचा उलगडा होऊन गाव आपल्याकडे चालविण्यास मिळण्याबाबत आण्णाजी नरसिंह देशपांडे याचे (४१२-४१३); डोणोली येथं रोगामुळे पीक आले नसल्याकारणाने वसुलाबाबत जास्त उपसर्ग न करण्याविषयी बुवासाहेब छत्रपतीस वहिणाबाई यांचे (४१६).

**पत्रके**—नरु बापू सरपोतदार याच्या हक्काबद्दल गावगन्नाकडून येणे असलेल्या ऐवजाबाबत (१४३५७-३५८).

**चोटखत**—नरू बापू सरपोतदार यांजकडे असलेल्या हक्काबाबतच्या खालसा व दुमाला गावाबाबत (१४३९१-३९२).

**याद्या**—सतवयाबाबत जमा झालेल्या ऐवजासंबंधी (१४३२३-३२५); नारायणराव पाटणकर याजकडे दिलेल्या थैल्यासंबंधी (३२६); आरळे, पोवाले इ० गावांकडून यावयाच्या गल्ल्यासंबंधी (३३३); छत्रपती व इंग्रज यांच्या झालेल्या भेटीसंबंधी (३३५-३३६); बजी शिपीण हिने आपल्या जावयास मूठ मारुन मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत हुजूर न्यायाधिशाकडे चालावयाच्या खटल्यासंबंधी (३५१); हुजूर न्यायाधिशांकडील कामासंबंधी (३५६); पंतआमात्य यांच्या दौलतीच्या जमाखर्चाच्या याद्या पाठवीत असल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यांना शामराव बळवंत यांचे (३७९); सरदार, मानकरी वगैरेसंबंधी (पहिले पान नाही) (३८१); अखबारनवीस यानी परस्पर पो. एजंट याजकडे पाठवलेल्या सावकार लोकांच्या पत्रासंबंधी (३८७); चिटणिसीकडील लोकांच्या रोजमुऱ्यासंबंधी (३९०); विशाळगडकर प्रतिनिधी यांच्या माहितीबाबत (३९८-३९९); हुजूर सेवेबद्दल लोकांना दिलेल्या जमिनीसंबंधी (४००-४०१); धारकर पोवार व छत्रपती यांच्या भेटीबाबत (४०३); डोंगरोजी यादव याच्याकडील सनदासंबंधी (४०५); सरंजामी गावासंबंधी (४१४).

---

**ज. क्र. ९२, रु. क्र. ९२, पु. क्र. ३, का. सं. १४४१७–१४४५६ (४०).**

**सु. स. ११४३ ते १२५३, इ. स. १७४२-४३ ते १८५२-५३.**

**करार**—निवाळकर देसाई यांच्याकडील आठ गावे परत करवीर सरकारात घेतल्याबाबत (१४४३०-४३२).

**कलमबंदी**—इंग्रजांच्या ऐवजाचा करवीरकरांनी उलगडा करण्यासंबंधी (१४४३९-४४०).

**टिप्पण**—सिंधुदुर्गाच्या बांधकामासंबंधी व मदराव बनगर याने शत्रूशी केलेल्या लढाईसंबंधी (१४४२४); ताराबाईचा मुलगा शिवाजी हा राज्यावर केव्हा बसला व वारला यासंबंधी (४२५); महालक्ष्मीची स्थापना सिदोजीराव घोरपडे यानी केल्यासंबंधी (४२६); कोन्हेरराव त्र्यंबक पटवर्धन यानी करवीरावर केलेल्या स्वारीसंबंधी (४३३); छत्रपती कर्नाटकात गेल्यावेळी रत्नाकर पंडित, प्रीतीराव चव्हाण वगैरेवर राज्यकारभाराची जबाबदारी टाकल्यासंबंधी (४३४).

**पत्रे**—दानवाड व एकसंबे येथील सीमा तंट्यासंबंधी गावकामगार कलोळ यास विजापूरकरांचे (१४४१८); फौजेच्या मक्त्याबाबतची बाकी देण्याबाबत सिदराम गौडा निंबाळकर देसाई यास आदिलशाही सरकारचे (४१९); मनोळी ठाण्याबाबत यशवंतराव शिंदे व सटवाजी भोसले यांचेमध्ये चाललेल्या खटल्याबाबत यशवंतराव शिंदे यास (लिहिणाऱ्याचे नाव नाही) (४२९); जिवाजी आवाजी याजकडून सर्व मजकूर समजेल या अर्थी तुळजोजी राजे यास तिसरे शिवाजी यांचे (४३५); इंग्रजी गलबताना व जहाजांना उपद्रव न करण्याबाबत छत्रपतीस गव्हर्नर याचे (४३६); छत्रपतींच्या आरमाराने चांदभाई याच्या जप्त केलेल्या व्यापारी जहाजासंबंधी छत्रपतीस कंपनी सरकारचे (४३७); येसाजी नाईक मांजरेकर

**रुमाल क्र. ९२**

**पुडके क्र. ३—(चालू)**

**पत्रे**—(चालू)
यांच्याशी झालेल्या गोळागोळीबावत, सुलतानजी भोसले सिंधुदुर्ग यास (१४४४१); इंग्रजी फौजेसह निघून येत असल्यासंबंधी छत्रपतीस राघो सदाशिव याचे (४४२); इंग्रजी जहाजास उपसर्ग न करण्याबावत सिंधुदुर्गावरील अम्मलदारास ताकीद केल्यासंबंधी गव्हर्नर मुंबई यास छत्रपतीचे (४४३-४४४); सदलगेच्या सुभेदारास लखोटा दिल्यासंबंधी बाबाजी यास कृष्णाजी याचे (४४५); महालक्ष्मीचा प्रसाद पाठविल्यासंबंधी छत्रपतीस रंग जोशी याचे (४४६); सौदतीचे ठाणे घालून होताच निघून येत असल्याबाबत छत्रपतीस भरमाप्पा देसाई याचे (४४७); मि. जॉर्ज यास क्षेमसमाचारासंबंधी करवीर-करांचे (४४८-४४९); शिरोळे येथील जमिनीच्या वसुलाबाबत छत्रपतीस नारायण-घालवाडकर याचे (४५०); गुन्हेगारास बंदोबस्ताने पाठवून देण्यासंबंधी रामचंद्रराव राजाज्ञा यास पोलीस अम्मलदार चिकोडी याचे (४५१); लखोटे रवाना केल्यासंबंधी छत्रपतीस मामलेदार पेठा शिरोळे याचे (४५२).

**फर्मान**—जालन शिवाजी उमदराव यास बादशहाकडून दहा हजार रुपये, दोनशे स्वार, नगारा व निशाण देण्यात आल्यासंबंधी (१४४१७).

**याद्या**—शककर्ते शिवाजी महाराज यांची स्वारी कर्नाटकात असता तेथे देवीने सांगितलेल्या भविष्य वाणीसंबंधी (१४४२०-४२२); संताजी घोरपडे, विठोजी चव्हाण व भैरजी घोरपडे यांस राजाराम छत्रपतींनी दिलेल्या किताबासंबंधी (४२३); द्वारकोजी नाईक, अर्जोजी यादव वगैरे लोकास दिलेल्या नेमणुकासंबंधी (४२७); वरच्या दर्जातील लोकांना देण्यात आलेल्या अधिकाराबाबत (४५३-४५६).

**वतनपत्र**—संभाजी शहाजी भोसले यास छत्रपतींनी गावोगावी दिलेल्या वतनांसंबंधी (१४४३८).

**सूडबंद**—राजसबाई यांच्या नावे असलेल्या खासगी महालाकडील सरदेशकुलकर्णीसंबंधी (१४४२८).

---

**ज. क्र. ९३, रु. क्र. ९३, पु. क्र. १, का. सं. १४४५७–१४५४४ (८८).**

**सु.स. १२१६ ते १२३८, इ. स. १८१५-१६ ते १८३७-३८**

**पत्रे**—**छत्रपतीस वकिलांची** : इंग्रजाकडील कामकाजे होत असल्याबाबत (१४४५८); कमिशनर व गव्हर्नर यास पाठवलेल्या थैल्या (पत्रा) संबंधी (४५९); खर्चाच्या बंदोबस्तासाठी (४६०); स्टिव्हन्सन यांची भेट घेतल्यासंबंधी (४६१); पो. ए. यांच्या थैल्यांची उत्तरे पाठवण्याबावत (४६२); कितूरचा तंटा मिटविण्याच्या कामगिरीवर जाण्याच्या खर्चाबाबत (४६४); मातोश्री साहेबांच्या मृत्यूची वार्ता बेवर साहेबांच्या कानी घातल्याबाबत (४६६-४६७); आकिवाटकर यास सत्वर परत पाठविण्याविषयी (४७१); पागेतील चोरीस गेलेल्या घोड्यांची चौकशी करण्यासंबंधी (४७२); पो. एजंट तालुक्यांच्या पाहणीसाठी गेल्यासंबंधी (४७३); खर्चाची तरतुद सत्वर करण्याविषयी (४७४); होंगल येथे पो. एजंट यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसंबंधी (४७५-४७६); तुळजापुरास जाण्यासाठी इंग्रजा-कडून रहदारीचे दस्तक घेण्याबावत (४७७-४७८); छत्रपतीच्या प्रकृतीसंबंधी व रह-दारीच्या दस्तकासंबंधी इंग्रजांशी बोलणी केल्याबावत (४७९-४८२); भाऊ महाराज व इचलकरंजीकर यांच्या झालेल्या नुकसानीच्या रुजुवातीसंबंधी (४८३); जगद्गुरु संकेश्वर प्रकरणी इंग्रज बहाद्दराशी बोलणी केल्याबावत (४८४-४८५); इंग्रजी फौज, तोफा वगैरे धारवाडकडे रवाना झाल्यासंबंधी (४८६); सातारा वगैरे इंग्रजी इलाख्यात गेलेल्या लोकांस परत येण्यास हुकूम होण्याबावत (४८७); उंटासाठी दाणे व फरासाच्या पोटगीची सोय करण्यासंबंधी (४८८); जीवराव जाधव व कृष्णराव गर्दे इत्यादींच्या इंग्रज अधिकाऱ्यांशी व्हावयाच्या भेटीसंबंधी (४८९); आबाजीपंत यांच्याशी विचार विनिमय करून सविस्तर कळवीत असल्यासंबंधी (४९०); पो. एजंट हे शिरगांवहून लष्करासह निघून पुढे जाणार असल्यासंबंधी (४९१); हुजूरने शिकारीत मारलेली डुकरे पो. एजंट निसवट यांजकडे पाठविल्याबावत (४९२); कडलगे प्रकरणी इंग्रजाशी बोलणी केल्याबावत (५०९); आज्ञेप्रमाणे सेवा करण्याचा मनोदय आहे याअर्थी (५१०); कामकाजाची माहिती देऊन

## रुमाल क्र. ९३

### पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—(चालू)

शिवराम महादेव यास रवाना केल्याबाबत (१४५११); हैवतराव गायकवाड यांचे रहदारीचे दस्तक पाठवल्याबाबत (५१२); पो. एजंट यांचेशी झालेल्या बोलण्याबाबतची यादी पाठवल्याबाबत (५१३); चिचलीकर देसाई प्रकरणी पो. ए. यांच्याशी बोलणी केल्यासंबंधी तसेच पो. ए. यांच्या पाच्छापूर वगैरे ठिकाणी होणाऱ्या मुक्कामाबाबत (५१४); धारवाड येथील इंग्रज अधिकारी वगैरेंचा परिचय करून घेतला असल्यासंबंधी (५१५); कामाच्या थैल्या पो. ए. डनलॉप यांना सादर केल्याबाबत (५१६); थैल्यांच्या नकला पोहोचल्याबाबत (५१७); रामरावजी यांच्या कामासंबंधी पो. ए. यांनी गव्हर्नरकडे शिफारस केल्याबाबत (५२१); वेंगुर्ले येथे डनलॉप साहेबांची भेट घेतल्याबाबत (५२२); इंग्रजाशी कामकाजासंबंधी बोलण्याच्या प्रयत्नांत असल्यासंबंधी (५२३); पो. ए. यांची पुणे मुक्कामी भेट घेतल्यासंबंधी (५२४–५२५); इंग्रज बहाद्दर यांना पुष्पहार वगैरे अर्पण करून सन्मान केल्याबाबत (५३५); पाटण्यास जाण्यासाठी रहदारीचे दस्तक मिळण्याबाबत इंग्रजांशी बोलणी केल्याबाबत (५३६–५३७).

**पत्रे—छत्रपतीस नारायणराव रत्नाकर यांची :** नरसिंगराव सूर्यवंशी याने डुकराची शिकार केल्याबाबत (१४४९३); सविस्तर मजकूर जीवराव जाधव यांच्या पत्री लिहिल्याबाबत (४९८); नारायणराव व जिवाजीराव खानविलकर यांना मंडळीसह हिंदुस्थानात जाण्यास रहदारीचे दस्तक मिळण्याबद्दल (५००); मातोश्रींच्या शरीरप्रकृतीसंबंधी (५०१); चिकोडी इलाख्यातील चोरांना जामीनावर सोडल्यासंबंधी (५०२); कलेक्टर साहेब पाच्छापुराहून निघून बेळगांवास दाखल झाल्यासंबंधी (५०३); गुरु महाराज यांच्या गुरासंबंधी कलेक्टरकडून आलेल्या याद्या पाठविल्या असल्यासंबंधी (५०४); नांदणीकर यांना मळणी करण्यास मनाई करावी अशासंबंधी (५०५); आप्पाजी देसाई चिचणीकर याना पाठवून देण्याबाबत कलेक्टर यास सांगतो याअर्थी (५०६); पन्हाळ्याहून करवीरास आणलेले दागिने पाठवून देण्यासंबंधी (५०७); शिकारीत मारलेले डुक्कर, ससे, इंग्रज बहाद्दरकडे पाठवून दिल्यासंबंधी (५०८).

**पत्रे—छत्रपतींस इतरांची :** नानीबाई घाटगे यांच्या मुलाच्या बारशास लुगडे, खण वगैरे पाठविल्यासंबंधी बाळोजी निकम हुजरे याचे (१४४४४–४६३); गव्हर्नर पुणे मुक्कामी असल्याबद्दल वध्याचार्य पंडितराव याचे (४६९); डनलॉपसाहेब सांगलीहून मुंबईस रवाना झाल्याबाबत (५३८–३९); सिमसनसाहेब सांगलीस भेट देणार असल्यासंबंधी रामाजी भीमराव याचे (५४०–५४१).

**पत्रे—जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर यांची :** नेरलीकर यांची चीजवस्तू त्यांच्या कारकुनाच्या स्वाधीन करण्याबाबत जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर याचे (१४४९३); कोडोली येथील उमीदराम गुजर यांस लोकांकडून उपद्रव होऊ न देण्याबाबत (४९४); आपल्याकडील मजकूर छत्रपतींच्या पत्री लिहिल्याबद्दल (४९५); कलेक्टराच्या सरंजामास कांही उंट ठेवून घेऊन बाकीचे परत पाठविल्यासंबंधी (४९६); मातोश्री अहिल्याबाई यांची प्रकृती ठीक नसल्याबाबत (४९९); किल्लेदार यांच्यावरील फिर्यादीसंबंधी आबासाहेब जाधव यास बाळकृष्ण बाबूराव याचे (५१८); क्षेमसमाचार कळवण्यासंबंधी शिवाजीपंत दादा यास बाळकृष्ण बाबूराव याचे (५२०); कोडोलीकर प्याद्यांच्या ऐवजी दुसरा इसम पाठविण्याबाबत आबाजीपंत आबा यास बाळकृष्ण बाबूराव याचे (५२६-५२८); कंकणवाडी व मडीलगे या गांवाच्या सीमातंट्याबाबत रावसो बाकनीस यास बाळकृष्ण बाबूराव याचे (५३२); इचलकरंजीकरानी रांगोळीचे ठाणे घेतल्यासंबंधी सुंदराबाई याना भाऊ महाराज यांचे (५४२-५४४).

**पत्रे—नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव यांची :** भुदरगड प्रकरणी बोलणी झाल्याबाबत व नेसरीकरांचा जाबसाल नामंजूर झाल्यासंबंधी (१४५१९); भागिरथीगिरी व रघुनाथगिरी गोसावी यांच्या तंट्याच्या निकालाबाबत (५२९); छत्रपतींच्या कामकाजाविषयी नेहमी कळवीत असल्याबाबत (५३०); गव्हर्नरबरोबर परगांवी जाण्यास खर्चाचा बंदोबस्त करण्यासंबंधी (५३१); मुंबई व धारवाड येथील थैल्या पोहचल्यासंबंधी (५३३); यादी प्रो खर्चाचा बंदोबस्त करण्यासंबंधी (५३४).

**यादी**—गणपती दिलेल्या लोकांसंबंधी (१४४५७).

**ज. क्र. ९३, रु. क्र. ९३, पु. क्र. २, का. सं. १४५४५ ते १५५६७ (२३).**

**सु. स. १२१६ ते १२३८, इ. स. १८१५-१६ ते १८३७-३८.**

**पत्रे**—छत्रपतींच्या कामकाजाच्या उलगड्यासंबंधी गुरूजी बाबा यास आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बाबूराव यांचे (१४५४५); खानवेलकर यांस हिंदुस्थानांत जाण्यास रहदारीचे दस्तक मिळण्याबाबत जीवराव जाधव हवालदार यास नारायणराव राजाज्ञा यांचे (५५५–५५६).

**पत्रे—छत्रपतींस करवीरकर वकिलांची :** कमिशनरकडून आलेला जाहीरनामा व याद्या पाठवल्यासंबंधी (१४५४६–४७); महारुद्र शेटी बेळगांवकर यास नेसरीकर यानी पहारेत ठेवलेसंबंधी (५४८–५४९); यात्रेस जाण्याबाबत रहदारीचे दस्तक पाठवून देत असल्यासंबंधी (५५०); कंपनी सरकारांतून आलेल्या थैल्या पाठवल्यासंबंधी (५५१); फौज, सामान सरंजामासह नदी उतरून पार पाडल्यासंबंधी (५५२–५५३); कामकाजाविषयी बोलणी करीत असल्याबाबत (५५४); इंग्रजाशी बोलणी करण्यासाठी जबाबदार मनुष्य पाठविल्यासंबंधी (५५७); कलेक्टर यांजकडून आलेल्या थैल्या पाठविल्यासंबंधी (५५८–५५९); भडगांव व गिडवणे येथील निपाणकराच्या हक्काच्या ऐवजाविषयींची आज्ञापत्रें पोहचती केल्याबाबत (५६०–५६१).

**पत्रे—नानासो हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे :** कामकाजाविषयी बोलणी करीत असल्यासंबंधी (१४५६२); पो. एजंट करवीर यांच्या भेटीबाबत बंदोबस्त ठेवल्यासंबंधी (५६३); तांबुलकर वाडी प्रांती बंडाई करतात यासंबंधी (५६४); वेबर व सॅम्सन यांच्याशी बोलणी झाल्याबाबत (५६५–६६); मनोहरगड व भडगांव यांच्या बंदोबस्ताविषयीं (५६७).

---

**ज. क्र. ९४, रु. क्र. ९४, पु. क्र. १, का. सं. १४५६८ ते १४६८८ (१२१).**

**सु. स.१२१०–१२५२; इ. स. १८०९–१० ते १८५१-५२.**

**आज्ञापत्रे**—छत्रपतींच्या भेटीस येण्यासंबंधी सुबराव पंडित अमात्य यास राजमंडळचे (१४५८७); व्यंकटराव कृष्ण यास भेटीस पाठविण्याबाबत देवजी नाईक यास छत्रपतींचे (५८८); शेखा बेरड यास पट्टीच्या रुपयाबद्दल उपसर्ग न देण्याबाबत गांवकामगार बसरगे बुा यास हिम्मत बहाद्दर याचे (६४७); नारो खंडेराव यास इनामाचा वसूल देत जाण्याबद्दल गांवकामगार शिरढोण यांस राणोजी घोरपडे याचे (६४८); सती गेलेल्या स्त्रीच्या चौकशीबाबत पाठविलेल्या महादाजी सदाशिव यास मदत करण्यासंबंधी गांवकामगार मलकापूर यास राजमंडळचे (६५१).

**करार**—त्रिंबकजी कान्होजी सरदेसाई व राम सेनवी देशकुलकर्णी ताा आजरे यांच्या मधील परस्पर हक्कासंबंधी (१४६५७).

**कलमबंदी**—पाटील कुलकर्णी व नाईक याजकडून मुचलका घेण्याविषयी (१४५७३).

**टिप्पणे**—छत्रपति सिंहासनारूढ झाल्यावर विडे घ्यावयाच्या पद्धतीविषयी (१४६२८); खानवटकर भोसले घराण्याच्या माहितीसंबंधी (६२९); केरले, नर्तवडे, गिरगांव इ. गांवांसंबंधी दिलेल्या सनदपत्रें इ. संबंधी (६३५-६३९); मानाचे विडे कोणाकोणास द्यावयाचे त्यासंबंधी (६४४); जगद्गुरु, अमात्य, घोरपडे इ. स. मिळालेल्या किताबासंबंधी (६४५); पिंगळे, पेशवे यांच्या वंशावळीसंबंधी (६५२).

**निवाडपत्र**—प्रांत कऱ्हाडचे देशमुखी वतन व गोवारे येथील पाटीलकीचे वतन गिरजोजी यादव याचे असल्यासंबंधी (सुरुवातीचा भाग नाही) (१४६६२-६८८).

**पत्रे**—दिनकर ज्योतिषी पोंभुर्लेकर याची वृत्ती चालविण्यासंबंधी सावाजी आंबाजी सभासद व गांवकामगार देहाय, ताा खारेपाटण,यास छत्रपतींचे (१४५६८); वहिरेश्वर काा हवेली येथील शेषशायीच्या पूजाअर्चेबद्दल देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी यांस रामचंद्र नीळकंठ अमात्य याचे (५६९); करवीर राज्यांतील जंजिरे व गडकोट किल्ले यांच्या बंदोबस्ताबाबत कमांडर वॅटसन यास छत्रपतींच (५७०); नरसिंग आबाजी मुकरे तळीखोर यास पकडण्याबाबत करवीरकर वकीलास पो. एजंट याचे (५७४); पो. एजंट हे गोकाकचा धबधबा पाहून चिकोडीमार्गे जाणार असल्यासंबंधी नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (५७५); इंग्रजी फौजेच्या हालचालीसंबंधी नागोजीराव घाटगे यास व्यंकटराव कृष्ण याचे

## रुमाल क्र. ९४

### पुडके क्र. १—(चालू)

पत्रे (चालू)

(१४५८६); रत्नागिरी येथील यात्रेच्या बहिवाटीसाठी यशवंतराव शेखदार यास पाठविण्या-संबंधी जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर यांचे (५९२); भुजंगराव घोरपडे यांच्या प्रांतास उपद्रव न होण्याबाबत जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर यांचे (५९३); केरी येथील पुरोहित देसाई यांचा मुलगा करवीरी निघून पावल्याबाबतीत चौकशी करण्या-संबंधी रावसाहेब मंत्री यास सकल ब्रह्मवृंद प्रांत गोमांतक यांचे (६४०-६४१); सतीच्या चौकशीबद्दल करवीराहून कारकून, शिपाई, जासूद वगैरे आले त्यांच्या पोटापाण्याच्या खर्चासंबंधी रावजीपंत दादा सुभेदार यास (६४२); महालोजी घाटगे यांच्या तंजावर भेटीसंबंधी रत्नाकर आप्पा यास मानाजी व तातोजी विठोजी मोहिते यांचे (६५६); शंकराजी त्र्यंबक याजकडून पाठवलेली वस्त्रे व पत्रे पोहचल्यासंबंधी संभाजी राजे यास शरीफजी राजे यांचे (६५८).

पत्रे—नवाबाच्या फौजेने सरहद्दीवर उपद्रव सुरू केल्यामुळे तिकडे फौज पाठविण्यासंबंधी व्यंकटप्पा नाईक बहिरी बहाद्दर यांचे (१४५७१-५७२); हळनवडे येथील पो. एजंट यांच्या मुक्कामात गुलाबाची व चाफ्याची फुले पाठविण्यासंबंधी बाळकृष्ण बापूराव यांचे (५७६); कोनाडेकर पाटील यांनी दावा करण्याच्या तक्रारीवर लोकांस सातारा रेसिडेंटकडे पाठविण्यासंबंधी बाळ-कृष्ण बापूराव यांचे (५७७); पो. एजंट याजकडे थैल्या पोचल्या केल्याबाबत (५७८); महालक्ष्मीच्या शारदीय नवरात्राच्या उत्सवास येण्याबद्दलची वर्दी पो. एजंट यांचे कानी घातल्यासंबंधी (५७९), पो. एजंटकडून आलेल्या थैल्या पाठविल्यासंबंधी (५८०); भेटीस येत असल्यासंबंधी (५८१); पो. एजंट यास करवीरी भेटीसाठी बोलावण्यासंबंधी (५८२); पो. एजंट डनलॉप यांच्या गिरोळ येथील मुक्कामाच्या बंदोबस्ताबाबत रामाजी भीमराव यांचे (५८३-५८५); केदारजी मोहिते याने बंदूक मारून घेऊन आत्महत्या केल्या-संबंधी आनंदराव त्र्यंबक व बापूराव वकील यांचे (५८९); कलेक्टर यांच्याशी केलेल्या बोलण्यासंबंधीच्या तपशिलाबाबत (५९०); जागोजागी जमविलेल्या लोकांसंबंधी (अपुरे आहे) (५९१); पो. एजंट याजकडून आलेल्या याद्या पाठविल्या असल्यासंबंधी (५९४); बेळगांवकडील वृत्त जीवराव जाधव यांच्याकडून समजेल यासंबंधी (५९५); व गणपतराव व कृष्णराव यांच्या शोधासंबंधी नारायण रत्नाकर यांचे (५९६); तंजावरकरास दिपवाळीचे कपडे पोहचते केल्यासंबंधी व तिकडील वर्तमानाबाबत गोविंदराव व महादेवराव निवाळकर यांचे (६३३); कोपार्डे येथे सतीच्या चौकशीबद्दल कारकून, शिपाई, जासूद वगैरे आल्यासंबंधी मोरो भिकाजी फाटक यांचे (६५०); तंजावरकडील सृष्टिसौंदर्याबाबत तसेच नरहर त्र्यंबक यास वेळीच पाठविण्याबाबत शिवछत्रपतीस संभाजीराजे यांचे (६५९-६६१).

पत्रके (कोष्टकवजा)—जहागिरदार, सरंजामदार देवस्थाने वगैरेंच्याकडे असलेल्या जमिनी, वतनें, गांवे इ. संबंधी (१४५९७-६१८).

मसुदा—रामशास्त्रीबाबा यांच्या योगक्षेमासाठी गांवे देण्याबाबत तंजावरकरास छत्रपतींनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (१४६३४); सातारचे शाहू राजे व करवीरकर संभाजी राजे यांच्यामधील करारनाम्यांतील लिहावयाच्या कामासंबंधी (६५४).

याद्या—भोसले घराण्याच्या वंशावळीसंबंधी (१४६१९-६२६,६४२-६४३); तंजावरकर भोसले घराण्याच्या वंशावळीसंबंधी (६२७); कळंबेकर पानसे घराण्यांच्या माहिती व वंशावळीसंबंधी (६३६, ६४१); अनूरकर भोसले यांच्या वंशावळीसंबंधी (६३२); पळसवडे, प्रांत शिराळे येथील रात्रीच्या चौकी पहाऱ्यासंबंधी (६४६); रत्नशाळेकडून पुतळ्यांचे हार करण्यासंबंधी (६५३); ताराबाई व शाहू यांच्यामधील लढ्यासंबंधी व प्रतिनिधी घराण्याच्या माहिती विषयी (अपुरी आहे) (६५५).

---

**ज. क्र. ९५, रु. क्र. ९५, पु. क्र. १ का. सं. १४६८९ ते १४७४० (५२).**

**सु. स. १२२५-१२५३ ; इ. स. १८२३-२४ ते १८५१-५२.**

**अर्ज—दत्तक घेण्यास परवानगी मिळण्याबाबत आनंदीबाई देसाई नूलकर हिचा छत्रपतीकडे (१४७३४).**

**टिप्पण—बुवासाहेब छत्रपति यांच्या आप्त इष्टासंबंधीचे (१४६९६).**

## रुमाल क्र. ९५

### पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—**नारायणराव रत्नाकर यांजकडून :** दानोळीस जाऊन केलेल्या खटल्यासंबंधी हणमंतराव निंबाळकर यास (१४७१०); कागद वगैरे साहित्य पाठवून देण्यासंबंधी जीवराव जाधव यास (७१६); नानाराव देसाई व आप्पाजीराव देसाई यांना बेळगांवास पाठविण्यासंबंधी जीवराव जाधव यांना (७१७); हिंदुराव घोरपडे यांच्या घरात झालेल्या उपसर्गाबाबत जीवराव जाधव यास (७२२-७२३); सरभाईची जत्रा, मंगळवार पेठेतील मुलांची चोरी इ. संबंधी जीवराव जाधव यास (७२४-७३२).

**पत्रे**—मनोहरगड येथील गडकऱ्यांनी नामजाद लोकांना खाली घालवून दिल्याबाबत बच्याजी अनंत यांचे, दत्तक घेण्याचा विचार असल्यासंबंधी जीवराव जाधव व रावजी वाकनीस यांना आनंदीबाई देसाई कानूर यांची (१४७३५-७३६).

**पत्रे**—छत्रपतीस : पो. एजंट यांची धारवाडास भेट घेतल्यासंबंधी राघो व्यंकटेश यांचे (१४६८९-६९०); कमिशनर चॅपलिन यांजबरोबर करावयाच्या बोलण्यासंबंधी राघो व्यंकटेश यांचे (६९१); बेळगांवचे आसपास इंग्रजी फौज जमली असून पाच्छापूरच्या बाजूने काही पलटणी गेल्यासंबंधी (६९२); क्षेमसमाचारासंबंधी (६९३); फौजेमुळे करवीरी जाण्या-संबंधी (६९४); व्यंकटराव अर्जुनवाडकर धारवाडास आल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव यांचे (६९५); पो. एजंट यास आडूरकर यांच्या संबंधीचा मजकूर सांगितल्याबाबत पांडुरंग अनंत यांचे (६९७-६९८); आडूरकर भोसले यांच्या ठाण्याकडे फौज पाठविण्याबाबत पांडुरंग अनंत यांचे (६९९-७००); कंपनी सरकारच्या थैल्यांची उत्तरे पाठ-विण्याविषयी बाळकृष्ण बाबूराव यांची (७०१-७०२); पो. एजंट यांच्याशी बोलणी केल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव यांचे (७०३) व आनंदराव त्र्यंबक यांचे (७०४); इंग्रजाकडील थैल्यांची उत्तरे पाठविल्याविषयी (७०५); हुपरी व सामानगड येथे चोऱ्या, दरोडे करणाऱ्या आरोपींना करवीरी पाठवल्याबाबत पांडुरंग अनंत यांचे (७०६); पुण्याकडील फौज कुरुंदवाडच्या आसपास आली आहे याअर्थी आनंदराव त्र्यंबक यांचे (७०७); पो. एजंट निस्बट लष्करासह तासगांवांत मुक्कामाकरिता जाणार असल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक यांचे (७०८); तळंदगे येथे पो. एजंट यांच्याशी अद्याप बोलणे झाले नसल्यासंबंधी आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बाबूराव यांचे (७०९); बेळगांवास पो. एजंट यांची भेट घेणार असल्यासंबंधी नारायणराव रत्नाकर यांचे (७११); सीताराम लक्ष्मण व नरहर जनार्दन गोरे हे नागर मनोळीस जात असल्यासंबंधी (७१२); नागर मनोळीहून निघून कनूरच्या मुक्कामास जाणार असल्यासंबंधी (७१३); बेळगांवाकडील वृत्त जीवराव जाधव हे निवेदन करतील याअर्थी (७१४); पो. एजंट यांच्याशी झालेल्या बोलण्याचा तपशील कळवीत असल्या-संबंधी (७१५); छत्रपती व कर्नल (त्यांचे नांव नाही) यांच्या मुलाखतीबाबत (७१८); आणि भाऊमहाराज, इचलकरंजीकर इ. च्या नुकसानीबाबत नारायणराव रत्नाकर यांचे (७१९–७२१) बेळगांवास केव्हां येणार ते कळविण्याविषयी बाळाजी पारगांवकर यांचे (७३७). सणगे पाठविल्याबाबत नारायणराव हंबीरराव मोहिते यांचे (७४०);

**पावती**—गांवकामगार सरूड यांच्याकडून आपल्या नांवाचा लखोटा आपणास मिळाल्यासंबंधी बापू मैराळ कुलकर्णी यांजकडून (१४७३८); कमाविसदार कोगील यांच्याकडून हक्क मुशाहि-हिऱ्याची रक्कम पोचल्यासंबंधी बापू बाळोजी पाटील यांजकडून (७३९).

---

**ज. क्र. ९५, रू. क्र. ९५, पु. क्र. २, का. सं १४७४१–१४७९२ (५२).**

**सु. स. १२२४ ते १२३६, इ. स. १८२३-२४ ते १८३५-३६.**

**आज्ञापत्रे**—तावडतोब निघून येण्याबाबत खंडोजी नाईक यास राजमंडळाचे (१४७९०).

**पत्रे**—नागाव्याच्या जावसालासंबंधी जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर यांचे (१४७६१); पो. एजंट याच्या हळसवडे येथील मुक्कामाच्या बंदोबस्ताविषयी व क्षेमसमाचारा-संबंधी नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव यांचे (७७२-७७३); मोरोपंत

रुमाल क्र. ९५

पत्रे—(चालू)                    पुडके क्र. २—(चालू)

घोरपडे व आप्पा देसाई हे स्वामी सेवेस तयार असल्यासंबंधी नानासाहेब यास (१४७७४); पट्टनकोडोली येथील सनदी नोकर लोकांसंबंधी आबाजीपंत यास बाळकृष्ण बाबूराव याचे (७७५); पाटणच्या रहदारीच्या दस्तका संबंधी नानासाहेब हवालदार यास (७८१-७८३); बापूजीपंत यास पाठविण्याबाबत, नानासाहेब हवालदार यास (७८५); दिवाण पागेतील दोन घोडी पाठविण्याबाबत नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (७८६); पो. एजंट यांच्याशी होसुर, हेबाळ प्रकरणी बोलणी केल्यासंबंधी, नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (७८९).

पत्रे: छत्रपतीस—पो. एजंट यांची भेट घेत असल्यासंबंधी वकिलांचे (१४७४१); पुणे मुक्कामी कमिशनर यास भेटल्यासंबंधी बच्चाचार्य पंडितराव यांची (७४३–७४४); आज्ञेप्रमाणे कामकाजे पहात असल्यासंबंधी बच्चाचार्य पंडितराव याचे (७४५); विनीवाले याचा पुरुन ठेवलेला ऐवज मिळाला नसल्यासंबंधी पांडुरंग अनंत याचे (७४६-७४७); इंग्रजी फौज विर्डीस आल्यासंबंधी पांडुरंग अनंत याचे (७४८); हुबळी भागांतील इंग्रजी फौजेच्या हालचाली संबंधी पांडुरंग यशवंत याचे (७४९); भेट म्हणून जिन्नस पाठवल्यासंबंधी लखमगौडा देसाई याचे (७५०); भाऊ महाराज वगैरेंच्या नागाव्यासंबंधी मल्हार यशवंत व काशीनाथ संक्राजी यांचे (७५१); नागाव्याच्या ऐवजाच्या वाटाघाटीबाबत (७५२-७५६); बेळगांवकडील मजकूर जीवराव जाधव हे सांगतील या अर्थी (७५७); सीताराम लक्ष्मण व नरहर जनार्दन यांच्या बाबतीत काही गैरप्रकार होणार नाहीत या अर्थी (७५८); आसामी लोक पाठविण्यासंबंधी (७५९); व सांडणीस्वाराबरोबर पाठविलेले जिन्नस पोहचल्यासंबंधी नारायणराव रत्नाकर यांचे (७६०); मुंडलगीकर व गोकाककर यानी कंकणवाडीच्या रानातील पिकें कापून नेल्याबाबत, रामाजी भीमराव याचे (१४७६२); पो. एजंट डनलॉप याच्या बेंगुर्ला येथील मुक्कामासंबंधी (७६३); कडलगे ठाण्यावर कडलगेकर कुलकर्णी याने जमाव करुन गोळागोळी केल्याबाबत (७६४); कंकणवाडी व मुंडलगीचे सिमांतर खटल्यासंबंधी (७६५); चंदूर व पाच्छापुराहून सांडणीस्वार व जासुदाबरोबर मजकूर निवेदन केल्यासंबंधी (७६६); पो. एजंट यास मिठाईचे पेटारे पोहचते केल्यासंबंधी (७६७); आणि भरतगडासंबंधी इंग्रजांशी बोलणी केल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (७६८); पो. एजंट यास कामकाजाच्या थैल्या पोचत्या करुन त्याचे उत्तर पाठविल्यासंबंधी (७६९-७७०); हळसवडे येथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था चांगल्या प्रकारे केल्यासंबंधी, मोरोजी कणसे व बाळकृष्ण बाबूराव याचे (७७१); कामकाजाबाबत बोलणी होत असल्यासंबंधी (कामकाज कसले त्याचा उल्लेख नाही) (७७६-७७७); आजरेकर यानी भुदरगड तनख्यातील धनगरवाड्यावर हल्ला केल्याबाबत (७७८-७७९); कुडचीकर बेरडानी बुदहाळ गाव लुटल्यासंबंधी (७८०); शिराळे येथे कैदेत असलेल्या तळीखोर कोपार्डेकर पाटील व भुदरगड गावकऱ्यांनी धनगर वस्तीवर केलेला हल्ला यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव यांची (७८४); मनोहरगड येथील काही गडकरी हजर झाल्यासंबंधी व शारदीय नवरात्रास येत असल्यासंबंधी रामजी भीमराव यांचे (७८७); पाटणच्या रहदारीचे दस्तक पाठवीत असल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव यांचे (७८८); काडापूर येथे साहेबाचा (पो. एजंट) मुक्काम होणार असल्यासंबंधी मल्हार यशवंत याचे (७९२); काशीराव कोकरे यांच्या समाचारास भिकाजीराव यास पाठवण्याबाबत भाऊ महाराज यांचे (७९१).

---

**ज. नं. ९६, रु. नं. ९६, पुडके नं. १, का. सं. १४७९३-१४८६९ (७७).**

**सु. स. १२१९ ते १२६४, इ. स. १८१८-१९ ते १८६४-६४.**

**आज्ञापत्रे**—मकर संक्रमणाचे तीळ-शर्करायुक्त पोचल्याबाबत नीळकंठराव शिंदे यास आईसाहेब यांचे (१४७९४); कागलच्या रानात मारलेल्या कोडोलीच्या धनगराच्या चौकशीबाबत मोरो चिकटो यास राजमंडळाचे (८२६).

**पत्रे**—पंत राजाज्ञा याच्याकडून येणे असलेल्या रकमेसंबंधी (१४७८५); निरनिराळे गावात पडलेले दरोडे व नागावे यासंबंधी इंग्रजांशी बोलणी कल्याबाबत जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर

दप्तर क्र. ९६

**पत्रे**—(चालू)       पुडके क्र. १—(चालू)

याचे (१४८०४); छत्रपतींच्या पत्रामध्ये सविस्तर मजकूर लिहिल्याबाबत नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (८१२); सामानगडकऱ्यांनी चोरून नेलेली बकरी परत करण्याबाबत नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (८१५); राणीबिदनूर, होनली वगैरे गावी झालेल्या पो. एजंट यांच्या फिरतीबाबत नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (८१६); ठाणे, सालवण येथून घोड्यासाठी चंदी, वैरण इ. देण्याबाबत रंगू दळवई यास दिनकरराव गायकवाड याचे (८३७).

**पत्रे—छत्रपतींकडून :** मकर संक्रमणाचे तीळ-शर्करायुक्त पाठविल्याबाबत पो. एजंट, गव्हर्नर, इ. इंग्रज अधिकाऱ्यांना (१४७९३, ८०५, ८१९, ८२१, ८३६, ८५१).

**पत्रे—छत्रपतीस वच्चाचार्य पंडितराव यांची :** नांदरी, तुळजापूर भेटी बाबतच्या थैल्या पाठवून देणे-विषयी (१४७९६); गितोळे प्रकरणी इंग्रजांशी बोलणे झाल्याबाबत (७९७-७९८); पो. एजंट बेबर करवीरास भेट देणार असल्यासंबंधी (७९९-८००); कंपनी सरकारचे मनोदयाप्रमाणे वर्तणूक करण्याबाबत (८०१); कमिशनरच्या भेटीअंती कामकाजाबद्दल कळवीत असल्यासंबंधी (८०२).

**पत्रे—छत्रपतीस भाऊ महाराज यांची :** गव्हर्नर यांची भेट घेतल्यासंबंधी (१४८२२); तिळगूळ पाठविल्यासंबंधी (८२४-८३२); चि. आप्पा यांचा व्रतबंध समारंभ झाल्याबाबत (८२५); इकडील मजकूर सदाशिव अनंत व खंडोजी नाईक यांजकडून समजेल या अर्थी (८२८); सदाशिव अनंत यांजकडून आलेले पत्र पाठवून दिल्याबाबत (८३०); नाईक-भोसले यांजकडून पाठविलेली पत्रे मिळाल्याबाबत (८३३); क्षेमसमाचारासंबंधी (८३४-८४९); पुणे येथे चोरी करून करवीरीं आलेल्या ज्योती माने याच्या चौकशीसंबंधी (८३८); मसकती डाळिंबे इत्यादी जिन्नस पाठविल्यासंबंधी (८३९); नरसिंहवाडीस व तेथून संकेश्वरास जाण्यासाठी लागणारे सामान पाठवित असल्यासंबंधी (८४०); सुंदराबाई यांच्या प्रकृतीविषयी (८४२); खर्चाची व्यवस्था होण्याबाबत (८४३); पालखीचे सामान खासगीकडे पाठविल्याबाबत (८४४); भरमाजी सिदराम देसाई चिक्कोडीकर यांजविषयीचा मजकूर समजल्याबाबत (८४५); आण्णा महाराज यांच्या लग्नाच्या निमंत्रणाबाबत (८४६-८४७).

**पत्रे—छत्रपतीस रामजी भीमराव यांची :** नरसिंगराव यांच्या लग्नास सदाशिवराव दिवाण ज्योत्याजीराव नाईक, इ. मंडळी आल्यासंबंधी (१४८०८); हरिभट वालवे याच्या सुटकेबाबत (८०९-८११); कंकणवाडी, गोकाक, मुडलगी, शेडबाळ या गावांच्या सीमा तंट्याबाबत (८१३); पो. एजंट डनलॉप यांच्याकडून आलेले लखोटे पाठविल्याबाबत (८१४).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** यात्रेस जाण्यासाठी रहदारीचे दस्तक पाठविल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (१४८०३); धारवाड मुक्कामी रामरावजी यांची भेट घेतल्याबाबत नीळकंठ मनहर याचे (८०६); हिरा मसुरकर नायकिणीच्या वारसा चौकशीबाबत पो. एजंट यांचे (८०७); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठविल्याबाबत (८१७); नेर्लीच्या बागेतील द्राक्षे पाठवल्याबाबत अंताजी विरुपाक्ष याचे (८१८); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठवल्याबाबत तात्या महाराज यांचे (८२३,८२९); मेव्याचे पेटारे पाठविल्याबाबत गौराबाई गायकवाड हिचे (८२७); क्षेम समाचाराबाबत तात्या महाराज यांचे (८३५); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठवल्याबाबत गुरूमहाराज यांचे (८४१); आंबे पाठवल्याबाबत सिद्धेश्वर मठाधिपती यांचे (८४४); मकर संक्रमणाचे तीळ पोचल्याबाबत पो. एजंट, कमिशनर इ. ची (८५२-८६९).

**यादी**—रामकृष्णपंत व मोरो गंगाधर यांच्यामध्ये जमिनी वगैरेबाबत चालू असलेल्या खटल्याबाबत (१४८३१).

---

**ज. क्र. ९७, रु. क्र. ९७, पु. नं. १, का. सं १४८७०–१४९३८ (६९).**

**सु. स. १२१३ ते १२२८, इ. स. १८१२-१३ ते १८२७–२८.**

**कलमबंदी**—भवानी कोठीकडील शेरी वगैरे जमिनींची लावणी करण्यासंबंधी (१४९१६, ९१७).

**पत्रे**— मनोळीकडील केळी व द्राक्षे पाठविल्याबाबत. आईसाहेब यांना मोरो बाजीराव याचे (१४८७१); नारायणराव राजाज्ञा यांच्या नेमणुकीसंबंधी आईसाहेब यांना पो. एजंट यांचे (८७२)

रुमाल क्र. ९७

पुडके क्र. १--(चालू)

**पत्रे--जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर याची** : कागद वगैरे साहित्य पाठविण्यासंबंधी (१४९१८); आप्पाजी देसाई चिंचणीकर यास पाठविण्याविषयी (९१९); नांदणी येथील परागंदा झालेल्या रयत लोकांविषयी (९२०); गिजवणे येथील निपाणकर यांच्या येणे असलेल्या हक्काच्या ऐवजाबाबत (९२१); वाडीच्या वसाप्पा खोत याने केलेल्या फिर्यादीच्या कामाच्या नकला पाठविण्याबाबत (९२२); पुणेहून इंग्रज सेनाधिकाऱ्याने पाठवलेल्या चकती-संबंधी (९२३); रुकडीच्या पागेत असलेली आण्णाजी कुलकर्णी यांची घोडी त्यास परत करण्याबाबत (९२४). कलेक्टर यांच्यासाठी तंबूचे साहित्य पाठविण्यासंबंधी (९२५, ९२६); क्षेमसमाचारासंबंधी (९२७, ९२९); तोरगलकर यांच्याशी करावयाच्या बोलण्याची यादी पाठवण्याबाबत (९२८); गोविंदराव पंडित अमात्य यांच्या मुलीच्या लग्न समारंभास अंबारी हत्ती इ. सामान पाठवल्यासंबंधी (९३१, ९३२); मातोश्री साहेबांच्या प्रकृतीचे वर्तमान वरचेवर कळविण्याविषयी (९३३).

**पत्रे--छत्रपतीकडून** : मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठविल्यासंबंधी एल्फिन्स्टन व चॅपलीन यास (१४८७०,८८८).

**पत्रे--छत्रपतीस पांडुरंग अनंत यांची** : धारवाडकडील वर्तमान कळवीत असल्यासंबंधी (१४८८४, ८८५); आनंदराव आण्णा व बाळकोबा नाना वकील याना धारवाडास पाठवण्याबाबत (८८६, ८८७); नकाशाच्या कामासाठी आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यासंबंधी (८८९-८९२); कुडची भागातील चोरांच्या बंदोबस्ताविषयीं (८९३-८९५); नेर्लीकराकडील कर्जाऊ ऐवजाचा उलगडा करण्यासंबंधी (८९६); बिदी तालुक्याच्या जमाबंदीसाठी पो. एजंट आल्यासंबंधी (८९७-८९९); नीळकंठराव शिंदे यानी बाळोजी भोसले याच्या लुटून नेलेल्या जिंदगीची यादी पाठवल्यासंबंधी (९००-९०१).

**पत्रे--छत्रपतीस इतरांची** : सखारामपंताकडून पुण्याकडील मजकूर समजेल या अर्थी वच्चाचार्य पंडितराव यांचे (१४९०२); कुडचीस चोरांच्या बंदोबस्तासाठी गेलेल्या स्वार वगैरे लोकांनी तेथे दंगा केल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (९०३); पुणे मुक्कामी इंग्रजाशी कामकाजाची बोलणी करीत असल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (९०४-९०७); धारवाडचे कलेक्टर हुबळीस पेठ पहावयास गेल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव याचे (९०८); आंबे पाठविल्याबाबत नारायणराव रत्नाकर याचे (९०९); कामाचा, चंदीचा व भले लोक यांचा खर्चाच्या बंदोबस्ताविषयी मल्हार यशवंत याचे (९१०); शिवराम भट यानी कमतनूर इ. प्रकरणी इंग्रजाकडे नेलेल्या फिर्यादीसंबंधी बाळकृष्ण बाबूराव याचे (९११); बाबा महाराज व भाऊ महाराज यांच्याकडील गावासंबंधीच्या याद्या पाठवण्याबाबत मल्हार यशवंत व काशीनाथ संक्राजी यांचे (९१२); इचलकरंजीकर व पटवर्धन वगैरेंच्या वसुलाच्या रुजुवाती चालू असल्यासंबंधी मल्हार यशवंत व काशीनाथ संक्राजी याचे (९१३); राजाज्ञा यांच्या पत्रावरून सर्व निवेदन होईल या अर्थी महिपतराव गोपाळ याचे (९१४); कलेक्टर याजकडील हत्ती, उंट वगैरे सरंजामाच्या खर्चाची तरतूद कल्यासंबंधी नारायण रत्नाकर याचे (९१५); कामकाजाचे कागदपत्र पोचल्याबाबत महिपतराव गोपाळ याचे (९३०); इंग्रजाकडील जावसालाच्या उलगड्यासंबंधी, नारायणराव रत्नाकर याचे (९३४-९३८).

**याद्या--**नारायणराव पंडित राजाज्ञा व नारायणराव पाटणकर यांच्या समवेत पुण्यास इंग्रजांकडे पाठवलेल्या कागदपत्रासंबंधी (१४८७३-८८३).

---

**ज. क्र. ९७, रु. नं. ९७, पु. नं. २, का. सं. १४९३९-१५००५ (६७)**

**सु. स. १२१३ ते १२७३, इ. स. १८१२-१३ ते १८७२-७३.**

**आज्ञापत्रे--**रद्दकर्जाच्या मोबदला जकातीचा वसूल लावून दिल्याबाबत दादो कृष्ण परांडेकर यास छत्रपतीचे (१४९५९).

**टिप्पण--**पो. एजंट याजकडे पाठवलेल्या कागदपत्रासंबंधी (१४९७४).

**पत्रे--**कलेक्टरसाठी पाठवलेला सरंजाम चिकोडी मुक्कामी पोचल्याबाबत (१४९३९); व क्षेमसमाचारासंबंधी (९४०); आक्कासाहेब यांच्या जावसालाच्या उलगड्यासंबंधी (९४१);

## रुमाल क्र. (९७)

## पुडके क्र. २—(चालू)

समडोळीकर पाटील यास पाठविण्याबाबत, तसेच रावजी वाकनीस यास जामीन घेवून पाठवण्याबाबत (१४९४२-९४३); राज्यांतील सर्व खटल्यांची चौकशी होण्यासंबंधी जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर याचे (९४४-९४५); मकर संक्रमणाच तिळगूळ पाठविल्याबाबत, गव्हर्नर मुंबई यास छत्रपतींचे (९४७, ९७२, ९७३, ९७८); सदलगे मुक्कामी सुभेदार याजकडे लखोटा दिल्यासंबंधी, कृष्णाजी मुकुंद याचे (९५०); क्षेमसमाचारासंबंधी, (९५३); बेळगांव मुक्कामी पो. एजंट यांच्या भेटीस जात असल्यासंबंधी, दिवाणसाहेब याना बुवासाहेब छत्रपती यांचे (९५४); पंत प्रतिनिधी विशाळगडकर यांच्या कामाची गव्हर्नरकडून आलेली थैली पाठविल्याबाबत छत्रपतीस रामाजी भीमराव याचे (९६०); निष्ठापूर्वक तळमळीने छत्रपतींचे काम करीत असल्यासंबंधी (९६२); क्षेमसमाचारासंबंधी (९६३); पो. एजंट डनलॉप यांच्या भेटीसंबंधी (९६४); कोडोली मुक्कामाच्या खर्चाच्या बंदोबस्ताविषयी (९६५); व फिर्यादी लोकांच्या जावसालांच्या उलगड्याविषयी नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (९६६); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठवल्याबाबत, दिनकरराव गायकवाड यास भोजराज सिद्धराज पवार याचे (९६७); देशपांडे यांचे कारकुनाजवळ धोतरजोडी व कागद खरेदीसाठी रुपये दिल्याबाबत, आप्पासाहेब गायकवाड यास नारोजी कदम याचे (९६९); तिळगूळ पोचल्याबाबत, मातोश्री आक्काबाई सेनाखासखेल याना दिनकरराव गायकवाड यांचे (९९७).

पत्रे—**आबासाहेब छत्रपती यांना भाऊ महाराज यांची :** पाठवलेला पोषाख मिळाल्यासंबंधीचे पत्र पोचल्याबाबत (१४९८२); क्षेमसमाचारासंबंधी (९८३, ९८७, ९८८); पूर्वीच्या पत्रांत सविस्तर मजकूर लिहिला असल्यासंबंधी (९८५); ग्रांट साहेबाकडे मेवामिठाई, थैल्या वगैरे जिन्नस पोहचते केल्याबाबत (९९१-१५००५); दसऱ्याकरिता नवीन पोशाख पाठवल्यासंबंधी (९९२); शेटे बंधूंच्या भाऊबंदकीचा तंटा मिटविण्याबाबत (९९४); चॅपलीन वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांशी एक दोन दिवसांत बोलणी करीत असल्यासंबंधी (९९९); हत्ती खरेदीबाबत चौकशी करून कळवीत असल्यासंबंधी (१५०००); वठार गांवाच्या वहिवाटीसंबंधी (००२).

पत्रे—**बुवासाहेब छत्रपती यांना भाऊ महाराज यांची :** वहिनीसाहेबांच्या महायात्रेच्या खर्चाची सोय करण्याबाबत (१४९७७); बळवंतराव चिटणीस यास मजकूर सांगून पाठवल्यासंबंधी (९८१); बाळाजीपंत नातू यांच्या मुलाच्या लग्नासंबंधी (९८६); पागेकडील खर्चाची व्यवस्था होण्याबाबत (९९०); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठवल्याबाबत (९९३); धारवाड येथील खर्चाची व्यवस्था होण्याबाबत (९९६); गव्हर्नर यांच्याशी कामकाजासंबंधी बोलणी झाली नसल्याबाबत (१५००१); अमीरचंद याचे सरकारात असलेले दागिने त्यास परत करण्याबाबत (००३); मेव्याचे पेटारे वगैरे सामान पोंचल्याबाबत (००४).

पत्रे—**छत्रपतींस इतरांची :** रुकडी व माणगांव येथील सीमातंट्याबाबत (१४९४६); मनोहरगडावरील लोकांच्या तंट्याचा बंदोबस्त करण्यासंबंधी, (९४८, ९४९); बेळगांव मुक्कामी पो. एजंट निसबट व छत्रपति यांची भेट होण्याबाबत, (९५१, ९५२); पो. एजंट निसबट हे शहापुराहून धारवाडास जाणार असल्यासंबंधी (९५५); गव्हर्नर व पो. एजंट यांच्याशी दोस्ती वृद्धिंगत होण्याबाबत रामाजी भीमराव याचे (९५८); माधवराव बापू यास देवाज्ञा झाल्यासंबंधी, बुवासाहेब छत्रपतिस वहिणाबाई यांचे (९५६); द्राक्षे पाठविल्याबाबत अंताजी विरूपाक्ष याचे (९५७); मिठाईचे पेटारे पोचल्याबाबत पो. एजंट यांचे (९६१); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठवल्याबाबत बाबासाहेब व चिमासाहेब छत्रपतीस गुरू महाराज यांचे (९६८-९८९); सामानगडाकडील वेहड्याच्या याद्या कारकुनासोबत पाठविल्यासंबंधी महादजी व नारायण ज्योती यांचेकडून (९७०); द्राक्षे पाठविल्याबाबत रुद्रो नागनाथ याचे (९७१); मेवा मिठाईचे पेटारे पोहचल्याबाबत, कमिशनर याचे (९७५); दिवाळीच्या सणास आपल्याकडे येण्यासंबंधी (९७९); व क्षेमसमाचारासंबंधी आबासाहेब व बुवासाहेब छत्रपतीस भाऊ महाराज, यांचे (९८०); वरचेवर पत्र पाठविण्याविषयीं बाबासाहेब व चिमासाहेब छत्रपतीस गुरू महाराज यांचे (९८४); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठविल्याबाबत मानाजीराव जगताप याचे (९९५); चांगल्या घोड्याचा शोध करून पाठवीत असल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (९९८).

यादी—राणी ताराबाई व सॅमसन यांच्या भेटीसंबंधी (१४९७६).

**ज. क्र. ९८, रु. क्र. ९८, पु. क्र. १. का. सं. १५००६–१५०६४ (५९).**

**सु. स. १२२३ ते १२३७ ; इ. स. १८२१-२२ ते १८३६-३७.**

**कलमबंदी**—बापू महाराज, चिंचलीकर देसाई, लिंगनूरकर पाटील इ. बाबतच्या जावसालाविषयी (१५०३२, ०३३) तसेच जमेनिसीकडील कारकुनांच्या नेमणुका, कोल्हापूर येथील पटकीची साथ, निपाणीकरांच्या जमिनीतील चोरून नेलेला कडबा इ. संबंधी जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर याचे (०३४-०३५).

**पत्रे**—क्षेमसमाचारासंबंधी बाळाजी नारायण यास छत्रपतीकडून (अपूर्ण व अस्पष्ट) (१५००६); सदाशिवपंत भाऊ यांच्या कर्जफेडीसंबंधी नारोपंत नाना यांना भरमापा सिदराम याचे (००७); पुणे येथील इंग्रज अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार वागण्याबाबत महिपतराव पारसनीस यास लाला मुनसी याचे (००८); भाऊ महाराज, यांचेकडील समाचारासंबंधी नारायणराव सरलष्कर यास रामजी गोविंद मु. पुणे याचे (०२७, ०२८, ०४२); कंकणवाडीची जमाबंदी, वळीवडे येथील कैद्यांची सुटका इ. बाबत (०२९-०३१); व्यंकाजी तिमाजी कुलकर्णी याची तट्टाणी शिगरु त्यास परत करण्याबाबत (०३६); कलेक्टरचा मुक्काम परगावी होणार असल्याने त्यासाठी उंट, घोडी, भोई वगैरे सरंजाम पाठवण्याबाबत (०३७); तोरगलकडील कागदपत्र पाठविण्यासंबंधी (०३८); यळगूड गावाकडून तोफखान्याबाबतचा ऐवज दिला असल्यासंबंधी, (०४१); चैत्र वद्य अष्टमीच्या उत्सवाबाबत, पट्टणकुडी गडहिंग्लज या गावावर झालेल्या रोख्यास मनाई करण्याबाबत (०४४); क्षेमसमाचारासंबंधी नारायणराव रत्नाकर याचे जीवराव जाधव यास (०४८); आप्पा देसाई चिंचलीकर हे धारवाड येथे तापाने आजारी असल्यासंबंधी नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव याचे (०५८); बापूजी नारायण कुलकर्णी याच्या घरावर दरवडा पडल्याबाबत सातारकर छत्रपतीस (०५९).

**पत्रे—छत्रपतींस :** हवे असलेले कागदपत्र पाठविल्यासंबंधी वकिलाचे (१५००९); चिकोडीकर सराफ व चिंचणीकर कारकून यांना पाठवण्यासंबंधी (०१०, ०११); आकिवाटकर गिऱ्या आरोपीस इंग्रजांच्या स्वाधीन केल्याबाबत (०१२); छत्रपतीच्या जेजुरीच्या स्वारीबाबत, तसेच गव्हर्नर यांच्या बेळगावी होणाऱ्या मुक्कामासंबंधी पांडुरंग अनंत याचे (०१३, ०१४); रांगणा तनख्याच्या मोबदला द्यावयाची गावे, करंवळी येथील दुतर्फा अम्मल इ. संबंधी नीळकंठ मल्हार याचे (०१५-०१८) ; भाऊ महाराज, तोरगलकर इ. संबंधी पो. एजंट यांच्याशी केलेल्या वाटाघाटीबाबत नीळकंठ मल्हार याचे (०१९-०२१); भाऊ महाराज यांच्या नागाव्याबाबत (०२२); तसेच मल्हार लक्ष्मण वठारकर याच्या घराच्या नागाव्याची नुकसान भरपाई करून देण्याबाबत (०२३, ०२४); पो. एजंट निसबट हे इचलकरंजीकर, पटवर्धन इ. संबंधी रुजुवातीची कामे पाहू लागल्यासंबंधी मल्हार यशवंत व काशीनाथ शिवाजी याचे (०२६); आपल्याकडील मजकूर जीवराव जाधव निवेदन करतील या अर्थी (०३९); गिजवणे येथील तळीखोर लोकास पकडून पाठविण्याबाबत (०४०); सर कलेक्टर यास दिलेले डेऱ्याचे सामान, महामारीच्या शांतीसाठी अनुष्ठान इ. बाबत (०४३); राज्यावर कसाला पडल्यामुळे सरंजामदारांकडून एक सालाचा ऐवज घेण्याबाबत (०४५-०४७); इचलकरंजीकरासंबंधीचे जावसाल व चोरी दरोडे इ. बाबत इंग्रजांशी केलेल्या वाटाघाटी बाबत नारायणराव रत्नाकर (०४९-०५१); मकर संक्रमणाचे तिळगूळ पोचल्याबाबत पो. एजंट इ. इंग्रज अधिकाऱ्याची (०५२-०५७); खर्चाचा बंदोबस्त करण्याविषयी (०६०); व पुणे येथे सावकाराकडे गहाण ठेवलेले सरकारी दागिने सोडवून घण्याबाबत, भाऊ महाराज याचे (०६१-०६३).

**याद्या**—छत्रपती व पो. एजंट निसबट यांच्या भेटीसंबंधी (१५०२५); हत्ती, पालखी वगैरे सरंजामासह नारायणराव राजाज्ञा यांची रवानगी पुण्यास केल्याबद्दल (०६४).

---

**ज. क्र. ९८, रु. क्र. ९८, पु. क्र. २, का. सं. १५०६५–१५१२४ (६०).**

**सु. स. १२२३ ते १२३७, इ. स. १८२२–२३ ते १८३६–३७.**

**पत्रे**—खर्चाची व्यवस्था करण्यासंबंधी कृष्णराव गर्दे यास पांडुरंग अनंत याचे (१५०७४); पो. एजंटकडे पाठविण्याची थैली पत्रे मिळाल्याबाबत (१२०); व छत्रपतींनी दिलेले महावस्त्र व प्रसाद पोचल्यासंबंधी नानासाहेब हवालदार यास बाळकृष्ण बाबूराव यांचे (१२२).

**रुमाल क्र. ९८**

**पुडके क्र २—(चालू)**

**पत्रे—जीवराव जाधव यास नारायणराव रत्नाकर याची :** छत्रपतींच्या आज्ञेत राहूं अशा अर्थी (१५०९४); भाऊ महाराज यांच्या यादीचे उत्तर पाठवून देण्याविषयीं (०९५); आत्तारी सामान मिळाल्यासंबंधी (०९९); राहिलेली सणगे पाठविण्यासंबंधी (१००); चिकोडी येथील पाटील कुलकर्णी यांच्या जावसालासंबंधी (१०२); गहाण टाकलला सरकारी देव्हारा सोडवून घेण्याबावत (१०३); चिचलीकराकडील जावसाल उलगडला नसल्यासंबंधी (१०४); मुंबईहून छत्रपतींच्या थैलीचे आलेले उत्तर व्यंकाजीपंत याजबरोबर पाठवले असल्यासंबंधी (१०५); छत्रपतींच्या भेटीस येत असल्याबावत (१०६); कांही गावांतील मारल्या गेलेल्या माणसांच्या चौकशीसंबंधी (१०७); गिझवणे येथील परागंदा झालेल्या लोकासंबंधी (१०८); करवीरहून पाठवलेल्या असामी लोकांबावत (१०९); रुमडोलीकर पाटील यास सत्वर पाठविण्याबावत (११०, १११); वाडी रत्नागिरी येथील यात्रेच्या वहिवाटीस देवजी जाधव व रामाजीपंत यांना पाठविल्यासंबंधी (११२-११५); शिवसिंग यांजकडील मोत्यांच्या चोरीची चौकशी लवकर संपविण्याविषयी (११६); छत्रपतींच्या प्रकृतीचे वर्तमान वरचेवर कळवण्याबावत (११८-११९).

**पत्रे—छत्रपतीस पांडुरंग अनंत यांची :** पो. एजंट हे संवदतीस जाणार असल्यासंबंधी (१५०६७); मिरजेस होणाऱ्या छत्रपतींच्या भेटीसंबंधी (०७३); पो. एजंट हे जमावंदीच्या कामासाठी नवलगुंदास जाणार असल्याबावत (०७५-०७६), छत्रपतींच्या फौजेकडून इचलकरंजीकर व निपाणकर यांना उपद्रव होऊ नये या अर्थी (०७७); कितूर तालुक्याच्या जमावंदीसाठी पो. एजंट वेटगिरीस आल्यासंबंधी (०७८); चिकोडी व मनोळी तालुक्यांतील दुमालदारांस उपद्रव न होण्याबावत (०७९-०८०); नणंदीकर यांच्यावरील चैत्र वद्य अष्टमीच्या उत्सवाबावतच्या रोख्यासंबंधी (०८१); भाऊ चाफेकराकडून आलेली जवावाची यादी पाठविल्यासंबंधी (०८२); शिरगूरकर व कितूरकर यांच्या खटल्यासंबंधी (०८३-०८५); हुबळी येथील पो. एजंट यांच्या मुक्कामाविषयीं (०८८-०९०).

दुमालदारांस उपद्रव न होण्याविषयी (०६८-०६९);

**पत्रे—छत्रपतीस वकिलांची :** कमिशनर यांच्यावरोवर धारवाडास जात असल्याबावत (१५०६६); अखवारनवीस यांचे पत्र पाठविले असल्यासंबंधी (०७०); निपाणकरानी ठेवलेल्या फौजेबावत (०७१-०७२); यात्रेस जाण्यास रहदारीची परवानगी मिळण्याबावत, पो. एजंट यांच्याशी बोलणीं केल्यासंबंधी (०८६-०८७); पो. एजंट यांना भेटून सविस्तर कळवीत असल्यासंबंधी (१२१).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** भाऊ महाराजाकडील गांवाना उपद्रव न करण्याबावत कमिशनर यांचे (१५०६५); लाट व रांगोळी येथील नागाव्यासंबंधी मल्हार यशवंत व काशीनाथ शिवाजी यांचे (०९१); खर्चाची व्यवस्था सत्वर व्हावी या अर्थी (०९२); व करवीराहून पन्हाळ्यास कामदार लोक पाठवण्याबावत मल्हार यशवंत याचे (०९३); नांदणी येथील रयतेचे बोलणे समजावून घेण्यासाठीं आपाजीराव शिर्के यास पाठवण्याविषयीं नारायणराव रत्नाकर यांचे (०९६); क्षेमसमाचारासंबंधी (०९७); पो. एजंट व कलेक्टर यांच्या फिरतीकरितां भोई, उंट इत्यादि सरंजाम रवाना करण्यासंबंधी (०९८); सिरडी बाग संबंधी नणंदीकर यांच्या जावसालाविषयी (१०१); कलेक्टरचा मुक्काम करवीरास होणार असल्याबावत नारायणराव रत्नाकर यांचे (११७); कमिशनर यानी केलेल्या चौकशीत आपण निर्दोषी ठरलो या अर्थी रामाजी भीमराव यांचे (१२३-१२४).

---

**ज. क्र. ९९, रु. क्र. ९९, पु. क्र. १, का. नं. १५१२५ ते १५१९५ (७१).**

**सु. स. १२०० ते १२२८, इ. स. १७००–१८०० ते १८२७–२८.**

**आज्ञापत्रे—**नागोजीराव घाटगे हे सविस्तर मजकूर लिहितील या अर्थी आप्पूराव रामराव यास छत्रपतींचे (१५१२५); बाबूराव घाटे यास हुजूर भेटीस येण्याबावत राजमंडळाचे (१५९); रहमान आगा याच्या मिरज येथील बारा इमाम पिरांच्या वतनदारीबावतच्या हक्कासंबंधी माधवराव गंगाधर यास शंभु छत्रपतींचे (१६१).

रुमाल क्र. ९९

पुडके क्र. १—(चालू)

**जाहीरनामा**—बाजीराव पेशवे यांच्या मदतीसाठी मराठी मुलुखात येणाऱ्या इंग्रजी फौजेस मामलेदार, ठाणेदार, किल्लेदार इ. नीं अन्न, घासदाणा इ. देण्याची व्यवस्था करण्यासंबंधी गव्हर्नर जनरल वेलस्ली याचा (१५१३९-१४५).

**पत्रे**—फौजेसह सामानगडास जात असल्यासंबंधी कर्नल वेलस्ली यास रत्नाकर पंत राजाज्ञा यांचे (१५१२८); धारवाड तालुक्यातील दोन ठाणी घेऊन इंग्रज फौजेस अडथळा केल्याबाबत संभाजीराव शिंदे तोरगलकर यास वेलस्ली याचे (१२९); क्षमसमाचारासंबंधी हैबतराव गायकवाड यास वेलस्ली याचे (१३५); क्षेमसमाचारासंबंधी पीर महमद यास उदाजीराव घाटगे याचे (१५५); करवीरकरांची कामे चांगल्या प्रकारे होत असल्याबद्दल उदाजीराव घाटगे यास पो. एजंट याचे (१६०); पाठविलले जिन्नस पोचल्याबाबत; राणीसाहेब (सुंदराबाई) यांना थॉमस मन्रो याचे (१७१); भाऊ महाराज करवीरी जावयास निघाले असल्याबाबत राणीसाहेब याना एल्‌फिन्स्टन याचे (१७२); छत्रपतीकडील कागदपत्र-पाठविण्यासंबंधी भाऊबाबा यास ग्रांट याचे (१८८); आबासाहेब सिंहासनारूढ झाले त्यानिमित्त वस्त्रे व जवाहिर पाठविल्याबाबत चॅपलीन कमिशनर यास सुंदराबाई यांचे (१९०).

**पत्रे—छत्रपतीकडून एल्‌फिन्स्टन यास:** अटकेत असलेल्या नरहर देशपांडे याच्या मुलाची तो आजारी असल्याने सुटका करण्याविषयी (१५१५१); आपली कामकाजे सत्वर उलगडून देण्याबाबत (१५२); दोस्तीची वृद्धी होण्याबाबत (१७३); जोतीबास गेलेल्या अमृतराव पंडित यांच्याकडील कारकून इ. लोकांच्या शोधासंबंधी (१७४); सरंजाम पाठविला असल्या-संबंधी (१८४).

**पत्रे—छत्रपतीकडून ग्रांट यास:** पारगाव येथील वाण्याच्या घरावर पडलेल्या दरोड्यासंबंधी (१५१८२, १९३); बोलणी करण्यासाठी चिमणाजी सखदेव यास पाठविल्यासंबंधी (१८५-१८६); मरियम ख्रिस्ती याच्या चोरीसंबंधी (१८७); पाच असामीना पाठविल्यासंबंधी (१८९); वारणेपलीकडे वसूल न करण्यासंबंधी ताकीद दिल्याबाबत (१९१); चोरीच्या नावनिसीची यादी पोहोचल्यासंबंधी (१९२).

**पत्रे—छत्रपतीकडून वेलस्ली यास:** पुणेहून पाटण्यास जाताना भेट देण्याबाबतचे (१५१२६); आजरेकर व नेरलीकर हे करवीर प्रांतात उपसर्ग करतात त्यांच्या बंदोबस्ताविषयी (१२७); करवीरच्या सरहद्दीस आलेल्या इंग्रजी फौजेसंबंधी (१३०); बाजीराव पंडित प्रधान यांच्या मिरज येथील मुक्कामासंबंधी (१३१); कंपनी सरकारच्या फौजेस उपसर्ग न होण्याची व्यवस्था केल्याबाबत (१४७); पूर्वीप्रमाणेच करवीरकर व कंपनी सरकार यांची दोस्ती चालवावी या अर्थी (१४८-१४९).

**पत्रे—छत्रपतीकडून इतरांना:** क्षेमसमाचारासंबंधी जनरल स्टुअर्ट यास (१५१३२); केकले येथे आजारी माणसांच्या राहण्याची सोय केली असल्यासंबंधी डॉ. स्कॉट यांना (१४६); नारो गिरमाजी यास बोलणी करण्याकरिता पाठविले असल्याबाबत कंपनी सरकारास (१५३); उदाजीराव घाटगे यास कामामुळे ठेवून घेतले असल्याबाबत पो. एजंट याना (१५७); तिळगूळ पाठविल्याबाबत, पो. ए. याना (१६२); तिळगूळ पाठवल्याबाबत बॉस्टीन यास (१६३); सिंधुदुर्ग येथील शिवसागर देवस्थानास मोईनी खर्च व दरसालच्या उत्सवाकरिता असलेले इनाम चालवण्याबाबत रेसीडेंट सिंधुदुर्ग यांस (१६५); एल्‌फिन्स्टन यांचा लखोटा पोचल्याबाबत थॉमस मनरो यास (१७६).

**पत्रे—छत्रपतीस एल्‌फिन्स्टन यांची:** तिळगूळ पोचल्यासंबंधी (१५१६६); अमृतराव याजकडील करवीरी आलेल्या कारकून वगैरे लोकांचा शोध करण्याबाबत (१६८); मोरो बाजीराव चिटणीस याने इंग्रजाकडील छत्रपतींची कामकाजे करण्याविषयी (१६९-१७०); बत्तीस शिराळे वगैरे ठिकाणच्या बंडाच्या बंदोबस्तासाठी कंपनी सरकारची कुमक पाठविल्या-बाबत (१७८); घोडा, बैल व म्हैस येऊन पोचल्यासंबंधी (१८०).

रुमाल क्र. ९९

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—छत्रपतीस ग्रांट यांची :** करवीर सरकारकडील सरंजामदारांच्या कैफियती पाठविण्यासंबंधी (१५१७९); करवीर येथे दरोडा घातलेल्या मांगाना पाठविले असल्यासंबंधी (१८३); मांगले हा गाव पंडितराव यास इनाम असल्यासंबंधी (१९४); तुळजापुरास निघण्यापूर्वी लिहून कळविण्यासंबंधी (१९५).

**पत्रे—छत्रपतीस वेलस्ली यांची :** कुरुंदवाडच्या मुलुखास उपद्रव न होण्यासंबंधी (१५१३३, १३६, १३७); इचलकरंजीकर नारायणराव व्यंकटेश यांच्या लष्करास व मुलुखास उपद्रव न करण्याबाबत (१३४); तोरगलकर यांच्या पत्राची नक्कल पाठविल्याबाबत (१३८); दाजी नारायण यास मजकूर सांगून पाठवीत असल्याबाबत (१५०).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** उदाजीराव घाटगे यांना तूर्त पाठवू नये या अर्थी विल्यम डौस याचे (१५१५४); तिळगूळ पोचल्याबाबत (१५६); व कंपनी सरकारशी दोस्ती वृद्धिंगत करण्याविषयी रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (१५८); इनायतनामा व मिठाई पोहोचल्याबाबत कर्नल विल्यम डौस याचे (१६४); बापू रामोशी या बंडवाल्यास करवीरास आश्रय न देण्याबाबत पो. एजंट यांचे (१६७); भाऊ महाराज याना पाठवून देण्याबाबत थॉमस मन्रो याचे (१७७).

**याद्या—**छत्रपतीनी शिरोळ मुक्कामी पाठविलेले दागिने, वस्त्रे इ.संबंधी (१५१७५); निडगुंदी व सारापूर येथील चोरीस गेलेल्या करवीरकरांच्या म्हशीबाबत शेडबाळकर यांच्या वकिलास पो. एजंट यांचेकडून (१५१८१).

---

**ज. क्र. ९९, रु. क्र. ९९, पु. क्र. २, का. सं. १५१९६ – १५२६५ (७०).**

**सु. स. १२००-२८ इ. स. १७९९-१८०० ते १८२७-२८.**

**इनायतनामा—**चिकोडी, मनोळी तालुक्यांतील गावांच्या सोडचिठ्याबाबत गव्हर्नर जनरल वेलस्ली यास छत्रपतींचेकडून (१५२४५).

**जबाब—**फातिमा या स्त्रीच्या दागिन्यांचा अपहार केल्याबाबत व पारसी गृहस्थाचा घोडा चोरल्याबाबत शेख हुसेन बुडन याचा (१५२१६-२१७).

**पत्रे—**सदाशिव अनंत यास बोलणी करण्यासाठी पाठविल्याबाबत ग्रांट यास भाऊ महाराज यांचे (१५२००); आबासाहेब छत्रपतींच्या राज्यारोहण समारंभास येण्यासंबंधी चॅपलीन यास सुंदराबाई यांचे (२१३); धोंडजी वाघ यास आश्रय दिला नसल्यासंबंधी कर्नल वेलस्ली यास बापू याचे (२२५, २२६); बाळाजी जनार्दन व पटवर्धन यांच्याकडून होणाऱ्या उपसर्गाबाबत ऑर्थर वेलस्ली यास छत्रपतींचे (२२७); कंपनी सरकारशी दोस्ती ठेवण्यासंबंधी गव्हर्नर, मुंबई यास सुबराव पंडित अमात्य याचे (२२९); करवीरकराशी दोस्ती राखण्यासंबंधी (२४३); व सुबराव घाटगे याजबरोबर पाठविलेले पत्र छत्रपतीना सादर केल्याबाबत गव्हर्नर जनरल वेलस्ली यास हैबतराव गायकवाड याचे (२४४); कंपनी सरकारशी दोस्ती पूर्वीप्रमाणे चालवावी या अर्थी करवीरकरास जॉन मॉस्टीन याचे (२४७); छत्रपतींची कामकाजें सत्वर होण्याबद्दल, एलफिन्स्टन यास भाऊ महाराज याचे (२४९); पूर्ववत दोस्ती राखण्यासंबंधी गव्हर्नर, मुंबई यास करवीरकरांचे (२५२); तिळगूळ पाठविल्यासंबंधी गव्हर्नर जनरल डंकन व कर्नल क्लार्क याना (२५३); बाळाजीपंत यास रवाना केले असल्याबाबत कर्नल क्लार्क यास (२५५); व कोल्हा-पुरास

रुमाल क्र. ९९



पुडके क्र. २—(चालू)

केव्हा भेट देणार ते कळविण्यासंबंधी कर्नल क्लोज यास नागोजीराव घाटगे याचे (२५६); विरुपाक्ष व नागोजीपंत नेर्लीकर यांनी करवीर राज्यांतील गावें लुटल्यासंबंधी गव्हर्नर जनरल वेलस्ली यास शामय्या निा मि. क्लार्क याचे (२५९); सांगली येथे येणाऱ्या आपल्या लोकांस गळदगेकरांनी अडवून ठेवल्यासंबंधी पो. एजंट वेवर यास सिधोजीराव निंबाळकर यांचे (२६१-२६४); फौज वगैरे नेऊन कितूर तालुक्यांस उपसर्ग न करण्याबाबत रत्नाकर पंडित इत्यादीस कंपनी सरकारचे (२६५).

**पत्रे—छत्रपतींकडून कर्नल क्लोज यांस** : तहाच्या व जावसालाच्या याद्या वगैरे कागदपत्र पाठविल्याबाबत (१५२३०); हरी बल्लाळ केळेकर यास कैद करण्याबाबत (२३१); परशुराम पंडित यांच्या घरीं निर्माण झालेल्या खटल्याबाबत (२३२); क्षेमसमाचारासंबंधी (२३५, २४१, २५७); बाळाजीपंत व मोरोपंत यांच्यामार्फत इनायतनामा पाठविल्यासंबंधी (२४२); मोरोपंत यास सविस्तर मजकूर सांगून पाठविल्याबाबत (२४६); निपाणीकरास करवीरच्या गावांना उपसर्ग न करण्यास ताकीद होण्यासंबंधी (२५१); कामकाजाविषयी सुबराव घाटगे याना पाठवले असल्यासंबंधी (२५४).

**पत्रे—छत्रपतीकडून कर्नल वेलस्ली यास** : सविस्तर मजकूर निवेदन करण्यासाठी नागोजीराव घाटगे यास पाठविल्याबाबत (१५२२२); करवीर हद्दीत दंगे-धोपे करणाऱ्या घोंडजी वाघाचा बंदोबस्त करण्यासंबंधी (२२३); वस्त्रे वगैरे देऊन संताजीराव मोहिते यास पाठवले असल्यासंबंधी (२२४); सामानगड व कागल येथे पाठवलेल्या फौजेसंबंधी (२५८).

**पत्रे—छत्रपतीकडून इतरांना** : करवीरी होणार असलेल्या समारंभ कार्याची माहिती देण्यासाठी भाऊ महाराज यांना पाठविले असल्यासंबंधी चॅपलिन याना (१५२०१); वारणाकाठी असलेल्या करवीर व सातारा हद्दीतील मळी जमीनीत शेवरी, कंज्याळ इ. लावण्यासंबंधी, नारायणराव यादव याच्या वहिणीच्या लग्नासंबंधी व रहदारीच्या परवान्यासंबंधी ग्रॅंट यांना (२०३, २०४, २०५); भेट म्हणून पाठविलेले जवाहिर, पोषाख इ. वस्तु पोहचल्यासंबंधी व भाऊ महाराजाकडून मजकूर समजल्यासंबंधी एल्फिन्स्टन याना (२१०-२१२); किल्ले प्रसिद्धगड, सोनगड वगैरे तालुक्याचे जावसाल उलगडण्यासाठी कमिशनर चॅपलिन यास (२१४); चोरीस गेलेल्या कपडयांच्या पेटयाबाबत माहिती पाठवण्यासंबंधी मि. मॅलोट यास (२१९); चिकोडी, मनोळी भागात निपाणीकर व कागलकर करीत असलेल्या गैरवर्तणुकीविषयी कर्नल क्लोज यास (२२०-२२१); कंपनी सरकारच्या फौजाना उपसर्ग न करण्याची व्यवस्था केल्याबाबत कर्नल क्लार्क यास (२३६); पटवर्धनानी मनोळी तालुक्यातील घेतलेल्या ठाण्यांची मोकळीक करण्यासंबंधी गव्हर्नर वेलस्ली यास (२३७); करवीरी भेट देण्यासंबंधी जोनॅथन डंकन यास (२३८-२३९); कामकाजाकरिता नागोजीराव घाटगे यास पाठवल्याबाबत गव्हर्नर, मुंबई यास (२४८); सविस्तर मजकूर सांगून मोरो महादेव व व्यंकटराव कृष्ण यास पाठवल्याबाबत जोसेफ युटाफ यास (२५०).

**पत्रे—छत्रपतीस ग्रॅंट यांची** : उदगीर येथील बंडवाल्यांच्या बंदोबस्तासाठी (१५१९७); चोरांच्या बंदोबस्तासाठी व त्यांची माहिती कळवण्याविषयी (१९८-१९९); घोडनाक मांगाच्या अपराधाची चौकशी करण्याविषयी (२०६); नारायणराव यादव यांची मुलगी बाळोजी मोरे यास देण्याबाबतच्या करारासंबंधी (२०७); नरसाप्पा सराफ यांस चोरांनी लुबाडले त्याची चौकशी होण्यासंबंधी (२०८); करवीर इलाख्यात दरोडा घातलेल्या आरोपीस करवीरी पाठविल्यासंबंधी (२०९); खानापूर पेट्यातील चोरासंबंधी (२१५).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** कोंकणातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी कलेक्टर दक्षिण प्रांत कोंकण यांचे (१५१९६); वकिलामार्फत पाठविलेली सणगे पोचल्यासंबंधी कॅप्टन एचीसन याचे (२१८); इमदाद अल्ली मुनशी यास नोकरीस ठेवून घेण्याबाबत एल्फिन्स्टन याचे (२४०).

**मसुदे**—पाठवलेली थैली पोचल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास छत्रपतीनी पाठवावयाच्या पत्रासंबंधी (१५२२८); बंडाच्या पारिपत्यास जाणाऱ्या इंग्रजी फलटणीस करवीर हद्दीतून जाऊ देण्यासंबंधी विल्यम क्लार्क यास छत्रपतीनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (२३३); शाम भटजी यास मुंबईहून पुण्यास पाठविल्याबाबत कर्नल विल्यम यास बापू यानी लिहावयाच्या पत्रासंबंधी (२३४); दिनकर आप्पाजी यास कामकाजासाठी पाठवले असल्याबाबत छत्रपतीनी कर्नल क्लोज यास लिहावयाच्या आज्ञापत्रासंबंधी (२६०).

**थाद्या**—कमिशनर चॅपलिन व मि. मन्रो याना पाठविलेली वस्त्रे व जवाहीर यासंबंधी (१५२०२); एल्फिन्स्टन यानी छत्रपतीस पाठविलेली वस्त्रे, जवाहीर इ. संबंधी (२११).

---

**ज. क्र. १००, रु. क्र. १००, पु. क्र. १, का. सं. १५२६६ ते १५३३१ (६६).**

**सु. स. १२०० ते १२२१, इ. स. १७९९–१८००ते १८२०–२१**

**आज्ञापत्र**—युटॉफ याचे पत्र येताच फौजेची रवानगी करण्याबाबत अप्पुराव रामराव यास छत्रपतींचे (१५२६८); वेलस्ली याजकडील वर्तमान वरचेवर कळविण्याविषयी अप्पुराव रामराव यास (२६९-२७०).

**पत्रे**—क्षेमसमाचारासंबंधी नागोजीराव घाटगे यास अप्पुराव याचे (१५२६६); मोरोपंत भेटीस येत असल्यासंबंधी नागोजीराव घाटगे यास व्यंकटराव कृष्ण याचे (२६७); कर्नल स्टिव्हनसनची तुकडी मलकापुराहून विरा राज्यात जाणार म्हणून वेलस्लीचे लष्कर पैनगंगेच्या तिरावर असल्यासंबंधी नारायणराव पाटणकर यास मि. किटली कमांडर ठाणे घोडगिरी याचे (२७१); छत्रपतीना पाठवलेल्या पत्राची नक्कल माहितीकरिता पाठविल्याबाबत हैबतराव गायकवाड यास वेलस्ली याचे (२७२); बेळगाव येथे लष्करात पडलेल्या दरोड्याच्या तपासाबाबत कलेक्टर, धारवाड याचे करवीर राज्यातील मामलेदार, ठाणेदार जहागिरदार वगैरेना (२७८); कृष्णेच्या तहाच्या नकला पाठविल्याबाबत तसेच चिकोडी मनोळीच्या ताकिदी प्रधानपंत याजकडून छत्रपतीकडे पाठवून देण्याबाबत गव्हर्नर जनरल यास विश्वासराव गायकवाड याचे (३०३); छत्रपतींना इंग्रजाना करावयाच्या कुमकेविषयी बापूसाहेब यास मोरो महादेव याचे (३२१); बाळाजीपंत यानी कर्नल वेलस्ली याची भेट घेतल्याविषयी नागोजीराव घाटगे यास लिंगो भगवंत याचे (३२२); कंपनी सरकारशी दोस्ती राहावी या अर्थी नागोजीराव घाटगे यास कर्नल वेलस्ली याचे (३२३).

**पत्रे—सुंदराबाई राणीसाहेब यांची :** आबासाहेब छत्रपतीना पुत्र झाल्याबद्दल शर्करा पाठविल्याविषयी ग्रॅंट याना (१५२७९); कमिशनर चॅपलीन यास (२८५); रॉबर्टसन यास (३२९); अंबिकाबाई याना ऋतुप्राप्ती झाल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास (२८४); दिनकरराव गायकवाड यास पाठविल्याबाबत एल्फिन्स्टन यास (२९५); आबासाहेब छत्रपति यांच्या राज्यारोहण समारंभाच्या वेळी जवाहीर, सणगे वगैरे पाठवलेले जिन्नस पोचल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास (२९६-२९७); कमिशनर चॅपलिन यास (३०१).

रुमाल क्र. १००

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—छत्रपतींकडून एलफिन्स्टन यास** : कंपनी सरकारच्या दोस्तीबाबत बोलणी करण्यासाठी नारो गिरमाजी व शिवराम बापू याना पाठविल्याबाबत (१५२७७); मोरो बाजीराव चिटणीस व बापू शिवराम यांना कामकाजाची माहिती देऊन पाठवल्याबाबत (२८१); कामकाजे उलगडून दोस्ती वाढवावी या अर्थी (२८३); गोव्यातील इंग्रज वकील मि. कोटलेर यास सर्व मजकूर सांगितला असल्यासंबंधी (३०८); सविस्तर मजकूर सांगून आनंदराव यास पाठवल्याबाबत (३१५); त्रिंबक आबजी याजबरोबर कामकाजे पाठविल्याबाबत (३१७); निपाणकरानी करवीरनजीक तोफेची मारामारी केल्याबाबत (३१८); भाऊ महाराज याना पाठविल्याबाबत (३१९); कृष्णराव गोपाळ याजबरोबर पाठविलेले पत्र पोहोचलेबाबत (३२५); नागोजीराव पाटणकर यास बोलणी करण्यासाठी पाठविल्याबाबत (३२६); मालवणहून मुंबईस जाणाऱ्या पलटणीसाठी रहदारीचे पाठवलेले दस्तक पोहचल्याबाबत (३३१).

**पत्रे—छत्रपतींकडून चॅपलीन यास** : कामकाजाचा उलगडा करण्याबाबत (१५२८०); मालवण भागांतील चोरांस पकडल्याबाबत (२८६); बंडवाले लोकास पकडण्यासंबंधी (२९०); मलवडी येथील नारायणराव बाजी घाटगे यांच्या देशमुखी वतनासंबंधी (२९१); आबाजी भोसले याचे कोरयाल येथील पाटीलकीचे वेतन चालविण्याबाबत (२९९).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना** : आलताफनाम्याची थैली पोचल्याबाबत फेजरल यास (१५२८२); काजीर्डा घाटातून जाणाऱ्या व्यापारी मालावरील जकातीसंबंधी कलेक्टर बाणकोट यास (२९३-२९४); रामचंद्र रघुनाथ यास कामकाजे समजावून देऊन पाठविले असल्याबाबत जॉन व कोटलेर गव्हर्नर गोवा यास (३०५-३०७); पलटणी व सरंजाम वगैरे पाठवून देण्याबाबत जॉन व लुई फर्नांडीस यास (३११); आपली कामकाजे करून दोस्ती वाढवण्याबाबत कॅप्टन मेन यास (३१२); थैल्या (पत्रे) पोचल्याबाबत (३२०); व बंदुकीची जोडी पोचल्याबाबत कर्नल मत्रजर यास (३२७); इंग्रजी लष्करी कुमक मिळाल्यास २० हजार रुपये देऊ या अर्थी लुई फर्नांडीस यास (३२८); दिनकर आप्पाजी यास कामकाजे देऊन पाठविल्याबाबत जनरल अलपेडी यास (३३०).

**पत्रे—छत्रपतीस** : पेंढाऱ्यांच्या उपद्रवाबाबत पाठविलेल्या पत्रामध्ये खोडाखोड झाल्याबाबत कर्नल क्लोज याचे (१५२७३); कोंबड्या व मासे पोचल्याबाबत (२७४); छत्रपतींची कामकाजे कंपनी सरकारकडून चांगल्या तऱ्हेने होत आहेत या अर्थी (२७५); व तिळगूळ पोचल्याबाबत डौस याचे (२७६); प्रसिद्धगडकरी व सोनगडकरी यांच्याकडून रयत लोकास होणाऱ्या उपद्रवासंबंधी अचिसन याचे (२९२); भेट म्हणून पाठविलेल्या वस्तुसंबंधी एलफिन्स्टन याचे (२९८); लुई फर्नांडीस यास सरंजामसह मालवणास पाठवित असल्यासंबंधी जॉन फर्नांडीस याचे (३०४); कंपनी सरकारकडून आपल्या मनोदयाप्रमाणे कामकाजे होतील या अर्थी जॉन व लुई फर्नांडीस याचे (३०९); छत्रपतीना त्यांच्या शत्रुविरुद्ध सहाय्य करण्याबाबत जॉन व लुई फर्नांडीस यांचे (३१०); गडकरी लोकानी कर्जाऊ घेतलेल्या रकमेसंबंधी रेसिडेंट सिंधुदुर्ग यांचे (३१३); सेनाखासखेल यांचे वकील बापू मैराळ हे कोल्हापूरास यात्रेसाठी आले असल्याबाबत एलफिन्स्टन याचे (३१४); इंग्रजांनी कौल दिलेल्या व्यापारी जहाजाना अडथळा न करण्याबाबत कलेक्टर दक्षिण प्रांत कोंकण याचे (३१६); लुई फर्नांडीस यास मालवणास पाठवण्याचे रहित झाल्यासंबंधी जॉन फर्नांडीस याचे (३२४).

**याद्या—**इंग्रजांनी छत्रपतीस पाठवलेल्या सन्मानार्थी पोषाखासंबंधी (१५२८७-२८९); करवीरकरांनी साताऱ्याच्या छत्रपतीस पाठवलेल्या सन्मानार्थी पोषाखासंबंधी (३००); आबासाहेब छत्रपतींच्या राज्यारोहण प्रसंगी इंग्रजानी पाठवलेल्या सन्मानार्थी पोषाखासंबंधी (३०२).

---

**ज. क्र. १००, रु. क्र. १००, पु. क्र. २, का. सं. १५३३२-१५३९५ (६४).**

**सु. स. १२०३ ते १२१७, इ. स. १८०२-०३ ते १८१६-१८१७.**

**पत्रे—**वायजाबाई यांची प्रकृती ठीक नसल्याबाबत मि. जॅकीन यास सुंदराबाई यांचे (१५३५९); आकासो घाटगे यांच्या प्रकृतीस बरे नसल्याबाबत (३६०); चि. बापू यास पुत्र झाल्यानिमित्त शर्करा पाठविल्यासंबंधी एलफिन्स्टन यास रामचंद्रराव पंडित याचे (३६१); लष्कराकडील

रुमाल क्र. १००

पत्रे—(चालू) पुडके क्र. २–(चालू)

वैल पाठविले आहेत त्यावर जकात न घेण्याबाबत रत्नाकर पंत यास कर्नल मन्रजर याचे (१५३६८); कर्नल डौस यास पाठवलेल्या पत्राचा जवाब न आल्याने मनुष्य पाठवल्याबावत (३७१); कामकाजे देऊन बाळाजी बाजीराव चिटणीस यास पाठविल्याबाबत एल्फिन्स्टन यास भाऊ महाराज यांचे (३९१); आवासाहेब छत्रपतींस पुत्ररत्न झाल्याबावत शर्करा पाठविल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (३९२).

**पत्रे—छत्रपतींकडून एल्फिन्स्टन यास :** पत्रे पोचल्यासंबंधी (१५३४२); कामकाजाच्या जबाबाची थैली पाठविली जाईल या अर्थी (३४३); भाऊ महाराज, दिनकरराव गायकवाड, नारायणराव पंडित हे सर्व मजकूर सांगतील या अर्थी (३४४); निपाणकरांनी सामानगडास फौज पाठवून शह दिला असल्याबावत (३४५); करवीर प्रांतातील गावास वसुलाविषयी उपसर्ग न करण्याबाबत निपाणीकरास ताकीद करण्याबाबत (३४६); करारनामा व तहनामेच्या थैल्या स्वरुपजी क्षीरसागर बरोबर पाठवल्या असल्याबाबत (३४७); चिकोडी, मनोळी तालुक्यांच्या सोडचिठ्ठ्या पाठवण्याबाबत (३४८); निपाणकरांनी करवीरनजीक तोफेची मारामारी केल्याबाबत (३४९); स्वरुपजी क्षीरसागर याच्याकडून सर्व मजकूर समजेल या अर्थी (३५२); अलताफनाम्याची थैली देऊन भाऊ महाराज यांची रवानगी केल्याबाबत (३५३); गायकवाड यांचे वकील बापू मैराळ याच्या करवीर निवासिनीच्या यात्रेसंबंधी (३६७); करवीर ३ रे शिवाजी याच्या मृत्यूसंबंधी (३७४); करवीर राज्याचे संरक्षण करण्याविषयी (३७५); कामकाजाच्या उलगड्याबाबत (३७६); इंग्रजी फलटणीने निपाणकरांच्या ठाण्यास वेढा देऊन कामकाजाचा उलगडा करुन घेतल्याबाबत (३७७-३७८); यशवंतराव घाटगे हे पुण्यास भेटीस येत असल्याबाबत (३८०); बाळाबाई निंबाळकर तुळजापुरास व हणमंतराव निंबाळकर जेजुरीस जाणार असल्याबाबत (३८१); कामकाजे करुन दोस्ती वाढवावी या अर्थी (३८२, ३८३); कागल तालुका करवीर राज्यातील असल्यासंबंधी (३८४-३८५); ऐनापुरे गावास उपसर्ग न करण्याबद्दल शिरोळ मामलेदारास ताकीद केल्याबाबत (३८६); निपाणकरांनी हिम्मत बहादर यांच्या घेतलेल्या मुलुखासंबंधी (३८७); बापोजी गणेश गोखले हे करवीर प्रांतात उपसर्ग करतात त्यांना ताकीद होण्याबाबत (३८९).

**पत्रे—छत्रपतीकडून इतरांना :** रहदारी मार्गाच्या व्यवस्थेबाबत ऑर्थर वेलस्ली यास (१५३३२); वेलस्ली यांच्या नावे पाठवलेला इनायतनामा त्याजकडे पोचता करण्याबाबत कर्नल डौस यास (३३४); क्षेमसमाचाराबाबत रेसिडेंट सिंधुदुर्ग यास (३३७); कृष्णाजी व्यंकटेश या कारकुनाच्या सुटकेबाबत कर्नल क्लोज यास (३३८); जनरल वेलस्ली याजकडून आलेल्या करारनाम्याच्या यादी व इंग्रज लखोटा स्वरुपजी क्षीरसागर बरोबर रवाना केल्याबाबत गव्हर्नर मुंबई यास (३३९); नारायणराव पंडित व दिनकरराव गायकवाड यांना सविस्तर मजकूर सांगून पाठविल्याबाबत कर्नल मन्रजर यास (३५०); करवीरकर ३ रे शिवाजी कैलासवासी झाल्यासंबंधी कोटलेर ब्रुटीस यास (३५७); भरतगड व नरसिंहगड येथे वाडीकर सावंताची फौज आल्यासंबंधी कर्नल स्मिथ यास हैबतराव गायकवाड यांची (३६२-३६३); अमृतराव शिंदे यांच्याकडून मजकूर समजेल या अर्थी कोटलेर ब्रुटीस यास (३६९); नारो गिरमाजी व उदाजीराव घाटगे हे कामकाजाविषयी बोलणी करतील या अर्थी मि. लुई यास (३७०); करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या मृत्युबाबत मि. लुई यास (३७२); राघो व्यंकटेश यांना कामकाजाची माहिती देऊन पाठविल्याबाबत कर्नल क्लोज यास (३९३); क्षेमसमाचारासंबंधी डौस यास (३९४); टिपू सुलतान याचे पारिपत्याकरिता जादा फौजेची जरूर असल्यास कळविण्यासंबंधी गव्हर्नर मुंबई यास (३९५).

**पत्रे—छत्रपतींस एल्फिन्स्टन याची :** महमद इब्राहीम व स्वरुपजी हुजरे यांच्याकडून सर्व मजकूर समजेल या अर्थी (१५३५१); भाऊ महाराज यांच्या योग्यतेविषयी (३५६); दिनकरराव गायकवाड यांजकडे कामे देऊन पाठवल्यासंबंधी (३६६); करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या निधनाबाबत (३७३); अलताफनामे पोचल्याबाबत (३७९); पुणे येथील इंग्रजांच्या ब्राह्मण कारकुनास जबरदस्तीने अटक केल्याबाबत (३९०).

रुमाल क्र. १००

पत्रे—(चालू) पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे—छत्रपतींस इतरांची :** कल्लोळ येथील देवळात आजारी माणसे ठेवण्याबावत डॉ. स्कॉट याचे (१५३३३); छत्रपतीचा लखोटा गव्हर्नर जनरल यांजकडे पाठविल्याबावत लेप्टनंट नॉक्स याचे (३३५); इंग्रज व होळकर यांच्यामध्ये झालेल्या लढाईबावत कर्नल क्लोज याचे (३३६); लुई फर्नांडीस मालवणास जाणार असल्याबावत जॉन फर्नांडीस याचे (३४७); रामचंद्र रघुनाथ याजकडून सर्व कामकाजे समजली पण त्याचा जवाव देण्याचा अधिकार आपणास नाही या अर्थी कोर्टलँडस्युलर, ब्रिटीश वकील बंदर गोवा याचे (३४१); विलायती बंदूक पाठविल्याबावत कर्नल मन्रजर याचे (३५४, ३५५); कर्नल डौस वगैरेना पाठविलेली पत्रे त्यांना पोचती केल्याबावत गुलाम अली मुनशी याचे (३५८); करवीर हद्दीत मसूर येथे आलेल्या सावंतवाडीकर याच्या फौजेसंबंधी रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (३६४, ३६५); करवीर हद्दीतून पुणे मार्गे मुंबईचे रहदारीचे दस्तक दिल्याबावत रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (३८८).

---

**ज. क्र. १०१, रु. क्र. १०१, पु. : क्र. १, का. सं. १५३९६-१५४५० (५५).**

**सु. स. ११७६ ते १२१६, इ. स. १७७५-७६ ते १८१५-१८१६.**

**इस्तिहारनामा**—कंपनी सरकारच्या लष्करास कंपनीचे रुपये घेऊन धान्य इत्यादी जिन्नस विकत देण्याबावत (१५४१०).

**पत्रे**—क्षेमसमाचाराबावत नागोजीराव घाटगे यास मेजर हॉक याचे (१५३९९); छत्रपतींची पत्रे कर्नल वेलस्ली याजकडे पाठविल्याबावत नागोजीराव घाटगे यास व्यंकटराव कृष्ण याचे (४०२); फौजेच्या मदतीची जरुरी नसल्याबावत जनरल कॅमेल याचे करवीरकरास (४०३); छत्रपती पाटणास जाणार असल्याबावत अप्पूराव बापू याचे (४०४); वरचेवर पत्रे पाठवण्याविषयी कर्नल वेलस्ली यास नागोजीराव पाटणकर याचे (४०७, ४०८); छत्रपतींचा कार्यभाग करण्यासंबंधी रामचंद्रराव पंडीत याचे एल्फिन्स्टन यास (४२६); भाऊ महाराज व गायकवाड हे सर्व मजकूर सांगतील याअर्थी एल्फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (४२७); छत्रपतींना संकटमुक्त करण्यासंबंधी रामचंद्रराव पंडीत याचे एल्फिन्स्टन यास (४२९); करवीर राज्यातील खेडयांना उपसर्ग न देण्याबावत निपाणकरास ताकीद देण्याबावत एल्फिन्स्टन यास छत्रपतीचे (४३०); करवीर सरकारच्या कामकाजाविषयी (४३२); चि. बापू यास पुत्रप्राप्ती झाल्याबद्दल शर्करा (४३३) व चि. भाऊ यास पुत्र झाल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास रामचंद्रराव पंडीत याचे (४३५); त्रिंबकजी डेंगळे यास पकडण्याविषयी बाजीराव साठे यास एल्फिन्स्टन याचे (४४५).

**पत्रे—छत्रपतींची एल्फिन्स्टन यास :** कामकाजे करून दोस्ती वृद्धिंगत करण्याविषयी (१५४२५); करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या निधनाबावत (४३७, ४३८, ४४२); मोरो बाजीराव चिटणीस यास बोलणी करण्यास पाठविण्याबावत (४४०); हिम्मत बहाद्दर यांचे तालुके निपाणकराकडून परत मिळाल्यासंबंधी (४४१).

**पत्रे—छत्रपतींची इतरांस :** पेशव्यांच्या फौजेने आपल्या राज्याची फार खराबी केल्याबावत कर्नल किटन यास (१५३९६); पत्र पोहोचल्यासंबंधी शिवछत्रपती यांचे खुदापरस्ते तुरवेषा दर्गापीर-बंदेनवाडा यास (३९७); शिरगावकर वगैरेना करवीर हद्दीत उपसर्ग न करण्यास ताकीद होण्याबावत वेलस्ली यास (४०६); पटवर्धनानी छत्रपतींच्या विरुद्ध इंग्रजांकडे केलेल्या तक्रारीसंबंधी कर्नल क्लोज यास (४१४); करवीर हद्दीतून पुण्यास जाणाऱ्या इंग्रजी फलटणीस अडथळा होऊ न देण्याबावत कोटलेर ब्रुटीस मु।। गोवा यास (४४१); कामकाजे करून दोस्ती वाढवण्याबावत लुई फर्नांडीस यास (४३६); मालवण येथील छत्रपतींच्या आरमाराविषयी (४३९); एल्फिन्स्टन करवीरी केव्हा येणार ते कळविण्याविषयी रेसिडेंट सिंधुदुर्ग यास (४५०).

**पत्रे—छत्रपतींस इतरांची :** वरचेवर पत्रे पाठवून दोस्ती वृद्धिगत करावी या अर्थी वेलस्ली याचे (१५४००); कर्नल वेलस्ली व मोरोपंत यांची भेट झाल्यासंबंधी व्यंकटराव कृष्ण याचे (४०१); आईसाहेब यांचेसाठी औषधी तेल पाठवले असल्यासंबंधी सर विल्यम क्लार्क याचे (४०५); क्षेमसमाचारासंबंधी गव्हर्नर जनरल वेलस्ली याचे (४०९); खाद्यपदार्थ व पत्र पोचल्याबावत

रुमाल क्र. १०१

पुडके क्र. १—(चालू)

पत्रे—(चालू) सिदोजीराव निंबाळकराकडून मनोळीचे ठाणे न मिळाल्यासंबंधी वेलस्ली याचे (१५४११); आरोपी लोकांना बापूजीपंत गोखले यांच्या स्वाधीन करण्यासंबंधी (४१३); जमखिंडी (४१२); किर्लोस्कर येथील अम्मलदाराने ठाणे ताब्यात दिले नसल्यासंबंधी (४१५-४१६); पंडीत प्रधान (पेशवे), दक्षिणेस यात्रेनिमित्त करवीरी नोकरीस न ठेवण्याबाबत (४१७-४१८); करवीराहून आलेली पत्रे वगैरे पो. एजंटाकडे जात असल्यासंबंधी कर्नल क्लोज याचे (४१९); परस्परांच्या मुलुखातील व्यापाऱ्यांना परस्परांच्या पाठवल्यासंबंधी गव्हर्नर मुंबई याचे (४२०); परस्परांच्या मुलुखात व्यापार करण्यास परवानगी असल्याबाबत गव्हर्नर, मुंबई याचे (४२८); करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या मृत्युसंबंधी शंभू छत्रपतींस गुलाम अल्ली मुन्शी याचे (४३१)

पत्रे—**छत्रपतींस एल्‌फिन्स्टन यांची** : करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या निधनाबाबत (१५४२२-४२३); इंग्रजांनी घेतलेल्या सिंधुदुर्गाकडील क्षेमसमाचारासंबंधी आबासाहेब छत्रपतींस (४२४); तिळगूळ मिळाल्यासंबंधी (४४३-४४४); इंग्रजी भागाच्या कारभारासंबंधी (४३४); सैन्यास मालवणहून जाण्यायेण्यासाठी रहदारीचा परवाना देण्यासंबंधी (४४६-४४७); मालवणास जाताना मि. डनलॉप करवीरी मुक्काम करणार असल्यासंबंधी (४४८-४४९).

यादी—छत्रपतींनी वेलस्ली यास लिहिलेल्या पत्रासंबंधी (१५३९८).

---

ज. नं. १०१, रु. क्र. १०१, पु. : क्र. २, का. सं. १५४५१-१५४८९ (३९).

सु. स. १२१६ ते १२२७, इ. स. १८१५-१६ ते १८२६-२७.

पत्रे—पुणे येथील इंग्रजांच्या ब्राह्मण कारकुनास कैद केल्यासंबंधी एल्‌फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (१५४५३); चिमा तात्याच्या विवाहास येण्याचे आमंत्रण पोचल्यासंबंधी गुरु महाराज यास एल्‌फिन्स्टन याचे (४५४); विलायतेहून बडा सावकार आल्यावर काम करीत असल्यासंबंधी सर्जेराव दादा यास (कोणाचे ते समजत नाही) (४५५); तिळगूळ पोचल्याबाबत कमिशनर चॅपलिन याचे छत्रपतींस (४५७); मल्हारराव घोरपडे याजकडील जावसाल मांचूरचे ठाणे छत्रपतींस मिळण्यासंबंधी चॅपलीन यास वासुदेव पंडीत याचे (४६२); नारायण बाजी घाटगे व झुंझारराव घाटगे यांच्यामध्ये चाललेल्या मणीवाडी येथील देशमुखी वतनाच्या खटल्याबाबत (४७५).

पत्रे—**छत्रपतींची एल्‌फिन्स्टन यास** : पुणे येथील इंग्रजाकडील ब्राह्मण कारकुनास मोरो बाजीराव चिटणीस याने अटक केल्याबाबत (१५४५२); गणेश बाबाजी खडके याजकडून विश्वासराव गायकवाड यानी कापड वगैरे घेतले त्याची बाकी चुकती करण्यासंबंधी (४६३-४६४) तुळजापुरास देवदर्शनास जाण्यासंबंधी रहदारीचे दस्तक मिळण्यासंबंधी (४६६).

पत्रे—**छत्रपतींकडून इतरांना** : मातोश्री तुळजापुराहून निघून करवीरास पोचल्यासंबंधी चॅपलीन व ग्रांट यास (१५४६९-४७१); विजापूरचे कलेक्टर यांचा अलतफनामा मिळाल्यासंबंधी (४७२); झुंझारराव घाटगे यास करवीरी पाठवण्याबाबत चॅपलीन यास (४७४); करवीर प्रांतात चोऱ्या, दरोडे होतात त्याच्या बंदोबस्तासाठी कलेक्टर धारवाड यास (४७६); वाडीकर सावंत यांच्याकडे चालत असलेल्या दुतर्फी अम्मलासंबंधी चॅपलीन यास (४७७); भाऊ महाराज यांना गुप्तगोष्टी करण्यास पाठविल्याबाबत चॅपलीन यास (४७८); बापूजी बेलापूरकर याने नरहर कोडोलीकर सावकार यास देणे असलेल्या ऐवजासंबंधी कलेक्टर, सोलापूर यास (४७९); तुळजापुरास देवदर्शनास जाण्यासाठी रहदारीचे दस्तक मिळण्याविषयी पो. एजंट यास (४८४); रामचंद्र रघुनाथ यांना कामकाजे समजावून पाठवल्याबाबत गव्हर्नर, मुंबई यास (४८५, ४८६).

पत्रे—**छत्रपतींस इतरांची** : कंपनी सरकारच्या ब्राह्मण कारकुनास केलेल्या अटकबाबत चौकशी होण्यासंबंधी एल्‌फिन्स्टन याचे (१५४५१); विंग येथे खून करून फरारी झालेल्या संतू पाटलास पकडण्याबाबत ग्रांट, पो. एजंट सातारा याचे (४५६); जावसालाच्या उलगड्यासाठी वकीलास पाठवून देण्यासंबंधी चॅपलीन याचे (४५८); तिळशर्करा पोचल्याबाबत ग्रांट याचे (४५९); पुनवत येथील आरोपी मांगास मामलेदार शिराळे याच्याकडे पाठवण्याबाबत ग्रांट याचे (४६०); ज्वाला प्रसाद मुन्शी याच्या उंटाच्या चोरी प्रकरणी रॉबर्टसन याचे (४६१);

**रुमाल क्र. १०१**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रें**— (चालू)

सातार्‍याहून ग्रांट यांचेकडून आलेली थैली पाठवल्याबाबत अंताजी बल्लाळ याचे (१५४६५); तुळजापूर भेटीबाबत ग्रांट याचे (४६७); दोन बंदुका पाठवल्यासंबंधी कॅप्टन अचीसन याचे (४६८); पटकीचे औषध पाठवण्यासंबंधी कॅप्टन अचीसन याचे (४७३); आपल्याकडील काम लवकरच निकालात निघतील याअर्थी एल्फिन्स्टन याचे (४८८-४८९); दरोडेखोर लोकांचा बंदोबस्त केल्याबाबत कर्नल क्लोज याचे (४९७).

**याद्या**—चिटणीस, पंत अमात्य, सरलष्कर व इतर नोकर लोक यास चिटणिसीकडून द्यावयाच्या वाटणीसंबंधी (१५४८०-४८२).

---

**ज. क्र. १०२, रु. क्र. १०२, पु. क्र. १, का. सं. १५४९० ते १५५३७ (४८).**

**सु. स. ११७५ ते १२२२, इ. स. १७७४–७५ ते १८२१–२२.**

**आज्ञापत्रे**—जोसेफ बुटाफ याच्या जागी आलेल्या अधिकार्‍याचे छत्रपतींच्या संबंधी मत कसे काय आहे ते कळविण्याबाबत नानाजीराव घाटगे यास छत्रपतींचे (१५५१८).

**पत्रे**—कंपनी सरकारकडून छत्रपतीस मिळावयाच्या ऐवजाबाबत यशवंतराव शिंदे यास रॉबर्ट इनशा याचे (१५४९०); भेटीस येण्याबाबत नागोजीराव घाटगे यास कर्नल वेलस्ली याचे (४९४); निपाणीकराकडून येणे ऐवजाबाबत एल्फिन्स्टन यास वासुदेव पंडीत याचे (५१५); सिदोजीराव निंबाळकर यानी छत्रपतीस द्यावयाच्या ऐवजाबाबत पांडुरंग नाईक यास एल्फिन्स्टन याचे (५१९); सावंतवाडीकडील दुतर्फ अम्मलाच्या बंदोबस्तासाठी पो. एजंट यास भाऊ महाराज यांचे (५३१); करवीरकरांच्या कामकाजासंबंधी नागो गिरमाजी बोलतील या अर्थी एल्फिन्स्टन यास भाऊ महाराज याचे (५३२); कृपादृष्टी असावी या अर्थी एल्फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (५३७).

**पत्रे—छत्रपतींची एल्फिन्स्टन यास** : करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या निधनासंबंधी (१५५०५); आपली कामे करुन मैत्री वाढवावी या अर्थी (५०६); नरसिंहगड व भरतगड येथील वाडीवर सावंत याच्या जमावाबाबत (५०७); कामकाजाची यादी पोचल्याबाबत (५०८); भरतगड व नरसिंहगड वाडीकर यांनी घेतल्याबाबत, सिंधुदुर्गाकडे सावंत यांनी नुकसानी केल्याबाबत (५०९); नाईक निंबाळकर यांच्या निजामशाहीतील सरंजामाबाबत (५१२); पिकलेले फणस पाठविल्याबाबत (५१४); कामकाजाची बोलणी करण्यासाठी भाऊ महाराज व दिनकरराव गायकवाड यांना पाठविल्याबाबत (५१६); नागपुरात अटक केलेल्या नाईक यांच्या लोकांच्या सुटकेबाबत (५१७); कामकाजाच्या जबाबाच्या थैल्या पाठविल्याबाबत (५२१); सिंधुदुर्गाचे रेसिडेंट डनलॉप करवीरहून सिंधुदुर्गास गेल्यासंबंधी (५२२); टॉमस मन्रो याजकडे कामकाजासाठी भाऊ महाराज यांना पाठविल्याबाबत (५२३); आबाजी बाजीराव हे गुप्त गोष्टी करतील या अर्थी (५२४); पुत्ररत्न झाल्याबद्दल शर्करा पाठविल्याबाबत (५२६); निपाणी येथे अटकेत असलेल्या आप्पाजी सुबराव यास इंग्रजाकडे पाठवण्यासंबंधी (५२७); सविस्तर मजकूर नारो गिरमाजी सांगतील या अर्थी (५२८); वाडीकर सावंत यांच्याकडील जाबसालाबाबत (५३६).

**पत्रे—छत्रपतींकडून ग्रांट यास** : मिठाई वगैरे जिन्नस पाठविल्याबाबत (१५५३०); बोलणी करण्यासाठी भाऊ महाराज याना पाठवल्याबाबत (५३३); संपूर्ण हुकेरी प्रांत छत्रपतींना मिळण्याबाबत (५३४); पाटणकर यांच्या सवाल जबाबाचे उलगडे होण्याबाबत (५३५).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना** : रत्नाकरपंत राजाज्ञा याजकडून सविस्तर मजकूर समजेल या अर्थी नबाब मुलकेजहां यास (१५४९२); मनोळी, चिकोडी वगैरे गावांच्या बंदोबस्ताबाबत कर्नल वेलस्ली यास (४९३); कर्नल वेलस्ली यांच्या भेटीसंबंधी अपूराव यास (४९५); चिकोडी मनोळी तालुक्यांच्या सोडचिठ्ठ्याबाबत (कोणास ते नमूद नाही) (४९७); नागोजीराव घाटगे यास बोलणी करण्यासाठी रवाना केल्याबाबत कर्नल वेलस्ली यास (४९८); मोत्याचा कंठा, वस्त्रे इ. वस्तू पाठविल्याबाबत विल्यम क्लार्क यास (५००); दोस्ती वृद्धिंगत करण्यासंबंधी गव्हर्नर, मुंबई यास (५०१); बंगाल व युरोप येथील मर्दुमकीच्या अभिनंदनार्थ ऑर्थर वेलस्ली यास (५०२); सर्जेराव घाटगे यास ठेऊन घेतल्याबाबत डौस यास

रुमाल क्र. १०२

पत्रे—(चालू) पुडके क्र. १—(चालू)

(१५५१०); नृसिहवाडी येथील इंग्रजांच्या मुक्कामाबाबत कर्नल डौस यास (५११); कामकाजाचे उलगडे करण्यासाठी गोविंद फडणीस व विठोजी नाईक यांना पाठविल्याबाबत रेसिडेंट सिंधुदुर्ग यास (५२०); अंताजी कुलकर्णी मसुरे याजकडून विश्वनाथ वझे याने जवरीने खत करून घेतल्याबाबत रेसिडेंट सिंधुदुर्ग यास (५२५); निपाणकरांच्या चिकोडी मनोळीकडील जमिनी व वतनी हक्क यासंबंधी चॅपलीन यास (५२९).

**पत्रे—छत्रपतींस इतरांकडून :** विलायतेस जात असल्याबाबत युटाफ याचे (१५४९१); नागोजीराव घाटगे व कर्नल वेलस्ली यांच्या मुलाखतीबाबत मेजर हॉक याचे (४९६); करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या मृत्यूसंबंधी लुई यांचे (५०३); औषध उपचाराने प्रकृती ठीक होईल याअर्थी कर्नल मंत्रजर याचे (५०४); कंपनी सरकार व छत्रपती यांच्या दोस्तीसंबंधी कर्नल डौस यास (५१३).

**मसुदा**—सर्जेराव घाटगे फौजेसह पुण्यास येणार असल्यासंबंधी वेलस्ली यास छत्रपतींनी पाठवावयाच्या पत्राबाबत (१५४९९).

---

**घ. क्र. १०२, रु. क्र. १०२, पु. क्र. २, का. सं. १५५३८—१५५८७ (५०).**

**सु. स. १२०० ते १२१३, इ. स. १७९९-१८०० ते १८१२-१३.**

**आज्ञापत्रे**—युटॉफ यांच्याबरोबर पाटण्यास जाण्याबाबत नागोजीराव घाटगे यास शिवछत्रपतीचे (१५५५३).

**पत्रे**--लष्कराकडून रयतेस उपद्रव न करण्यासंबंधी हरीपंत बाबासाहेब यास कर्नल वेलस्ली याचे (१५५३८); कंपनी सरकारकडून करवीरकरास द्यावयाच्या फौजेच्या मदतीबाबत जोसेफ युटॉफ याचे नागोजीराव घाटगे यास (५४४); करवीरकरांच्या हद्दीतून फौजेसह येताना येथील गावांना व रयतांना उपसर्ग होऊ न देण्याबाबत छत्रपतीस कर्नल वेलस्ली याचे (५४५); लक्ष्मण दीक्षित यांच्या सुसल गावास शिरोळच्या ठाणेदाराकडून उपद्रव होऊ न देण्याबाबत (५४६); इंग्रजांशी झालेल्या लढाईत धोंडजी वाघ ठार झाल्यासंबंधी बापूसाहेब यास मोरोपंत महादेव याचे (५४८); शिद्यांचा एक सरदार व आप्पा देसाई रामदुर्गास जाऊन खंडणी मागत असल्यासंबंधी (५५२); स्वरूपजी क्षीरसागरकडून पो. एजंट याजकडे पाठवावयाच्या पत्रांचे मसुदे पाठविले असल्यासंबंधी भाऊ महाराज यास नारायण श्रीरंग याचे (५५४); क्षेमसमाचारासंबंधी नारायणराव पाटणकर यास जनरल वेलस्ली याचे (५५६); खल भटजी यांच्याकडून सर्व मजकूर समजला या अर्थी रामचंद्र जोशीराव यास कँप्बेल याचे (५५९); देवी नाईक याजबरोबर पाठविलेला लखोटा मिळाल्याबाबत कर्नल विल्यम क्लार्क याचे (५६६).

**पत्रे—छत्रपतींकडून कर्नल क्लोज यास :** कामकाजाच्या जबाबाच्या थैल्या पाठविल्याबाबत (१५५५७); कंपनी सरकारच्या दोस्तीसंबंधी (५६०); इंग्रज व यशवंतराव होळकर यांच्यामध्ये झालेल्या लढाईसंबंधी (५६३); कामाची माहिती देऊन नारायणराव घाटगे यास पाठवल्यासंबंधी (५६४); निपाणीकरांच्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्याबाबत (५७३); परशराम पंडित यांच्या तालुक्याच्या बंदोबस्ताबाबत (५७४); हरि बल्लाळ केळकर हा किल्ल बावडेहून सावंतवाडीस पळून गेल्याबाबत (५७५); निपाणीकर करवीर हद्दीतील गावास उपसर्ग देतात त्याच्या बंदोबस्ताबाबत (५८१); क्लिमिंग्टन यास बडतर्फ केल्याबाबत आलेल्या पत्रासंबंधी (५८२).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना :** नागोजीराव घाटगे यांच्याकडून सर्व मजकूर कळेल याअर्थी त्रिंबकराव लिंगो यास (१५५४७); चिकोडी, मनोळी तालुक्यांच्या सोडचिठ्ठ्या पाठवण्याबाबत गव्हर्नर जनरल वेलस्ली यास (५५५); आपल्या पत्राप्रमाणे अम्मलदारांना ताकिदी रवाना केल्याबाबत मि. स्कॉट यास (५६२); कामकाजे सत्वर करून दोस्ती वाढवावी याअर्थी एल्‌फिन्स्टन यास (५८३); नारो गिरमाजी याजकडून सर्व मजकूर समजेल या अर्थी कर्नल डौस यास (५८५); आपल्याकडून आलेले पत्र गव्हर्नर मुंबई यांच्याकडे पाठविल्यासंबंधी रेसिडेंट सिंधुदुर्ग यास (५८६).

रुमाल क्र. १०२

पुडके क्र. २—(चालू.)

**पत्रे—छत्रपतींस कर्नल क्लोज यांची :** सिधोजीराव निंबाळकर याच्या आवसालाच्या उलगडयाबाबत (१५५६७-५६९); सिंधुदुर्गाच्या मोकळिकीबाबत व सावंतवाडीकरांनी व्यापारी जहाजे लुटल्याबाबत (५७०, ५७१); दिनकर पंडित हे कामकाजे चांगल्या प्रकारे करतात या अर्थी (५७२); अखबार लिहिणाऱ्या कारकुनास कैदेतून मुक्त करण्याबाबत (५७६).

**पत्रे—छत्रपतींस इतरांची :** धोंडजी वाघ यास आसरा न देण्याबाबत कर्नल वेलस्ली याचे (१५५३९-५४१); धोंडजी वाघाच्या बंदोबस्ताबाबत व्यंकटराव कृष्ण याचे (५४२, ५४३); कर्नल वेलस्ली यास पत्र देऊन त्याचे उत्तर पाठविल्यासंबंधी लिंगो भगवंत याचे (५४९-५५१); घोडगिरी येथील अम्मलदार लक्ष्मणपंत यास जनरल वेलस्ली याने दिलेली वस्त्रे बाजीराव याने काढून घेतल्यासंबंधी कमांडर ठाणे घोडगिरी याचे (५५८); कर्नल क्लोज हे दौलतराव शिंदे यांच्या लष्करात गेल्यामुळे लखोटा तिकडे पाठविल्याबाबत जॉन स्टुवर्ट याचे (५६१); क्लोज व कॅप्टन थॉमस सिडन्हॅम याचे (५६५); कंपनी सरकार व करवीरकर यांच्यामध्ये आरमार व व्यापारी जहाजाबाबत झालेल्या करारासंबंधी गव्हर्नर मुंबई याचे (५७७-५८०); पेशवे पुण्यास आल्यावर कामे जारी होतील या अर्थी एल्फिन्स्टन याचे (५८४); कामकाजाच्या निकालासंबंधी एल्फिन्स्टन याचे (५८७).

---

**ज. क्र. १०३, रु. क्र. १०३, पु. क्र. १, का. सं. १५५८८ ते १५६३५ (४८).**

**सु. स. १२१३ ते १२३७; इ. स. १८१२-१३ ते १८३६-३७.**

**जाहिरनामा—**त्रिंबकजी डेंगळे हा फरारी असून त्याची बातमी कळविण्यासंबंधी कंपनी सरकारचा (१५५९८).

**पत्रे—**परागंदा झालेले भरमाजी पाटील व बापूजी कुलकर्णी याना ताकीद दऊन दानवाड येथे राहण्यास परवानगी देण्याबाबत छत्रपतींचे वकीलास पो. एजंट याचे (१५६०७); कागल तालुक्यातून जाणाऱ्या इंग्रजी फौजेस जरूर ती मदत देण्याविषयी करवीरकर वकिलास पो. एजंट याचे (६०९); गोपाबाई वेडकीहाळकर इच्या मुलास छत्रपतीकडील लोकानी पहारेत बसवल्यासंबंधी पो. एजंट यांचे (६१०); आबासाहेब हे अधिकारारूढ होऊन त्यांच्या नावाची मोहर करण्याचे ठरल्याबाबत ताकरीन यास सुंदराबाई यांचे (६१६); विनायक बच्चाजी हे इकडील वृत्तांत निवेदन करतील याअर्थी असि. कलेक्टर व मॅजिस्ट्रेट (कोठले ते नमूद नाही) यास छत्रपतींची (६१८); आबासाहेब छत्रपती हे सिंहासनारूढ झाल्यानिमित्त जवाहीर दागिने इ. पाठविल्यासंबंधी ताकरीन यास सुंदराबाई यांचे (६२३); आबासाहेब व बाबासाहेब हे उभयता लहान असल्यामुळे राज्याच्या संरक्षणाच्या बंदोबस्ताबाबत गव्हर्नर मुंबई यास सुंदराबाई यांचे (६२६-६२७); गंगाधर लक्ष्मण जोशी याजकडून यावयाच्या ऐवजासंबंधी कृष्णरावजी यास एल्फिन्स्टन याचे (६३५).

**पत्रे—छत्रपतींकडून ग्रांट यास :** तुळजापुरास देवदर्शनास जाण्याबाबतच्या बंदोबस्ताविषयी (१५५९९); कोंकण प्रांतात होत असलेल्या चोऱ्या व दरोडयाच्या बंदोबस्ताबाबत (६०१); चिमणाजी सखदेव हे इकडील वृत्तांत सांगतील याअर्थी (६०५); मेव्याचे पेटारे पाठविल्यासंबंधी (६१३).

**पत्रे—छत्रपतींकडून ताकरीन यास :** महिपतराव साठे व यशवंतराव परांजपे याना गळतगे हा गाव इनाम दिल्याबाबत (१५६०२); नारो गिरमाजी बरोबर पत्र पाठविल्याबाबत (६०३); गोविंद रामाजी याच्या घरावर पडलेल्या दरोडयाच्या चौकशीबाबत (६०८); आप्पाजीराव सितोळे व चिमाजी सितोळे यांच्या खटल्यासंबंधी (६११); केरोसीच्या रानात लक्ष्मण नाईक बेळगांवकर याच्या झालेल्या चोरीसंबंधी (६१५); छत्रपतीच्या सिंहासनारूढ समारंभासंबंधी (६१७); गोकाककर देसाईची मालमत्ता जमखिंडीकरांच्या ताब्यात देण्याबाबत (६२१-६२२, ६२४-६२५).

रुमाल क्र. १०३

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना :** सोडचिठ्या प्रमाणे ठाणी ताब्यात घेताना निपाणीकरांना हरकत घेतल्या-संबंधी, (१५५९०-५९१); व तिळगूळ पाठवल्यावावत कर्नल डौस यास (५९२); नरतवडेकर व किल्ले वहिरतगडकरी यांच्यात जमिनीवावत झालेल्या झगड्यासंबंधी सहाय्यक कलेक्टर व मॅजिस्ट्रेट रत्नागिरी याना (६००); कंपनी सरकार बरोबरच्या दोस्तीवावत थॉमस मन्रो यास (६०६); इंग्रजांनी जप्त केलेली गलवते परत मिळण्या-वावत, (६२९-६३०); व सिंधुदुर्ग बंदराच्या मोकळिकीवावत गव्हर्नर मुंबई यास (६३१-६३२).

**पत्रे—छत्रपतीस एल्फिन्स्टन याची :** छत्रपतींची कामे लवकर यशस्वी होतील याअर्थी (१५५८४-५८९); निपाणीकर यानी करवीर राज्यात केलेल्या वसुली संबंधी (५९३-५९४); छत्रपतींच्या कामकाजाच्या उलगड्यासंबंधी (५९५); खानापूर हा गाव सामानगडकरी व हलकर्णीच्या लोकानी लुटून नेल्यासंबंधी (५९६-५९७).

**पत्रे—छत्रपतींस ग्रांट याची :** मौजे पिरानकवठे येथील वारणा तिरावरील मळ्यांना हिंगणगावकऱ्यां-कडून उपद्रव होऊ न देण्यासंबंधी (१५६१२); पुसे येथे चोरी केलेल्या आरोपींना पाठविण्या-संबंधी (६१४); रेठरेकर स्वरूपजी पाटील यांच्या मुलाच्या लग्नासंबंधी (६१९); घोंडनाक याच्या अटकेसंबंधी (६२०).

**पत्रे—छत्रपतींस इतरांची :** गोविंद रामाजी याच्या घरावर पडलेल्या दरोड्यासंबंधी ताकरीन याचे (१५६०३); आण्णा जोशी आळतेकर, नारायण वैद्य, जीवराव जाधव इत्यादि लोकांस कमिशनर याच्याकडे पाठवण्यासंबंधी डनलॉप याचे (६२८); सिंधुदुर्ग येथील शिवसागर देवालयाकडील सेवक वहिरजी व वावजी महादेव सकपाळ यांना पूर्ववत नोकरीस ठेवण्या-वावत रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (६३३-६३४).

---

**ब. क्र. १०३, रु. क्र. १०३, पु. क्र. २, का. सं. १५६३६-१५६८७ (५२).**

**सु. स. १०७७/१२२१, इ. स. १६७६-७७ ते १८२०-२१**

**टिप्पणे**—तोरगलकर, पाटणकर, हिम्मत वहाद्दर, जोशीराव इत्यादींच्या पूर्वजांच्या माहितीसंबंधी (१५६७४-६८७).

**पत्रे**—मोरो वाजीराव व वावाजी वाजीराव चिटणीस यांच्या कामगिरीविषयी (१५६५५); क्षेम-समाचारासंबंधी गुरूमहाराज यांना एल्फिन्स्टन याचे (६५७); मोरो वाजीराव चिटणीस यानी केलेल्या बोलण्यासंबंधी सुंदरावाई याना एल्फिन्स्टन याचे (६५८); निपाणीकर यांच्या गांवांच्या माहितीवावत नारोपंत वकील यास पो. एजंट याचे (६५९); अवधूतराव याच्या फिर्यादीच्या कामासंबंधी नारोपंत वकील यास पो. एजंट याचे (६६०); केरूर येथील टपाल जासूदाचे सामान त्या गावच्या पाटलाने काढून घेतल्यावावत चौकशी करण्याविषयी पो. एजंट याचे छत्रपतींचे वकीलास (६६१); छत्रपती सिंहासनारूढ झाले म्हणून आनंद झाला याअर्थी सुंदरावाई यांना चॅपलीन याचे (६६९).

**पत्रे—छत्रपतींकडून :** क्षेमसमाचारासंबंधी व हिरे, माणके इ. वस्तु पोचल्यावावत राजे अमरसिंग यास (१५६३९); पुत्रोत्सवाची शर्करा व वस्त्रे कर्नल विल्यम क्लार्क यास पोचती करण्यावावत अप्पूराव रामराव यास (६४३); नागोजीराव घाटगे करवीरास परत आल्यासंबंधी गव्हर्नर मुंबई यास (६४६); भाऊ महाराज व दिनकरराव गायकवाड याना पाठवून दिल्यासंबंधी मत्रजर यास (६४७); नारो गिरमाजी हे सविस्तर मजकूर निवेदन करतील या अर्थी कर्नल विल्यम डौस यास (६५०); कामकाजाविषयी भाऊ महाराज याना पाठविल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास (६५३-६५४); नारो गिरमाजीवरोबर पाठविलेल्या कामकाजाविषयी पो. एजंट यास (६६८); माणगाव येथील घोंडनाक मांगास चोरीवावत पकडण्यासंबंधी ग्रांट यास (६७२-६७३).

## रुमाल क्र. १०२

### पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे**—छत्रपतींस : कंपनी सरकारच्या कर्जफेडीसंबंधी रॉबर्ट हेनशा याचे (१५६४०); मनोळी येथील किल्लेदाराने इंग्रज फौजेवर दारुगोळा फेकल्यासंबंधी कर्नल वेलस्ली याचे (६४१); नवलगुंद भागातील इंग्रजी फौजेच्या हालचालीबाबत व्यंकटराव कृष्ण याचे (६४२); गुलाम हुसेन बोहरी यांची किस्ती व ऐवज हरिपंत केळकर याने लुटल्यासंबंधी कर्नल क्लोज याचे (६४४, ६६४); रास्ते यांचा पक्ष सोडून आपले काम करीत जाईन या अर्थी मुनशी महम्मद इब्राहिम याचे (६४८-६४९); लाट व रांगोळी या गावासंबंधी भाऊ महाराज यांच्याबरोबर बोलणी झाल्याबाबत एल्फिन्स्टन याचे (६५१-६५२); बाळाजी बाजीराव चिटणीस याची रवानगी केल्याबद्दल, एल्फिन्स्टन याचे (६५६); कोल्हापूर येथील कंपनी सरकारचे अखबारनवीस यांचा वर्ग तासगावी होऊन त्याच्या जागी दुसरे अखबारनवीस पाठविले असल्यासंबंधी पो. एजंट याचे (६६२); कोकण प्रांतातील पळालेल्या कैद्यास शोधल्यासंबंधी ताकरीन याचे (६६३); प्रसिद्धगड व सोनगड बाबतच्या निवाड्यासंबंधी एचीसन याचे (६६४); छत्रपतींच्या इलाख्यातील चोर व दरोडेखोर लोकांच्या बंदोबस्तासंबंधी कमिशनर चॅपलीन याचे (६६५); चिकोडी तालुक्यातील गावासंबंधी पो. एजंट याचे (६६६); वेंगुर्ल्याहून मुंबईस जात असल्यासंबंधी एचीसन याचे (६६७).

**याद्या**—सरकारी कचेऱ्यासाठी कोल्हापुरात बांधावयाच्या इमारतीसंबंधी (१५६३६); कंपनी सरकारने छत्रपतींना पाठवलेल्या दागदागिने व वस्त्रे यासंबंधी (६७१).

**वतनपत्रे**—त्र्यंबकजीकाकास कर्नाटक प्रांती शिवछत्रपतींनी वतन करून दिल्यासंबंधी शिवाजी राजे याचे (१५६३७-६३८).

---

ज. क्र. १०३, रु. क्र. १०३, पु. क्र. ३, का. सं. १५६८८-१५७५० (६३).

सु. स. १२०० ते १२२१, इ. स. १७९९-१८०० ते १८२०-२१.

**कौलनामा**—कंपनी सरकारने बापू चिनणोजी निपाळकर यास डांगी घाटातील जकातीचा मक्ता दिल्याबाबत (१५७३६).

**पत्रे**—सेनासाहेबसुभासंबंधी नागोजीराव घाटगे यास गोविंद बापूजी याचे (१५६८८); फत्तेनारी रवाना करण्याविषयी गव्हर्नर मुंबई यास नागोजीराव घाटगे याचे (७०४); लखनौ येथील सरंजाम मिळण्याबाबत नवाब मुस्तफा व नवाब तुरखयाह यास प्रीतीराव चव्हाण याचे (७०५); कानकाये करून दोस्ती वृद्धिंगत करावी या अर्थी छत्रपतींचे दुई पार्लाडिस, निसबट इ. इंग्रज अधिकाऱ्यास (७०६-७०८); बाळाजी बाजीराव चिटणीस सविस्तर मजकूर सांगतील या अर्थी एल्फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (७२४); आबासाहेब छत्रपतीस पुत्र झाल्याबाबत (७२७); तसेच सौ. अंबिकाबाईस ऋतुप्राप्ती झाल्याबाबत पाठविलेली शर्करा पोचल्यासंबंधी सुंदराबाईस रॉबर्टसन याचे (७२८); आबासाहेब छत्रपतींच्या सिंहासनारूढ समारंभासंबंधी माहितीची यादी पाठविल्याबाबत ग्रांट यास सुंदराबाई यांचे (७४३).

**पत्रे**—छत्रपतींकडून एल्फिन्स्टन यांस : कानकाये करून दोस्ती वाढवावी या अर्थी (१५७१०); कामत दप्तरदारांची मर्जीतून नोकरीक होण्याबाबत (७१२); मल्लकर निंबाळकर यांच्या निवासस्थानातील सरंजामाबाबत (७१३); निवासी अप्पाचा बंदोबस्त नारायण घोरपडे, मार्तंडराव पाटणकर वगैरेंनी केल्याबाबत (७१४-७१५); आष्टे येथील निंबाळकर यांचे चौथाईचे वतन खालसा करण्याबाबत (७१६-७१७); सौ. अंबिकाबाई यांच्यासाठी सरंजाम पाठविल्याबाबत (७२२); दिनकर अप्पाजी यास बोलणी करण्यास पाठविल्याबाबत (७२३); इंग्रज व बाजीराव पेशवा यांच्यामधील लढाईबाबत (७२६); भाऊ महाराज, नारो बाजीराव हे बोलणी करतील या अर्थी (७३१-७३२); कानकायाची बोलणी करण्यास भाऊ महाराज यांना पाठविल्याबाबत (७४२); कानकायाच्या पत्रे पाठविल्याबाबत (७५०).

**रुमाल क्र. १०३**

**पुडके क्र. ३—(चालू)**

**पत्रे—छत्रपतींकडून वेलस्ली यास :** रत्नाकरपंत राजाज्ञा यांस फौजेसह करवीर प्रांताच्या सरहद्दीवर पाठविल्यासंबंधी (१५६९१-६९२); निपाणीकर व तलूरकर यांच्या पुंडाईबाबत (६९३-६९४); नेरलीनजीक फौज रवाना केल्याबाबत (६९७-६९८); चिकोडी व मनोळी तालुके छत्रपतीस मिळण्याबाबत (७०१); पाटण्याहून परत जातांना करवीरास भेट देण्याबाबत (७०३); करवीर हद्दीत पटवर्धनाकडील पेंढारी लोक उपसर्ग करतात त्याच्या बंदोबस्ताबाबत (७२१).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना :** तोरगल तालुक्यातील गावास उपद्रव न करण्याबाबत नवाब मुल्केजहा यास (१५६८९); धोंडजी वाघ याच्या पाडावासंबंधी क. कँपबेल यास (६९९); कंपनी सरकारच्या कामास आलेल्या शामनाथ भटजीस सुरक्षितपणे पुण्यास रवाना केल्याबाबत कर्नल विल्यम क्लार्क यास (७००); घोडगिरीतील मुक्कामात वेलस्ली यांनी लक्ष्मणपंत यास दिलेली सनगे बाजी चवडो याने काढून घेतल्या प्रकरणी त्यास ताकीद केल्याबाबत कमांडर केटली यास (७०२); भरतगड किल्ल्यावरील शिबंदीच्या खर्चाच्या व्यवस्थेबाबत रसिडेंट सिंधुदुर्ग यास (७१९); सवालजबाबाच्या थैल्या देऊन भाऊ महाराज यांना पाठविल्याबाबत (७३०); रत्नागिरी प्रांताच्या सवाल जबाबाबाबतची थैली पाठविल्याबाबत (७३३); व पुण्याहून बंड करण्याच्या उद्देशाने येणाऱ्या लोकांच्या बंदोबस्ताबाबत पो. एजंट यास (७३४); चोर, दरोडेखोर यांच्या बंदोबस्ताकरिता कोकणचे घाटात चौक्या पहारे ठेवल्याबाबत ताकरीन यास (७३५); चोर आरोपी भिक्यामांग व सख्या हे येथे नसल्याबाबत ग्रांट यांना (७३७); करवीर हद्दीत होणाऱ्या चोऱ्यांच्या बंदोबस्ताबाबत कलेक्टर रत्नागिरी यास (७३८); करवीर हद्दीतील चोऱ्या दरोड्यांच्या बंदोबस्ताबाबत ताकरीन यास (७३९); कोकणात होणाऱ्या चोऱ्या व दरोड्यांचा बंदोबस्त केल्याबाबत कमिशनर चॅपलीन यास (७४०); तळगरे यथील जिवाजीराव शिर्के यास वतनासंबंधी त्याच्या भाऊबंदांकडून होणाऱ्या त्रासासंबंधी रेसिडेंट बाणकोट यास (७४१); कानकाजाचे उलगडे होण्यासंबंधी ताकरीन यास (७४५); भरतगडासंबंधीच्या तरतुदीबाबत, कृष्णराव यास (७४६).

**पत्रे—छत्रपतींस :** कंपनी सरकारशी झालेल्या कराराप्रमाणे वागण्यासंबंधी कर्नल वेलस्ली याचे (१५६९०); क्षेमसमाचारासंबंधी क. क्लार्क याचे (६९५); शिरगांवकर नागो शामराव यांचे इनामी गावांना उपद्रव न होण्याबाबत, वेलस्ली याचे (६९६); ३ रे शिवाजी याच्या मृत्यूची बातमी कळून दुःख झाल्याबाबत कर्नल डौसचे (७०९); मालवणची पावती पोचल्यासंबंधी एल्फिन्स्टन यांचे (७११); आखबारीच्या कामावर बाबजी राम साठे याची नेमणूक केल्याबाबत एल्फिन्स्टन याचे (७२०); मोरो बाजीराव चिटणीस याच्या खातरजमेविषयी एल्फिन्स्टन याचे (७२५); वाळवे गोटखिंडी येथील शेतकऱ्यांच्या लुटीप्रकरणी रामोशी लोकांचा तपास करण्याबाबत ग्रांट यांचे (७२९); गोकाक येथील परागंदा झालेल्या लोकांविषयी पो. एजंट यांचे (७३४); मनुरे रयतांच्या फिर्यादीचे निकाल लवकर लावण्याविषयी रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (७४७, ७४९).

**मसुदा—**करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या मृत्यूसंबंधी शंभु छत्रपती यांनी एल्फिन्स्टन यास लिहावयाच्या पत्रासंबंधी (१५७१८).

---

**र. क्र. १०४, द. क्र. १०४, पु. क्र. १, का. सं. १५७५१-१५७८९ (३९).**

**सु. स. १२०० ते १२२९, इ. स. १७९९-१८०० ते १८२८-२९**

**रस्तह—**करवीरकरांचे वकील हनमंतराव याना म्हैसूरहून कोल्हापुरास जाऊ देण्याबाबत (१५७६८).

**पत्रे—नारोजीराव घाटगे यास :** धोंडजी वाघ यास पकडण्याबाबत आप्पूराव याचे (१५७५२-७५३); इंग्रजी लष्कर कावल मुक्कामी असल्याबाबत आप्पूराव याचे (७५४); धोंडजी वाघ यास पकडण्याकरिता मदत केल्याबाबत पूटोक याचे (७५५).

रुमाल क्र. १०३

पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे—छत्रपतींस :** कंपनी सरकारच्या कर्जफेडीसंबंधी रॉबर्ट हेनशा याचे (१५६४०); मनोळी येथील किल्लेदाराने इंग्रज फौजेवर दारुगोळा फेकल्यासंबंधी कर्नल वेलस्ली याचे (६४१); नवलगुंद भागातील इंग्रजी फौजेच्या हालचालीबाबत व्यंकटराव कृष्ण याचे (६४२); गुलाम हुसेन बोहरी यांची किस्ती व ऐवज हरिपंत केळकर याने लुटल्यासंबंधी कर्नल क्लोज याचे (६४४, ६६४); रास्ते यांचा पक्ष सोडून आपले काम करीत जाईन या अर्थी मनशी महम्मद इब्राहिम याचे (६४८-६४९); लाट व रांगोळी या गावासंबंधी भाऊ महाराज यांच्याबरोबर बोलणी झाल्याबाबत एल्फिन्स्टन याचे (६५१-६५२); बाळाजी बाजीराव चिटणीस याची रवानगी केल्याबद्दल, एल्फिन्स्टन याचे (६५६); कोल्हापूर येथील कंपनी सरकारचे अखबारनवीस यांचा वर्ग तासगावी होऊन त्याच्या जागी दुसरे अखबारनवीस पाठविले असल्यासंबंधी पो. एजंट याचे (६६२); कोकण प्रांतातील पळालेल्या कैद्यास शोधल्यासंबंधी ताकरीन याचे (६६३); प्रसिद्धगड व सोनगड बाबतच्या निवाड्यासंबंधी एचीसन याचे (६६४); छत्रपतींच्या इलाख्यातील चोर व दरोडेखोर लोकांच्या बंदोबस्तासंबंधी कमिशनर चॅपलीन याचे (६६५); चिकोडी तालुक्यातील गावासंबंधी पो. एजंट याचे (६६६); वेंगुर्लेहून मुंबईस जात असल्यासंबंधी एचीसन याचे (६६७).

**याद्या—**सरकारी कचेऱ्यासाठी कोल्हापुरात बांधावयाच्या इमारतीसंबंधी (१५६३६); कंपनी सरकारने छत्रपतींना पाठवलेल्या दागदागिने व वस्त्रे यासंबंधी (६७१).

**वतनपत्रे—**त्र्यंबकजीकाकास कर्नाटक प्रांती शिवछत्रपतींनी वतन करून दिल्यासंबंधी शिवाजी राजे याचे (१५६३७-६३८).

---

**ज. क्र. १०३, रु. क्र. १०३, पु. क्र. ३, का. सं. १५६८८-१५७५० (६३).**

**सु. स. १२०० ते १२२१, इ. स. १७९९-१८०० ते १८२०-२१.**

**कौलनामा—**कंपनी सरकारने बापू चिमणोजी निफाडकर यास डांगी घाटातील जकातीचा मक्ता दिल्याबाबत (१५७३६).

**पत्रे—**क्षेमसमाचारासंबंधी नागोजीराव घाटगे यास गोविंद बापूजी याचे (१५६८८); फत्तेमारी रवाना करण्याविषयी गव्हर्नर मुंबई यास नागोजीराव घाटगे याचे (७०४); नलदुर्ग येथील सरंजाम मिळण्याबाबत नवाब मुस्तगनी व नवाब तुरखशहा यास प्रीतीराव चव्हाण याचे (७०५); कामकाजे करून दोस्ती वृद्धिंगत करावी या अर्थी छत्रपतींचे लुई फर्नांडीस, निसबट इ. इंग्रज अधिकाऱ्यास (७०६-७०८); बाळाजी बाजीराव चिटणीस सविस्तर मजकूर सांगतील या अर्थी एल्फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (७२४); आबासाहेब छत्रपतीस पुत्र झाल्याबाबत (७२७); तसेच सौ. अंबिकाबाईस ऋतुप्राप्ती झाल्याबाबत पाठविलेली शर्करा पोचल्यासंबंधी सुंदराबाईस रॉबर्टसन याचे (७२८); आबासाहेब छत्रपतींच्या सिंहासनारूढ समारंभासंबंधी माहितीची यादी पाठविल्याबाबत ग्रांट यास सुंदराबाई यांचे (७४३).

**पत्रे—छत्रपतींकडून एल्फिन्स्टन यांस :** कामकाजे करून दोस्ती वाढवावी या अर्थी (१५७१०); कागल तालुक्याची जप्तीतून मोकळीक होण्याबाबत (७१२); सरलष्कर निंबाळकर यांच्या निजामशाहीतील सरंजामाबाबत (७१३); निपाणी ठाण्याचा बंदोबस्त नारायण घोरपडे, मानसिंगराव पाटणकर वगैरेंनी केल्याबाबत (७१४-७१५); आष्टे येथील निंबाळकर यांचे चौथाईचे वतन खालसा करण्याबाबत (७१६-७१७); सौ. अंबिकाबाई यांच्यासाठी सरंजाम पाठविल्याबाबत (७२२); दिनकर अप्पाजी यास बोलणी करण्यास पाठविल्याबाबत (७२३); इंग्रज व बाजीराव पेशवा यांच्यामधील लढाईबाबत (७२६); भाऊ महाराज, मोरो बाजीराव हे बोलणी करतील या अर्थी (७३१-७३२); कामकाजाची बोलणी करण्यास भाऊ महाराज यांना पाठविल्याबाबत (७४२); कामकाजाच्या थैल्या पाठविल्याबाबत (७५०).

### रुमाल क्र. १०३

### पुडके क्र. ३--(चालू)

**पत्रे—छत्रपतींकडून वेलस्ली यास :** रत्नाकरपंत राजाज्ञा यांस फौजेसह करवीर प्रांताच्या सरहद्दीवर पाठविल्यासंबंधी (१५६९१-६९२); निपाणीकर व तलूरकर यांच्या पुंडाईबाबत (६९३-६९४); नेरलीनजीक फौज रवाना केल्याबाबत (६९७-६९८); चिकोडी व मनोळी तालुके छत्रपतीस मिळण्याबाबत (७०१); पाटण्याहून परत जातांना करवीरास भेट देण्याबाबत (७०३); करवीर हद्दीत पटवर्धनाकडील पेंढारी लोक उपसर्ग करतात त्याच्या बंदोबस्ताबाबत (७२१).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना :** तोरगल तालुक्यातील गावास उपद्रव न करण्याबाबत नवाब मुल्केजहा यास (१५६८९); धोंडजी वाघ याच्या पाडावासंबंधी क. कॅंपबेल यास (६९९); कंपनी सरकारच्या कामास आलेल्या शामनाथ भटजीस सुरक्षितपणे पुण्यास रवाना केल्याबाबत कर्नल विल्यम क्लार्क यास (७००); घोडगिरीतील मुक्कामात वेलस्ली यांनी लक्ष्मणपंत यास दिलेली सनगे बाजी चवडो याने काढून घेतल्या प्रकरणी त्यास ताकीद केल्याबाबत कमांडर केटली यास (७०२); भरतगड किल्ल्यावरील शिबंदीच्या खर्चाच्या व्यवस्थेबाबत रसिडेंट सिंधुदुर्ग यास (७१९); सवालजबाबाच्या थैल्या देऊन भाऊ महाराज यांना पाठविल्याबाबत (७३०); रत्नागिरी प्रांताच्या सवाल जबाबाबाबतची थैली पाठविल्याबाबत (७३३); व पुण्याहून बंड करण्याच्या उद्देशाने येणाऱ्या लोकांच्या बंदोबस्ताबाबत पो. एजंट यास (७३४); चोर, दरोडेखोर यांच्या बंदोबस्ताकरिता कोकणचे घाटात चौक्या पहारे ठेवल्याबाबत ताकरीन यास (७३५); चोर आरोपी भिक्यामांग व सख्या हे येथे नसल्याबाबत ग्रांट यांना (७३७); करवीर हद्दींत होणाऱ्या चोऱ्यांच्या बंदोबस्ताबाबत कलेक्टर रत्नागिरी यास (७३८); करवीर हद्दीतील चोऱ्या दरोड्यांच्या बंदोबस्ताबाबत ताकरीन यास (७३९); कोकणात होणाऱ्या चोऱ्या व दरोड्यांचा बंदोबस्त केल्याबाबत कमिशनर चॅपलीन यास (७४०); तळगरे यथील जिवाजीराव शिर्के यास वतनासंबंधी त्याच्या भाऊबंदांकडून होणाऱ्या त्रासासंबंधी रेसिडेंट बाणकोट यास (७४१); कामकाजाचे उलगडे होण्यासंबंधी ताकरीन यास (७४५); भरतगडासंबंधीच्या तरतुदीबाबत, कृष्णराव यास (७४६).

**पत्रे—छत्रपतींस :** कंपनी सरकारशी झालेल्या कराराप्रमाणे वागण्यासंबंधी कर्नल वेलस्ली याचे (१५६९०); क्षेमसमाचारासंबंधी क. क्लार्क याचे (६९५); शिरगांवकर नागो शामराव यांचे इनामी गावांना उपद्रव न होण्याबाबत, वेलस्ली याचे (६९६); ३ रे शिवाजी यांच्या मृत्यूची वातमी कळून दुःख झाल्याबाबत कर्नल डौसचे (७०९); मालवणची पावती पोचल्यासंबंधी एल्फिन्स्टन यांचे (७११); आखबारीच्या कामावर बाबजी राम साठे याची नेमणूक केल्याबाबत एल्फिस्टन याचे (७२०); मोरो बाजीराव चिटणीस यांच्या खातरजमेविषयी एल्फिन्स्टन याचे (७२५); वाळवे गोटखिंडी येथील शेतकऱ्यांच्या लुटीप्रकरणी रामोशी लोकांचा तपास करण्याबाबत ग्रांट यांचे (७२९); गोकाक येथील परागंदा झालेल्या लोकांविषयी पो. एजंट यांचे (७४४); मसुरे रयतांच्या फिर्यादीचे निकाल लवकर लावण्याविषयी रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (७४७, ७४९).

**मसुदा—**करवीरकर ३ रे शिवाजी यांच्या मृत्यूसंबंधी शंभु छत्रपती यांनी एल्फिस्टन यास लिहावयाच्या पत्रासंबंधी (१५७१८).

---

**र. क्र. १०४, द. क्र. १०४, पु. क्र. १, का. सं. १५७५१-१५७८९ (३९).**

**सु. स. १२०० ते १२२९, इ. स. १७९९-१८०० ते १८२८-२९**

**यस्तक—**करवीरकरांचे वकील हनमंतराव याना म्हैसूरहून कोल्हापुरास जाऊ देण्याबाबत (१५७६८).

**पत्रे—नागोजीराव घाटगे यास :** धोंडजी वाघ यास पकडण्याबाबत आप्पूराव याचे (१५७५२-७५३); इंग्रजी लष्कर कागल मुक्कामी असल्याबाबत आप्पूराव याचे (७५४); धोंडजी वाघ यास पकडण्याकरिता मदत केल्याबाबत युटॉफ याचे (७५५).

रुमाल क्र. १०४

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—छत्रपतींकडून एल्फिन्स्टन यास** : कामकाजे सत्वर होण्याबाबत (१५७७३-७७४); यशवंतराव घाटगे यास तुळजापुरास जाण्यासाठी रहदारीचे दस्तक पाठविण्याबाबत (७७५); एल्फिन्स्टनच्या बंधूच्या मृत्यूच्या शोकसमाचाराबाबत (७७६).

**पत्रे—छत्रपतींकडून वेलस्ली यास** : कुरुंदवाडकर यांनी बाजारास गेलेल्या अटकाव करून ठेवलेल्या लोकांची मोकळीक होण्याबाबत (१५७५७); करवीर राज्यास पटवर्धनांकडून होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्ताबाबत (७५८); निपाणीकर यांच्याकडून खेड्यापाड्यांना होत असलेल्या उपद्रवाबाबत (७५९); तिमाजी भिमाजी याना बोलणी करण्यास पाठवल्याबाबत (७६०); कंपनी सरकारशी झालेल्या कराराप्रमाणे कामें सत्वर होण्यासंबंधी (७६१).

**पत्रे—छत्रपतींकडून इतरांना** : पेशवे व कंपनी सरकार यांच्यामध्ये प्रांत सालसीबाबत चाललेल्या तंट्यासंबंधी गव्हर्नर मुंबई यास (१५७६७); रामचंद्र रघुनाथ यास कामकाजे देऊन पाठविल्याबाबत कोटलेर बुटीस यास (७६९); हुजूर पागेकडील हरवलेल्या उंटांच्या शोधासंबंधी कर्नल मकजर यास (७७०); मुंबईहून पाठविलेल्या घड्याळाच्या माहितीसंबंधी बेसिस इमसबेल यास (७७९); मांचनूर महाल मालोजी घोरपडे याजकडे चालवण्याबाबत पो. एजंट यास (७८२); जगदगुरू करवीर व हुकेरीकर देशपांडे यामधील कमतनूर गांवाबाबतच्या तंट्यासंबंधी चॅपलीन यास (७८४); झुंझारराव घाटगे यास बोलणी करण्यासाठी पाठविल्याबाबत जेंकीन यास (७८५); इंग्रजी मुलुखांतील बंडवाले लोकांना पकडण्यासंबंधी ताकरीन यास (७८६); कंपनी सरकारच्या मुलुखांतील पळून गेलेल्या चोरांना पकडण्याबाबत ताकरीन यास (७८७).

**पत्रे—छत्रपतीस** : कंपनी सरकारबरोबर दोस्ती करण्यासंबंधी मेजर मालकम याचे (१५७५६); पूर्वीचे करार पाहून कंपनी सरकारची दोस्ती वाढवावी याअर्थी कर्नल क्लोज याचे (७६२); रामचंद्र परसराम पटवर्धनांच्या मुलुखास उपद्रव न देण्याबाबत कर्नल क्लोज याचे (७६३); कोंबडी खरेदीस गेलेल्या कंपनीच्या शिपायास हलकणकरानी मारहाण केल्यासंबंधी जेम्स स्मिथ याचे (७६४); युवराज संभाजी याच्या विवाहाचे आमंत्रण पोचल्यासंबंधी लेप्टनंट नॉक्स याचे (७६५); पटवर्धनानी चिकोडी तालुक्यांतील ठाणे घेतल्यासंबंधी कर्नल क्लोज याचे (७६६); त्र्यंबकराव आवजी व इब्राहिमखान वकील यांच्याकडून सर्व मजकूर समजल्यासंबंधी जॉन व लुई फर्नांडीस यांची (७७१-७७२); क्षेमसमाचारासंबंधी कर्नल डौस याचे (७७७); मुंबईहून घड्याळ पाठविल्याबाबत रेसिडेंट सिंधुदुर्ग याचे (७७८, ७८०); पेशवे व कंपनी सरकार यांच्यामध्ये चालू असलेल्या जावसालासंबंधी एल्फिन्स्टन याचे (७८१); करवीरांत असणाऱ्या गोकाककरांकडील लोकांबाबत टाकरीन याचे (७८८).

**पावती**—छत्रपतींकडून सदाशिव व बाजी नाईक यास मिळालेल्या नुकसानभरपाईबाबत (१५७८९).

**फर्मान**—तोरगल व मनोळी तालुक्यास गनीमाकडून उपद्रव होऊ न देण्याबाबत नवाब मुल्केजहा यास छत्रपतींचे (१५७५१).

**यादी**—छत्रपतींनी एल्फिन्स्टन यास पाठविलेली वस्त्रे व जवाहीर यासंबंधीची (१५७८३).

---

**र. क्र. १०४, द. क्र. १०४, पु. क्र. २, का. सं. १५७९०-१५८३८ (४९).**

**सु. स. १२०० ते १२२७, इ. स. १७९९-१८०० ते १८२६-२७.**

**जाहीरनामा**—कंपनी सरकारची नाणीं घेऊन लष्करास धान्य इ. देण्याबाबत कंपनी सरकारचा (१५८०१).

**पत्रे**—धोंडजी वाघचे पारिपत्य करण्याबाबत करवीरकरांनी करावयाच्या मदतीसंबंधी, कर्नल वेलस्ली यास झुंझारराव (नागोजीराव) घाटगे याचे (१५८००); पेशव्यांच्या मदतीस जाणाऱ्या इंग्रजी फौजेस अडथळा न होण्याबाबत नारायणराव पाटणकर यास वेलस्ली याचे (८०४);

**रुमाल क्र. १०४**

**पत्रे**—(चालू) **पुडके क्र. २**—(चालू)

कोल्हापूर संस्थानावर मेहेरबानी ठेवण्यासंबंधी कर्नल क्लोज यांस वेलस्ली याचे (१५८१०); करवीरकरांचे वकील हणमंतराव यांना म्हैसूरहून कोल्हापुरास जातांना सहाय्य करण्यासंबंधी तालुकेदार, किल्लेदार इ. अधिकाऱ्यांस मडी पुर्णय्या याचे (८१५); आपल्याकडील मजकूर छत्रपतींना सांगितल्यासंबंधी मत्रजर यास नारायणराव रत्नाकर व दिनकरराव गायकवाड याचे (८१७); छत्रपतींची कामकाजे सत्वर करण्याविषयीं रामचंद्रराव पंडित याचे एल्‌फिन्स्टन यास (८१९); कामकाजाचे उलगडे सत्वर करून पाठविण्याविषयी स्वरुपजी क्षीरसागर यास सुंदराबाई यांचे (८२०); अंडी व कोंबडीचे खाद्यपदार्थ पाठविल्यासंबंधी एल्‌फिन्स्टन यास सुंदराबाई यांचे (८२२); आलतफनामा पोंचल्याबाबत सुंदराबाई यांना पो. एजंट चॅपलीन याचे (८२६); आबासाहेब छत्रपतीस पुत्रप्राप्ती झाल्यासंबंधी सुंदराबाई यांना ग्रांट याचे (८२८); बेळगांवहून साताऱ्यास जाणाऱ्या इंग्रजी पलटणीस मदत करण्यासंबंधी करवीरकरांच्या वकीलास पो. ए. यांचे (८३२); सिताराम दातार याची इनाम जमीन त्याजकडे चालवण्यासंबंधी पो. ए. याचे करवीरकर यांच्या वकीलास (८३३).

**पत्रे—छत्रपतींकडून एल्‌फिन्स्टन यास :** आपल्या कार्यभागाविषयी दिनकरराव गायकवाड सांगतील याअर्थी (१५८१६); निपाणकर वगैरेच्या बंदोबस्तासाठीं इंग्रजी फौज पाठविण्याबाबत (८२१); निपाणीकरानी करवीर प्रांतातील वसूल नेल्यासंबंधी (८२३); कंपनी सरकारच्या कर्जाऊ ऐवजाच्या फेडीसंबंधी (८२५); करवीर राज्याचा अभिमान धरण्यासंबंधी (८२९-८३०).

**पत्रे—छत्रपतींकडून वेलस्ली यास :** भेटीस करवीरी येण्याबाबत (१५८०२); सुबराव घाटगे यास फौजेसुद्धा बंदोबस्तास राहणेस आज्ञा केल्याबाबत तसेच कामकाजे सत्वर होण्याबाबत (८०५); कराराप्रमाणे नोकर लोकांना वागविण्याबाबत (८०७); निपाणीकरांनी व तलूरकरांनी मनोळी व चिकोडीची ठाणीं न दिल्याबाबत (८०८); पुण्यास होणाऱ्या भेटीबाबत कळविल्यासंबंधी (८०९); रामचंद्र परशराम यांनी केलेल्या नुकसानीबाबत तसेच घोंडजी वाघ यास पकडण्याविषयी (८३६-८३७).

**पत्रे—छत्रपतींची इतरांना :** क्षेमसमाचारासंबंधी नवाब मुलकेजहाँ यास (१५७९०); कराराम्याची यादी मिळाल्याबाबत गव्हर्नर मुंबई यास (८१२); क्लिमिंग्टन याजकडून ऐवजाचा उलगडा करून घेवून त्यास बडतर्फ करीत असल्यासंबंधी कर्नल क्लोज यास (८१३-८१४); कामाच्या थैल्या पोचल्याबाबत कर्नल मत्रजर यास (८१८); मालोजीराव घोरपडे याच्याकडील ठाण्याच्या बंदोबस्ताबाबत पो. एजंट चॅपलीन यास (८२७); फरारी मांग आरोपीस पकडण्यासंबंधी, ग्रांट यास (८३४); सेनाखासखेल यांच्याकडून सर्व मजकूर समजेल याअर्थी थॉमस मन्रो यास (८३८).

**पत्रे—छत्रपतीस वेलस्ली याची :** घोंडजी वाघचे पारिपत्य करण्यास गेलेल्या फौजेस करवीरकरांच्या फौजेने उपद्रव केल्याबाबत (१५७९४, ७९६); घोंडजी वाघ यास ठार मारल्यासंबंधी (७९७); मनोळीचे किल्लेदाराने इंग्रज फौजेवर दारुगोळा सोडल्यासंबंधी (७९८–७९९); मोरो बाजीराव पटवर्धन हे पेशवे यांचे नोकर असल्याने ते त्यांच्या हुकुमाप्रमाणे वागतील याअर्थी (८०३); तारदाळ, हदोळी व जांवळी या गांवांना उपद्रव न देण्यासंबंधी (८०६).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** कर्नल वेलस्ली यास थैल्या पाठविल्यासंबंधी मोरो महादेव याचे (१५७९१–७९३); सिदोजीराव नाईक निंबाळकराशी असलेला तंटा तडजोडीने मिटवण्याबाबत कर्नल क्लोज याचे (८११); कंपनी सरकारकरिता साग वगैरे जिन्नस खरेदी करण्यास आलेल्या लोकांस रहदारी व जकात याबाबत अटकाव न करण्याविषयी रेसिडेंट सिंधुदुर्ग यांचे (८२४); प्रसिद्धगडच्या मामलेदाराने अटकेत ठेवलेल्या ब्राह्मणांस सोडण्याबाबत पुरुषोत्तम भट याचे (८३१); चिकोडीकर देसाई यांच्या येलीमनोळी या इनाम गांवाबाबत चाललेल्या खटल्यासंबंधी पो. ए. यांचे (८३५).

---

**ब. क्र. १०४, रु. क्र. १०४, पु. क्र. ३, का. सं. १५८३९-१५९१२ (७४).**

**सु. स. १२०२ ते १२२६, इ. स. १८०१०२ ते १८२५२६.**

**आज्ञापत्रे**—गहाण ठेवलेले दागिने परत करण्यासंबंधी नरहर व सदाशिव कोडोलीकर यास छत्रपतींचे (१५८६९); गांवकामगार कडलगे यास एकसाळी मखलासी ऐवज पाठवून देण्याबाबत छत्रपतींचे (८७९); परशराम जनार्दन यास कुरुंदवाडकराची गुरें त्याजकडे सोडून देण्याबद्दल छत्रपतींचे (८८०); गांवोगांवचे ठाणदार व चौकीदार यास पो. ए. बवर घारवाडहून सातान्यास जातेवेळीं ज्या ज्या ठिकाणी वस्तीस राहतील तेथे चौकी पहारा वगैरेचा बंदोबस्त ठेवण्याबाबत (८८४); आकुरले ता. शिरोळे येथील हिशेबाचे रुमाल घेऊन पेठयाकडे सरुडचे मुक्कामी येण्याबाबत गांवकामगार यास हिंदूराव गायकवाड याचे (८८६); लिंबारी पोवार यास, हलकर्णी येथील रयतानी कुरणांत जमीन व विहीर काढली त्यास अडथळा न करणेबाबत राजमंडळाचे (८८७); मेजर टोबीस कऱ्हाडास जातांना त्याच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यासंबंधी गांवकामगार कोडोली यास छत्रपतींचे (८८९); गांवकामगार वरणगे यास सरदेशकुलकर्ण हक्काची रक्कम सुरळीत देण्याबाबत राजमंडळाचे (८९३); दिनकर गायकवाड यास सखाराम पानारी याचा जामीन कतबा पाठवण्याबाबत छत्रपतींचें (९०७).

**पत्रे**—कर्नल विल्यम क्लार्क यांची भेट घेऊन त्यांना थैल्या सादर केल्याबाबत नागोजीराव घाटगे यास बाळाजी सखाराम याचे (१५८४७); करवीरी सत्वर निघून येण्याबाबत देवी नाईक यास नागोजीराव घाटगे याचे (८५१); चिंतामण पांडुरंग यांनी सांगली मुक्कामी छत्रपतींच्या लष्करास उपद्रव केल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास जगद्गुरु मठ करवीर यांचे (८५६); पेशवे व करवीरकर यांच्यामधील सरहद्दीच्या तंटयासंबंधी कर्नल डौस याचे (८५८); घोंडजीराव नाईक निंवाळकर यास त्यानी पाच हजार कर्जापैकी ३१०० रुपये दिलेबाबत मल्हार बाळाजी खासनीस व जिवाजी गिरमाजी यांचे (८६५); मुंडवाड येथील बैल वगैरे जनावरें परत दिल्याबाबत मलगौडा पाटील यास परशरामपंत भाऊ यांचे (८६६-८६८); करवीरी पाठवण्यासाठी फणस जमा करणेबद्दल हिंदूराव गायकवाड याचे भाण, उंचण इ. गांवच्या गांवकामगार यांना (८७१); गुरव लोकांकडून पत्रावळी जमा केल्यासंबंधी हिंदूराव गायकवाड यास, पेरिड, शिरगांव इ. गांवाचे गांवकामगार यांचे (८८१); यंकनमुर्डीकडील ऐवजाच्या तगाद्यासंबंधी भैरोबा हुजरे यास आण्णाजी गणेश व आंबाजी रामचंद्र यांचे (८८२); इसु पन्हाळकर व आपाजी धावड यास दागिने घेऊन येणेबद्दल (८८३); सरुड मुक्कामी निघून येण्यासंबंधी गांवकामगार नेरले यांना (८८५); भेडसगांवचे हिशेबाचे रुमाल घेऊन सरुड मुक्कामीं आलेल्या ओंगला, मगदूम वगैरे लोकांस मसाला देण्याबाबत गांवकामगार भेडसगांव यास हिंदूराव गायकवाड याचे (८८८); श्राद्धास येण्याबद्दल हिंदूराव गायकवाड यास भवानराव निकम देशमुख याचे (८९०); सांबू ता शिरोळ येथील हिशेबाचे रुमाल पेठयाकडे घेऊन आलेल्या लोकांस मसाला देण्याबाबत गांवकामगार सांबू यास हिंदूराव गायकवाड याचे (८९१); हिंदूराव गायकवाड यास नाडगोंडाच्या जमिनीच्या वहिवाटीसंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (८९२); हिंदूराव गायकवाड यास मल्हारपंत भाऊ याचा लखोटा पाठविल्यासंबंधी घोंडजीराव नाईक निंबाळकर याचे (८९४); सरुड इ. गावांचे नकाशे तयार करण्यासंबंधी बाबाजीपंत वाघुर्डेकर यास, मल्हार यशवंत याचे (८९५); विठोजी जावव हुजरे यास नाथाजी पाटील वाडी चरण यास उपद्रव न करण्याबाबत मोरोबा फणसे यांचे (८९६); विठोजी जाधव हुजरे यास गांवोगांव रोखे केले असल्यासंबंधी राणोजी भोसले व मार्तंड व्यंकाजी यांचे (८९७); पोखले, गिरोली इ. गांवांवर पाठवलेल्या रोख्यासंबंधी विठोजी जाधव यास महादजी निकम याचे (८९८); विठोजी हुजरे व बाळाजीपंत दादा यास चावरेकर गांवकर यास गायकवाड यांनी कामासाठी ठेवून घेतल्याबद्दल व्यंकटराव भोसले यांचे (८९९); तसेच हिंदूराव गायकवाड याचे (९००); दिलेल्या भांड्यापैकी एक भांडे फुटके निघाल्यासंबंधी विठोजी जाधव व बाबाजीपंत यांना कृष्णाजी अनंत याचे (९०१); गांवकामगार उंचज यास करवीरीं फणस पाठविण्यासंबंधी हिंदूराव गायकवाड याचे (९०२); नूल येथील शिबंदीबाबतच्या वसुलासंबंधी भैरोबा हुजरे यास आण्णाजी गणेश व आंबाजी रामचंद्र यांचे (१५९०३-९०४); घोंडबा नाना यास, वरातदाराकडून होणारा तगादा बंद करण्याबाबत, आण्णाजी गणेश व आंबाजी रामचंद्र यांचे (९०५); आंबाजीराव आबासो

रुमाल क्र. १०४

पुडके क्र. ३—(चालू)

पत्रे—(चलू)

यास शंभु पिरखानी रुपये ४३ पाठविलेबावत रामाजी महादेव याचे (९०६); धोंडबा नाना यास क्षेमसमाचारासंबंधी (९०८); पंडित व वैदिक मंडळींच्या जमिनी पडवजा करून गांव शिरस्तेप्रो वसूल घेण्यासंबंधी आंबाजी राव यास आण्णाजी गणेश व आबाजी रामचंद्र यांचे (९०९); पो. ए. यास पाठवलेली थैली दिवाण यांनी मागून घेतल्यासंबंधी (९१०); भरतपूरचा किल्ला सर करण्याच्या इंग्रजांच्या प्रयत्नाविषयी छत्रपतीस कॅप्टन थॉमस सिडन्हॅम याचे (९१२).

पत्रे—छत्रपतींकडून : संभाजी राजे यांच्या विवाहास हजर राहण्याबाबत (१५८३९); करवीरी भेट देण्याबावत (८४२); वारणा नदीकडील बंडवाल्यांच्या पारिपत्यासाठी करवीरकरांच्या फौजा रवाना झाल्याबावत (८४३); सरहद्दीस आलेल्या इंग्रजी पलटणीकडून करवीर राज्यास उपसर्ग होऊ न देण्याबावत ग. जनरल वेलस्ली यास (८५०); निपाणीकर व तलूरकर यांच्या बंदोवस्ताविषयीं कॅ. वेल यास (८५२); कामकाजें देऊन भाऊमहाराज, यांना पाठविण्याबावत (८५३); चिकोडी व मनोळी तालुक्यांच्या प्रकरणी न्याय देण्यावावत तसेच वाडीकर सावंत यांनीं जबरीने भरतगड घेतल्यासंबंधी (८५४-८५५); भाऊ महाराज व मोरो बाजीराव चिटणीस यांना बोलणी करण्यासाठी पाठवल्यासंबंधी (८५७); सन्मानार्थ पोषाख जवाहीर पाठवल्यासंबंधी एल्फिन्स्टन यास (८५९); कुरुंदवाड येथे झालेल्या चोरीची चौकशी सुरु असल्याबावत पो. ए. यास (८६१); दाजी गोपाळ निलजीकर याचे वतन जप्त केल्यावावत ताकरीन यास (८६२); विजापूर व विदर, हैद्रावाद इ. कडील वादशहा वगैरे संबंधीची फर्माने वखरी इ. कागदपत्र पाठवण्यासंबंधी ग्रांट यास (८६३); रेठरेकर पाटील सरुपजी मोहिते याची मुलगी वाळोजी मोरे याच्या मुलास देण्याप्रकरणी ग्रांट यास (८६४).

पत्रे—छत्रपतींस वेलस्ली यांची : चिकोडी वगैरे प्रांतांच्या बंदोबस्तासाठी इंग्रजी लष्कर पाठविल्यावावत (१५८४०); नवे वकील अद्याप आपणांकडे पोंचले नसल्यावावत (८४१); पटवर्धन, नेर्लीकर, इचलकरंजीकर इत्यादींना खटले न करण्यावावत सांगितल्यासंबंधी (८४४-८४५); क्षेमसमाचारासंबंधी (८४६); इंग्रज अधिकाऱ्यावरोबर रामराव यास कुरुंदवाडास पाठविल्याबावत (८४८); छत्रपतींच्या फौजेने शिराळे प्रांतांत लुटालूट केल्यावावत (८४९).

पत्रे—छत्रपतींस इतरांची : मोरो बाजीराव व बापूजी शिवराम यानी सर्व मजकूर निवेदन केल्यासंबंधी एल्फिन्स्टन याचे (१५८६०); बंटमूरकर दसाई याने नागावा केल्यासंबंधी गांवकामगार मांगूर याचे (८७०); तागाची जरुरी असल्यासंबंधी महंमद इब्राहिम परकार याचे (८७८); आईसाहेब व नागोजीराव घाटगे यांच्या प्रकृतीविषयीं कर्नल क्लार्क याचे (९११).

यादी—नेजेचे ठाणें घेतांना ठार व जखमी झालेल्या लोकांसंबंधी (१५८७२–८७७).

---

ज. क्र. १०५, रु. क्र. १०५, पु० क्र. १, का. सं. १५९१३–१५९६० (४८).

सु. स. १२२० ते १२३८, इ. स. १८१९-२० ते १८३७-३८.

पत्रे—गोमांतकी आंबे पाठविल्यासंबंधी आईसाो यांना मोरेश्वर सुवराव याचे (१५९१६); पोंभुर्ले येथील ऐवज पूर्वीप्रमाणेच चालवण्यावावत दिनकरराव गायकवाड यास रघुनाथराव आमात्य याचे (९१९); आसंडोली येथील भिवाजी पाटील याच्या चौकशीसाठी नेमलेल्या पंचायती प्रकरणी पंत आमात्य यास हैवतराव गायकवाड याचे (९३७-९३८); गगनगड येथें आमात्यांची भेट घेतल्यावावत आनंदराव मंत्री यास दिनकरराव गायकवाड याचे (९३९); करवीराहून बावडा येथे येऊन पोचल्यावावत पंत आमात्य यास अप्पाजी बल्लाळ याचे (९४५); हुजूरची आज्ञापत्रें पोचल्यासंबंधी आवाजीपंत यास मोरेश्वर सुवराव याचे (९५२); हुजूरची आज्ञापत्रें पोचल्यासंबंधी नारायणराव पाटणकर यास मोरेश्वर सुवराव याचे

## रुमाल क्र. १०५

### पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—(चालू)

(१५९५३); मोरेश्वरराव पंडीत यांच्याकडील बाकीचा ऐवज जप्त झाल्याबाबत सुंदरखान यांना आबासाहेब व बुवासाहेब छत्रपतींचे (९५४); रामचंद्र गुंडो ढोलतील तो मक्ता हुजुरच्या कामाकर घालण्याबाबत आबाजीपंत यास मोरेश्वर सुबराव यांचे (९५५); बेळगांवात हिशेबाचे कागदपत्र घेऊन गेलेल्या लोकांसंबंधी दिनकरराव गायकवाड यास मार्तंडराव खोपडे यांचे (९५६); पोंभुर्ले येथील ऐवजाच्या वाटणीबाबत दिनकरराव गायकवाड यास रामचंद्रराव मानराव यांचे (९५८).

**पत्रे : छत्रपतींस मोरेश्वर सुबराव यांची**—ता तारळे येथील बनगर लोकांकडील हिशेब घेण्यासंबंधी (१५९१८); दिगस येथील बबाजी पाटील यास सोडून देण्यासंबंधी (९२०); जावळात उठावण्याचे काम होताच शिवाजी देसाई यास गांवी पाठवीत असल्याबाबत (९४१); निरनिराळ्या गांवावरील रोख्यांच्या ऐवजासंबंधीची माहिती अनंतशास्त्री सांगतील याबद्दल (९४६); कोतेकर पाटील यांचे पत्र त्यास परत केल्याबाबत (९५०); छत्रपतींसाठी फणस पाठविल्याबाबत (९५१).

**पत्रे : छत्रपतींस इतरांची**—नरसदवडे येथील वसुलाबाबत, (१५९१३); गोकाकी डाळिंबे पाठविल्यासंबंधी गोविंदराव मोरेश्वर यांचे (९१४); राजाराम भगवंत यास पाठविल्यासंबंधी नारायणराव नीलकंठ यांचे (९१५); लष्करासाठी सामान घेऊन गेलेल्या बैलांना परत करवीरी पाठवून देण्याबाबत, सुंदराबाई यांचे (९१७); चि. गंगाबाईच्या विवाहास येण्याबाबत बाळाजी नारायण यांचे (९२१); तिळगूळ मिळाल्याबाबत गंगाधरराव गोविंद यांचे (९२२); भुदरगड व सामानगड येथील ऐवजाच्या वसुलीसंबंधी भगवंतराव आबाजी प्रतिनिधी यांचे (९२४); केशवराव याच्या व्रतबंध समारंभास येण्यासंबंधी रघुनाथराव केशव यांचे (९२५); बाळाजीपंत हे आपल्याकडील वृत्तांत निवेदन करतील यासंबंधी त्रिंबकराव गणपत यांचे (९२६); किल्ले गगनगड येथील हिशेबासंबंधी रामराव बळवंत देशपांडे यांचे (९२७, ९२८); तिळगूळ मिळाल्यासंबंधी रघुनाथराव नीळकंठ यांचे (९३४); तिळगूळ पाठविल्यासंबंधी रघुनाथराव केशव यांचे (९३५); कानोली व इंदापूर येथून आणावयाच्या इमारतीच्या लाकडावर जकात न घेण्याबाबत त्र्यंबकराव गणपत यांचे (९३६); विशाळगडाकडील ऐवजाच्या वसुलाबाबत, बहिणाबाई यांचे (९४०); रामचंद्रपंत यास पाठविल्याबाबत (९४३); छत्रपतींसाठी नामे पाठविल्याबाबत, (९४३); मातोश्रींच्या महायात्रेसंबंधी गोविंदराव मोरेश्वर यांचे (९४४); सालसी महालाकडील जावसालाची यादी पाठविल्याबाबत *(९५७); आज्ञापत्रे पोचल्यासंबंधी नारायणराव घोरपडे यांचे (९५९); हरवलेला उंट गायकवाड यांजकडून आपणास परत मिळण्याबाबत चिमाजी सितोळे यांचे (९६०).

**मसुदा**—मोरेश्वरराव आमात्य यांचे सरदेशमुख हक्क, इनामगावें वगैरे बाबतींत गव्हर्नर मुंबई यांस छत्रपतींनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (१५९४७-९४९).

**याद्या**—सरवंदळे, रेठरे इ. गावांसंबंधी छत्रपतींकडून आमात्यांच्या होऊन यावयाच्या कामासंबंधी (१५९२३); नुकसानभरपाईबाबत इंग्रजाकडे लावून दिलेल्या तालुक्यासंबंधी (९२९-९३३).

---

**ज. क्र. १०५, रु. क्र. १०५, पु. क्र. २, का. सं. १५९६१–१६०२१ (६१).**

**सु. स. ११९६ ते १२४५, इ. स. १७९५-९६ ते १८४४-४५.**

**पत्रे**—गांवगन्नास गेलेल्या वरातदाराना परत बोलावण्यासंबंधी पंत अमात्य यास रत्नाकर राजाज्ञा यांचे (१५९६१); रद्दकर्जाच्या ऐवजाबाबत, बोंडजीराव नाईक यास मोरेश्वर सुबराव यांचे (९६४); आबा पुरंदरे महालक्ष्मीच्या दर्शनास करवीरी येत असल्याबाबत दिनकरराव यांचे (९६९); कै. भवानराव बेडकीहाळकर यांच्या पत्नीस दिराचा मुलगा दत्तक घेण्यास परवानगी देण्यासंबंधी सदाशिव रामचंद्र यांचे (९७०-९७२); श्रीचा (महालक्ष्मीचा) उत्सव होताच केशवराम गवई यास पाठवून देण्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यास रघुनाथराव केशव यांचे '(९७४); वारदेशकराकडील ऐवजाच्या वसुलीसंबंधी छत्रपतीस रघुनाथराव गोविंद अमात्य यांचे (९७५); हरि रामचंद्र मराठे याच्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्यासंबंधी दिनकरराव गायकवाड यांस लक्ष्मीबाई व अंबिकाबाई अमात्य यांचे (९८२); पंत अमात्य यांच्या प्रकृतीसंबंधी रामचंद्रपंत बाबाजी वाईंगणकर

रुमाल क्र. १०५

पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे**—(चालू)

यांस दिनकरराव गायकवाड यांचे (१५९८३); पत्राप्रमाणे सामान पाठविण्याबाबत गोविंदराव गायकवाड यास दिनकरराव गायकवाड यांचे (९८५); माजनाळ येथें ऐवजा-करितां आलेल्या वरातदारांना मनाई करण्यासंबंधी जमनाबाई अमात्य यांना मुबराव कृष्ण अमात्य यांचे (९९१); सीता व सुवासानी यांच्या खटल्यासंबंधी आईसो यास गणपतराव कोल्हर यांचे (१६००४); सुपाचे गावाच्या वहिवाटीसंबंधी दिनकरराव गायकवाड यांस अमृतराव भगवत प्रतिनिधी यांचे (०१०); ठाणे साळवण गणपतराव हणमंत यांजकडे दिल्या-बाबत दिनकरराव गायकवाड यास शामराव देशपांडे यांचे (०११); बावडा येथील हिशोबाची चौकशी चालू असल्यासंबंधी आप्पासाहेब गायकवाड यास रावजी शिवाजी यांचे (०१४); खारेपाटन व साळशीच्या नदीवर सरसुभेदार जनावसुद्धा आले असल्यासंबंधी बन्याजीपंत यास लक्ष्मण बल्लाळ यांचे (०१५); राशिवडे येथें होणारा पंत अमात्य यांचा मुक्काम रहित झाल्यासंबंधी आप्पासाहेब गायकवाड यास नरोजी कदम यांचे (०१६); मैनाबाईच्या लग्नास पुण्यास सरंजाम पाठविण्याबाबत जीवराव जाधव यास गोविंदराव मोरेश्वर यांचे (०१७); हिशेबाचे कागद करवीरी घेऊन येण्याबाबत व रक्कम पाठवून देण्याबाबत, दिनकरराव गायकवाड यास सिताराम विठ्ठल नाईक यांचे (०१८-०१९); कळवडे कोदवडे वगैरे ठिकाणी राशीवडे येथील स्वारांनी केलेल्या दंग्याबाबत दिनकरराव गायकवाड यास रघुनाथराव अमात्य यांचे (०२१).

**पत्रे—छत्रपतीस गोविंद मोरेश्वर याची :** केळी वगैरे फळफळावळ पाठविल्याबाबत (१५९७७, ९८० ९९६); मद्य व अननस पाठविल्यासंबंधी (९७८); क्षेमसमाचारासंबंधी (९७९); आज्ञेप्रमाणे खुनी आरोपी संकु-डाकवे यास पाठवून दिल्यासंबंधी (९८१); करवीरी येत असल्यासंबंधी (९९३); मकर संक्रमणाचे तिळगूळ पाठविल्यासंबंधी (९९४); फणसपोळी पाठविल्याबाबत (९९५).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची :** कानकाजासंबंधी माहिती देण्यासाठी रामचंद्र गुंडो यास पाठविल्याबाबत मोरेश्वर सुबराव यांचे (१५९६२); रामचंद्र गुंडो व अंताजी बाबूराव यांच्या बावडा संस्थानच्या गैरकारभारासंबंधी भीमराव भास्कर यांचे (९६३); गांवगन्नाकडील हिशेब वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांना सादर केल्याबाबत रामचंद्र मल्हार यांचे (९६५); श्रींच्या (रामनवमीच्या) उत्सवासाठी पोषाख व हत्ती पाठविण्याबाबत रघुनाथराव गोविंद यांचे (९६६); आळ्यासंबंधी पूर्वी दिलेला ऐवज परत मिळण्यासंबंधी विश्वासराव पटवर्धन यांचे (९६७, ९६८); फणस पाठविल्यासंबंधी मोरेश्वरराव रामचंद्र यांचे (९७६); ऐवजाच्या वसुलासाठी आलेले वरातदार दंगा करीत असल्याबाबत गांवकामगार कावळवाडी यांचे (९८४); हत्तीचा दात पाठविल्याबाबत, रघुनाथराव गोविंद यांचे (९८६); मौजे पेरिड गांवास मलकापूरच्या लोकांकडून उपद्रव न होण्यासंबंधी माधवराव भगवंत प्रतिनिधी यांचे (९८७, ९८९); नारायणराव पाटणकर व आबाजीपंत हे वृत्तांत निवेदन करतील याअर्थी मोरेश्वर सुबराव यांचे (९९०); केसोपंत हे आपल्याकडील वृत्तांत निवेदन करतील याअर्थी (९९२); चोर व दरोडेखोर लोकांच्या बंदोबस्तासंबंधी (९९७); आंबे, फणस, सांबराचे कातडे इत्यादी जिन्नस पाठविल्यासंबंधी मोरेश्वर सुबराव यांची (१५९९८-१६००२); नेरले व आरळे या गांवाच्या दुतर्फा वहिवाटीसंबंधी अमृतराव भगवंत प्रतिनिधी यांचे (००३); नदीस पाणी आल्याने नावेस बांधलेल्या मुटून गेलेल्या फळया व वेळू यासंबंधी त्र्यंबकराव रघुनाथ राव यांचे (००५); बोरबेट व लखमापूर येथील वसुलासंबंधी (००८); ठाणें, साळवण वगैरे बाबतचे हक्क पूर्वापार चालवण्यासंबंधी, मोरेश्वर सुबराव यांचे (००९); आबा पुरंदरे यांची करवीरी राहण्याची सोय करण्याबाबत दिनकरराव यांचे (०१२); भीमाजीपंत व अंताजीपंत विशाळगडास गेल्यासंबंधी दिनकर आप्पाजी यांचे (०१३); मौजे रेंदाळ व कारदगे यामधील सीमा तंट्याच्या चौकशीबाबत आप्पाजी गोविंद यांचे (०२०).

**याद्या**—पंत अमात्य बावडेकर घराण्यातील स्त्रियांच्या नांवे असलेल्या सरंजामासंबंधी (१५९७३); बाळकृष्ण शेट पायरे खासगी मामलत्याकडील गांवे इत्यादीबाबत प्रतिनिधीकडून जलगडा होऊन यावयाच्या कामासंबंधी (१६००६-००७).

---

अ. क्र. १०५, र. क्र. १०५, पु० क्र. ३, का. सं. १६०२२-१६०७४ (५३)

सु. स. १२१३ ते १२३७, इ. स. १८१२-१३ ते १८३६-३७.

**अर्ज**—रायोजी पारगांवकर यास साळवणकर देसाई याच्या अटकेतून सोडण्याबाबत पंत अमात्य याजकडे बापु पारगांवकर याचा (१६०३५); नानासाहेब पाटणकर व हिंदुराव बाबासाहेब यांच्याकडून होणाऱ्या उपद्रवाबाबत राधाबाई घोरपडे यांजकडून छत्रपतींस (०४६).

**टिप्पण**—दुसरी याद यशवंतराव घाटगे यांच्या अंमलाखाली किती वर्षे होता त्यासंबंधी (१६०६१); रामचंद्र सुबराव इत्यादी अमात्यांनी छत्रपतीस दिलेल्या नजराण्यासंबंधी (०६२).

**पत्रे**—कोकिनरे गावात होत असलेल्या उपद्रवासंबंधी आप्पा भटजी व मोरोपंत आबा यांना महिपत हैबतराव याचे (१६०२५); राघो रामचंद्र हे इकडील वृत्तांत निवेदन करतील याअर्थी नारायणराव पाटणकर यांस मोरेश्वर सुबराव याचे (०२९); पाठविलेले पत्र व आंबे पोचल्याबाबत सैद महम्मद पीरजादे यास सुबराव पंडित अमात्य यांचे (०३२); आपल्या जामिनकीचा उलगडा होईपर्यंत कर्जदाराकडून उपद्रव होऊ न देण्याबाबत दिनकरराव गायकवाड यास रामराव देशपांडे याचे (०४०); शालजोडी व पागोटे पाठवून देण्याबद्दल आनंदराव मंत्री यास दिनकरराव गायकवाड याचे (०४१); ऐवजाच्या वसुलाबाबत यांवकानगार चिचणी, बरनाळ व गव्हाण यांना बाळाजी महादेव याचे (०५९); भोसरे गावाच्या वहिवाटीसंबंधी देशमुख व देशपांडे प्रांत खटाव यांना वासुदेव पंडित यांचे (०६०). खडाळे मुक्कामी गव्हर्नरची भेट घेत असल्याबाबत बाबासाहेब पाटणकर यास दौलतराव घोरपडे याचे (०६३); इचलकरंजीकर व नेसरीकर यांच्या खटल्यासंबंधी सुंदराबाई यांना भाऊ महाराज यांचे (०६४-०६५); सरकारी खातातर्फे आणण्यात येत असलेल्या विडयाच्या पानावर जकात न घेण्याबाबत दिनकरराव गायकवाड यांस बापूजी नारायण याचे (०६६); हेदवड येथील पळून गेलेल्या महाराचा शोध करण्याबाबत हैबतराव गायकवाड यास सुबराव कृष्ण अमात्य यांचे (०६७); पंत अमात्य यांच्या प्रकृतीसंबंधी दिनकरराव गायकवाड यास रामचंद्र गुंडो व अंताजी बाबूराव यांचे (०६९); वाळवण येथे पाटलाच्या अटकेत असलेल्या बादू नाळ्याच्या सुटकेबाबत दिनकरराव गायकवाड यास शंकर नलवडे याचे (०७१); छत्रपतींशी निष्ठेने वागण्याबाबत नानीबाई घाटगे यांना बॅटसीन याचे (०७२); कोकिनरे गावाची राघो चिदरकर यांच्या जप्तीतून मोकळीक होण्याबाबत दिनकरराव गायकवाड यांना अंबिकाबाई अमात्य यांचे (०७३); चिकोडी व हुकेरी तालुके छत्रपतींना दिले असल्यासंबंधी नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर यास थॉमस मन्रो याचे (०७४).

**पत्रे—छत्रपतीस मोरेश्वर सुबराव याची** : वाघाचे पेटे पाठविल्याबाबत (१६०२६); मालवणहून कैदेतून पळून गेलेल्या चोरांच्या तपासाबाबत (०२८); बनगर व गवळी यांच्याकडे रैते पाठविल्यासंबंधी (०३०); पळसंबे येथील नक्काड कारखान्याकडील लोकांनी रामचंद्रपंत यांच्या बंधूकडून जबरीने कबूलत करून घेतल्यासंबंधी (०४२); नंदगाव येथे झालेल्या चोरीसंबंधी (०४८); महालुंगे पाठविल्याबाबत (०५०); चि. गोविंदराव याच्या लग्नास येण्यासंबंधी (आईसाहेब यांना) (०५१-०५२); फोंडा घाट चालू करण्यासाठी झालेल्या इंग्रजी रुकाटयासंबंधी (०५३); विजयादशमीचे विडे मिळाल्यासंबंधी (०५४).

**पत्रे—छत्रपतीस इतरांची** : रेठरे मालेवाडी येथे कामास गेलेल्या कारकून लोकांवर तेथील लोकांनी गोळीबार केल्यासंबंधी भगवंतराव प्रतिनिधी यांचे (१६०२२); दागिने करून दिल्याबाबत नाथाजीपंत यांचे (०२४); सैन्यनायाराजसंबंधी गोविंदराव मोरेश्वर याचे (०२७); केरडोळ येथील आपली वतनदारी पूर्ववत चालविण्याबाबत (बाबासाहेब यास) कृष्णाजी नरसी देशपांडे याचे (०३१); सरंजामी वतनी व इनाम गावाच्या वहिवाटीसंबंधी वेसीत इनतबेल याचे (०३३); बाबूराव नरसिंह यांचेकडून मजकूर समजल्यासंबंधी परशराम रामचंद्र याचे (०३४); बसंगोंडा पाटील यांच्या शेतीची मोकळीक करण्यास शिरगुरकरास ताकीद होण्याविषयी त्र्यंबकराव नयनत याचे (०३८); अंताजी महादेव यास पाठवून दिल्याबद्दल भगवंतराव आबाजी याचे (०४३); पेरीड तर्फ शिराळे येथील वसुलाबाबत भगवंतराव आबाजी प्रतिनिधी यांचे (०४४); रेठरे पा वाळवा येथील जकातीबाबतच्या हिश्श्यासंबंधी माधवराव मुधवज प्रतिनिधी यांचे (०४५); माहुळ, कळवड, इत्यादी गावांवरच्या बाबती हक्कासंबंधी रघुनाथराव गोविंद याचे (०४७); संक्रांतीचे शर्करायुक्त

## रुमाल क्र. १०५

## पुडके क्र. ३—(चालू)

पत्रे—(चालू)

**प्रकरणी कामे**—विशाळगड घेऱ्यातील गावांच्या वसुलाबाबतच्या माहितीसंबंधी (१८५९०-५९८); फसवले गावाची जप्तीतून मोकळीक करण्यासंबंधी (६००-६०१); विशाळगड संस्थानात दिवाणी खटल्याबाबत पक्षकारावर करावयाच्या आकारणीबाबत (६०२-६०४); नवरात्र उत्सवात विशाळगडकराना तोफा, बंदुका इत्यादी उडवण्यास परवानगी देण्याबाबत (६०५-६०६); आनंदीबाई विशाळगडकर यांच्या खर्चाच्या नेमणुकीबाबत (६०७-६०९); विशाळगड घेऱ्यातील घाटाखालील गावाकडील वसुलासंबंधी (६१८); महागांव येथील ठाणेदारास फौजदारी खटल्यांच्या कामी असलेल्या अधिकारासंबंधी (६१९-६२१); आबाजी भिकाजी फडणीस याजकडे झापडे हा गाव पूर्ववत चालवण्याबाबत (६२८-६२९); रत्नागिरी जिल्ह्यातील विशाळगडकऱ्यांच्या गावांच्या जमीन महसूलासंबंधी (६३०-६३८); विशाळगडकराकडील गावांतील वरपट्टीसंबंधी पो. सुप. यास कलेक्टर रत्नागिरी याचे (६४१-६४५); घाटाखालील तालुक्यातील विशाळगडकऱ्यांच्या धर्मादाय, इनाम इत्यादी नेमणुकासंबंधी (६४६-६५२); घाटाखालील विशाळगडकरांच्या जप्तीत असलेल्या गावासंबंधी (६५३-६५८); संगमेश्वर येथील विशाळगडकर यांच्या चौथाई हिश्श्यासंबंधी (६५९-६६४); विठ्ठल शिवराम जमेनीस किल्ले विशाळगड य.च्या जप्ती-तील जमिनी वगैरे खुल्या करण्यासंबंधी (६६५-६६७); विशाळगड संस्थानांतील इनामी व इतलाखी नोकरांच्या चौकशीसंबंधी (६६८-६७१); भवानीबाई विशाळगडकर याना द्यावयाच्या नेमणुकीबाबत (६७२-६७५); रत्नागिरी व अंजनवेल यथील विशाळगडकऱ्यांच्या एकतर्फी व दुतर्फी अम्मलासंबंधी (६७९-७१२); भवानीबाई विशाळगडकर यांच्या वयासंबंधी (७१३); विशाळगड संस्थानचा जमाखर्च, कर्जबाब, इत्यादी-संबंधी (७१५-७१६); विशाळगड संस्थानासंबंधी वार्षिक माहिती पाठवण्याबाबत (७१९-७२०); विशाळगड संस्थानाकडील सोने, दागदागिने, कागदपत्र इत्यादी बाबत पो. सुपरिण्टेंडेण्टकडे माहिती पाठविण्याविषयी (७२१-७४५).

**याद्या**—करवीर राज्यातील गावोगावचे पाटील, कुलकर्णी यांनी रयत लोकांशी वागावयाच्या नियमासंबंधी (१८४९४-५८८); लक्ष्मीबाई विशाळगडकर यांच्याकडील दागिन्यासंबंधी (६११-६१२).

---

**ज. क्र. १२३, रु. क्र. १२३, पुडके क्र. २, का. सं. १८७४६-१८८६० (११५).**

**सु. स. १२१३ ते १२५८, इ. स. १८१२-१३ ते १८५७-५८.**

**पत्रक (तक्ता)**—विशाळगड संस्थानच्या घेणे देण्यासंबंधी (१८८६०).

**पत्रे**—भाऊ महाराज, चिटणीस व स्वरुपजी क्षीरसागर व आपण एक विचारे वागण्याबाबत (१८७४६); विशाळगडकराकडून घ्यावयाच्या नजराण्यासंबंधी मुख्य कारभारी करवीर यास पो. एजंट यांचे (७४७); विशाळगडकराकडील इनाम, सरंजाम इत्यादीबाबत पो. एजंट यास मुख्यकारभारी करवीर याजकडून (७५६-७५७); विशाळगडकर प्रतिनिधी यांच्य

**रुमाल क्र. १२३**

**पुडके क्र. २—(चालू)**

**पत्रे—** (चालू)

दत्तक प्रकरणी मुख्यकारभारी करवीर यास पो. एजंट याचे (१८७६३-७६४); विशाळगडावरील इंग्रज अधिकाऱ्यांस मलकापूर येथे राहण्यासाठी घर पाहून देण्याबावत कॅप्टन ग्रॅहॅम यास कारभारी विशाळगड याचे (७६५-७६६); घोणसरी येथे राहणारे किल्ले शिवगड येथील गडकऱ्यांना पाठवून देण्याविषयी पो. एजंट यांना कलेक्टर, रत्नागिरी याचे (७६७-७६८); घेरा विशाळगडपैकी गवळी लोकांकडून करावयाच्या तूप आकारणीसंबंधी पो. एजंट कोल्हापूर यास रत्नागिरी कलेक्टर याचे (७६९-७७०); संस्थान विशाळगडकडील दिवाणी व फौजदारी कामासंबंधी (७७८-७९०); विशाळगडाकडील घाटाखालील दुतर्फा गावांच्या दहा वर्षातील वसुलाबावत (८०६); अंजनवेल व रत्नागिरी तालुक्यांतील विशाळगडकरांच्या इनामी व इतलाख नेमणुकांसंबंधी मुख्य कारभारी करवीर यास कारभारी विशाळगड याचे (८१८-८२१); सदाशिव रघुनाथ कात्रे यांच्या इनाम वसुलासंबंधी (८२२-८२३); कणसवले या गावच्या वहिवाटीसंबंधी (८२४); विशाळगड येथील मोकाशासंबंधी माहिती कळवण्याबावत (८२५-८२६); गोविंद सदाशिव फडणीस याच्या मोकासा गावाबावत पो. सुप., यास कलेक्टर रत्नागिरी याचे (८२७-८२८); घेरा विशाळगडाकडील हिशेबाचे कागद पाठवल्याबावत महालकरी घेरा विशाळगड याचे (८२९-८३१); विशाळगड येथील जमिनीच्या पाहाणीसंबंधी (८३६-८३७); विशाळगडाकडील हशम व गडकरी यांच्या जमिनीच्या आकारणीसंबंधी (८४२); विशाळगड घेऱ्यापैकी एकतर्फी गावाच्या हिशेवाच्या रुजुवातीसंबंधी पो. एजंट कोल्हापूर यास कलेक्टर रत्नागिरी याचे (८४३).

**प्रकरणी कामे—**दुतर्फा अम्मल असलेल्या मौजे हिंदले येथील वसुलासंबंधी पो. एजंट यास कलेक्टर रत्नागिरी यांचे (१८७५८-७६१); विशाळगड घेऱ्यातील घाटाखालील गावांच्या जमाबंदीबाबत (७६२); विशाळगड किल्ल्यासाठी लागणारे वासे, गवत इत्यादी आणण्यास साखरपेकरानी केलेल्या अडथळ्यासंबंधी (७७१-७७२); वाजोली गावावरील भोई लोकांच्या मोकासा हक्काबावत (७९१-७९४); शिवगड येथे चाकरी करणाऱ्या गडकरी लोकास कारभारी बावडा यांच्याकडे पाठवण्याबावत (७९५-८०५); रत्नागिरी व अंजनवेल तालुक्यातील विशाळगडकऱ्यांच्या चौथाई अम्मलाविषयी (८१०-८१७); दामोदर दाजी व गोविंद बावाजी गोडे यांची देवडे येथील वहिवाट वतनदारीची नसल्यासंबंधी (८३२-८३५); गडकऱ्यांच्या बंडप्रकरणी जप्त केलेल्या घेरा विशाळगड येथील गावासंबंधी (८३८-८४१); आवाजी अनंत बहालकर याजकडून येणे असलेल्या ऐवजाबावत (८४४-८४७); विशाळगडकराकडील मजगाव या गावाच्या जमाबंदीबावत खोताच्या हक्कासंबंधी (८४८-८५१); भवानीबाई विशाळगडकर यांच्या खर्चाच्या नेमणुकीबावत (८५२-८५९).

**याद्या—**-दत्तकाबावत विशाळगडकराकडून घ्यावयाच्या नजराण्यासंबंधी (१८७४८-७४९); कॉ. लक्ष्मीबाई प्रतिनिधी यांचे रुप्याचे व सोन्याचे दागिने जामदारखान्याकडे जमा केल्यासंबंधी (७५०-७५१, ७७३-७७७); लक्ष्मण विष्णु मुकादम याच्या नदेरी येथील मोकासा हक्काबावत (७५२-७५५);

---

**ज. क्र. १२४, रु. क्र. १२४, पु० क्र. १, का. सं. १८८६१-१९०३४ (१७४).**

**सु. स. १०९३ ते १२५०, इ. स. १६९२-९३ ते १८४९-५०.**

**आज्ञापत्रे—**मिरज येथील देशमुखीचे वतन व्यंकोजी दादो व आदनाईक सावंत यांना दिल्याबावत देशाधिकारी प्रांत मिरज यास राजाराम छत्रपति यांचे (१८८६३-८६५); मत्याजी इंगवले नाईक यास नूल येथे इनाम जमीन दिल्याबावत देशाधिकारी व कारकून प्रांत आजरे याना दुसरे शिवाजी यांचे (८६६-८६७); गडहिंग्लज इत्यादी सात गावांच्या मोकाशाचा कारभार नारो महादेव याजकडे दिल्यासंबंधी, देशमुख व देशपांडे प्रांत हुकेरी यास दुसरे शिवाजी यांचे (८६८-८६९); का नेसरी, सोलापूर व आजरे येथील देशमुखीचा ऐवज नारायणराव घोरपडे याजकडे देण्याबावत सिदराम भोसले यास

**रुमाल क्र. १२४**

**पुडके क्र. १—(चालू)**

**आज्ञापत्रे—(चालू)**

छत्रपतींची (१८८९४); मिरज येथील देशमुखी वतनाची वहिवाट जगन्नाथ अनंत व गणेश विनायक याजकडे दिल्यावावत गावकामगार प्रांत मिरज यास चितामणराव पांडुरंग यांचे (९१०-९११); मिरज प्रांतातील ब्राम्हण व जैन देशमुखांच्या जमिनीचा ऐवज ज्याचा त्यास देण्याविषयी म्हैशाळ, हिंगणगांव इत्यादी गावांच्या गावकामगार याना गणपतराव चितामणराव यांचे (९१२-९१४); संक्राजी खंडू देसाई यास आरदाळ येथील मोकासबाबीचा ऐवज दिल्यासंबंधी गावकामगार आरदाळ तसेच संक्राजी देसाई यांना छत्रपतीचे (९२२-९२३); राणोजी घोरपडे याना मिरज येथील देशमुखीचे वतन दिल्यावावत देशाधिकारी व कारकून मिरज यास शंभू छत्रपतींचे (९३२-९३७); कुरुंदवाड येथील चौथाईचा ऐवज राणोजी घोरपडे सेनापती यांच्याकडे देण्याबावत गावकामगार कुरुंदवाड यास छत्रपतीचे (९४४); बोलकेवाडी गाव नागेश भट यास इनाम दिल्यावावत गावकामगार यास शंभू छत्रपतीचे (९४८); आजरे येथील पाचोत्रा एकमाही ऐवज चौथ्या वाड्याकडे देण्याबावत देशमुख व देशपांडे याना शंभू छत्रपतीचे (९५१); ब्राम्हणांचे देशमुखीचे वतन पूर्वीप्रमाणे चालविण्यावावत बाळाजी पंडित प्रधान यास आईसाहेब यांचे (९५२); मिरजेच्या देशमुखीच्या वतनास नारायणराव घोरपडे यांचेकडून उपसर्ग होऊ न देण्याबावत राणोजी घोरपडे सेनापती यास आईसाहेब यांचे (९५३); आप्पाजी नरसिंगराव याजकडे मिरज येथील देशमुखीचे वतन चालविण्यासंबंधी शिवाजी साळुंखे यास आईसाहेब यांचे (९५४); करपेवाडी गाव शंकराचार्य स्वामी याना इनाम करून दिल्यावावत गावकामगार याना (९५५); व देशमुख देशपांडे तालुका आजरे याना शंभू छत्रपतीचे (९५६); इचलकरंजी येथे बांधावयाच्या वाड्यासंबंधी शेषो नारायण यास जिजाबाई यांचे (९५७-९५९); करवीरी बाळंतपणास येण्यासंबंधी अनुबाईस जिजाबाईसाहेब यांचे (९६०-९६१); रामचंद्र कृष्ण यास मुरडे तर्फ आजरे येथील जमीन इनाम दिल्यावावत गावकामगार यास पंतअमात्य याचे (९६७-९६८); तपोनिधि मोतीगिरी यास विजणे हा गाव इनाम करून दिल्यावावत गावकामगार यास व्यंकटराव नारायण याचे (९७०); बहिरजी गायकवाड यास रांगोळी येथील नाईकीचे वतन दिल्यावावत मामला धर्मसंस्थान यास छत्रपतीचे (९७१-९७३); इचलकरंजीतील शेरी जमीन व आजरे प्रांतातील सरदेशमुखी वतन संताजीराव घोरपडे याजकडे चालविण्याबावत (९८८); तसेच इचलकरंजीकरानी देशमुखी व सरदेशमुखीच्या नजराण्याचा ऐवज छत्रपतीस देण्याबावत नारायणराव व्यंकटेश यास छत्रपतीचे (९९३).

**इनामपत्रे**—इचलकरंजी गाव इनाम करून दिल्यावावत राणोजी व पिराजी घोरपडे याना शंभू छत्रपतींचे (१८९४५); बोलकेवाडी हा गाव इनाम करून दिल्यासंबंधी नागेश भट यास शंभू छत्रपतीचे (९४६-९४७); व्यंकटराव नारायण यास इचलकरंजी, शिरढोण वगैरे चार गावे इनाम करून दिल्यावावत नारायण जोशी याना शंभू छत्रपतींचे (९४९-९५०).

**उतारा**—ग्रांट यांच्या पुस्तकातील शाहू व संभाजी यामधील तहासंबंधी (१८८७२).

**जबाब**—आवदुललाट व रांगोळी येथील सरदेशमुखी वतन वहिवाटीत असल्याबद्दल भवानराव बळवंत याचा (१९०००).

**टिप्पण**—नारायण व्यंकटेश याजकडे आजऱ्याचा सरंजाम देण्याबावतच्या करारनाम्यासंबंधी (१८८८५); नारो खंडेराव यास मिरज प्रांती दिलेल्या सरंजामाविषयी (८९३).

**तहनामे**—शाहू व संभाजी यामध्ये राज्याच्या वाटणीसंबंधी झालेला (१८८७१); शिरदवाडचे ठाणे सेनापतीकडे न देण्याबावत कासीवा काळे व विसाजी नारायण यामध्ये झालेला (८९०-८९२).

**पत्रे**—मिरज येथील देशमुखीचे वतन संताजी घोरपडे यास करून दिल्यावावत रामचंद्र अमात्य याचे संताजी घोरपडे यास (१८८६१-८६२); आजरे महालाच्या बंदोवस्ताविषयी, देशमुख व देशपांडे याना राणोजी घोरपडे सेनापती यांचे (८८६-८८७); आजरे येथील देशमुखीचा व शेरीचा वसूल (ऐवज) नारायणराव घोरपडे याजकडे देण्याबावत सिदोजीराव नाईक निंबाळकर यास दौलतराव शिंदे याचे (८९५-८९६); कै. बापूसाहेब यानी दिलेली वतनी सनदापत्रे पाहाण्यासाठी देण्याविषयी सेनापती याना इचलकरंजीकर यांचे (९०२); महालाकडून व

रुमाल क्र. १२४

पुडके क्र. १–(चालू)

**पत्रे–**(चालू)

लष्कराकडून उपद्रव होणार नसल्यासंबंधी संभाजी खंडो देसाई आजरे यास शिवाजी घोरपडे याचे (१८९२४); रामचंद्र कृष्ण यास मुरुड येथील जमीन इनाम दिल्याबाबत व्यंकटराव यास सुबराव कृष्ण अमात्य याचे (९६५-९६६); आजरे तालुक्यात नेसरीकर यांचेकडून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्यासंबंधी आबासाहेब छत्रपती यास (९७९); आजरे प्रांतातील होणारा सिलसिला बंद होण्याबाबत तसेच गावाची मोकळीक होण्यासंबंधी भाऊ महाराजास इचलकरंजीकर यांचे (९८२); सामानगड व भुदरगड वगैरेचा दुतर्फा अंमल खंड्यात असलेबद्दलच्या निर्णयासंबंधी भाऊ महाराज याना आबाजी बल्लाळ व येसाजी कृष्ण याचे (९९२); देशमुखी व सरदेशमुखीचा ऐवज पाठवीत असल्याबाबत सदाशिवपंत आबा यास कृष्णाजी अनंत यांचे (९९४); भवानराव बळवंत यांच्या लाट, रांगोळी व सरदेशमुखीच्या वतना-संबंधीचा मजकूर गव्हर्नर यांना सांगण्याबाबत भाऊ महाराज यांना सुन्दराबाई यांचे (९९७); रांगोळी व सरदेशमुखीच्या वतनासंबंधीच्या सनदा घेऊन भवानराव बळवंत यास पाठविल्याबाबत भाऊ महाराज याना (९९८); भवानराव बळवंत यांच्या रांगोळी व सरदेशमुखीच्या वतनासंबंधी, आईसाहेब याना दिनकरराव गायकवाड यांचे (९९९); करवीरकर व इचलकरंजीकर यांच्यामध्ये लढाई झाली असल्यासंबंधी थॅकरीन यांस गणपतराव कोनेर याचे (१९०१२-०१३); लोक, पागा व भोई घेऊन पोचताच पुण्याहून निघत असल्याबाबत सुन्दराबाई याना (०१४); करवीरकर यांच्या कामकाजा-संबंधी कमिशनर यांस छत्रपतीचे (०१६-०१७); देशमुख, ब्राम्हण व जैन लोकांच्या कपातीसंबंधी पो. एजंट यास छत्रपतीचे (०२४-०२५); अण्णाजी नरसिह देशपांडे यानी इचलकरंजीकरांकडून घेतलेल्या गाव व रुपयासंबंधी छत्रपतीची आज्ञा काय ती कळविण्याबाबत अखबारनवीस करवीर यास पो. एजंट यांचे (०२८); इचलकरंजीकर यानी करवीरकरांच्या रजातलबेत वागण्यासंबंधी केशवराव घोरपडे यास टाऊनसन साहेब यांचे (०३०-०३१); देशमुखी व सरदेशमुखीबद्दल नजराणा दिला असल्याने करवीरकराकडून पुन्हा पुन्हा उपसर्ग होऊ नये अशाबद्दल इचलकरंजीकर वकीलाचे (इंग्रजास) (०३२-०३४).

**पत्रे—छत्रपतीस :** राणोजी घोरपडे व अंताजी शामजी यांच्याकडून बोरगाव, कोननोळी वगैरे प्रांतात उपसर्ग होत असल्यासंबंधी व्यंकटराव नारायण याचे (१८९६३-९६४); नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर हे करवीर इलाख्यात दंगा करतात त्यांच्या बंदोबस्तासंबंधी पो. एजंट याचे (१९००१-००२); गावखेडी, देशमुखी व सरदेशमुखी वगैरेची मोकळीक करण्यासंबंधी (००३); मनोहरगड व सामानगड व हलकर्णी अम्मलाबाबत येसाजी कृष्ण हे निवेदन करतील या अर्थी (००४); तसेच फौज परत जावी व कारकून लोकांना मनाई व्हावी अशा अर्थाचे नारायण-राव व्यंकटेश याचे (००५-००६); लाट, रांगोळी व इचलकरंजीकर प्रकरणी सविस्तर बोलत असल्यासंबंधी करवीरकर वकीलांचे (०१५); इचलकरंजीकर घोरपडे यांच्या दौलतीस व हक्कास उपसर्ग न करण्याबाबत कमिशनर याचे (०१८-०१९); करवीरकर व इचलकरंजीकर यांच्यामधील सीमा तंट्याबाबत कमिशनर याचे (०२०-०२१); इचलकरंजीकराकडून नारायणराव घोरपडे यांना उपसर्ग न देण्याबाबत (०२२-०२३); नारो गोविंद चुणेकर यांच्या येणे असलेल्या कर्जाऊ ऐवजाबाबत पो. एजंट याचे (०२७); नारो गोविंद व इचलकरंजीकर यांच्यामधील कर्जासंबंधी पो. एजंट यांचे (०२९).

**पत्रे—नारायण व्यंकटेश यांचेकडून :** तर्फ आजरे येथील वसूल सेनापती कापशीकर याजकडे देण्याबाबत सिदोजीराव नाईक निंबाळकर यास (१८८९७-८९९); महागोंड हा गाव सेनापतीकडे दिल्यासंबंधी गणेश रामचंद्र ता। आजरे यास (९००); इचलकरंजी येथील शेरी जमीन सेनापतीकडे देण्याबाबत आप्पाजी सदाशिव कमाविसदार यास (९०१); मिरजेच्या किल्ल्यावर करवीरकर यांचा अम्मल बसविल्याबाबत व संताजी घोरपडे यास मिरजेची देशमुखी दिल्याबाबत यमाजीपंत आप्पा यास (९१९-९२१); मोतीगिरी गोसावी यास विजणे हा गांव इनाम दिल्याबाबत (९६९); नेसरीकर व सामानगडकरी यांच्या उपद्रवाबाबत त्यांना ताकीद करण्याविषयी, (९७७); नेसरीकर यांचेकडून उपसर्ग न होण्याबाबत बोलणे करण्यासाठी कारकून पाठवून देत असल्यासंबंधी हैबतराव गायकवाड यास (९७८); देशमुखी व सरदेशमुखी तसेच सामानगडकरी व कडगाव-

**रुमाल क्र. १२४**

**पुडके क्र. १—(चालू)**

**पत्रे**--(चालू)

कर यांच्या उपसर्गाबाबत जाबसाल उलगडून मिळत नसल्यासंबंधी (१८९८०-९८१); व रांगोळी व रेंदाळ या गावांच्या सीमा तंटयासंबंधी भाऊ महाराज यास (९८३-९८६); टाकवडे येथील उतरलेल्या फौजेचा बंदोबस्त करण्याविषयी पंत आबा याना (९८७); बहुमानाची वस्त्रे पोचल्यासंबंधी सेनापतीस (९९१); जोगळेकर यास द्यावयाच्या ऐवजासंबंधी (९९५); येसाजी कृष्ण हे इकडील मजकूर निवेदन करतील याअर्थी (९९६); तसेच कारकून लोकास मनाई होऊन फौज उठवून नेण्यासंबंधी सदाशिवपंत आबा यास (१९००७); आजरे तालुक्यातील दुतर्फा अम्मलासंबंधी तेथील लोकांबरोबर आबासाहेब महाराज यांच्या लोकांनी लढाई केल्याबाबत (००८-०१०); छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणेच कामकाज करीत असल्याबाबत ताकरीन यास (०११).

**वतनपत्रे**—हिंदुराव घोरपडे यानी नारो महादेव यास ता। आजरेची सरदेशमुखी दिल्यासंबंधी (१८८७०); राणोजी घोरपडे यास मिरजेची देशमुखी वतनाची वतनपत्र करून दिल्यासंबंधी छत्रपतींचे (९२५-९३१); सुभा पन्हाळा व मिरज येथील २८ महालांचे देशमुखीचे वतन दिल्याबाबत राणोजी पिराजी घोरपडे यास शंभु छत्रपतींचे (९३८-९४३).

**याद्या**--राणोजी घोरपडे याजकडील इनामगाव व सरंजाम या विषयी (१८८७३-८८४); नारायणराव व्यंकटराव यास द्यावयाच्या सरंजामासंबंधी (८८८-८८९); प्रांत मिरज येथील ब्राम्हण व जैन देशमुख यांच्या जप्त केलेल्या वतनासंबंधी (९०३-९०९); मिरज प्रांतातील ब्राम्हण व जैन देशमुख यांच्या माहितीसंबंधी (९१५-९१६); ब्राम्हण व जैन देशमुख याजकडे मिरज प्रांती गावोगावी चालत असलेल्या कमता (जमीनी) संबंधी (९१७-९१८); राणोजी घोरपडे याजकडून स्वारी खर्चाबद्दल ऐवज छत्रपतीनी घेतल्यासंबंधी (९६२); वडगाव, कुंभोज वगैरे गावांच्या देशमुखी व सरदेशमुखी बाबत व इचलकरंजी येथील नजराण्याच्या रक्कमेसंबंधी (९७४-९७६); इचलकरंजी येथे सेनापतीची स्वारी आली त्यावेळी संस्थानाकडील शिबंदी यांच्या खर्चासंबंधी (९८९-९९०).

---

**ज. क्र. १२५, रु. क्र. १२५, पुडके क्र. १, का. सं. १९०३५-१९२०० (१६६)**

**सु. स. १२१४ ते १२७०, इ.स. १८१३-१४ ते १८६९-७०.**

**आमंत्रणपत्रे**—राजाराम छत्रपती यांच्या लग्नोत्सवास हजर रहाण्यासंबंधी कमिशनर, कलेक्टर, इंग्रज अधिकारी यांना राणी अहिल्याबाई साहेब यांची (१९१८४-१९१).

**आज्ञापत्रे**—यशवंतराव घाटगे सर्जेराव यास नेरली, रुई, मुरगूड वगैरे पांच गावचे नाईकीचे वतन दिल्याबाबत त्या गावचे गावकामगार याना राजमंडळाचे (१९०४६); वारशाच्या दुस्ताबद्दलचे रुपये पाठविण्याबाबत रताजीराव चव्हाण हिम्मतबहाद्दर यास राजमंडळाचे (०४७); लक्ष्मणराव शिंदे यास सेनाखासखेल हुद्दा देऊन त्यांचा सरंजाम पूर्ववत प्रमाणे त्यास दिल्याबाबत राजमंडळाचे (१९४).

**करारनामा**—करवीरकर व कंपनी सरकार यामध्ये राज्यकारभार चालविण्यासंबंधी झालेला (१९१८३).

**कलमबंदी**—इनामदार, जहागिरदार व सरंजामदार वगैरेनी फौजदारी कामे कोणत्या रितीने कोठपर्यंत आपले अधिकारात चालवावे यासंबंधी (१९०५४-०५७).

**टिप्पणे**—दानवाड, लिंगनूर वगैरे गावांच्या सोडचिठया इंग्रजाकडून आल्याबाबत (१९०३६); गोविंदराव पाटणकर यांच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलाकडे अगर वारसाकडे गाव चालवण्याबाबत (१९५); गावगन्नासंबंधी जुने कागद निवडीत मिळाल्यासंबंधी (१९९-२००)

**पत्रक**—कागल प्रांतातील गावाची वहिवाट कोणाकडे कशी व कोणत्या सालात आली त्याबद्दल (१९०६०-०६३).

**पत्रे**—लिंगनूर व कागल या गावांच्या सीमा तंटयाचा निवाडा करण्याबाबत कल्याणराव कृष्ण यास दादो आनंदराव याचे (१९०३५); कागल तालुक्यातील बेलवडे, सेडूर, म्हाकवे इत्यादी गावे करवीरकरांच्या स्वाधीन करण्यासंबंधी तसेच रायबाग महालातील जमीनदारांनी करवीरकरांच्या रजातलबेत वर्तणूक करण्यासंबंधी कल्याणराव कृष्ण यास सदाशिव माणकेश्वर व दादो

रुमाल क्र. १२५

पुडके क्र.—१ (चालू)

**पत्रे**—(चालू)

आनंदराव याचे (०३७-०४२); जयसिंगराव घाटगे सर्जेराव याजकडे करवीरकरांची बेलवले, सेंडूर वगैरे सहा गावे स्वाधीन करण्यासंबंधी कल्याणराव कृष्ण यास दादो आनंदराव याचे (०४३); कागल तालुक्यातील पाच गावे करवीरकरास मिळण्याबाबत पो. एजंट यास करवीरकर वकीलाचे (०४४); तिळगूळ पाठवल्याबाबत छत्रपतीस रघुनाथराव चिमणाजी याचे (०४८-०४९); मुक्ताबाई व शांताबाई यांच्या विवाह समारंभासंबंधी छत्रपतीस रघुनाथ जयवंत याचे (०५०-०५१); तिळगूळ पाठवल्याबाबत छत्रपतीस रामचंद्र रघुनाथ याचे (०५२-०५३); नांदोसी, पेटा खानापूर येथील मठाधिकार व जमिनी वगैरे शिष्याकडे चालविण्याबाबत छत्रपतीस गुदानपुरी महंत याचे (०५८); शहापूर इनामगाव पूर्ववत प्रमाणे चालवण्याबाबत खुदानपुरी गोसावी सालमानपुरी नादोसी याचे छत्रपतीस (०५९); कै. राजाराम छत्रपती यांची गादी दत्तक घेऊन पुढे चालवण्याबाबत पो. एजंट यास अहिल्याबाईसाहेब यांचे (०७०-०७१); करवीरकरास चिकोडी व हुकेरी तालुके कंपनी सरकारातून मिळाल्याबाबत नारायणराव घोरपडे यास थॉमस मन्रो याचे (१९२); सुभानराव शिंदे सेनाखासखेल यास फौजेच्या खर्चाबद्दल चौथाई ऐवज दिल्याबद्दल चेनव्वा जयगोंडा देसाई यास (१९३);

**परवाना**—केदारजी हुजरे यास कंपनी सरकारातून जकातीची माफी दिल्याबाबत (१९०४५).

**प्रकरणी कामे**—स्टॅम्प कागद विक्री वगैरेचा ठराव होण्यासंबंधी (१९०६४-०६९); छत्रपतींच्या मृत्यु-नंतर करवीर येथील व्यवस्था पो. एजंट मार्फत चालविण्याबाबत विचारलेल्या हकी-गतीसंबंधी (०७२-१८२).

**याद्या**—इनामदार व दुमालदार यांचेकडे गावे असल्याबाबत (अपूर्ण) (१९१९६-१९८).

---

**ज. क्र. १२६, रु. क्र. १२६, पुडके क्र. १, का. सं. १९२०१-१९३००(१००).**

**सु. स. ११६० ते १२१२, इ. स. १७५९-६० ते १८११-१२.**

**आज्ञापत्रे**—प्रामाणिकपणे कामकाजे केल्यासंबंधी गुलाम महम्मद मुनशी यास छत्रपतीचे (१९२३८).

**कलमबंदी**—कागल तालुक्याच्या बंदोबस्ताविषयी (१९२८९).

**टिप्पण**—गुजाजी व हैवतराव गायकवाड याना मिळालेल्या किताबासंबंधी (१९३००).

**पत्रे**—आपल्याकडील सविस्तर मजकूर विसोबा नाईक याचे पत्री लिहिल्याबाबत जोशीराव यास रामचंद्रराव घोरपडे याचे (१९२०१); तिसरे शिवाजी यांच्या राज्यारोहणासंबंधी रघुनाथराव पंडित याना जिजाबाई यांचे (२०२); बोलणी करण्यासाठी शिवराम माधव यास पाठविल्याबाबत टिपू सुलतान यास सवराव कृष्ण आमात्य याचे (२०४); पुण्यास गडी पाठवून देत अस-ल्याबाबत कृशापा माने यास सखाराम घाटगे याचे (२०७); शिवा खासबारदार यास झालेल्या मारहाणीबाबत नागोजीराव घाटगे यास रामचंद्रराव घोरपडे याचे (२०८); छत्रपतींची स्वारी कर्नाटक प्रांती गेली असल्याबाबत रायरायेदि सावंत शामराव बहादूर यास प्रीतीराव चव्हाण याचे (२१०); दौलतराव शिंदे व बाया यामध्ये समेट घडवण्याबाबत निवाजी हवालदार यास यशवंतराव घोरपडे याचे (२११); लढाई बंद करण्याबाबत, रामचंद्रपंत आप्पा यास (२१२); व क्षेमसमाचारासंबंधी आकाराम यादव यास सखाराम घाटगे याचे (२१३); नाना फडणीस व परशुरामपंत यांच्याकडील प्रांत शिंदे याना दिल्यासंबंधी, हिम्मतबहादूर चव्हाण यास मालजी निकम याचे (२१७); प्रतिनिधी याजकडून आणलेले २००० रुपये पाठविण्याबाबत रत्नाकरपंत राजाज्ञा यास (२१९); पुण्याहून आलेला सरसुभेदार कोंकण प्रांती जप्ती करीत असल्याबाबत रामचंद्र जोशीराव यास आनंदराव आवाजी प्रतिनिधि याचे (२२०); करवीरास छत्रपतींची भेट होण्याबाबत प्रीतीराव चव्हाण यास गुजाजी गायकवाड विश्वासराव याचे (२२५); रामचंद्र लिंगो यास पाठविल्याबाबत बाळाबाई घाटगे याना सरदेसाई मामले हुबळी याचे (२३०); सातारा मुक्कामी फौजेसुद्धा येण्याबाबत गोपाळजी मोहिते यास सखाराम घाटगे सर्जेराव याचे (२३१); बेलवले, शेंडूर इत्यादी गावे

**रुमाल क्र. १२६**

**पुडके क्र. १—(चालू)**

पत्रे—(चालू)

करवीरकरांच्या स्वाधीन करण्याबाबत कल्याणराव कृष्ण यास सदाशिव माणकेश्वर याचे (१९२३२); राचप्पा जाधव देसाई प्रांत रायबाग व भरमाप्पा जाधव यांच्यामधील भाऊबंदकीच्या खटल्यासंबंधी मालोजीराव घोरपडे याचे जिवाजीपंत ठाणे इंगळी यास (२३५); काजिर्डा घाटातील रहदारीबाबत सुन्दराबाई याना भाऊ महाराज यांचे (२३९); बाया व शिंदे यांच्या तंटयाच्या समेटाबाबत आनंदराव यादव यास निवाजी यादव हवालदार याचे (२४०); पुण्यास माणसे रवाना केल्याबाबत डोंगरोजी यादव हवालदार यास भगवंत आप्पाजी याचे (२४७); छत्रपतींच्या प्रकृतीची काळजी घेण्याबाबत गोविंदराव गायकवाड यास दिनकरराव गायकवाड याचे (२४८); आपण करवीरास जात असल्याबाबत बापूजीपंत दादा यास नारायणराव पाटणकर याचे (२५२); तारळे येथील आपल्या देशमुखीच्या खटल्याचा निवाडा करण्याबाबत नागोजीराव पाटणकर यास उदाजीराव चव्हाण याचे (२५३); बाया व शिंदे यांच्या समेटाबाबत आनंदराव जाधव यास यशवंतराव घोरपडे याचे (२५६); टाकवडयातील फौज परत घेण्याबाबत बंदोबस्त करण्याविषयी सदाशिवपंत आबा यास नारायणराव व्यंकटेश याचे (२५८-२५९); इंग्रजांशी झालेल्या तहनाम्याच्या नकला पाठविल्यासंबंधी कर्नल क्लोज यास करवीर राजमंडळाचे (२६०); राजापुरास झुंझारराव घोरपडे याचे ठाणे जबरदस्तीने घातल्याबाबत संताजीराव घोरपडे यास (२६८); बोलणी करण्यासाठी काशी नारायण यास पाठविल्याबाबत अरस्तुजहां यास प्रीतीराव चव्हाण याचे (२६९); निपाणीकर व विश्वासराव घाटगे यानी आळते व हिंगणगाव येथील अटकेत ठेविलेल्या कुळासंबंधी स्वरुपजी क्षीरसागर यास बाळाबाई निंबाळकर याचे (२७१); छत्रपतीस पुत्र झाल्याबाबत शर्करा पाठवल्यासंबंधी हैदरअल्ली यास यशवंतराव शिंदे याचे (२७३); पंडित प्रधान यात्रेसाठी दक्षिण प्रांती जाणार असल्याबाबत नारायणराव पाटणकर यास कर्नल क्लोज याचे (२८३); बाळवें वगैरे साडेआठ गावे खर्चासाठी मिळाल्याबाबत जयसिंगराव घाटगे यास रखमाबाई घाटगे यांचे (२८४-२८५); क्षेमसमाचारासंबंधी बाबाजी घाटगे यास सकवारबाई घाटगे यांचे (२८६); सुटका झाल्याचे ऐकून आनंद वाटला या अर्थी तुळजोजी घाटगे यास दौलतराव शिंदे याचे (२८८); कार्यसिद्धी करण्याविषयी यशवंतराव शिंदे यास प्रीतीराव चव्हाण यांचे (२९०); भरतगड येथे सावंतवाडीकरानी गोळागोळी केल्याबाबत जेम्स जोसेफ यास करवीरकरांचे (२९४); यशवंतराव होळकर यांच्याकडून जाबसाल उलगडून घेण्यासंबंधी नारायणराव यास प्रीतीराव चव्हाण याचे (२९५); निपाणीस येण्यासंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यास सिधोजीराव निपाणीकर याचे (२९७); कालिंदे व तीर्थवाडी ही गावे शेषोपंत व भगवंतपंत याना दिली असल्यासंबंधी माधवराव यास अनुबाई याचे (२९९).

**पत्रे—आईसाहेब यांना :** पालखीची तवकडी पाठविल्याबाबत नरसो त्र्यंबक याचे (१९२२४); पाठविलेल्या वस्त्रांचा स्वीकार केल्याबाबत शेषो नारायण याचे (२४१); पेशवे व इंग्रज यांच्या लष्करी हालचालीसंबंधी मोरो धोंडदेव याचे (२४४); नळदुर्ग व आवसे येथील पेशव्यांच्या व निजामाच्या लष्करी हालचालीसंबंधी विसाजी नारायण याचे (२६१); लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल याना पुत्र झाल्याबाबत शंकरराव शिंदे याचे (२७०); कागल तालुक्यातील तळीखोरांच्या बंदोबस्ताबाबत, दिनकरराव याचे (२७६); बेडकीहाळ व सदलगे वगैरे गावे मिळण्यासंबंधी बोलणी चालू असल्याबाबत दिनकरराव याचे (२७७); ओढणी, तिवट रवाना केल्याबाबत भगवंत कृष्ण याचे (२९८).

**पत्रे—बाईसाहेब यांना :** चिरंजिवांचा नामकरण विधी झाल्याबाबत द्वारकाबाई घोरपडे याचे (१९२०३) मिरजेच्या बंदोबस्तासाठी रघुनाथपंत यानी शिवाजी बल्लाळ यास पाठविल्याबाबत नरसो त्र्यंबक याचे (२१४); दसऱ्याच्या भेटीस येण्यास परवानगी मिळण्याविषयी भगवंत आप्पाजी याचे (२२७-२२९); शेषोपंताकडून आलेली पत्रे पाठविल्याबाबत (२३३); व रणछोड नाईक याच्यासह करवीरी येत असल्याबाबत भगवंत आप्पाजी याचे (२३४); डोंगरोजी यादव व भगवंतपंत यांजकडून पाठविलेली आज्ञापत्रे पोचल्यासंबंधी (२३६); दत्तविधानाची बातमी कळल्यासंबंधी भगवंतपंत आप्पाजी याचे (२३७); क्षेमसमाचारासंबंधी, (२४२); व पागेकडील धरून ठेवलेली घोडी व तट्टे सोडण्याबाबत शेषो नारायण याचे (२४३); आज्ञापत्र पोचल्याबाबत

रुमाल क्र. १२६

पुडके क्र. १--(चालू)

**पत्रे**—(चालू)
(१९२४५); व पेशव्याकडून आलेले पत्र पाठविल्यावावत भगवंतपंत आप्पाजी याचे (२४६); पंतप्रधानांची भेट घेऊन सविस्तर मजकूर कळवीत आहे या अर्थी शेषो नारायण याचे (२९६).

**पत्रे—छत्रपतीस :** संक्राजी पवार व खंडोजी गायकवाड यास पाठविल्यावावत वाजीराव रघुनाथ याचे (१९२०५); रामचंद्र रघुनाथ नेरलीकर यास पेशव्यांकडून उपद्रव होऊ न देण्यावावत पो. एजंट याचे (२०६); गडहिंग्लज व चिकोडी या भागाच्या बंदोवस्ताविषयी सुभानजी साळोखे याचे (२०९); खंडणीचा ऐवज आकाराम यादव यास देत असल्यावावत, (२१५); व यशवंतराव घोरपडे याजकडील गावास उपसर्ग न होण्यावावत प्रीतीराव चव्हाण याचे (२१६); महिपतगड प्रकरणी नाना फडणीस यांच्यावर जप्ती आल्यावावत नारायण निकम व लक्ष्मण भगवंत याचे (२२१); मनोहरगड येथील वहिवाटी-संबंधी जीवराव जाधव याचे (२२२-२२३); आकाराम जाधव हावलदार यास आंबा घाटाची माहिती देण्यावावत प्रतिनिधी याचे (२२६); अटकूरकर आप्पाजी देसाई यास अटक करून सामानगडावर ठेवल्यावावत (२४९); सुन्दरवाडी येथे झालेल्या दंग्या-वावत (२५०); व हुजऱ्यावरोवर १५० लोक पाठविल्यावावत उदाजीराव चव्हाण याचे (२५१); आप्पाजीपंत सांगतील त्याप्रमाणे बंदोवस्त करण्यावावत जानराव घोरपडे याचे (२५४); एल्फिन्स्टनकडून आलेली पत्रे पाठविल्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (२५५); खर्चाची व्यवस्था करण्यावावत आदोजी हुजरे याचे (२५७); मनोळी येथील टाकसा-ळीसंबंधी लक्ष्मणराव शिंदे याचे (२७२); चाकरीत अंतर पडणार नाही या अर्थी तुळजोजीराव घाटगे याचे (२७४); मालवेकर पाटील यानी केलेल्या खटल्याविषयी संताजीराव घोरपडे याचे (२७५); आनंदराव आप्पाजी याच्या समवेत इंग्रजवहादूर याची भेट घेतल्यासंबंधी सुबराव घोरपडे याचे (२७८); आपणास इनाम दिलेल्या गावांच्या सनदा पाठविण्यावावत विठ्ठल अप्पाजी याचे (२७९); विशाळगड येथील काम-दारांच्या तंटचासंबंधी वाळाजी हरि देसाई याचे (२८०, २८२); विजयादशमीचा पोषाख पाठविल्यावावत माधवराव नारायण याचे (२८७); नारायणराव घोरपडे व रायाजी जाधव जप्तनमुलुख याना फौजेसुद्धा रवाना करण्यावावत दौलतराव शिंदे याचे (२९१-२९२); निपाणीकर यांच्या लष्करी हालचालीवावत पिराजी निकम याचे (२९३).

**मसुदा**—कर्नाटक सरहद्दीस फौज रवाना केल्यावावत हिम्मतवहादूर यानी नवावास लिहावयाच्या पत्रासंबंधी (१९२१८).

**याद्या**—घाटातील चौक्यासंबंधी (१९२६२); कऱ्हाड येथील लढाईत जखमी व ठार झालेल्या लोकांसंबंधी (२६३, २६७)

---

**ज्र. क्र. १२६, रु. क्र. १२६, पु. क्र. २, का. सं. १९३०१-१९३९५(९५).**

**सु. स. १२१३ ते १२३७, इ. स. १८१२-१३ ते १८३६-३७.**

**कलमबंदी**—रखमावाई घाटगे कागलकर यांच्या गावाच्या सोडचिठ्ठचा पाठविण्यावावत (१९३७७-३७८).

**टिप्पण**—छत्रपति व त्यांच्या स्त्रिया यांच्या माहितीसंबंधी (१९३७९-३८९).

**पत्रे**—वाळकृष्ण पाथरे याजकडून यावयाच्या जकात ऐवजावावत छत्रपतीस अमृतराव प्रतिनिधी याचे (१९३४९-३५०); श्रावण मासातील गोसावी जेवणावावत हिंदुराव व आत्माराम जाधव याचे (३५१-३५५); शत्रूवर उपकार करू नये या अर्थी (३७५); दादांच्या आज्ञेत वागण्यासंबंधी भाऊ व तात्या याना त्यांच्या वडिलांचे (३९०).

**प्रकरणी कामे**—सखाराम मोहिते यांच्या केरले व इतर गावांच्या इनाम व पाटीलकी वतनासंबंधी (१९३५६, ३५९).

**रुमाल क्र. १२६**

**पुडके क्र. २—(चालू)**

**मसुदा**—मुणगे येथील जंगलाचे हक्कासंबंधी कलेक्टर कंपनी सरकार यांनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (१९३७६).

**याद्या**—शिवाजी, औरंगजेब, आदिलशाह इत्यादीच्या माहितीसंबंधी (अपूर्ण) (१९३६०–३७२); बंडाईबाबत केलेला वसूल, दाजीबा दप्तरदार याची धारवाडास वकिलीच्या कामावर नेमणूक इत्यादिसंबंधी (३७३); पाटणकर, कागलकर इत्यादी घराण्यातील स्त्री-पुरुषांना पाठवण्याच्या पत्रांच्या पद्धतीसंबंधी (३७४); बाळाबाई आक्कास बाडीस मारावयाचा बेत केल्याप्रकरणी (३९१–३९५).

**रवासुदगी**—कामाकाजांबाबत राजमंडळ चिटणीसाकडून इंग्रजाकडील आपल्या वकीलांना पाठवलेल्या पत्रासंबंधी (१९३०१–३४८).

---

**ज. क्र. १२७, रु. क्र. १२७, पु. क्र. १, का. सं. १९३९६-१९४६६(७१).**

**सु. स. ११६० ते १२३७, इ. स. १७५९-६० ते १८३६-३७.**

**आज्ञापत्रे**—अबदुललाट हा गाव नारो खंडेराव यास इनाम दिल्याबाबत गावकामगार यास राणोजी घोरपडे सेनापती याचे (१९४०४); रांगोळी हा गाव नारो खंडेराव यास इनाम दिल्याबाबत गावकामगार यास (४०५); बेडग, तासगाव वगैरे १२ गावांची मोकास बाब नारो खंडेराव यास देण्याबाबत गावकामगार यास राणोजी घोरपडे सेनापति याचे (४१५); सावनूरच्या नबाबाचे तालुके त्याच्या ताब्यात देण्याविषयी रत्नाकरपंत राजाज्ञा यास तिसरे शिवाजी याचे (४५५); नोकरीवर सत्वर हजर होण्याबाबत हिंदुराव घाटगे यास छत्रपतीचे (४६३).

**इनामपत्रे**—नारो खंडेराव यास अब्दुललाट व रांगोळी ही गावे इनाम दिल्याबाबत राणोजी घोरपडे याचे (१९४००-४०१); गणेश दामोदर साने यास देवरूख व सेरसत येथे दिलेल्या इनाम जमीनीसंबंधी (४३७-४३८).

**इमानपत्र**—कसलीहि अभिलाषा न धरता इनाम सरंजामाची वहिवाट करीत असल्याबाबत नारो खंडेराव यास व्यंकटराव नारायण याचे (१९४०८).

**कलमबंदी**—भुदरगडकरी लोकांच्या पोटापाण्याच्या व राहण्याच्या व्यवस्थेविषयी (१९४५३).

**टिप्पण**—भिर्डी हा गांव छत्रपतींचा असून शेषो नारायण यांस चाकरीबद्दल नेमून दिल्यासंबंधी (१९३९६); दिल्लीच्या बादशहाचे भाऊबंद व छत्रपती यांच्या भेटीची पद्धत, नादीरशहाच्या मुलाचा निजामाच्या कन्येशी विवाह इत्यादिबाबत (४५६); कागलकर घाटगे, पाटणकर व शिंदे या घराण्यात झालेल्या विवाहासंबंधी (४५९).

**पत्रे**—भेटीसाठी येण्याबाबत नारायणराव मल्हार यास अनुबाई इचे (१९४०६); जाबसालाच्या उलगडयाबाबत मल्हार बळवंत यांस (४०७); व क्षेमसमाचारासंबंधी नारो खंडेराव यास व्यंकटराव नारायण याचे (४०९); रामचंद्र महादेव यास पाठविण्यासंबंधी आईसाहेब याना माधवराव बल्लाळ याचे (४१०); क्षेमसमाचारासंबंधी प्रीतीराव चव्हाण यास सुबराव कृष्ण याचे (४१४); इंग्रजाशी करावयाच्या बोलण्यासंबंधी सुंदराबाई यांना भाऊ महाराज याचे (४२०); फौजेसह पुण्यास येण्याबाबत प्रीतीराव चव्हाण यास बाळोजी कुंजर याचे (४२१); पेशवे यांच्याशी करावयाच्या बोलण्यासंबंधी आईसाहेब यांना शेषो नारायण याचे (४२७); छत्रपति व निजाम यामधील दोस्तीसंबंधी तेगजंग बहाद्दर यास प्रीतीराव चव्हाण याचे (४२८-४२९); यशवंतराव पाटणकर व चाफेकर हे बाळकृष्ण गंगाधर याना घेऊन नेरली मुक्कामी आल्यासंबंधी प्रीतीराव चव्हाण यास आनंदराव आबाजी याचे (४३०); आपल्या तगाद्याचा परिहार होण्याबाबत आईसाहेब यांना शेषो नारायण याचे (४३४); फिरंगोजी जाधव याजकडे असलेली लष्कराची घोडी, उंट इत्यादी सोडण्याबाबत मातुश्री बाईसाहेब यांस (शेषो नारायण याचे) (४३५); भोसले यांच्याखानवट येथील वतनासंबंधी बाईसाहेब यांना शेषो नारायण याचे (४३६); छत्रपती फौजेसह सरहद्दीवर रवाना झाल्यासंबंधी नबाब मुस्तगनी यास प्रीतीराव चव्हाण याचे (४३९); घोडनदी जवळ पेशवे व रघुनाथराव यांच्यामधील लढाईसंबंधी जिजाबाई यांना शेषो नारायण याचे

**रुमाल क्र. १२७**

**पुडके क्र. १ (चालू)**

**पत्रे**—(चालू)
(१९४४०-४४४); पेशव्यांची भेट व कर्नाटकातील मोहिमेबाबत जिजाबाई यांना शेपो नारायण याचे (४४४-४४८); निजामशाहीतील आपला सरंजाम मिळण्याविषयी मधस्तुल मुलक बहादूर यास (अपूर्ण) (४५२); लक्ष्मण हरी हे सविस्तर मजकूर सांगतील या अर्थी नवाब मुस्तगनी यास प्रीतीराव चव्हाण याचे (४५४); पंत प्रतिनिधी व जानोजी भोसले यांची भेट घेतल्याबाबत (४५७-४५८); पेशवे कोपरगावास निघून गेल्याबाबत सुंदराबाई यांना भाऊ महाराज याचे (४६१); पठाण बारगीर यांनी महाडीक याची पळवून नेलेली घोडी पाठविल्याबाबत ग्रांट यास छत्रपतींचे (४६४); फौजेसह अकिवाटच्या आसरेस राहून शत्रूच्या शिरोळ येथील फौजेस पायबंद घालण्याबाबत रत्नाकर पंडित राजाज्ञा यास प्रीतीराव चव्हाण याचे (४६५); मतिवडेची सर्व गुरे सोडून देण्याविषयी रत्नाकर आप्पा यास सिदमराव घाटगे याचे (४६६).

**पत्रे—छत्रपतीस :** भुदरगड प्रकरणी आपल्या मनात दुजाभाव नाही या अर्थी सुबराव घोरपडे याचे (१९३९७); शर्करायुक्त तीळ पाठवल्याबाबत बळवंतराव चिटणीस याचे (३९९); जीवराव घोरपडे याच्या गावावर झालेल्या रोख्यास मनाई होण्याबाबत प्रीतीराव चव्हाण याचे (४११); धुळपाकडून सिलसिला न होण्याबाबत सुबराव कृष्ण याचे (४१३); दसऱ्याचा पोषाख पाठवल्याबाबत नानासाहेब पेशवे याचे (४१६); भुदरगड किल्ल्याहून प्रसाद व अंगारा पाठवल्याबाबत रेखोजीराव जाधव व चिंतामण जोशीराव याचे (४१७); सगुबाईने घेतलेल्या दत्तकासंबंधी, आबाजीराव प्रतिनिधी यांचे (४१८); सरकारी कामाच्या बंदोबस्तासंबंधी (४१९); पदाधिकाराची वस्त्रे व अलंकार मिळाल्याबाबत गोविंदराव मोरेश्वर अमात्य याचे (४२२); सरंजामासह भुदरगडास येत असल्याबाबत मोरेश्वर सुबराव याचे (४२३); मानसिंगराव जाधव व मालजी निकम याना पाठवीत असल्याबाबत (४२४); व जोशीराव तोरगलाहून व इंग्रजाकडून आलेल्या पत्रांची उत्तरे पाठवल्याबाबत (४२५); व जोशीराव यांच्याकडून खर्चास ऐवज मिळत नसल्याबाबत प्रीतीराव चव्हाण याचे (४२६); मालवणहून पुण्यास जाणाऱ्या इंग्रजी पलटणीस जकातीचा उपसर्ग न होणेबाबत मोरेश्वर सुबराव याचे (४३१); कर्नाटक येथील सरंजामाची नीळकंठराव चव्हाण व प्रीतीराव चव्हाण यांच्यामध्ये वाटणी करून देण्यासंबंधी चिंतामणराव पांडुरंग याचे (४३२); आपल्याविरुद्ध पंतप्रधानाजवळ काही बोलणे केले नाही या अर्थी (४३३); सामानगडकऱ्यांच्या मसाला ऐवजाबाबत भवानराव खानविलकर याचे (४४९); भुदरगडावरील निपाणीकरांच्या संभाव्य हल्ल्यासंबंधी यादवराव जाधव व हणमंत शिवराम याचे (४५०); किल्ले भुदरगडच्या सोडचिठ्या मिळाल्याबाबत माणकोजी गायकवाड याचे (४५१); जतवाड हा गाव पूर्ववत आपणाकडे चालवण्याबाबत नरसिंह खंडेराव याचे (४६२).

**मसुदा**—पुणे येथील इंग्रज कर्नलास तिळगूळ पाठविल्याबाबत छत्रपतींनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (१९४१२).

**यादी**—कमतनूर हा गाव नरसिंगराव देशपांडे याचा असल्यासंबंधी (१९३२८).

**वतनपत्रे**—नारो खंडेराव यास मिरज येथील देशमुखी व प्रांत पन्हाळा व मिरज येथील सरदेशमुखीची वतने दिल्यासंबंधी राणोजी घोरपडे याची (१९४०२-४०३).

**वंशावळ**—खानविलकर घराण्याची (१९४६०).

---

**ज. क्र. १२७, रु. क्र. १२७, पु. क्र. २, का. सं. १९४६७-१९५२१ (५५).**

**सु. स. ११६० ते १२४४, इ. स. १७५९-६० ते १८४३-४४.**

**कलमबंदी**—नेज या गावाच्या जप्तीसंबंधी (१९४७८).

**पत्रे**—स्वराज्य संस्थापनाच्या कामी सहाय्य करण्याविषयी, मालोजीराव घोरपडे यास शिवाजी राजे यांचे (१९४६७-४७५); गुडेवाडी व अर्जुनवाडी ही गावे नेसरीकर शिंदे यांची असल्यासंबंधी पो. एजंट यास करवीरकर वकीलाचे (४७६); पडलेल्या कुस्वप्ना संबंधी आईसाहेब यांना गोडूबाई शिंदे इचे (४८०); क्षेमसमाचारासंबंधी (४८१); संकेश्वर मठ प्रकरणी लिहून पाठविण्याविषयी सदाशिवपंत आबा यास रामचंद्र जिवाजी याचे (४८२); जिवाजी बल्लाळ हे किल्ले येथे जमाव जमवीत असल्या-

**रुमाल क्र. १२७**

**पुडके क्र. २--(चालू)**

बावत येसाजी लक्ष्मण कुलकर्णी याचे (१९४८३); कर्जाच्या व शिबंदीच्या बंदोबस्ताविषयी बयासाहेब यांना नरसिंगराव शिंदे याचे (४८४); घामने वगैरे गावातील गुरे व धान्य सेनापति यानी कापशीस नेल्याबावत पंत राजाज्ञा यास हणमंत शिवराम याचे (४८५); पेशव्यांशी समेट करण्यासंबंधी वाईसाहेब यांना भगवंत आप्पाजी यांचे (४८६); आकाराम बावा याजकडून सर्व मजकूर कळल्याबावत, भाऊ जोशीराव यास सखाराम घाटगे याचे (४८८); फौजेसुद्धा सातारा मुक्कामी येण्याबावत आकाराम बावा यास सखाराम घाटगे याचे (४८९); आजरे येथील वहिवाटीबाबत तंटा न करण्यासंबंधी इचलकरंजीकरास ताकीद केल्याबाबत, शिवाजी घोरपडे यास माधवराव बल्लाळ याचे (४९०); आपल्याकडील सविस्तर मजकूर आकाराम बावा सांगतील या अर्थी निंबाजी बावा यास सखाराम घाटगे याचे (४९१); सेनापतीस भेटल्याबावत, आईसाहेब याना कृष्णाजी अमृतराव प्रतिनिधी याचे (४९२); प्रीतीराव चव्हाण यास फौजेसुद्धा कर्नाटक प्रांती रवाना केल्यासंबंधी व्यंकटराव नाईक यास (४९४); कामकाजासाठी कारकून पाठवीत असल्यासंबंधी नबाब अब्दुल नबीखां यास प्रीतीराव चव्हाण याचे (४९६); बंडवाल्यांना आश्रय दिला जाणार नाही या अर्थी कर्नल क्लोज यास छत्रपतींचे (४९८); चाकरीविषयी काळजी नसावी या अर्थी (४९९); एलफिन्स्टन व चॅपलिन यांच्याशी कामकाजासंबंधी बोलणी केल्याबावत वहिनीसाहेब याना भाऊ महाराज यांचे (५००); सिंधुदुर्ग बंदरातील रहदारीबावत गव्हर्नर वेलस्ली यास छत्रपतींचे (५०१); कल्याणराव यांची भेट घेतल्याबावत प्रीतीराव चव्हाण यास जिवाजी आनंदराव याचे (५०२); मुराररावघोरपडे याने रामपुरास ठाणे पातल्यासंबंधी भाऊ महाराज याना संताजीराव घोरपडे याचे (५०४); तालचरी येथील इंग्रज अधिकाऱ्यास भेटल्यासंबंधी बाजीपंत तात्या यास मोरो महादेव याचे (५०६); क्षेमसमाचारासंबंधी प्रीतीराव चव्हाण यास देवी नाईक याचे (५०८); लवकरच करवीरी येत असल्याबावत सुंदराबाई यांना भाऊमहाराज याचे (५०९); लिंगनूर व दानवाड ही गावे करवीरकरांच्या स्वाधीन करण्याबावत कल्याणराव कृष्ण यास सदाशिवराव माणकेश्वर याचे (५११); लक्ष्मण हरी हे सविस्तर मजकूर निवेदन करतील या अर्थी अजिम-उल उमराव यास प्रीतीराव चव्हाण याचे (५१२); शिवा खासबारदार याच्याशी आपण मारामारी केली नसल्यासंबंधी विसोबा नाईक यास रामचंद्रराव घोरपडे याचे (५१६); मालवणहून करवीरास आणावयाच्या तोफासंबंधी दिनकरराव गायकवाड यास उदाजीराव घाटगे याचे (५१७); करवीरास येण्यास विलंब लागणार असल्यासंबंधी सीताराम भोसले यास सुबराव घोरपडे याचे (५१८); रघुनाथराव पेशवे याचे पत्र पाठविले असल्यासंबंधी जिजाबाई यांना भगवंत आप्पाजी याचे (५२०); क्षेमसमाचाराबाबत मानसिंगराव पाटणकर यास देवी नाईक याचे (५२१).

**पत्रे--छत्रपतीस :** तीळशर्करा पाठविल्याबावत बळवंत मल्हार याचे (१९४७७); कंपनी सरकारकडून जाबसाल उलगडून घेण्याबावत तिसरे शिवाजी याना (४८७); पंत प्रतिनिधी खानापुरास रवाना झाल्यासंबंधी विजापूर प्रांती राजाज्ञा इत्यादींकडून होणाऱ्या उपसर्गाच्या बंदोबस्ताविषयी जानराव जाधव याचे (४९५); क्षेमसमाचारासंबंधी आऊबाई घाटगे इचे (५०३); राघो विठ्ठल याचेकडून आज्ञापत्र पोचल्याबावत माणकोजी शिंदे याचे (५०५); कुडाळ प्रांतातील आमडवाल या शंकराचार्य यांच्या इनाम गावासंबंधी चॅपलीन याचे (५०७); चत्रसिंग (चतुरसिंग) इत्यादींच्या बंदोबस्ताविषयी बाजीराव रघुनाथ याचे (५१०); गोखले व कुरुंदवाडकर यांच्या लष्करी हालचालींसंबंधी मुलकेजहां (सावनूरकर) याचे (५१३); करवीर हद्दीतील चोरांच्या बंदोबस्ताबावत चॅपलीन याचे (५१४); मुनशी मीर इमदादअल्ली याच्याशी आपला स्नेह असल्यासंबंधी दौलतराव घोरपडे याचे (५१५); कोतोली गावाच्या खटल्यासंबंधी उदाजीराव चव्हाण याचे (५१९).

**याद्या--**नारायणराव घोरपडे, रामचंद्रराव घोरपडे इत्यादींस सेनापतिपद दिल्यासंबंधी (१९४७९); चिकोडी, मनोळी, वाडीकर सावंत इत्यादींबाबत करावयाच्या बोलण्यासंबंधी (४९७).

---

**ज. क्र. १२८, रु. क्र. १२८, पु. क्र. १, का. सं. १९५२२-१९५७६ (५५).**

**मु. स. ११६० ते १२३७, इ. स. १७५९-६० ते १८३६-३७.**

**करार**—सिंधुदुर्ग बंदरात आरमारी बोटी, फत्तेमाऱ्या वगैरे न आणण्यावावत करवीरकर व इंग्रज यांचेमध्ये झालेला (१९५४४).

**पत्रे**—कर्नल वेलस्ली यास छत्रपतींनी पत्र पाठविल्यासंबंधी मेजर हक यास नागोजीराव घाटगे याचे (१९५२३); क्षेमसमाचारासंबंधी बाईसाहेब यांना भगवंत आप्पाजी याचे (५२७); हमीदवाडचे ठाणे मिळाल्याबावत आईसाहेब यांना भगवंत आप्पाजी याचे (५२८); मलकापुराहून विशाळगडास गेल्यासंबंधी बाईसाहेब यांना कृष्णाजी अमृतराव प्रतिनिधी याचे (५२९); पेशवे यांच्या लष्करी हालचालीची माहिती पाठवीत असल्याबाबत आईसाहेब यांना व्यंकटराव कृष्ण याचे (५३०); पो. एजंट धारवाड याजकडून आलेल्या जवावाची थैली पाठवल्यावावत श्रीपतराव घाटगे यास दिनकर गायकवाड याचे (५३१); छत्रपतींकडील वर्तमान वरचेवर कळविण्याबावत रावसाहेब निंबाळकर यास बापूजी नारायण याचे (५३४); सातारा मुक्कामी फौजेसुद्धा निघून येण्याबावत आकाराम यादव यास सिदराम नाईक निंबाळकर याचे (५३५-५३६); दौलतराव शिंदे व बाया यांचा समेट घडवून आणण्यासंबंधी आकाराम यादव यास यशवंतराव घोरपडे याचे (५३७); इंग्रजाकडून कागल तालुक्याच्या सोडचिठ्या मिळवण्यावावत सुंदराबाई यांना मोरो बाजीराव व चिटणीस याचे (५३९-५४०); सिंधुदुर्ग येथील देवस्थानाच्या मोईनी खर्चाबावत (५४१); रघुनाथपंत यांच्या हिंदुस्थानात होणाऱ्या स्वारीवावत जिजाबाई यांना शेषो त्रिमल याचे (५४२); महाराजाचे आज्ञेप्रमाणे मोरेश्वर शास्त्री, गोपाळशास्त्री व रामचंद्र बाबाजी यांच्या मार्फत कारभार सुरू झाल्यावावत जिजाबाई यांना रघुनाथ बाजीराव याचे (५४६); सबनीस व परांजपे यांच्या उपद्रवावावत अंताजीपंत वाकनीस यास अमृतराव भगवंत प्रतिनिधी याचे (५४७); मनोळीस ठाणे न घालण्यावावत व्यंकटराव नलवडे यास संभाजीराव शिंदे याचे (५४८); क्षेमसमाचारासंबंधी (५४९); फणसप गावी गेलेल्या वरातदारास परत जाण्यास ताकीद देण्यासंबंधी आबाजीराव प्रतिनिधी यास आईसाहेब यांचे (५५०); पटवर्धनाकडून करवीरकरांच्या प्रांतास होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोबस्तावावत नागोजीराव घाटगे याचे (५५१); सरंजाम व खर्चाचा बंदोवस्त करण्याबावत मानसिंगराव बापू यास आप्पाजी विठ्ठल याचे (५५३); दौलतराव शिंदे व बाया यामधील वादासंबंधी जानराव काका यास यशवंतराव घोरपडे याचे (५५४); खटांगळे येथील बावती व नजराण्याच्या ऐवजावावत रामचंद्रराव आमात्य यास रत्नाकरपंत राजाज्ञा यांचे (५५९); भुदरगड येथील लोकांच्या पोटापाण्याच्या व्यवस्थेवावत, नारायणराव यास (५६३); नेसरीकर शिंदे व मैनावाई हेरेकर यांच्यामध्ये अर्जुनवाड बावत चाललेल्या तंट्यासंबंधी (५६५); होंगलकर वाण्याची बाकी देण्यावावत कृष्णराव जगताप यास (५७०); जीवराव जाधव यास नारायणराव राजाज्ञा यांचे (५७४); गव्हर्नर यास मुंबई येथे भेटल्यासंबंधी आईसाहेब याना बाळाजी बाजीराव चिटणीस याचे (५७२-५७३); शत्रूच्या पारपत्यावावत पांडुरंगराव लाड यास रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (५७६).

**पत्रे—छत्रपतीस :** दास्तान कोठीकडे कैदेत ठेवलेल्या सगणी कुणबिणीबावत राणोजी दळवी याचे (१९५२२); मीर इदात अली मुनशी याचा छत्रपतीची नोकरी करण्याचा मानस असल्याबाबत दौलतराव घोरपडे याचे (५२४); भुदरगड, विशाळगड, बावडा इत्यादीसंबंधी चॅपलीन यांच्या बरोबर बोलणी होणार असल्याबावत भाऊ महाराज याचे (५२६); कागलचे ठाणे केव्हाही परत करीन या अर्थी तुळजोजी घाटगे याचे (५३२); फौजेच्या रवानगीबावत मीर महमद याचे (५३३); साळशी येथील येणे असलेल्या ऐवजावावत देवी नाईक याचे (५३८); विठ्ठलपंत सबनीस हे विशाळगडाकडील मजकूर निवेदन करतील या अर्थी आंदोजी हुजरे याचे (५४३); करवीरी खासबारदार लोक पाठविल्याबावत रताजीराव चव्हाण याचे (५४५); हिम्मतबहादूर यांच्या पत्री सर्व मजकूर लिहिला असल्यावावत देवी नाईक याचे (५५२); लष्कर मुक्कामी यथास्थित असल्यावावत नारो गिरमाजी व नारो गंगाधर यांचे (५५५, ५६९, ५७१); स्वामी सेवेसी एकनिष्ठ असल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (५५६); गव्हर्नर यांची भेट घेतल्यासंबंधी मल्हार यशवंत याचे (५५७-५५८); भेटीस येत असल्यासंबंधी लक्ष्मीबाई शिंदे इचे (५६०); स्वामीसेवेसी एकनिष्ठ असल्यावावत बाळाजी बाबूराव याचे (१९५६१); पंतप्रधान यांच्या रथास फुलगाव

येथे झालेल्या अपघाताविषयी बाळाजी बाजीराव चिटणीस याचे (५६६-५६७); मलकापूर येथील लष्करातील लोकांच्या हजेरीच्या याद्या पाठविल्याबाबत (५६८); व पथकातील म्हातारे, लंगडे व आजारी लोकांची यादी पाठवल्याबाबत नारो गंगाधर याचे (५७५).

**मसुदे**--फौजेसह सामानगडास पोहचल्याबाबत वेलरळी यांस राजाज्ञा यांने लिहावयाच्या पत्रासंबंधी (१९५६२); बाळाजी राम व नागोजी घाटगे याना पाठवून देण्याबाबत गव्हर्नर यास रघुनाथ पै याने लिहावयाच्या पत्रासंबंधी (५६४).

**यादी**--करवीरकर व इंग्रज यामध्ये मालवणबाबत झालेल्या बोलण्याबाबत (१९५२५).

------

**ज. क्र. १२९, रु. क्र. १२९, पु. क्र. १, का. सं. १९५७७-१९६७१ (९५).**

**सु. स. ११३० ते १२४५, इ. स. १७२९-३० ते १८४४-४५.**

**आज्ञापत्र**--मिरज येथील मोंगलाईबाब करवीरकर संभाजीस दिल्याबाबत बाळाजी साळोखे यास सातारेकर शाहु छत्रपतींचे (१९५७७).

**कलमबंदी**--गजेंद्रगडकर सुबराव घोरपडे याचे वतन जमिनी इत्यादीसंबंधी छत्रपतींकडून ठराव होऊन यावयाच्या कलमासंबंधी (१९६०७–६१०).

**टिप्पणे**--इंग्रजाशी तह करून पेशव्यांनी त्यास वसई, वडोदे, डभई, भिवंडी इत्यादी मुलूख दिल्यासंबंधी (१९६०२).

**पत्रे--महाराणी जिजाबाई यांना** : सेवेत एकनिष्ठ असल्याबाबत महिपतराव आवजी याचे (१९५८०); प्रकृतीस बरे वाटताच भेटीस येत असल्याबाबत भगवंत आप्पाजी याचे (५८१).

**पत्रे--महाराणी दुर्गाबाई यांना** : क्षेमसमाचारासंबंधी सुबराव घोरपडे याचे (१९५८२); इंग्रजास द्यावयाच्या हप्तेबंदीच्या ऐवजासंबंधी प्रेसिडेंट व गव्हर्नर, मुंबई यास दुर्गाबाई यांचे (५८३).

**पत्रे--३ रे शिवाजी यांना प्रतिनिधि यांची** : रघुनाथ आबाजी व मोरोपंत भेटीस येणार असल्याबाबत (१९५८४); आप्पाजी भगवंत व मोरो हणमंतराव यांच्याशी झालेल्या बोलण्यासंबंधी (५८५); आप्पाजी भगवंत याजकडून आलेले पत्र पाठविल्यासंबंधी (५८६); लष्कराकडून आलेले पत्र पाठवल्यासंबंधी (५८७); बाजी रुद्र याच्याशी बोलणी करून येत असल्याबाबत (५८८).

**पत्रे--३ रे शिवाजी यांना इतरांची** : कंपनी सरकारच्या कामामुळे करवीरी येण्यास वेळ नसल्याबाबत देवी नाईक याचे (१९५८९); इंग्रजांशी झालेला जाबसाल बंगाल सुभेकडे पाठविल्याबाबत रघुनाथ पै याचे (५९०); नागोजीराव घाटगे याच्या पत्री सर्व मजकूर लिहिल्याबाबत दादाजी यादव याचे (५९१); शिंदे व सदाशिव मल्हार यांच्या भेटीसंबंधी मालोजी निकम याचे (५९२); सिंधुदुर्ग परत करवीरकरांच्या स्वाधीन करण्यासंबंधी कंपनी सरकारचे (६०१); सांगवडे येथील इनाम जमिनीच्या सनदा व खोची गांवच्या वतनासंबंधी सुबराव घोरपडे याचे (६०४).

**पत्रे--३ रे शिवाजी यांचेकडून** : गजेंद्रगडकर घोरपडे याजकडून करवीर दरबारकडे यावयाच्या ऐवजासंबंधी देवाप्पा यास (१९५७८); रंकाळ्याचे पाणी करवीरच्या लोकास नेऊ देण्याबाबत गणेश भिकाजी गोसावी यास सखाराम घाटगे सर्जेराव याचे (५९३); सावंतवाडीकरापासून होणाऱ्या उपद्रवासंबंधी सुलतानजी भोसले व शिवाजीपंत फडणीस यास देवीसिंग हवालदार किल्ले यशवंतगड याचे (५९४); प्रीतीराव चव्हाण व सखोजी भोसले यांना फौजेसह आपल्याकडे पाठविल्यासंबंधी, हैदरअल्ली यास यशवंतराव शिंदे याचे (५९५); सिद्धगिरी येथील सिद्धेश्वर देवस्थानचे इनाम गाव व जमिनी पूर्ववत

चालविण्यासंबंधी (१९५९६); गाय, घोडी व हत्ती पाठवून देण्यावावत विठ्ठल आप्पाजी याचे ( (५९७); खर्चास देऊन पलटणी सत्वर पाठवण्याविषयी त्र्यंवकराव यास (५९८-५९९); एल्फिन्स्टन याचेकडून कामकाजे उलगडून घेण्याविषयी महमद इब्राहिम मुनशी यास रत्नाकरपंत राजाज्ञा यांचे (६००); बंदगान अल्ली यास छत्रपतींचे खलिते पोचते केल्यावावत प्रीतीराव चव्हाण यास राजे कल्याणराव याचे (६०३); बोलणी करण्यासाठी नागोजीराव घाटगे व बाळाजी राम याना पाठविल्यावावत गव्हर्नर मुंबई याना (६०६); करवीरकराकडील शत्रूच्या हल्ल्यासंबंधी नागोजीराव घाटगे यास बच्चाजी अनंत याचे (६११); पलटणी व सरंजामसुद्धा करवीरी निघून येण्याबावत त्र्यंवकराव यास रत्नाकरपंत राजाज्ञा यांचे (६१२); आवासाहेव छत्रपति यांच्या सिंहासनारूढ समारंभासंबंधी पो. एजंट याना (६२८).

**पत्रे—संभाजी उर्फ आबासाहेब छत्रपति यांना :** सविस्तर मजकूर भेटीअंती सांगत आहे याअर्थी संभाजीराव शिंदे याचे (१९६१३); घोडी पाठवून देण्याविषयी वावासाहेव याचे (६१४); नागपूरकडील वृत्तांत आक्कासाहेव निंवाळकर यांचे पत्री लिहिला असल्यासंबंधी सेटीवा घाटगे याचे (६१५); क्षेमसमाचारासंबंधी वावासाहेव याचे (६१६); भरमाजी देसाई चिंचणीकर यांच्या गावांच्या व वतनाच्या बंदोवस्तासंबंधी दिनकरराव याचे (६१७).

**पत्रे—राणी सुन्दराबाई यांना मोरो बाजीराव चिटणीस यांची :** एक विचारे कामकाज करीत आहे याअर्थी (१९६१८); क्षेमसमाचारासंबंधी (६१९); चॅपलीन याच्या दौऱ्यासंबंधी (६२०); मुंवईकडील मजकुराची यादी पाठविल्यासंबंधी (६२१); जावसालावावत पेशव्यांना इंग्रजांनी निकड लावल्यासंबंधी (६२२); सनगे पाठवित असल्यासंबंधी (६२४); मुंवईस जाण्यासाठी पुण्याहून चिंचवडच्या मुक्कामास गेल्यासंबंधी (६२५); स्वरूपजी क्षीरसागर यानी इंग्रजाशी वोलणी केल्यावावत (६२६); भाऊ महाराज यानी वकीलीच्या कामी कर्ज काढून केलेल्या खर्चासंबंधी (६२९); एकसंबे, कागल, इत्यादी तालुके करवीरकरास मिळण्यावावत इंग्रजाशी वोलणी झाल्यावावत (६३२-६३३); इंग्रजाशी बोलणी केल्यासंबंधी (६३८); नारायणराव राजाज्ञांकडून भुदरगड तालुक्यास होणाऱ्या उपद्रवावावत (६३९).

**पत्रे—राणी सुन्दराबाई याना इतरांची :** वैद्य यानी लिहिलेल्या पत्रावरून मजकूर विदित होईल या अर्थी नारो गिरमाजी याचे (१९६२३); क्षेमसमाचारासंबंधी कृष्णाजी अमृतराव प्रतिनिधि याचे (६२७); छत्रपतींना पुत्र झाल्यावावत शर्करा भरतगडकरी लोकांना वाटल्यासंबंधी दिनकरराव गायकवाड याचे (६३१); निपाणीकराकडून येणे असलेल्या ऐवजासंबंधी इंग्रजांकडे प्रयत्न करीत असल्यावावत भाऊ महाराज याचे (६३४); दिनकरराव गायकवाड यांच्यासह इंग्रजाबरोवर वोलणी केल्यासंबंधी भाऊ महाराज याचे (६३५); चॅपलीन, स्मिथ वगैरे इंग्रज अधिकाऱ्यावरोवर बोलणी करणार असल्यासंबंधी, भाऊ महाराज याचे (६३६).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपतींस नारो गंगाधर याची :** न्हनु पेंढारी यास लष्कर मुक्कामी पाठवण्यावावत (१९६४०); निपाणीकर लोक गलतगेचे सरहद्दीवरून परत गेल्यावावत (६४६); लष्कराकडील मजकुराची यादी पाठविल्यासंबंधी (६६०); चिकोडी येथील शिरगांवकरांचा वाडा उकरावयाच्या तपशीलाचा नकाशा व नेरली ठाण्याचा नकाशा पाठवल्यासंबंधी (६६१); तोफखान्याकडील लोकांना द्यावयाच्या रोजमुऱ्यासंबंधी (६६४).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपतीस नारो गिरमाजी याची :** मुडलगे मुक्कामी केनीसाहेवाशी बोलणी झाल्यासंबंधी (१९६४१); तिळगूळ पाठवल्यासंबंधी (६४२); नरहरपंत व गुंडोपंत हे अणिगिरे तालुक्यात ऐवज वसूल करण्यास गेले असल्यासंबंधी (६४३); हुंडेकरी यांच्या गुमास्त्याने धारवाडास पो. एजंट याजकडे केलेल्या फिर्यादीसंबंधी (६४४); पासष्ट गावांच्या सोडचिठ्ठीच्या शोधासंबंधी (६४५); आठ दिवसात गलगले येथून इंग्रजी लष्कराचे कूच होणार असल्यासंबंधी (६४७); पेशवे पंढरपुरास जाणार असल्यावावत (६४८); महाभाष्य रंगाचार्य यांची करवीरी व्यवस्था ठेवण्यासंबंधी (६६७); हाणगोली येथील इंग्रजी लष्कराच्या मुक्कामाविषयी (६६९); इंग्रजाकडून घाटाच्या पाहणीवावत (६७०).

रुमाल क्र. १२९

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—बुवासाहेब छत्रपतींस मोरो बाजीराव याची :** इंग्रजाकडील ऐवज आणण्यासंबंधी (१९६४९); चॅपलीन-साहेब सातारा, सोलापूर विजापुरास जाणार असल्यासंबंधी (६५०); चिकोडी व मनोळी तालुक्यातील जहागिरदार वगैरेबरोबर कसलीही बोलणी केली नसल्यासंबंधी (६५१); इंग्रजाशी बोलणी करीत असल्यासंबंधी (६६५); भुदरगड येथील बंदोबस्ताबाबत (६६८).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपतींस इतरांची :** कागल प्रकरणी इंग्रजाशी बोलणी झाल्याबाबत बाळाजी बाजी-राव याचे (१९६३०); जैनाळ येथील गोपाळपंत पाटील यांचा घरगुती खटल्याबाबत राणोजी राव घोरपडे याचे (६९२); आनंदराव आण्णा व गोपाळराव पागनीस यांच्याकडून आलेली पत्रे पाठविल्याबाबत सुबराव घोरपडे याचे (६५३); तिळगूळ पाठविल्याबाबत मालोजीराव घोरपडे याचे (६५४); आपण शिकारीत मारलेले डुक्कर इंग्रज अधिकाऱ्यास भेट देणार असल्याबाबत (६५५); पो. एजंट यांचा मुक्काम बागेवाडीस असल्यासंबंधी सुबराव घोरपडे याचे (६५६); कामकाजासंबंधी इंग्रजाशी बोलणी केल्यासंबंधी नीळकंठ मल्हार याचे (६५७).

**पत्रे**—जिवण्या मांग यास पकडून आणण्याबाबत सुबराव घोरपडे यास मालोजीराव घोरपडे याचे (१९५७९); लाट व रांगोळी येथील देशमुखीचे वतन भवानराव बळवंत याजकडे पूर्वीप्रमाणे चालविण्याविषयी गव्हर्नरशी बोलणी करण्याबाबत भाऊ महाराज याचे (६५८); कामकाजे करून सत्वर येण्यासंबंधी उदाजी घाटगे यास नारायणराव राजाज्ञा याचे (६५९); खर्चासाठी ऐवज पाठविण्याविषयी मालोजी घोरपडे व नारो गंगाधर याचे (६६२); क्षेमसमाचारासंबंधी उदाजीराव घाटगे यास नारो गिरमाजी याचे (६६३, ६६६); कमळाबाई व दौलतराव घोरपडे यांना भेटीस पाठविल्याबाबत दिवाणसाहेब याना भुजंगराव घोरपडे याचे (६७१).

**याद्या**—चिकोडी तालुक्याच्या रद्द कर्जाच्या हिशेबासंबंधी (१९६०५); निपाणीकर यानी जबरीने लिहून घेतलेल्या सनदा, पत्रे परत छत्रपतींकडे येण्याबाबत (६३७).

---

**ज. क्र. १२९, रु. क्र. १२९, पु. क्र. २, का. सं. १९६७२–१९७५२ (८१).**

**सु. स. १२३० ते १२३८ इ. स. १७२९-३० ते १८३७-३८.**

**अर्ज**—खाजगी खर्चाच्या नेमणुकीबाबत भवानीबाई प्रतिनिधी यांचा गव्हर्नर मुंबई याजकडे (१९७४१-७४२).

**आज्ञापत्र**—आनंदराव त्र्यंबक व बाळकृष्ण बाबूराव हे न सांगता कोठेतरी निघून गेल्याबाबत नारायण-राव राजाज्ञा यास बुवासाहेब छत्रपति यांचे (१९७१७).

**जबानी**—फ्रेंच व इंग्रज यामधील अरबस्तानातील वैमनस्यासंबंधी (१९७४०).

**टिप्पणे**—घोरपडे घराण्यात चालत आलेल्या सेनापती पदासंबंधी (१९७५०–७५१); नेसरी ठाण्यावरील शिंदे निषाणीकर इत्यादींच्या अम्मलाविषयी (७५२).

**पत्रे**—राघोबादादा यांची भेट करून देण्याबाबत व त्रिवर्गाचे पारिपत्य करण्यासंबंधी मानाजी शिंदे यास शाहूराजे यांचे (१९६७२-६७४); गमाजीपंताच्या पारिपत्याबाबत जिजाबाई यांना नरसिंगराव उद्धव याचे (६७५-६७६); दाजी विठ्ठल सांगतील तो मजकूर सरकारात निवेदन करण्याबाबत प्रतिनिधी यांचें (१९६७७); सरंजाम, फौज वगैरेसह छत्रपतींच्या भेटीस येण्याबाबत आवदीया-रजंग यास (६८२); चिकोडी तालुक्यात ठाणी घालून देण्याबाबत रामचंद्रपंत यास (६८३); व पलटणे व सरंजामसुद्धा सत्वर निघून येण्याबाबत त्रिंबकराव यास रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (६८४); बाळाजी दिनकर व हरिहरराव रघुनाथ हेरवाडकर यांच्यामधील भाऊबंदी वाटणीसंबंधी पो. ए. यास राजमंडळचे (६८६); पथकांच्या खर्चासंबंधी छत्रपतीस रत्नाकर राजाज्ञा याचे (६८७-६८८); रामचंद्रपंत दाजी सांगतील त्याप्रमाणे बंदोबस्त करण्यासंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यास देवी नाईक याचे (६९२); महम्मद इब्राहिम मुनशी यांनी इंग्रजाशी केलेल्या बोलण्यासंबंधी त्र्यंबकराव यास (६९३); पलटणी व सरंजामसुद्धा सत्वर निघून येण्याबाबत महमद इब्राहिम मुनशी मुक्काम पुणे यास (६९४); चिकोडी, मनोळी व

## रुमाल क्र. १२९

## पुडके क्र. २—(चालू)

पत्रे—(चालू)

हुकेरी तालुक्यात करवीरकरांची ठाणी वसविण्यासंबंधी रामचंद्रपंत यास (१९६९५); गोखले व पाच्छापूरकर यांच्यामधील लढाईसंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यास हणमंत शिवराम याचे (६९६); काही कामामुळे छत्रपतींच्या भेटीस येत नसल्याबाबत रत्नाकरपंत राजाज्ञा यास केशव नारायण नाईक याचे (६९८); खर्चाची तरतूद करताच फौजेसह येत असल्यासंबंधी अवदियारजंग याचे (७०३); क्षेमसमाचारासंबंधी पारसनवीस यास स्वरूपजी क्षीरसागर याचे (७०५). भोज व एकसंबे ही दोन गावे करवीरकरास मिळण्यासंबंधी कंपनी सरकारास करवीरकर वकीलाचे (७०६); शिरगांव संबंधीचे जावसाल इंग्रजाकडून उलगडून घेण्याबाबत पंत राजाज्ञा यास मोरो बाजीराव याचे (७०७); ऐवजाच्या वसुलाच्या रुजुवातीचे काम इंग्रजाकडून करून घेण्याबाबत सुन्दराबाई याना बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस याचे (७०८-७१०). क्षेमसमाचारासंबंधी बळवंत रावजी यास नारो गिरमाजी याचे (७१२); रत्नागिरीहून आलेल्या थैलीबाबत पो. एजंटशी बोलणी करीत असल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव याचे (७१५); पुणे मुक्कामी इंग्रज अधिकाऱ्यास भेटत असल्यासंबंधी बाळकृष्ण नाना यास गोपाळ वासुदेव याचे (७१६); इंग्रजांचा मुक्काम सातान्यास होणार असल्यासंबंधी (७१८); मनोळी व इतर ठाणी करवीरकरांच्या स्वाधीन करण्यासंबंधी निपाणीकर यास सखाराम घाटगे याचे (७१९); पुरंदरास येत असल्यासंबंधी मल्हारपंत नाडगोंडा यास पिराजीराव घाटगे याचे (७२५); क्षेमसमाचारासंबंधी बाबासाहेब पाटणकर यास आप्पाजीराव पाटणकर याचे (७२६); हैबतराव गायकवाड मृत्यु पावल्याबाबत दिनकरराव गायकवाड याचे (७२७); आबदागिरीचे सामान पोचल्यासंबंधी उदाजीराव घाटगे यास नारो गिरमाजी याचे (७३१); खर्चाची व्यवस्था करीत असल्याबाबत वासुदेव पंत आप्पा सांगलीकर यास संभाजीराव घोरपडे याचे (७३८); कर्नाटक प्रांताच्या बंदोबस्तासाठी कोन्हेर तिमाजी याची रवानगी करण्यासंबंधी शिवाजीपंत यास मुरारजी हिंदुराव घोरपडे याचे (७३९).

पत्रे—३ रे शिवाजी यांना इतरांची : भेटीस येत असल्याबाबत प्रतिनिधी याचे (१९६७८); पेशव्याशी झालेल्या बोलण्यासंबंधी, रघुनाथराव पं यास नीळकंठराव अनंत याचे (६७९); तिळगूळ पोचल्यासंबंधी गोपाळजी भोसले याचे (६८०); लष्कराहून आलेली पत्रे रवाना केल्याबाबत प्रतिनिधी याचे (६८१); मकर संक्रमणाचे तीळ शर्करा पाठवल्याबाबत रघुनाथ पं याचे (६८५); आपल्याकडून होणाऱ्या सेवेसंबंधी शेषो नारायण याचे (६८९); मालवण येथील दंग्यासंबंधी इंग्रजाशी बोलणी केल्याबाबत रघुनाथ पं याचे (६९०-६९१); परशरामभाऊकडे नारायण जिवाजीकडून पत्रे घेऊन जाणाऱ्या जासूदास पकडून चौकीत बसवले असल्यासंबंधी साबाजी पांढरे याचे (६९७); कोयळी गावाची सनद परशरामभाऊच्या नांवे करून पाठविण्याविषयी निंबाजी यादव याचे (७०४).

पत्रे—बुवासाहेब छत्रपतींस इतरांची : ठाणे आळते रद्दकर्जास असल्यासंबंधी निंबाजी यादव याचे (१९७११); तूर्त धारवाडास जाणार नसल्यासंबंधी (७१३-७१४); व पो. एजंट यांच्याशी बोलणी झाल्यासंबंधी बाळकृष्ण बाबूराव याचे (७२०); वसुलाचे ऐवजाविषयी मुंबईस इंग्रजाशी बोलणी केल्यासंबंधी बाळाजी बाजीराव चिटणीस याचे (७२१-७२३); तोफखानेकडील लोकांस व कुरणकडील बाणदारास एक माही रोजमुरा देण्यासंबंधी नारो गंगाधर याचे (७२४); पुण्यातील इंग्रज अधिकाऱ्यास कलमबंदीतील मजकूर समजाऊन दिल्यासंबंधी रामचंद्र मल्हार याचे (७२८); नारोपंत यानी शिरगूर व निलजी ही दोन ठाणी स्वाधीन केल्यासंबंधी जोत्याजीराव घाटगे याचे (७२९); वाटणी घेण्यास लष्करातील लोकांच्या हरकतीसंबंधी नारो गंगाधर याचे (७३०); गल्ल्याच्या जमेच्या याद्या पाठविल्याबाबत केदारजी रणदिवे व नारो गंगाधर याचे (७३२); घोडा व उंट पाठवून देण्यासंबंधी मीर अल्ली नवाब याचे (७३३); गडकरी लोकांच्या चाकरीसंबंधी विठ्ठल अप्पाजी याचे (७३५); घोडगिरी येथे इंग्रज अधिकाऱ्यास भेटण्यासंबंधी नारो गिरमाजी याचे (७३४); चॅपलीन व रॉबिन्सन हे पुण्यात नसल्याबाबत बाळाजी बाजीराव चिटणीस याचे (७३६); चिंचलीकर देसाई याचे ठाणे घेतल्याबाबत पो. एजंट याचे (७३७).

प्रकरणी कामे—विशाळगड येथील भोईलोकांच्या मोकास बाबेसंबंधी (१९७४३).

रुमाल क्र. १२९

पुडके क्र. २—(चालू)

पावत्या—भावाच्या खुनाबद्दल नुकसान भरपाई मिळाल्याबाबत ज्योती सिदनाईक यानी नेसरीकर शिंदे व कंपनी सरकारास लिहून दिलेल्या (१९६९९-७०२).

याद्या—रद्दकर्जासाठी लावून दिलेल्या तालुक्याबाबत (१९७४४); प्रतिनिधी यानी दत्तक इत्यादी संबंधी छत्रपतीस द्यावयाच्या नजराण्यासंबंधी (७४५); विश्वासराव घाटगे यास यशवंतराव घाटगे यानी सहा गावे करार करुन दिल्याबाबत (७४६); कागलकर घाटगे घराण्यातील सरंजामाच्या वाटणीसंबंधी (७४७); यशवंतराव घाटगे यांच्या कागल तालुक्यातील जप्त केलेल्या गावासंबंधी (७४८-७४९).

---

ज. क्र. १३०, रु. क्र. १३०, पु. क्र. १, का. सं. १९७५३-१९८१३ (६१).

सु. स. ११६० ते १२३८, इ. स. १७५९-६० ते १८३७-३८.

अर्ज—विजापूर येथील पिरजादे, फकीर वगैरे मुसलमान लोकावर खानेपट्टी न बसवण्याबाबत (१९७६१)

आज्ञापत्रे—राधाबाई विशाळगडकर यांच्या खर्चासंबंधी व अमृतराव प्रतिनिधि यांच्या दौलतीसंबंधीची माहिती पो. एजंट याना सांगण्याबाबत (१९८०७).

इनामपत्र—खानवट हे गाव इनाम दिल्याबाबत शहाजी भोसले यास जिजाबाई यांचे (१९७५८).

करीणा—प्रभावळी येथील कुलकर्णाच्या वतनाच्या वहिवाटीसंबंधी. (१९७५८-अ)

तहनामा—परस्परास लष्करी सहाय्य करण्याविषयी व रघुनाथराव पंडित (पेशवे) याना मदत करण्याविषयी इंग्रज व करवीरकर यामध्ये झालेला (१९७६२).

पत्रे—महाराणी जिजाबाई याना : क्षेमसमाचारासंबंधी, भगवंत आप्पाजी यांचे (१९७५५); नाना यानाही आपल्या भेटीस येण्याबाबत आज्ञा व्हावी या अर्थी शेषो नारायण याचे (७५६); वजाबाई यांचे मृत्युसंबंधी राणोजी घोरपडे याचे (७५७).

पत्रे—राणी दुर्गाबाई यांचेकडून : कंपनी सरकारच्या देणे ऐवजासंबंधी, जॉन वॉटसन् याना (१९७५९); भारी फौजेसह बंकापूरास सत्वर येण्याबाबत हैदरअल्ली यास (७६०); वसूलासंबंधी इंग्रजाशी बोलणी झाल्यासंबंधी आबासाहेब व बुवासाहेब छत्रपती याना भाऊ महाराज यांचे (७७६).

पत्रे—३ रे शिवाजी यांना : महिपतगडासंबंधी नाना फडणीस व परशुराम भाऊ यांच्या हालचालीसंबंधी सुभानजी साळोखे याचे (१९७६३); आपल्याला अंतर न देण्याविषयी श्रीनिवास प्रतिनिधी याचे (७६४); खर्चाची व्यवस्था करण्यासंबंधी नारो हरि करंदीकर याचे (७६५); सिंधुदुर्ग येथे मुसुंब्याच्या तारव्यावरील पकडलेल्या हस्तिदंतासंबंधी (७६६).

पत्रे—विठोजीराव यास नारायणराव मोहिते यांच्या पत्नीने दत्तक घेतल्याबाबत रत्नाकरपंत राजाज्ञा यास भानजी मोहिते हंबीरराव इत्यादी यांचे (१९७६७-७६८); सावकारी डिंगी सोडून देण्याबाबत दादाजी यादव यास प्रीतीराव चव्हाण याचे (७६९); राजाज्ञा यास सैन्यासह सामानगडाच्या सरहद्दीवर पाठवल्यासंबंधी मोरोपंत यास नागोजीराव घाटगे याचे (७७०-७७१); इंग्रजाकडील व्यापारी जहाजांच्या होणाऱ्या लुटालुटीसंबंधी नागोजीराव घाटगे यास मिंगेल देमील याचे (७७२); नारायणराव हे इकडील मजकूर सांगतील या अर्थी (७७३); छत्रपतींच्या लष्कराकडून कंपनी सरकारच्या मुलखास होत असलेल्या उपद्रवाबाबत रत्नाकरपंत राजाज्ञा यास देवी नाईक याचे (७७४); कृष्णराव जनार्दन यास सविस्तर मजकूर सांगून पाठविल्यासंबंधी मीर नजर अली खां यास (७७५).

रुमाल क्र. १३०

पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे—राणी सुन्दराबाई यांना :** कामकाजाच्या थैल्या इंग्रजाकडे सादर केल्यावावत (१९७७७); दिनकरराव गायकवाड, स्वरूपजी क्षीरसागर व आपण एक विचारे कामकाज करीत आहोत या अर्थी मोरो बाजीराव याचे (७७८); इंग्रजाबरोबर झालेल्या बोलण्यासंबंधी मोरो बाजीराव व भाऊ महाराज याचे (७७९-७८०); हलकर्णी व करवळी या गावाच्या सोडचिठ्यावावत भाऊ महाराज यांचे (७८१-७८२); निगवे येथील जावसालांच्या रोख्या-संबंधी बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस याचे (७८३); टाकळी, शिरदवाड व रेंदाळ वगैरे गावच्या सोडचिठ्या पाठवण्यावावत भाऊ महाराज यांचे (७८४); बापूजी सोमण याचे विनंतीपत्र पाठवल्यासंबंधी नारो गिरमाजी याचे (७८५); आक्कासाहेब याना पाठवावयाची पत्रे इंग्रजाना दाखवून त्यांच्याकडे रवाना केल्यावावत (७८६); श्रीमंताची स्वारी (पेशवे) कोंकणात गेल्यासंबंधी नारो गिरमाजी याचे (७८७).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपती यांना**—वेकनाळ येथील सरदेशमुखीच्या ऐवजाच्या रोख्यासंबंधी, संताजीराव घोरपडे याचे (७८८); सौंदती व शिरगाव बाबतचे जावसाल उलगडून घेण्यासंबंधी, मोरो बाजीराव याचे (७८९); शिरोळ येथील बखेडेखोरांच्या बंदोवस्तावावत, मोरो बाजीराव चिटणीस याचे (७९०); मुंबई येथे गव्हर्नरशी झालेल्या भेटीसंबंधी मोरो बाजीराव याचे (७९१-७९२); कामकाज व वसुलाच्या ऐवजाच्या रुजुवातीचे काम चालू असल्यावावत, बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस याचे (७९३); कामात कसूर होणार नाही या अर्थी नारो गिरमाजी याचे (७९४); वाळवे येथे इंग्रज अधिकाऱ्यास भेटल्यासंबंधी, नारो गिरमाजी याचे (७९५-७९६); पन्हाळगड व पावनगड येथील गडकऱ्यांच्या पोटगीबावत, नारो गंगाधर याचे (७९७); सामानगडकऱ्यापासून होणाऱ्या उपद्रवास मनाई करण्यासंबंधी राणोजी नलवडे याचे (७९८-७९९); कागल तालुक्यास होणाऱ्या उपद्रवाच्या बंदोवस्तावावत कमिशनर चॅपलीन यास मानसिंगराव घाटगे याचे (८००-८०१); पाठविलेले रुपये मिळाल्यावावत उदाजीराव घाटगे यास नारो गिरमाजी याचे (८०२); केळीची पाने खरेदी केल्यावावत, राघोपंत भिसे यास (८०३); राघोपंत भिसे यास केळीची पाने खरेदी करण्यासाठी साडे बारा रुपये देण्यावावत आत्मारामपंत यास (८०४); व क्षेमसमाचारासंबंधी चिमणाजीपंत याना (८०५); शास्त्रीबावांच्या पत्री सर्व मजकूर लिहिल्यासंबंधी बच्चाजीराव पंडितराव याना मल्हार यशवंत याचे (८०६); छत्रपतींचे कल्याण करावे हेच मनात असल्यासंबंधी भाऊ महाराज यांचे (८०८); खर्चाच्या बंदोवस्तावावत विश्वासराव घाटगे यास कुसाजी माने याचे (८०९); एकनिष्ठपणे स्वामी सेवा करणार या अर्थी हिंदूराव बापू यास बाळकृष्ण बाबूराव याचे (८१०); पूर्वीच्या पत्रातील मजकूर गुप्त ठेवण्यावावत (८११); चोर व बंडवाल्या लोकांची चौकशी चालू असल्यावावत दिनकरराव गायकवाड यास व्यंकटराव व रामचंद्रराव पाटणकर यांचे (८१२).

**याद्या—**सिंधुदुर्ग येथील जामदारखान्याकडील शिलकेसंबंधी (१९८१३).

---

**ज. क्र. १३०, रु. क्र. १३०, पु. क्र. २, का. सं. १९८१४-१९८७९ (६६).**
**सु. स. ११२१ ते १२४५, इ. स. १७२०-२१ ते १८४४-४५.**

**अर्ज—**आनंदीबाई देसाई हिची चीजवस्तू वगैरे तेरणीकर याने लुटल्यासंबंधी छत्रपतीकडे (१९८७४).

**आज्ञापत्रे—**पिराजी घोरपडे याजकडून येणे असलेले कर्ज त्यास माफ केल्यावावत श्रीनिवास प्रतिनिधी याचे गावकामगार का शिरहट्टी याना (१९८१४); आलास या गावच्या देशमुखीचा ऐवज पिराजी घोरपडे यास देण्याबद्दल श्रीनिवास प्रतिनिधि याचे गावकामगार याना (८१५); कोडोली येथील देशमुखीच्या वतनाचा इनाम हक्क पिराजी घोरपडे याजकडे

**रुमाल क्र. १३०**

**पुडके क्र. २--(चालू)**

**आज्ञापत्रे**-(चलू)

चालवण्यावावत गांवकामगार यास प्रतिनिधी याचे (१९८१६); का ढालगाव येथील सरदेशमुखी पिराजी घोरपडे यास दिल्यासंबंधी, देसाई व सरदेसाई मामले मूर्तजावाद यांचे गावकामगार याना (८१९); बेडग येथील देशमुखी वतन राणोजी घोरपडे यास दिल्यासंबंधी (८२०); राणोजी घोरपडे यास आलास हा गाव दिल्यासंबंधी पिराजी घोरपडे याचे गावकामगार यांना (८२१).

**इनामपत्र**--इचलकरंजी व शिरढोण ही गावे राणोजी घोरपडे यास इनाम दिल्यासंबंधी (१९८३४).

**टिप्पण**--विशाळगड तालुका प्रतिनिधीस दिल्यासंबंधी व परशुरामपंत प्रतिनिधीवरील शाहूच्या रोषासंबंधी (१९८३३).

**पत्रे**--इंचलकरंजी वगैरे पाच गावे पिराजी घोरपडे यास इनाम दिल्यासंबंधी सुभेदार प्रांत पन्हाळा यास (१९८१७); पिराजी घोरपडे यास प्रांत पन्हाळा येथील सरदेशमुखी दिल्याबावत नरसो वीरेश्वर यास श्रीनिवास प्रतिनिधी याचे (८१८); राणोजी घोरपडे यांजकडे सरंजामी नोकरी करण्यावावत यमाजी रुद्र यास नानासाहेब पेशवे याचे (८२२). आज्ञेप्रमाणे लष्कर तयार असल्यासंबंधी छत्रपतीस प्रतिनिघी याचे (८३५); इंग्रजाशी दोस्ती वाढवावी अशी छत्रपतीची इच्छा असल्यासंबंधी मिगेल देलीम यास नागोजीराव घाटगे याचे (८३६); मानसिंगराव पाटणकर यांच्याकडे येणे असलेल्या बाकीसंबंधी परशराम पंत प्रतिनिधी यास सेवागिरी याचे (८३७); सर्जेराव घाटगे, शिंदे बाया, इत्यादीच्या हालचालीसंबंधी ३ रे शिवाजी याना नारो गोविंद खांडेकर याचे (८३८); रांगण व मालवण येथील वरात ऐवजावावत राघोपंत यास* (८३९); प्रीतीराव चव्हाण यास देवी नाईक यानी लिहिलेल्या पत्रावरून सर्व मजकूर कळेल या अर्थी ३ रे शिवाजी यांना व्यंकटराव याचे (८४०); छत्रपतींच्या भेटीस येण्यावावत लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल यास सदाशिवराव ज्योती दिवाण याचे (८४१); पिराजी निकम याजवरोवर खर्चास पाठवल्यावावत सुवराव घाटगे यास हैवतराव गायकवाड याचे (८४२); पेंढारी लोकांस करवीरी नोकरीस पाठवून देण्यावावत पीड नाईक वहिरी वहाद्दर यास (८४३); पेशव्याकडील छत्रपतींची कामे उलगडून देण्यासंबंधी रामचंद्र जोशीराव याचे (८४४).

**पत्रे--बाळाजी बाजीरावांची राणोजी घोरपडे याजसंबंधी** : हुकेरी तालुक्याची मोकासवाव चालविण्यावावत देशमुख देशपांडे प्रांत हुकेरी यास (१९८२३); सरंजामी नोकरी करण्यावावत रघुनाथ देसाई निपाणीकर यास (८२४); कागल येथील मुकासवाव चालविण्यावावत देशमुख व देशपांडे प्रांत कागल यास (८२५); मुकासवाब चालवण्यावावत देशमुख व देशपांडे पो कोल्हापूर यास (८२६); सरंजामी नोकरी करण्यावावत वावजी सावंत यास (८२७); महादजी शितोळे व निंवाजी भांडवलकर यास (८२८, ८२९); आजरे तालुका इनाम दिल्यासंबंधी (८३०); आजरे तालुक्यावावत तंटा न करण्यास इचलकरंजीकरास ताकीद केल्यासंबंधी शिवाजी घोरपडे यास माधवराव वल्लाळ प्रधान याचे (८३१-८३२).

**पत्रे--आबासाहेब छत्रपति याना इतरांची** : मुंवईस गव्हर्नरची भेट घेतल्यासंबंधी मोरो वाजीराव याचे (१९८५५); देवरूख येथील उपाध्ये दामोदर याचे देवस्थान उत्पन्न पूर्ववत प्रो॥ त्याजकडे चालविण्यावावत (८५६).

**पत्रे--राणी सुंदराबाई यांची बुवासाहेब छत्रपति याना** : कोणत्याही गावावर रोखे न करता परत करवीरी येण्यासंबंधी (१९८५२); क्षेमसमाचारासंबंधी (८५३); पो. एजंट मन्रो याची भेट घेण्यासंबंधी (८५४); फोंडा घाटातील तोफा वेलवण येथे आणण्यासंबंधी (८५७).

**पत्रे--राणी सुंदराबाई याना इतरांची** : इंग्रजांकडून उलगडून घ्यावयाच्या कामासंबंधीची माहिती संभु कदम निवेदन करील या अर्थी (१९८४५); इंग्रजाशी कामकाजासंबंधी बोलणी करीत असल्यावावत मोरो वाजीराव याचे (८४६); सेनाखासखेल याजकडील कामकाजे, कर्जाऊ जावसाल, वगैरेसंबंधी निवेदन छत्रपतीच्या पत्री लिहिल्यावावत भाऊ महाराज यांचे (८४७); एल्फिन्स्टन खानदेशात गेल्यासंबंधी व वाजीराव पेशवे महायात्रेस गेल्याबावत (८४८); निपाणीकर यानी छत्रपतींच्या तालुक्यास उपद्रव दिल्यासंबंधी भाऊ महाराज याचे (८४९-५०); आबाजीराम यास पन्हाळा येथील गल्लेच्या वसुलाविषयी मनाई होण्याबावत (८५१).

रुमाल क्र. १३०

पुडके क्र. २ (चालू)

**पत्रे—बुवासाहेब छत्रपति याना इतरांची :** कागलकडील जकातीची पूर्ववत प्रो वहिवाट चालण्याबाबत गोविंद दासो याचे (१९८५८); ग्रांट याची भेट घेऊन करवीरी येत असल्याबाबत भाऊ महाराज याचे (८५९); म्हाकवे येथील ठाणे घेतल्याबाबत बाबाजी जगदाळे याचे (८६०); जीवराव जाधव हे मजकूर निवेदन करतील या अर्थी नारायणराव रत्नाकर याचे (८६१); शिरगूरचे ठाणे घेतल्याबाबत जोत्याजीराव घाटगे याचे (८६२); रीड साहेबाच्या पत्राचे उत्तर पाठविण्यासंबंधी रामचंद्र मल्हार व वच्याजी अनंत याचे (८६३); कामकाजाविषयी इंग्रजाशी बोलणी केल्याबाबत (८६४-८६५); भेटीची इच्छा असल्याबाबत रामचंद्र मल्हार व वच्याजी अनंत याचे (८७०).

**पत्रे**—कागलकर यानी छत्रपतीच्या हुकमतीखाली वागण्याबाबत मुख्य कारभारी याचे पो. एजंट यास (८६६-८६७); छत्रपतीचा मुक्काम लाटेस असल्यासंबंधी गोपाळराव यास नारायणराव पाटणकर याचे (८६८-८६९); कऱ्हाड व सातारा येथे रास्तेकडील जमावाने लुटालूट केल्याबद्दल (८७१); जोत्याजीराव निंबाळकर व बळवंतराव रास्ते यांचेमधील देणेघेण्याच्या निकालासंबंधी पो. ए. यास, राजमंडळाचे (८७२); शिरोळ तालुक्यात बंडाचा उपद्रव होऊ नये यासाठी लोक व स्वार पाठविण्याबाबत (८७३); आपटे हे सविस्तर मजकूर सांगतील या अर्थी रामराव अखबारनवीस यास अमृतराव भगवंत याचे (८७५); दिवाण साहेब यांची भेट करुन देण्याबाबत दिनकरराव गायकवाड यास नरसिंहराव शिंदे याचे (८७६).

**याद्या**—बळवंतराव रास्ते यांच्या देण्याघेण्याच्या तडजोडीबाबत जोत्याजीराव निंबाळकर यास राजमंडळाचे (१९८७७); विठ्ठल दिनकरराव, नरसिंगराव शेषाद्रि यांच्या भाऊबंदी वाटणीसंबंधी (८७८-८७९).

---

**ज. क्र. १३१, रु. क्र. १३१, पुडके क्र. १, का. सं. १९८८०-१९९५३ (७४).**

**सु. स. ११६०, १२३७ ते इ.स.१७५९–६० ते १८३६–३७.**

**टिप्पणे**—अंगात येवून अंबाबाईने सांगितलेल्या भाकितासंबंधी (१९८८०); यशवंतराव घाटगे यांच्याकडे कागल तालुका व देशमुखी वतन पूर्ववत चालविण्याबाबत चिंतामण पांडुरंग यास सांगितल्यासंबंधी (८८१); भिरडी गांव शंभु छत्रपतीनी शेषो नारायण यास दिल्यासंबंधी व नंतर तो निपाणीकरापासून परत करवीरकरास मिळाल्यासंबंधी (८८३); शेषो नारायण याजकडून परत घेतलेल्या गावासंबंधी (८८४).

**पत्रे**—विद्याभ्यास करुन शरीर प्रकृती चांगली ठेवण्यासंबंधी रघुनाथराव यास बाजीराव पेशवे याचे (१९८८८).

**पत्रे : राणी जिजाबाई यांना**—शेषो नारायण याचे रुईहून यडूरास जात असल्यासंबंधी (१९८८९); एकनिष्ठपणे सेवा करीत आहे या अर्थी (८९०).

**पत्रे : राणी दुर्गाबाई यांना**—कर्नाटकातील हैदरअल्लीच्या हालचालीसंबंधी नागोजी श्रीनिवास याचे (१९८९१-८९२); वासुदेव देशपांडे व संताजी नवरे यामार्फत आज्ञा सांगणे ती मागून पाठवल्यासंबंधी बाबाजी गजेंद्रगडकर यास (८९३); पेशव्यांच्या कर्नाटक स्वारीसंबंधी, बाबाजी याचे (८९४-८९७); लष्कराच्या खर्चाच्या बंदोबस्ताविषयी (८९८); व धारवाडचा किल्ला सर करण्यासंबंधी मुरारराव याचे (८९९-९००).

**पत्रे : ३ रे शिवाजी छत्रपति यांना**—सखाराम घाटगे, फकीरजी गाढवे व नाना फडणीस यांच्या अटकेबाबत बापूजी रघुनाथ याचे (१९९०१); इंग्रजांशी दोस्तीसंबंधी बोलणी करीत असल्यासंबंधी रघुनाथ पं याचे (९०२); शत्रूपासून हुपरी ठाण्याचे रक्षण करण्यासंबंधी (९०३); कर्नाटकात बसवलेल्या ठाण्यांची माहिती देण्यासंबंधी बाजीराव गोविंद याचे (९०४); बाजी व रुद्र मोरो हणमंत यांना निरोप देण्यासंबंधी प्रतिनिधी याचे (९०५); शत्रूचे पारिपत्य करण्याबाबत इंग्रजाशी बोलण्यासंबंधी रामचंद्र दांडेकर याचे (९०६-९०७); इंग्रजी लष्कराच्या मुक्कामासंबंधी (९०८-९०९); निवाजी नलवडे हे सर्व मजकूर सांगतील या अर्थी मालोजी निकम याचे (९१०).

## रुमाल क्र. १३१

### पुडके क्र. १—(चालू)

पत्रे—गोवा बंदरात सिंधुदुर्ग येथे पाडाव केलेल्या गलबतासंबंधी (९११); करवीरकराची कामकाजे योग्य तऱ्हेने करण्यासंबंधी महम्मद इब्राहिम मुनशी मु. पुणे यास रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (९१२); बापूजीपंत व राघोपंत हे आपल्याकडील मजकूर निवेदन करतील या अर्थी नागोजीराव घाटगे यास आप्पाजी विठ्ठल याचे (९१३); सिंधुदुर्ग व मालवण येथील आरमारासंबंधी देवजी नाईक यास (९१४); पेशव्यांच्या फौजेची फाटाफूट, संकेश्वर मठातील दीक्षित इत्यादी मंडळीस अटक इत्यादी संबंधी (९१५); जिवाजीपंत वाकनीस फौजेसह करवीरी निघाल्याबाबत आप्पाजीराव प्रतिनिधी यास खेम सावंत भोसले सरदेसाई याचे (९१६); रघुनाथराव पंडित व सदाशिव चिमणाजी यांची स्वस्थळी स्थापना करण्याबाबत, (९१७); तसेच आपले सर्वप्रकारे रक्षण केले जाईल या अर्थी व्यंकटप्पा वहिरी बहाद्दर संस्थान सूरापूर यास राजमंडळचे (९१८); कापशीकर सेनापती यांचा सरंजाम त्यांच्या स्वाधीन करण्यासंबंधी सदाशिवपंत यास बापूजी शिवराम याचे (९१९). कोंकण प्रांतातील हबशी पट्टीच्या अम्मलाबाबत आबाजीपंत यास माधवराव भगवंत प्रतिनिधी याचे (९३१). माफी मागितल्यामुळे गांव व किल्ला परत केल्यासंबंधी गजेंद्रगडकर भुजंगराव घोरपडे यास ग्रांट याचे (९४८); रायबाग येथे ठाणे घालण्याबाबत सदाशिवपंत यास भाऊ महाराज याचे (९४९); विशाळगडकर प्रतिनिधीबाईची भेट घेतल्यासंबंधी जीवराव जाधव यास श्रीकराचार्य न्यायाधीश यांचे (९५०); नारो गिरमाजी याजकडे चिठी रवाना केल्यासंबंधी (९५१); बावडेकर यानी घातलेल्या दरोड्याबाबत (९५२); महालक्ष्मीच्या दर्शनास करवीरी येण्यास छत्रपतीची परवानगी मिळण्यासंबंधी अंबाजीपंत यास नरसिंगराव घोरपडे याचे (९५३).

**पत्रे—राणी सुन्दराबाई यांना मोरो बाजीराव यांची :** चिकोडी व मनोळी तालुके करवीरकराचे असल्याचे इंग्रजास पटले असल्यासंबंधी (१९९२०); क्षेमसमाचारासंबंधी (९२१); सविस्तर मजकुराची यादी पाठविल्यासंबंधी (९२२); वसुलाच्या ऐवजांच्या याद्या पाठवण्याबाबत (९२३); निपाणीकरांकडील गावाच्या सोडचिठ्या मिळवण्याबाबत (९२४); मुंबईस गव्हर्नर याची भेट घेतल्यासंबंधी (९२५); दिनकरराव गायकवाड याना औषधोपचार चालू असल्याबाबत (९२६); पेठेतील मारवाडी यांच्या दुकानावर पडलेल्या दरोड्याबाबत (९२७).

**पत्रे—राणीसुन्दराबाई यांना इतरांची :** स्मिथ यांच्या गोवा, पंढरपूर, सोलापूर वगैरे ठिकाणच्या मुक्कामासंबंधी भाऊ महाराज याचे (१९९२८); बाळासाहेब घोरपडे व वंटमुरीकर देसाई यांच्या लष्कराने शिरढोण येथील गुरे व घोडी पळवून नेल्यासंबंधी नागोजीराव पाटणकर याचे (९२९); धारवाड येथे इंग्रजांशी कामकाजाबाबत बोलणी करीत असल्याबाबत भाऊ महाराज यांचे (९३०).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपति याना :** इंग्रजांकडून ऐवजाचे काम करुन घेत असल्यासंबंधी बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस यांचे (१९९३२-९३३); चॅपलीन यांची भेट घेत असल्यासंबंधी (९३४); अरबस्तानातील इंग्रजांच्या लढाया थांबल्यासंबंधी (९३५); वसुलाचे कामाबाबत (९३६); पुणे येथे इंग्रजांशी बोलणी केल्याबाबत मोरो बाजीराव याचे (९३७); आपल्याकडील मजकूराची यादी पाठविल्यासंबंधी रामचंद्र मल्हार व बच्याजी अनंत यांचे (९३८); पांडुरंग रामाजी यास धारवाडास पाठविल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (९३९-९४०); आंबे घाटातील रहदारीबाबत (९४१); किल्ला पन्हाळा येथील लोकांच्या पोटगीच्या खर्चाबाबत बाळाजी कृष्ण याचे (९४२); सर कलेक्टर यांच्याकडून बेळगांव मुक्कामी आलेल्या पत्रांची थैली रवाना केल्याबाबत नारायणराव रत्नाकर याचे (९४३); रहदारीचे दस्तक पाठवीत असल्याबाबत बाळकृष्ण बाबूराव याचे (९४४); आळते ठाण्यास होणाऱ्या पेंढाऱ्यांच्या उपद्रवासंबंधी नरहर गोविंद याचे (९४५-९४६); करवीर इलाख्यांतील चोरांच्या बंदोबस्तासंबंधी नारो गिरमाजी याचे (९४७).

रुमाल क्र. १३१

पुडके क्र. १—(चालू.)

**मसुदा**—गोवेकडील सरहद्दीसंबंधी पंत अमात्य यांच्या नावे गोवेकरास लिहावयाच्या पत्राचा (१९८८७).

**याद्या**—विशाळगड तनख्यापैकी इनाम गावासंबंधी (१९८८५); राचाप्पा देसाई यांच्या जिंदगीची नुकसानी, मोहोळकर यांचा कल्लोळ इत्यादि गावावरील कर्जाऊ ऐवज, इत्यादी बाबींच्या उलगड्यासंबंधी (८८६).

---

**ज. क्र. १३१, रु. क्र. १३१, पु. क्र. २, का. सं. १९९५४-२००१४ (६१).**

**सु.स. ११३० ते १२४४, इ. स. १७२९-३० ते १८४३-४४.**

**अर्ज**—करवीरकराकडून झालेल्या उपद्रवाचा बंदोबस्त करण्याबाबत एल्फिन्स्टन यास यशवंतराव-घाटगे याचा (१९९७९); हिम्मतबहाद्दरीचा सरंजाम आपल्याकडे चालविण्याबाबत बुवा साहेब छत्रपतीस उदाजीराव चव्हाण याचे (९८९).

**इनामपत्रे**—नेसरीकर शिंदे यानी गुडेवाडी हा गांव भोसले याना इनाम दिल्यासंबंधी, सुवराव व नरसिंगराव शिंदे नेसरीकर याचे (१९९८७-९८८).

**टिप्पणे**—वाकनिसी प्रकरणी आज्ञापत्रे इत्यादी करवीर सरकारकडे पाठवलेल्या कागदासंबंधी (२००११); नरतवडे हा गांव बाळाबाई आक्का यांना छत्रपतींनी इनाम दिल्यासंबंधी (०१३-०१४).

**कलमबंदी**—पेशवे व करवीरकर यामध्ये सरंजामदार, वाडीकर सावंत इत्यादीबाबत ठरलेल्या कलमा-संबंधी (१९९५४-९५६).

**पत्रे**—पेशवे व निजाम यांच्यामध्ये नगर येथे झालेल्या तहासंबंधी छत्रपतीस शेषो नारायण याचे (१९९५७); तुळोजी आंग्रे विशाळगड व बावडा याना शह देणार असल्यासंबंधी रामाजीपंत व अंतोबा यास (९५८-९५९); वरचेवर पत्र पाठविण्याबाबत बाबाजी यास दुर्गाबाई यांचे (९६३). धोंडजी वाघ याच्या पारिपत्याबाबत नागोजीराव घाटगे यास जोसेफ युटाफ याचे (९६८); रामचंद्र पाथरे यांचा वेझरेल हा इनाम गाव पूर्ववत चालविण्यासंबंधी (९६९); मुनवर दौला व अलावतखेरे खाँ यास करवीरी नोकरीसाठी पाठविल्यासंबंधी नारायणराव पाटणकर यास नवाब इंतिजाम दौला सफदरजंग याचे (९७०); खर्चाचा बंदोबस्त झाल्यावर करवीरी निघून येत असल्याबद्दल हैबतराव गायकवाड यास चतुरसिंग राजे भोसले याचे (९७१); मालवणकर हरभट अभ्यंकर यास तीर्थयात्रेसाठीं आपल्या हद्दीतून जाण्यायेण्यास परवानगी देण्यासंबंधी प्रतापसिंगराव बंदरकोची यास (९७२-९७३); त्रिवर्ग फौजेसह येण्यास तयार असल्याबाबत सुवराव पंत प्रधान यास नवाब सफदरजंग याचे (९७४); वाडीकर सावंत याजकडून मालवण बंदरी होणाऱ्या उपद्रवासंबंधी (९७५); रेडीच्या किल्ल्यातील गुराबा व गलबते सिंधुदुर्गास आणीत असताना त्यास इंग्रजानी केलेल्या अडथळ्यासंबंधी बाळाजीपंत कोल्हारकर यास बच्चाजी अनंत याचे (९७६); शीख, शिंदे, भोसले व होळकर यांनी इंग्रजाशी केलेल्या लढाईसंबंधी आबासाहेब छत्रपतीस मालजी निकम याचे (९७७-९७८); रताजीराव चव्हाण याजकडून हिम्मत बहाद्दरीचा सरंजाम घेऊन आपल्याकडे देण्याबाबत, पो. ए. यास उदाजीराव चव्हाण याचे (९९०); रताजीराव चव्हाण यास हिम्मत बहाद्दरीच्या सरंजामावरून दूर करण्यासंबंधी सदाशिवपंत वकील यास उदाजीराव चव्हाण याचे (९९१); संवदत्ती येथे दंगा धोपा केल्यामुळे जमनागिरी यास कैद केल्यासंबंधी बुवासाहेब छत्रपतीस संभाजी भीमराव याचे (९९२); भुदरगड येथील पेंढारी लोकांचा बंदोबस्त करण्याबाबत बुवासाहेब छत्रपतीस नारो गिरमाजी याचे (९९३); रामापूर येथील ठाणें घेतल्यासंबंधीं बुवासाहेब छत्रपतीस मुरारराव घोरपडे याचे (९९४-९९५); एक खंडी भात पाठविण्याबाबत नारायणराव पंडित यास मोरो बाजीराव चिटणीस याचे (९९६); सुवराव घोरपडे व गव्हर्नर एल्फिन्स्टन यांची भेट झाल्याबाबत शास्त्री बाबा यांना मल्हार यशवंत याचे (९९७-९९८); निमशिरगांव येथील पट्टीच्या वसुलासंबंधी गांवकामगार निमशिरगांव यांचे (९९९); कागल व इचलकरंजी येथीस गावांच्या सोडचिठ्या

**रुमाल क्र. १३१**

**पुडके क्र. २—(चालू)**

संबंधी (२०००१); मुरारराव घोरपडे शिकारीत ठार झाल्याबाबत (००२); कागल तालुक्यास जबरीनें ठाणे घातल्यासंबंधींचा मजकूर कळविण्याबाबत (००३); करवीरकराशी गावासंबंधी असलेले खटले आपसात मिटवण्यासंबंधी नानीबाई घाटगे कागलकर यास पो. ए. याचे (००४); गजेंद्रगड येथील दिवाणी व फौजदारी कामकाजासंबंधी बेवर याना नरसिंगराव सुभेदार याचे (००५); रामराव अखबारनवीस याजकडे असलेली सरकारी भांडी परत देण्यास हुकूम दिल्याबाबत सदाशिवपंत वकील यास पो. ए. याचे (००६); करवीर सरकारच्या भांड्याबद्दल व सरंजामासंबंधी अखबारनवीस याच्या घरचा झाडा घेण्याबद्दल हुकूम पाठविल्यासंबंधी आबाजी सदाशिवपंत यास पो. ए. याचे (००७-००८); प्यादेपट्टी व मखलासीचे रुपये पाठविल्यासंबंधी शामजी देशपांडे याचे (००९); इचलकरंजीकर घोरपडे यानी दत्तकाबद्दल द्यावयाच्या नजराण्यासंबंधी पो. ए. यास बाजीराव बाळाजी चिटणीस याजकडून (०१०); उत्तर कार्यासाठी पाठविलेले रुपये पोचल्याबाबत राधाबाई घोरपडे हिचे (०१२).

**पत्रे—राणी जिजाबाई यांना शेषो नारायण यांची :** माधवराव प्रधान यास करवीरकराकडून पेशवाईची वस्त्रे व शिक्का मिळण्यासंबंधी (१९९६०); येलूरकर जाधव यानी रामचंद्र जाधव यांची धरून ठेवलेली घोडी सोडून देण्याबाबत (९६१); तिसरे शिवाजी यांच्या राज्यारोहणासंबंधी (९६२).

**पत्रे—३ रे शिवाजी यांना इतरांची :** बंगालहून जाबसालाची डाक आली नसल्याबाबत रघुनाथ पं याचे (१९९६४); काळोपंत यास कामानिमित्त ठेवून घेतल्यासंबंधी श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी याचे (९६५); सखाराम घाटगे सर्जेराव यांची भेट झाल्यासंबंधी प्रीतीराव चव्हाण याचे (९६६); रामचंद्र जोशीराव यानी लिहिल्याप्रमाणे लष्करांत पत्रें लिहिली असल्यासंबंधी माधवराव निकम याचे (९६७).

**पत्रे—राणी सुन्दराबाई यांना इतरांची :** मुंबईहून इंग्रजांकडून थैलीचे उत्तर पाठविल्यासंबंधी (१९९८०); भोज प्रकरणी भोवरगांवच्या साक्षीदाराच्या शोधासंबंधी मोरो बाजीराव चिटणीस याचे (९८१); पट्टाभिषेक शिक्का चालू करण्याबाबत इंग्रजांशी बोलणी चालू असल्यासंबंधी (९८२); स्वरुपजी क्षीरसागर मृत्यु पावल्याबाबत (९८३), गंगाधर शास्त्री व पंत प्रधान यांची भेट झाल्याबाबत भाऊ महाराज यांचे (९८४-९८५); गोपाळराव नाईक याजकडे सरदेशमुखीचा ऐवज देऊन एकनिष्ठपणे सेवा करीन याविषयी बाबाजी घोंडदेव याचे (९८६).

**यादी पत्र**—लूटमार करणाऱ्या लोकांस शासन करण्यासंबंधी बुवासाहेब छत्रपतीस सदाशिवपंत वकील याचे (२००००).

---

**ज. क्र. १३२, रु. क्र. १३२, पु. क्र. १, का. सं. २००१५-२००८१ (६७).**

**सु. स. ११६० ते १२६१, इ. स. १७५९-६० ते १८६०-६१.**

**आज्ञापत्रे**—कामकाजे करून कृपेस पात्र व्हावे या अर्थी सेनाखासखेल शंकरराव शिंदे यास तिसरे शिवाजी यांचे (२००३५); सतीबंदीसंबंधी राणोजी दळवी व हणमंत आबाजी किल्ले पन्हाळा यास राजमंडळचे (०३९); फिर्यादीच्या चौकशीसंबंधी राजमंडळचे (०६१); सावगांव, यळगूड, लिंगनूर वगैरे ठिकाणी गुंडो जिवाजी कुलकर्णी यास छत्रपतीनी जमीन इनाम दिल्यासंबंधी (०६३).

**कलमबंदी**—सखाराम घाटगे, निपाणीकर, सावंतवाडीकर इत्यादीबाबत करवीरकर व इंग्रज यामध्ये ठरलेल्या कलमासंबंधी (२००३७).

**टिप्पणे**—कागलकर सखाराम घाटगे व वामनराव मिरजकर याना मिळालेल्या सरंजामासंबंधी (२००२६); सातारकरांच्या रत्नागिरी येथील अम्मलासंबंधी (०३६).

## रुमाल क्र. १३२

### पुडके क्र. १—(चालू)

**पत्रे**—कुसाबाईस पुत्र झाल्यासंबंधी विठ्ठल सुन्दर यास जिजाबाई याचे (२००१५); धारवाड येथील मोहिमेबाबत आईसाहेब याना बाबाजी गजेंद्रगडकर याचे (०१६-०१७); सिंधुदुर्ग येथील देवास पाठविलेली वस्त्रे व दागिने पोचल्यासंबंधी तसेच इंग्रजांच्या आरमारी हालचालीसंबंधी, छत्रपतीस चि. आबा याचे (०१८-०१९); नबाब किवलेगाही यांच्या भेटीसंबंधी छत्रपतीस रामचंद्र केशवराव याचे (०२०); सरकारी कामासाठी स्वार व पायदळ यांची भरती करण्याच्या कामी रत्नाकरपंत राजाज्ञाकडून झालेल्या अडथळ्यासंबंधी तिसरे शिवाजी याना (०२१); कर्जाऊ ऐवजाची रक्कम पाठविण्याविषयी निंबाजी हवालदार यास जानराव जाधव याचे (०२२); पेशव्यांच्याकडे २ लक्षाचा मुलूख देण्याबाबत नाना फडणीस याच्याशी केलेल्या बोलण्यासंबंधी (०२३); फौजेसुद्धा महाराजांच्या मदतीस येण्याबाबत नबाब मुल्केजहां यास चतुरसिंग भोसले याचे (०२४-०२५); पुण्याहून बहिरजी गायकवाड यानी पाठवलेले पत्र पोचल्यासंबंधी पंडित रत्नाकरपंत राजाज्ञा यास गुजाजी गायकवाड याचे (०२७-०२८); होळकरांची पुण्यावरील स्वारी व पेशव्यांच्या वसई, महाड, सुवर्णदुर्ग येथील हालचालीसंबंधी हैबतराव गायकवाड यास सुभानजी निकम व हणमंत शिंदे यांचे (०२९); पेशव्यांकडून करवीरकराची कामकाजे करवून देण्यासंबंधी बापूनाना यास रामचंद्र जोशीराव याचे (०३०); बंगाल सरकारकडे सिद्दी लोक पाठविण्याबाबत नागोजीराव घाटगे यास देवी नाईक याचे (०३१-०३२); छत्रपतीकडून आलेली पत्रे पाठविण्याबाबत नागोजीराव घाटगे यास व्यंकटराव नलवडे याचे (०३३); रामचंद्रपंत दांडेकर हे सर्व वृत्तांत सांगतील या अर्थी तिसरे शिवाजी याना देवी नाईक याचे (०३४); गव्हर्नर यांच्या दौऱ्यासंबंधी नंतर कळवीत असल्याबाबत आबासाहेब व बुवासाहेब छत्रपती याना भाऊ महाराज यांचे (०३८); प्रसिद्धगड, विशाळगड इत्यादी ठिकाणच्या बंडवाल्यांविषयी (०४०-०४१); आप्पाजीराव नाईक निंबाळकर यांच्या ऐवजाच्या जाबसालासंबंधी व इतर कामासंबंधी इंग्रजांशी बोलणी करीत असल्याबद्दल सुन्दराबाई याना दिनकरराव याचे (०४२); रामराव अखबारनवीस याना विशाळगडावर सोडण्याबाबत आप्पाजीराव जाधव जप्तनमुलुख यास बुवासाहेब छत्रपतींचे (०५१); इंग्रज लष्कराचा मुक्काम येडूर येथे असल्याबाबत मल्हारपंत यास गोपाळ रघुनाथ याचे (०५२); दुतर्फा अम्मल असलेल्या गावी एकतर्फी अम्मल करण्याप्रकरणी शिवराम दामोदर यास, माधवराव प्रतिनिधी यांचे (०५३-०५४); बाजांचे तार्फे पाठवल्यासंबंधी आप्पाजीराव जाधव जप्तनमुलूख व मानसिंगराव घोरपडे याचे (०५५); करोसी नजिक इंग्रजी लष्कराचा मुक्काम असल्यासंबंधी मल्हारपंत सुभेदार यास सखोजी महाडीक याचे (०५६); इंग्रज अधिकाऱ्यांच्या मुक्कामात हत्ती, उंट व बैल पाठवल्याबाबत सखाराम देशपांडे याचे (०५७); संवदती येथील मठ संस्थानच्या वहिवाटीबाबत करवीरकर वकीलास पो. एजंट याचे (०५८-०५९); राघोपंत याजबरोबर पाठविलेली पत्रे छत्रपतीना सादर करण्याबाबत नारोपंत नाना यास आप्पाजी विठ्ठल याचे (०६०).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपती यांना :** आज्ञेप्रमाणे पोषाख व जिन्नस पाठवीत असल्यासंबंधी जयसिंगराव घाटगे याचे (२००४३); आईसाहेब यांच्या पत्री लिहिलेल्या मजकुरावरून निवेदन होईल या अर्थी राणोजी शिंदे याचे (०४४); रामपूरच्या ठाण्यास लोक पाठवल्याबाबत सखाराम माणकेश्वर देशपांडे याचे (०४५); फौजेच्या खर्चास पाठविण्याबाबत आप्पाजीराव जाधव व मानसिंगराव घोरपडे यांचे (०४६); कावडे ठाणे स्वाधीन झाल्याबाबत लहुजी पोवार याचे (०४७); फौजेसह वडणगे मुक्कामी निघून येत असल्यासंबंधी आप्पाजीराव जाधव याचे (०४८); आंबे घाटातील चोर व दरोडेखोरांना पकडल्यासंबंधी बाळाजी कृष्ण याचे (०४९); विशाळगड जहागिरीच्या कारभारासंबंधी महादाजी वल्लाळ याचे (०५०).

**प्रकरणी कामे**—पाटणकर व घाटगे यांच्या नरतवडे गावासंबंधीच्या हक्काबाबत (२००६६-०८१).

**याद्या**—बावडा व विशाळगड बाबतच्या सनदापत्राविषयी (२००६२); आंबाजी बाकनीस यास दिलेल्या इनाम जमिनीसंबंधी (०६४).

**वतनपत्र**—लिंगनूर येथील ज्योतिषीपणाचे वतन छत्रपतींनी गुंडो जिवाजी ज्योतिषी यास दिल्यासंबंधी (२००६५).

---

**ज. क्र. १३२, रु. क्र. १३२, पुडके क्र. २, का. सं. २००८२-२०१५२ (७१).**
**सु. स. ११६० ते १२९४, इ. स. १७५९ ते ६०/१८९३-९४.**

**अर्ज**—आपणास मोकासा इनाम असलेल्या गांवाबावत वसूल न घेण्यासंबंधी पो. सुप. यास बाजोलेकर भोई लोक यांचा (२०१२६).

**आज्ञापत्रे**—शत्रूचे पारिपत्य करावयास येणाऱ्या इंग्रज फौजेस अडथळा न करण्याबाबत रामचंद्रपंत यास करवीरकरांचे (२००९१); कनवाड येथील कुलकर्णीपणाचे वतन शेख महमूद यास दिल्याबाबत रावसाहेब निंबाळकर यास राजमंडळाचे (१२३).

**इजित (इजत) खत**—वडगांव येथील न्हावीपणाच्या वतनाबाबत पारोजी कासीद यास बसाजी व बाबु सूर्यवंशी यानी लिहून दिलेले (२०१०१-१०३).

**टिप्पणे**—सखाराम घाटगे तोरगलकर याच्या कामासंबंधीच्या कागदपत्राचे (२०१३२).

**पत्रे :** आपल्या मुलांच्या लग्नकार्यासंबंधी मानाप्पा मोहिते हंबीरराव यास नागोजीराव घाटगे याचे (२००८७); सावंतवाडीकरांच्या तालुक्याच्या सोडचिठ्ठ्यासंबंधी प्रीतिराव चव्हाण यास बाबूराव नरसिह याचे (०८८); आप्पाजीपंत हे इकडील मजकूर सांगतील या अर्थी रामचंद्र जोशीराव यास सखाराम घाटगे याचे (०८९); शत्रूच्या पारिपत्याबावत रामचंद्र दांडेकर यास रत्नाकरपंत राजाज्ञा याचे (०९०); वेलस्ली याजकडे आपले काही कामकाज असल्यास कळविण्यासंबंधी रामचंद्रराव जोशी यास इंग्रज अधिकाऱ्याचे (०९२); इंग्रजांशी कामकाजासंबंधी बोलणी केल्याबावत छत्रपतीस रघुनाथ पै याचे (०९३-०९४); कोकण प्रांताच्या हवशीपट्टीबाबत आबाजी पंत यास माधवराव प्रतिनिधी याचे (१११-११२); इंग्रज सरकारशी एकनिष्ठ राहू या अर्थी दिनकरराव आप्पा यास उदाजी घाटगे याचे (११५); रताजीराव चव्हाण यानी छत्रपतीशी केलेल्या गैरवर्तणुकीसंबंधी भाऊ जोशीराव यास चिंतामण पांडुरंग याचे (११६-११८); कराराप्रमाणे ऐवज त्रिंबकपंत यांच्याकडे देत असल्याबाबत (११९); एकसालीचा ऐवज बापोजी यास देत असल्याबाबत बापूजीपंत यास उदाजीराव घाटगे याचे (१२०); क्षेमसमाचारासंबंधी यशवंतराव घाटगे यास आण्णाजी सखाराम यांचे (१२१); भाजी, गूळ, ऊस इत्यादी जिन्नस पोचल्यासंबंधी कुसाप्पा माने यास सखाराम घाटगे याचे (१२४), आनंदराव बाजी शिंदे, मुरारराव कदम इत्यादी सांगतील त्याप्रमाणे कार्यसिद्धी करण्याबाबत आनंद रावजी मंत्री याना यादवराव कदम याचे (१२५).

**पत्रे—राणी जिजाबाई याना शेषो नारायण यांची :** पेशवा माधवराव व रघुनाथराव यांच्यामधील युद्धासंबंधी (२००८२-०८३); पेशवे व निजाम तसेच होळकर व सुजाउद्दौला व रजपूत यामधील लढायांसंबंधी (०८४-०८५); तिसरे शिवाजी यांच्या राज्यारोहणासंबंधी पेशव्याना संतोष वाटल्याबाबत (०८६).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपती याना :** आपला परामर्ष घेण्यासंबंधी जिऊबाई भानू हिचे (२०१०४); गावोगावच्या वसुलासंबंधी होणाऱ्या उपद्रवाबावत भाऊ महाराज यांचे (१०५); बावडेकर यांच्या इसपुर्ली येथील मुक्कामासंबंधी सुन्दराबाई घाटगे याचे (१०६); सुन्दराबाई घाटगे यांच्या जावसालासंबंधी कमालखान पन्नी यमगरणीकर याचे (१०७); चिचलीचे ठाणे स्वाधीन झाल्याबाबत भरमाप्पा सिदाम जाधव व रावजी भरमदेव देसाई प्रांत रायबाग यांचे (१०८); सावकाराकडील गहाण दागिने सोडवण्याबाबत बाळाजी बाजीराव व मोरो बाजीराव चिटणीस यांचे (१०९-११०).

**पत्रे—राणी सुन्दराबाई याना मोरो बाजीराव यांची :** नेसरीकर, इचलकरंजीकर वगैरेना आपसात तंटा न करण्याबाबत ताकीद होण्यासंबंधी (२००९७); भोजचे ठाणे परत मिळविण्याविषयी इंग्रजांशी झालेल्या बोलण्याबाबत (०९८-०९९); आईसाहेब यांच्या पत्री सेनाखासखेल यांच्या कामाबाबत लिहिल्यासंबंधी आबासाहेब याना दिनकरराय याचे (१००).

**पत्रे : (फारसी भाषेतून भाषांतरीत झालेली)**—मोगल, निजाम इत्यादी राज्यकर्त्यांनी छत्रपतीना लिहिलेल्या पत्रांचे महिपतराव पारसनीस यानी केलेले भाषांतर (२०१३३-१५२) (अपूर्ण).

**प्रकरणी कामे**—विशाळगडच्या सरंजामाविषयी (२०१२७-१२९); देसाई देशपांडे व नाडगौडे यांच्या वतनी जमिनी विक्रीस पात्र आहेत की नाहीत यासंबंधी (१३०-१३१).

**रुमाल क्र. १३२**

**पुडके क्र. २--(चालू)**

**मसुदा**--वाडीकर सावंताकडून कंपनी सरकारच्या जहाजांना होणाऱ्या उपद्रवाबावत नागोजीराव घाटगे याने इंग्रजांस लिहावयाच्या पत्रासंबंधी (२००९५-०९६).

**याद्या**--प्रतिनिधी घराण्यातील स्त्रियांना ठरवून दिलेल्या नेमणुकासंबंधी (२०११३-११४).

**वतनपत्र**--शेख महमूद समशेर यास कनवाड येथील कुलकर्णीपणाचे वतन करून दिल्याबावत राजमंडळाचे (२०१२२).

---

**ज. क्र. १३३, रु. क्र. १३३, पु. क्र. १, का. सं. २०१५३-२०२१४ (६२.)**

**सु. स. ११२७ ते १२४७ इ. स. १७२६-२७ ते १८४६-४७.**

**आज्ञापत्रे**--वृत्तीविषयक हक्क दिल्यासंबंधी व्यंकटाद्रि वैद्य यास शंभु छत्रपतीचे (२०१५३); वावाजी व्यंकटराव शिंदे यास सेनाखासखेलचा मामला सांगितल्यासंबंधी, यास (२०५); राणोजी पाटील मतकेकर याच्या भाऊबंदी तंटयासंबंधी, मतेखान पाटील यास राजमंडळाचे (२०६).

**टिपण्णे**--विशाळगडकर प्रतिनिधि व निकम देसाई यांच्या सरंजामाविषयी (२०२००); करवीर राज्यातील सरंजामदारांच्या भाऊबंदी वाटणीच्या चालीबावत (२०१).

**पत्रे**--स्वामी सेवा करण्याचा निश्चय असल्याबावत मा. आईसाहेब याना महीपतराव आवजी याचे (२०१५४); आज्ञेप्रमाणे विजयादशमीसाठी सुबराव घोरपडे याना करवीरी पाठवल्याबावत बाईसाहेब याना राणोजी घोरपडे यांचे (१५५); मुलीच्या लग्नासंबंधी आईसाहेब यांना गोविंदजी शिंदे याचे (१५६); नरगुंद येथे सेनाखासखेल व आप्पाजी बल्लाळ यानी हरिपंत आप्पाची भेट घेतल्यासंबंधी आईसाहेब याना शेषो राम याचे (१५७); पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तास मालकम येत असल्यासंबंधी (१५८); जानराव काका यांच्याशी झालेल्या बोलण्याची खातरजमा झाल्यावर येत असल्याबावत रत्नाकरपंत राजाज्ञा यास विश्वासराव घाटगे याचे (१६९); करवीर राज्यास पेशव्यांचेकडून होणाऱ्या लष्करी उपद्रवाबावत गव्हर्नर मुंबई यास यशवंतराव शिंदे याचे (१७०); शत्रूनी घेतलेली करवीरकरांची मनोळी वगैरे ठाणी परत मिळण्याबावत बाळाजीपंत यास नागोजीराव घाटगे याचे (१७१); आज्ञेप्रमाणे गुंडोपंत यास करवीरी पाठविल्यासंबंधी सरखवास यास लक्ष्मणराव शिंदे याचे (१७२); भेटण्याची इच्छा असल्याबावत कोन्हेरे तिमाजी यास मुरारजी हिंदुराव घोरपडे याचे (१७३); सखारामपंत याचे लष्करासह कूच झाल्यावर छत्रपतींच्या भेटीस येण्याबावत (१७६); थोंडजी वाघ याच्या तोरगल तालुक्यास फौजेचा उपद्रव होऊ न देण्याबावत (१७७); लष्करी कुमक सत्वर पाठविण्याविषयी हैदरअल्ली यास पाठविल्याबावत (१७८); सविस्तर मजकूर सांगून करीमखान यास पाठवल्याबावत यशवंतराव शिंदे याचे (१७९); लक्ष्मण मनोळी याच्या मनोळी येथील मालोजी घोरपडे यास मखलीशान याचे (१८०); देण्याघेण्याच्या व्यवहारासंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यास शंकरराव शिंदे सेनाखासखेल याचे (१८१); कंपनी सरकारच्या कर्जाऊ देणे असलेल्या ऐवजासंबंधी गव्हर्नर मुंबई यास यशवंतराव शिंदे याचे (१८२-१८३); चतुरसिंग भोसले व बंडवाले यांच्या शोधार्थ फौज रवाना झाल्याविषयी (१८५); चॅपलीन बरोबर बोलणी करून येत असल्याबावत सुन्दराबाई याना मोरो बाजीराव याचे (१८७); नंदवाडकर पाटील याची सुटका करण्यासंबंधी आईसाहेब यांना शंकरराव शिंदे याचे (१८८); खोची गाव आपल्या स्वाधीन करण्याबावत भाऊ महाराज याना लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल याचे (१८९); चॅपलीन बरोबर बोलणी करून येत असल्यासंबंधी छत्रपतीस मोरो बाजीराव याचे (१९०); नानासाहेब घाटगे यांचा वकील धारवाडास ठेवण्यासंबंधी चॅपलीन यास जयसिंगराव घाटगे याचे (१९६); करवीरकरांच्या कामकाजासंबंधी मोरोपंत दादा व बाळाजीपंत याना नरसिंगराव शिंदे याचे (१९७); तोरगल सरहद्दीच्या तंटयासंबंधी लक्ष्मणराव वैद्य तोरगलकर यास राधाबाई रामदुर्गकर हिचे (२०२); नागनूर गावाबावत द्यावयाच्या मक्ताखंडणी बावत सदाशिव भट कोडोलीकर यास तुळजाजीराव घाटगे याचे (२०७); गदग येथील मोकासबावेचा चौथाईचा ऐवज

रुमाल क्र. १३३

पुडके क्र. १—(चालू)

पत्रे—(चालू)

व्यंकटराव शिंदे याजकडे देण्याबाबत व्यंकटाद्रि श्रीनिवास देसाई यास (२०२०८); सुभानराव शिंदे सेनाखासखेल यास मोकासबाबेचा चौथाई ऐवज मुरळीतपणे देण्याबाबत जयंती व्यंकटाद्री देसाई यास (२०९-२१०); नावली, नेवापूर वगैरे १० गावांचा वसूल सुभानराव शिंदे सेनाखासखेल याजकडे देण्याबाबत श्रीनिवास व्यंकटाद्री देसाई यास (२११); वेलूर किल्ल्याच्या किल्लेदारीची सनद व हजार स्वारांची मनसब मिळवण्यासंबंधी छत्रपतीस मूर्तजाखान किल्लेदार याचे (२१३).

पत्रे—३ रे शिवाजी यांना : आज्ञेप्रमाणे तोरगलास आल्यासंबंधी शंकरराव शिंदे सेनाखासखेल याचे (२०१५९); माणकाप्पा नाईक वाडेकर याने आपल्याविषयी खोटी माहिती गव्हर्नर यास दिल्यासंबंधी रघुनाथ पै याचे (१६०-१६१); आंबे पाठवल्याबाबत महमद हशम जहागिरदार जुने तोरगल याचे (१६२); सरंजाममुद्दां मुरगुडास येण्यास झालेल्या आज्ञेबाबत लक्ष्मणराव व गिरधरराव शिंदे याचे (१६३-१६४); गुंडोपंत यास करवीरी पाठविल्याबाबत लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल याचे (१६५); पुणे येथील खर्चाच्या बंदोबस्ताबाबत गुजाजी गायकवाड याचे (१६६-१६७); आज्ञेप्रमाणे तोरगलास आल्या संबंधी लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल याचे (१६८).

पत्रे—बुवासाहेब छत्रपती याना : पटवर्धन यांच्या तालुक्यावर स्वारी न करण्यासंबंधी नारो गिरमाजी याचे (२०१९१); इचलकरंजी नजीक लष्कराचा मुक्काम केला असल्यासंबंधी आप्पाजीराव जाधव व मानसिंगराव घोरपडे यांचे (१९२); कावणे गांवच्या वसुलासंबंधी लहूजी पोवार याचे (१९३-१९४); स्वामी सेवेत अंतर होणार नाही या अर्थी वकिलांचे (१९५).

प्रकरणी कामे—लक्ष्मण राघोली इत्यादीकडे वझोले हा गांव पूर्ववत चालण्यासंबंधी (२०२०३-२०४).

मसुदा—कंपनी सरकारच्या तारवास गैरसमजुतीने पकडल्याबाबत छत्रपतीनी मुंबईकरास लिहावयाच्या पत्रासंबंधी (२०१८४); तोरगलच्या काजीच्या इनाम जमिनीबाबत तेथील अम्मलदारास ताकीद केल्याबाबत सदर काजी यास पाठवावयाच्या पत्रासंबंधी (१८३).

याद्या—सादुल्लाखान, मालवण, सावगांव, इंगळी इत्यादीबाबत इंग्रजांशी झालेल्या बोलण्यासंबंधी (२०१७४-१७५); किल्ले रांगणा येथील वाडीकर सावंत यांच्या दुतर्फा अम्मलाबाबत (१९८-१९९); गणोबा नाईक सरदेसाई याच्या वतनी व इनामी हक्कासंबंधी (२१२); शिरोळ इत्यादी गावी केसोपंत गोखले व भाऊ फडणीस याजकडे असलेल्या जमिनीसंबंधी (२१४).

---

**ज. क्र. १३३, रु. क्र. १३३, पु० क्र. २, का. सं. २०२१५-२०२५९ (४५).**

**सु. स. ११४९ ते १२९९, इ.स. १७४८-४९ ते १८९८-९९**

आज्ञापत्रे—मुलतानराव निंबाळकर यांच्या सरंजामातील भोईरे इत्यादी गाव सोडून देण्याबाबत रघोत्तम हैबतराव यास तिसरे शिवाजी याचे (२०२२५); मेतके हा गांव कृष्णाजी राणे व गंगाजी खतकर यांच्या स्वाधीन करण्याबाबत नारायण पिसाळ यास छत्रपतीचे (२२८).

उतारा—नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ यानी शंभू छत्रपतीस लिहून दिलेल्या करारातील नरगुंदकर शिंदे यांच्यासंबंधी (२०२१४-२१६).

कलमबंदी—सखाराम घाटगे सर्जेराव याच्यासंबंधी झालेल्या कराराबाबत (२०२२०-२२१).

पत्रे—शेपो नारायण वगैरे संबंधी पेशव्यांशी झालेल्या करारासंबंधी जिजाबाई याना महादेव भट कोंडेकर याचे (२०२१७-२१९); आंबे पाठविल्यासंबंधी लक्ष्मणराव शिंदे याचे छत्रपतीस (२२२); पेशवेपदाची वस्त्रे देण्यासाठी साताऱ्यास जाण्याप्रकरणी तिसरे शिवाजी याना गुजाजी गायकवाड याचे (२२३-२२४); पटवर्धनांच्या फौजेने सुरपूर भागात केलेल्या धामधुमीबाबत रघुनाथ सदाशिव याचे (२२६); चिकोडी व मनोळीबाबत इंग्रजांशी चाललेल्या बोलण्यासंबंधी सुन्दराबाई याना भाऊ महाराज याचे (२२७); संस्थान मठ करवीर येथील चांदीची काठी व चवरी यांच्या रिवाजाबाबत पो. एजंट यास छत्रपतीचे (२३५-२३६) छत्रपतींची कामकाजे दक्षतापूर्वक करीत असल्यासंबंधी उदाजीराव

रुमाल क्र. १३३

पुडके क्र. २—(चालू)

**पत्रे**—(चालू)

घाटगे यास नागो गिरमाजी याचे (२०२३७); चितामणराव आप्पा याचो भेट घेणार असल्यासंबंधी सदोवा आवा यास विश्वासराव घाटगे याचे (२३८-२४०); शिवाजी अनंत व सदाशिव लक्ष्मण यास करवीरी पाठवून देण्यावावत बाळाजी निकम व मोरो चिटको याचे (२४१); धारवाड येथे इंग्रजाशी आपल्या कामासंबंधी बोलण्यावावत वकिलास सांगण्याविषयी रावसाहेव निंवाळकर यास संभाजीराव घोरपडे याचे (२४२); करवीरकर व दौलतराव शिंदे याच्यातील पत्र व्यवहारासंबंधी (२४३-२४४); करवीरकरास मिळावयाच्या गावासंबंधी व इतर वावीसंबंधी आत्माराम जाधव याचे (२४५-२५१); छत्रपती व दिवाणसाहेव यांच्यासाठी पोषाख इत्यादी पाठविल्यासंबंधी आनंदराव मंत्री यास वायजावाई शिंदे याचे (२५२); करपेवाडी येथील दिवाणी व फौजदारी कामांच्या हक्का वावत विद्या नरसिंह भारती स्वामी यास पो. सुप. याचे (२५३).

**पत्रे—वुवासाहेव छत्रपतीस** : निपाणीकर करवीरचे मुलुखात स्वारी करणार असल्यासंबंधी मोरो वाजीराव याचे (२०२२९-२३०); पो. एजंट याजकडील कामकाजासंबंधी वकीलाचे (२३१-२३२); पंडितराव यांची भेट घेतल्यावावत लक्ष्मणराव गोविंद याचे (२३३); आज्ञापत्रे पोचल्यावावत जीवराव जाधव हवालदार याचे (२३४).

**प्रकरणी कामे**—सनदा वतनपत्रें वगैरेवर शिक्का मोर्तव करण्यासंवंधी (२०२५४).

**याद्या**—कृष्णभट, अप्पाभट गुळवणी यानी आपल्या इनामासंबंधी हजर केलेल्या सनदा पत्रासंबंधी (२०२५५-२५६); सेनाखासखेल याच्यासंबंधी चाललेल्या कामाच्या कागद पत्रासंबंधीच्या (२५७—२५९).

---

**ज. नं. १३४, रु. नं. १३४, पु० नं. १, का. सं. २०२६०-२०३१४ (५५).**
**सु. स. ११६०-१२६६, इ. स. १७५९-६० ते १८६५-६६.**

**आज्ञापत्रे**—कागल प्रांती सरंजाम दिल्यासंबंधी सखाराम घाटगे सर्जेराव यास तिसरे शिवाजी याचे (२०२६१-२६२).

**कलमबंदी**—पेशवे व करवीरकर यामधील शिरगूर, भिर्डी, एकसंबे इत्यादी गावांच्या ठरावाच्या कलमासंबंधी (२०२६३-२६४).

**जबाब**—का नेसरी येथील महाली वतनदार यानी आपणास होणाऱ्या उपद्रवासंबंधी दिलेला (२०३०२-३०३).

**टिप्पणे**—करवीरकर छत्रपतीशी माधवराव पेशवे यानी केलेल्या तहाच्या ठरावास मान्यता दिल्यासंबंधी (२०२६०); जगद्गुरु मठ संकेश्वर यांच्या करवीर भेटीसंबंधी (३०४); भगीरथगिरी गोसावी याना वारसा कामाच्या सनदासंबंधी (३१०-३११).

**पत्रे**—सादुल्लाखान याची घोडी परत करण्यासंबंधी तिसरे शिवाजी याना दिनकरराव याचे (२०२६५); परशराम रामचंद्र याच्या फौजेच्या हालचालीसंबंधी तिसरे शिवाजी याना राघो सदाशिव याचे (२६६-२६७); श्रीरंगपट्टण सरकारकडून करवीर सरकारास सहाय्य होण्यावावत नारायणराव पाटणकर यास सुवराव मोहिते याचे (२६८); विशाळगडच्या घेऱ्यात पेशव्यांची फौज उतरली असल्यावद्दल रामचंद्र जोशीराव यास आनंदराव आवाजी प्रतिनिधी याचे (२६९); परस्परांस सहाय्य करण्यासंबंधी नवाव सफदरजंग यास विमलराव श्रीनिवास निा दिलेरजंग सावनूरकर याचे (२७०); युटॉफ साहेवाशी बोलणी केल्यावावत नागोजीराव घाटगे, झुंझारराव व वापूसाहेव याना व्यंकटराव कृष्ण याचे (२७१); मतिवडे येथील घोडो वगैरे सोडून देण्यासंबंधी रत्नाकरपंत राजाज्ञा यास सिदरामराव घाटगे याचे (२७२); इंदापूर येथील देशमुखीवावत * (२७३); आपला सरंजाम गांव पूर्ववत् आपल्याकडे चालविण्याविषयी सुन्दरावाई याना शेषो नाईक याचे (२७६); इचलकरंजीकरांवावत

*अशा खुणा केलेल्या नोंदीत कोणाचे कोणास हे नमूद नाही.

**रुमाल क्र. १३४**

**पुडके क्र. १—(चालू)**

**पत्रे**—(चालू)

गव्हर्नरशी बोलणी झाल्यासंबंधी सुन्दराबाई याना बाळाजी बाजीराव चिटणीस याचे (२०२७८–२७९); कागल तालुक्यातील सात गावे कल्याण कृष्ण हिंदूराव व घाटगे यांच्या स्वाधीन करण्याबाबत सिदोजीराव निंबाळकर यास सदाशिव माणकेश्वर याचे (२८०-२८१); वेलवले वगैरे सात गांवे निपाणीकराकडून घेऊन करवीरकरांचे स्वाधीन करण्यासंबंधी, कल्याणराव कृष्ण यास दादो आनंदराव याचे (२८२); भगीरथगिरी याने संवदती गांवास दिलेल्या उपद्रवासंबंधी पो. एजंट यास छत्रपतीचे (२८३); माधवराव घाटगे व विराप्पा मूर्ती यांचे लखोटे यांच्याकडे पोचते केल्याबाबत सखाराम माणकेश्वर याचे (२९४); सिंधुदुर्गास छत्रपतींचा होणाऱ्या मुक्कामाविषयी (२९५); कंपनी सरकारने भरतपूरचा किल्ला घेतल्यासंबंधी (२९६); तोफखान्याकडील खर्चाच्या बंदोबस्ताविषयी दिनकरराव गायकवाड यास आप्पाजी बल्लाळ याचे (अपुरे) (३००-३०१); खंडाळचास गव्हर्नरच्या भेटीस जाण्यासंबंधी अहिल्याबाई याना दौलतराव घोरपडे याचे (३०७); नेसरी तालुक्यात देसाई व देशपांडे यांच्याकडे असलेल्या गावासंबंधी छत्रपतीस जीवराव शिंदे याचे (३१२); कावणे गावच्या पाटलास बेलवडेकर यानी ठार मारल्या प्रकरणी सुन्दराबाई घाटगे याना पो. एजंट याचे (३१३); करवीरहून येणाऱ्या कामाच्या थैल्या इंग्रज अधिकाऱ्याना व्यवस्थित सादर करण्याबाबत (३१४).

**पत्रे—बुवासाहेब छत्रपती याना :** नरसिंगराव घोरपडे याच्या मुलाने दत्तवाड येथे लुटालूट केल्याप्रकरणी भाऊ महाराज याचे (२०२८४-२८५); घोडे व तट्टू पाठवल्यासंबंधी नारो गंगाधर याचे (२८६); नेर्लीचा सरंजाम पूर्ववत् प्रमाणे स्वाधीन करण्याबाबत राधाबाई नेर्लीकर हिचे (२८७-२८८); हलकर्णी येथील इनाम जमिनीसंबंधी बाबाजी भीमराव देशपांडे याचे (२८९); आवकूबाई तोरगलकर कैलासवासी झाल्यानंतर रुपाजी जाधव याचे (२९०); विशाळगड प्रकरणी राघोपंत सविस्तर सांगतील या अर्थी वच्चाजी अनंत यास आप्पाजी विठ्ठल याचे (२९१-२९२).

**परिपत्रक**—सरकारी नोकरांच्या वर्तणुकीविषयी (२०३०५-३०६).

**मसुदे**—कागल तालुका हिंदुराव घाटगे सर्जेराव यांच्या स्वाधीन करण्याबाबत गव्हर्नर यास छत्रपतीनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (२०२७४); गुंडो जिवाजी कुलकर्णी यास लिंगनूर येथील कुलकर्ण वतन परत देण्याबाबतच्या आज्ञापत्रासंबंधी (२७५); डोणोली हा गाव पारसनीस यांच्याकडे इनाम असल्यासंबंधी डनलॉप यास छत्रपतीनी लिहावयाच्या पत्रासंबंधी (२९७-२९८).

**याद्या**—कऱ्हाडकर प्रतिनिधी व करवीरकर छत्रपती यांच्या भेटी बाबतच्या व पत्रव्यवहाराच्या पद्धतीविषयी (२०२७७); विशाळगडकरांस कारभाराची मुखत्यारी देणे इत्यादीसंबंधी (२९९); छत्रपतींच्या बडोदा येथील मुक्कामासंबंधी (३०८-३०९).

---

**ज. नं. १३४, रु. नं. १३४, पु० नं. २, का. सं. २०३१५ ते २०३७६ (६२).**

**सु. सं. १०८२ ते १२६६, का सं. १६८१-८२ ते १८६५-६६.**

**आज्ञापत्रे**—कर्नल वेलस्ली यास सिलसिल्याविषयी थैली पाठविण्यासंबंधी, शंकरराव शिंदे यास तिसरे शिवाजी याचे (२०३२५).

**इनामपत्रे**—बुवासाहेब छत्रपतीनी बजाबाई आक्का घाटगे याना मुडशिंगी येथे जमीन इनाम दिल्याबाबत (२०३५६).

**करार**—करवीरकर व पेशवे यामधील परस्पर संबंधाविषयी (२०३२१-३२२).

**कलमबंदी**—कागलकर व करवीरकर यांच्यामधील गावाच्या सीमांतर खटल्यासंबंधी (२०३५८-३५९).

**रुमाल क्र. १३४**
**पुडकें क्र. २ (चालू)**

**टिपणे**—संताजी घोरपडे याचा मृत्यु, राजारामाचे कर्नाटकातून महाराष्ट्रात आगमन इत्यादी संबंधी (२०३१७).

**जाहीरनामा**—भुजंगराव हिंदूराव घोरपडे याजकडे पूर्ववत्‌प्रमाणे गजेंद्रगडचा सरंजाम दिल्याबाबत पो. एजंट याचा (२०३६५).

**धर्मशासन पत्र**—बसवप्पा नाईक याने शामजी नाईक यास धार्मिक बाबीसंबंधी लिहून दिलेले (२०३१५-३१६).

**तहनामा**—सातारकरांकडील मुलुखाबाबत निजामाने करून दिलेला (२०३१८–३२०).

**पत्रे**—रघुनाथराव पंडित यांना पाठवलेल्या थैल्या व तिळगूळ त्यांच्याकडे पाठविल्याबाबत जिजाबाई याना शेषो नारायण याचे (२०३२३); धुळोजी व लिंगाजी यादव हे आपल्याकडील मजकूर निवेदन करतील या अर्थी आईसाहेब याना संभाजी शिर्के याचे (३२४); दोन तीन हजार रुपयाचा ऐवज पाठवण्याबाबत नारायणराव पाटणकर यास मीर रुमनुद्दीन हुसेनखान याचे (३२९); तोरगल सरंजामाच्या संरक्षणासंबंधी व क्षेमसमाचाराबाबत छत्रपति व आईसाहेब यांना शंकरराव व लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल यांची (३३०-३३९); रामशास्त्रीबुवा यास कावेरी तिरावर योगक्षेमासाठी गाव देण्याबाबत तंजावरकरास पंत आमात्य यांचे (३४०); तोवे व कोषाल या गावांच्या खंडणीसंबंधी प्रीतिराव चव्हाण यास (३४१); मुंबई येथील खर्चास पाटवून देण्याविषयी नाना यास माणको जिवाजी याचे (३४२); दारुगोळा इत्यादी साहित्य पाठवीत असल्याबाबत आबासाहेब व बुवासाहेब याना सुन्दराबाई यांचे (३४६); सिंधुदुर्ग येथील फत्तेमाऱ्यासंबंधी आप्पुराव यास नागोजीराव घाटगे याचे (३४७-३४८); क्षेमसमाचारासंबंधी सुन्दराबाई याना पार्वतीबाई घाटगे याचे (३४९); नंदगावचा मोर्चा उठविण्याबाबत आबासाहेब व बुवासाहेब छत्रपतीस सुन्दराबाई यांचे (३५०); खासगी मामलेकडील गल्ला कोठीस आणण्या-संबंधी व रथ तयार होताच पाठवीत असल्याबाबत आबासाहेब व बुवासाहेब छत्रपती यांना सुन्दराबाई याचे (३५१-३५२); कागल तालुक्याच्या सोडचिठ्ठ्यासंबंधी इंग्रजांशी चाललेल्या बोलण्याबाबत (३५३); नाडगौडीबाबतच्या व्हकर येथील जमिनीसंबंधी रामचंद्र यशवंत व गोपाळ धोंडी यांना जयसिंगराव घाटगे याचे (३५४); चिकोडी येथील लुटालुटीसंबंधी छत्रपतीस बच्चाजी धोंडदेव याचे (३५५); हैबतराव इंगळे यास दिलेल्या जमिनीसंबंधी सदाशिवपंत यांस यशवंतराव घाटगे याचे (३५७); विशाळगड येथील फितुरीबाबत छत्रपतीस विठ्ठल आप्पाजी याचे (३६०); नागनूरचे ठाणे घेतल्यासंबंधी छत्रपतीस लहूजी पोवार याचे (३६१); विशाळगड किल्ल्याचा बंदोबस्त इत्यादीबद्दल छत्रपतीस अमृतराव भगवंत याचे (३६२-३६४); गजेंद्रगड येथे इंग्रजी पलटण ठेवण्याबाबत भुजंगराव घोरपडे यास गव्हर्नर ग्रांट याचे (३६६-३६७); सुटून आलेल्या प्रांताच्या वहिवाटीसंबंधी बंदोबस्त करीत असल्याबाबत चि. भाऊ यास भाऊ महाराज यांचे (३६८-३७२).

**पत्रे—३ रे शिवाजी याना : (१७६०-१८१२)**—प्रभु लिंगगौडा देसाईकडून आलेल्या पत्रासंबंधी आबा याचे (२०३२६); पुण्याहून आलेल्या फौजेपासून विशाळगड व बावडा यांचे रक्षण करण्यासंबंधी आनंदराव आबाजी याचे (३२७-३२८); शिंद्यांकडे रवाना केलेल्या आज्ञापत्रासंबंधी सुभानजी साळोखे याचे (३४३); क्षेमसमाचारासंबंधी आप्पूजीराव याचे (३४४); सावंतवाडीकर यानी डंगीवरील धरून नेलेल्या घोड्यासंबंधी देवी नाईक याचे (३४५).

**प्रकरणी काम**—वासुदेव सदाशिव भट्ट व विष्णु बापू भट्ट यामधील जमिनीबाबतच्या दाव्यासंबंधी (२०३७५).

**याद्या**—रामराव अखबारनवीस याने नरसिंगराव शिंदे यास दिलेल्या उपद्रवासंबंधी (२०३७३-३७४); विठ्ठलराव शिंदे बन्नूरकर सेनाखासखेल यांच्या पुतण्याकडे नेमणुकीस दिलेल्या गावासंबंधी (३७६).

---

**अ. क्र. १३५, रु. क्र. १३५, पुडके क्र. १, का. सं. २०३७७-२०४३३ (५७).**
**सु. स. ११६० ते १२३८, इ. स. १७५९-६० ते १८३७-३८.**

**आज्ञापत्रे**—सिंदोजीराव निंबाळकर यास चिंचवड हा गांव राजमंडळाकडून इनाम दिल्याबाबत (२०३७७); सुबराव जाधव यांचा उपद्रव, बेरडांचा बंदोबस्त, तोरगलास होणारा पेशव्यांचा उपद्रव इत्यादीबाबत इंग्रजांशी करावयाच्या बोलण्यासंबंधी मोरो बाजीराव यास छत्रपतींचे (३९६-४००).

**कलमबंदी**—निपाणीकरांकडे करवीरकरांची असलेली गावे, खेडी इत्यादीबाबत झालेल्या बोलण्यासंबंधी (२०३९२-३९४); कोट करवीरकडील जावसालाच्या कलमासंबंधी (४२४) व जावसाल-संबंधी (४२५).

**टिप्पणे**—शिरोळ, अर्जुनवाड इत्यादी गावांच्या खर्चासंबंधी (२०४२६).

**पत्रे**—सिंधुदुर्गास जाणाऱ्या बोटीवरील अटक केलेल्या लोकांच्या सुटकेसंबंधी तिसरे शिवाजी याना (२०३७८); तोफखान्याकडील खर्चास रक्कम पाठविण्याविषयी बाळोजी जाधव सिंधुदुर्ग याचे छत्रपतीस (३७९); पेशवे, नाना फडणीस व इतर सरदार यांच्यामध्ये पुणे येथे झालेल्या बोलण्यासंबंधी राघो व्यंकटेश याचे छत्रपतीस (३८०-३८१); कर्जाऊ ऐवज मिळत नसल्याबाबत आईसाहेब याना लक्ष्मणराव शिंदे सेनाखासखेल याचे (३८२); इंग्रज व सावकार यांच्या कर्जाचे फेडीसंबंधी सुलतानराव जाधव यास सुलतानराव भोसले व रघुनाथराव पै यांचे (३८३-३८४); पुणे येथील पेशव्यांच्या वृत्तांतासंबंधी मालोजी निकम याचे छत्रपतीस (३८६-३८९); करवीर हद्दीतील मुलुखास गोखले यांच्या फौजेकडून उपद्रव होऊ न देण्याबाबत (३९०-३९१); पुसाळे गावचा वसूल विशाळगडाकडे जमा होण्याबाबत आबासाहेब छत्रपती याना दिनकरराव याचे (३९६).

